सत्यमेव जयते

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2015-2016

उपसंचालक, महानगरपालिका लेखा लेखापरीक्षा, उपविभाग - 2, स्थानिक निधी
लेखापरीक्षा कार्यालय, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी 2015-2016 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## वित्तीय वर्ष सन 2015-2016 वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/18/ब/मिरा-भाईदर मनपा/ले.प./2015-16/

सह संचालक (मनपालेप)
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला, रायगड भवन,
नवी मुंबई
दिनांक:

प्रति,

मा.आयुक्त,
मिरा-भाईदर महानगरपालिका
भाईदर.

मिरा भाईंदर महानगरपालिका 2015-2016 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण या कार्यालयाचे श्रीम. अमृता परदेशी, सहाय्यक संचालक तथा पथक प्रमुख (कालावधी दिनांक 26/11/2018 ते दिनांक 04/03/2018), श्री. तुषार मोरे, सहाय्यक संचालक तथा पथक प्रमुख (कालावधी दिनांक 05/03/2018 ते दिनांक 15/06/2018), श्री. वि. र. खेडकर, लेखापरीक्षा अधिकारी तथा पथक प्रमुख (कालावधी दिनांक 16/06/2018 ते दिनांक 15/07/2018) यांच्या पथकाने दिनांक 26/11/2018 ते दिनांक 15/07/2019 या कालावधीत पूर्ण केले आहे. प्रारुप अहवालाचे श्री. नितिन पाठक, उप संचालक (मनपालेप), उप विभाग - 2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी पुनर्विलोकन केले. सदर प्रारुप श्री. नितीन ना. पाठक, उपसंचालक (मनपालेप) स्थानिक लेखा निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दिनांक 19/12/2019 रोजी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर यांच्या समवेत चर्चा करुन अंतिमीकरण केले.

सदर लेखापरीक्षण कालावधीत खालीलप्रमाणे पदाधिकारी/अधिकारी कार्यरत होते.

| अ.क्र. | नाव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| 1. | श्रीम. गीता भरत जैन | महापौर | दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 |
| 2. | श्री. अच्युत हांगे | आयुक्त | दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 |

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ..................1

I PART I : भाग १ ..................3

मागील लेखा परीक्षण अहवाल ..................3

PART II ..................7

**कलम ९ अ खालील आक्षेप** ..................8

1 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प व आर्थिक स्थिती बाबत. ..................9

2 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचालित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ..................13

3 1.भाईंदर(पू) नवघर येथील सरस्वती नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.2.मिरा-रोड(पू) शांती नगर येथील शांतीनगर सेक्टर-4 बी/6 ते सेक्टर 1-डी-42 इमारती पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. ..................15

4 काजूपाडा ते हटकेश पर्यंत 1350 मि.मी.व्यासाची (ID) मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे या कामात झालेल्या अनियमितते बाबत. ..................18

5 स्थायी समितीच्या सभा प्रत्येक आठवड्यास न घेणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 73(ड) नुसार केलेल्या संविदांची माहिती स्थायी समितीस न कळविणे बाबत. ..................22

6 जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्रुत्थान अभियाना अंतर्गत गरीब झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी जनता नगर व काशीचर्च येथे घरे बांधणे या कामामध्ये झालेली अनियमितता बाबत. ..................23

7 महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24.04.2015 क्र.47 MAHARASHTRA STAMP ACT (AMENDMENT) ACT 2015 (MAH.ACT.NO.XX OF 2015) अन्वये वसुलपात्र मुद्रांक शुल्क वसुल न केलेबाबत. ..................31

8 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागांतर्गत शहरात डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके (LARVICIDE) व डास नाशके पुरवठा करणे या कामातील अनियमिततेबाबत ..................46

9 बालवाडी विदयार्थ्यांना साहित्य पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ..................50

10 महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत गरीब व गरजु महिलांना घरघंटी मशिन पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ..................53

11 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागाने अधिकारी/कर्मचारी यांना वेतन अदा करताना संबंधितांकडून पोहोच न घेणे व रु.1 किंमतीच्या मुद्रांकाची वसुली न केल्याबाबत. ..................56

**कलम ९ ब खालील आक्षेप** ..................58

12 अग्रिम रक्कम रु.6289727 चे समायोजन न झाल्याबाबत. ..................59

13 दलित वस्ती सुधारणा सन 2015-16 मधील कामात अनियमितता झाले बाबत ..................60

14 नवीन रस्ता बांधणे - मिरा रोड(पू) शांतीनगर सेक्टर नं.10 मधील सर्व सी.सी. गटार बांधणे ......................66
15 आमदार निधी सन 2015-16 मधील कामातील अनियमितते बाबत.........................................................68
16 पेणकर पाडा साईदत्त तलाव सुशोभिकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत....................................73
17 शिळफाटा येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाण्याच्या संतुलीत टाकी पासून विटावा येथील मुकुंद कंपनी पर्यंत 1590 मिमी व्यासाची शुध्द पाण्याची मृदु पोलादी जलवाहिनी अंथरणे व साकेत ते पाटलीपाडा पर्यंत 1590 मिमी व्यासाची शुध्द पाण्याची मृदु पोलादी ऊर्ध्व जलवाहिनी अंथरणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ........................................................................................................................76
18 मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत सी.आय. व डी.आय. पाईप्स 150 मि.मी. ते 600 मि.मी. व्यासाचे पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ................................81
19 भाईंदर(प)उत्तन रोड येथील मोर्वा शिवसेना शाखा ते मोर्वा शिवनेरी पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. 85
20 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी व भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयाकरिता आवश्यक हाऊसकिपींग पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ........................................................87
21 सन 2015-16 या आर्थिक वर्षातील मोबाईल टॉवरशी संबंधीत मालमत्ता कर वसुलीसाठी जलद व प्रभावी उपाययोजना न केलेबाबत. ...........................................................................................................................90
22 मालमत्ता कराचे धनादेश न वटलेबाबत..............................................................................................91
23 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तेवरील कर थकीत असलेबाबत..........................................96
24 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकळ्या जागेची कर आकारणी व थकित रक्कम वसूल केली नसलेबाबत.........................................................................................................................................98
25 अनधिकृत बांधकामावरील खर्च वसूल न केले बाबत. ...................................................................................99
26 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 1 ते 6 मधील कच्चे/पक्के नाले पावसाळ्यापूर्वी सफ़ाई व खोदाई कामे व भाड्याने यंत्र सामुग्री पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ..............................100
27 मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील बांधकाम करण्याचे काम हाती घेतलेल्या बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांनी स्थानिक संस्था कर न भरलेबाबत.........................................................................105
28 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने, स्मशाने, मैदाने व दुभाजकामध्ये सुशोभिकरण (LANDSCAPING) करणे कामात अनियमितता झाले बाबत. ...................................................................106
29 उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उदयानांना/दुभाजकांना भाडे तत्वावर पाण्याचा टँकर पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत......................................................................................................109
30 मिरा भाईंदर महानगरपालिका जाहिरात विभागाअंतर्गत जाहिरात कर व होर्डिंग्ज व जाहिरात फी वसूल न केलेबाबत. .........................................................................................................................................113
31 भाईंदर (पश्चिम) विभागाच्या बाजार वसुलीकरीता अभिकर्ता (एजंट) नेमणूकिबाबत. (दि.08/09/2015 ते दि.27/09/2016) ...............................................................................................................................115

32 मिरा भाईंदर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता इमारती, भाजी/मासळी मार्केट गाळे वगैरे यांच्या थकीत रक्कमा असलेबाबत. ....118

33 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात उपलब्ध असलेल्या 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) वाहन क्र.एम एच 04 एफ़ बी 2425 या वाहना करिता नविन टायर खरेदी करणे या कामात झालेल्या अनियमितते बाबत. ....121

34 महानगरपालिका मधील महिला व बालकल्याण अंतर्गत बालवाडयामधील विदयार्थ्यांना सकस आहार पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ....122

35 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना बुट व मोजे वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ....126

36 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना वह्या वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ....129

37 सन 2014-15 या आर्थिक वर्षाकरिता स्टेशनरी, विविध प्रकारची नमुने छपाई, बोर्ड बॅनर छपाई करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ....131

**कलम ९ क खालील आक्षेप ....135**

**------------------- निरंक ------------------- ....136**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....138**

38 द्विनोंद पध्दतीने (DOUBLE ENTRY) लेखे ठेवणे तसेच राष्ट्रीय लेखासंहिता (NMAM) प्रमाणे लेखा कार्यपध्दतीच्या अंमलबजावणी बाबत ....139

39 सामान्य प्रशासन विभागाकडील व लेखा विभागाकडील सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी खात्यामधील रक्कमांच्या तफावतीबाबत. ....140

40 मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथील घनकचरा ठिकाणी पोकलन, जे.सी.बी., क्रेन, डोझर, डंपर, टोरस व माती पुरवठा करणे. ....141

41 मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागाकरिता दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तूचा वार्षिक पुरवठा करणे कामामधील अनियमितते बाबत. ....143

42 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे, प्रसिध्द करणे कामाच्या निविदेबाबत. ....146

43 अग्निशमन विभागाकरीता अत्यावश्यक साहित्य पुरविणे कामात अनियमितता झाले बाबत. ....150

44 आग सुरक्षा निधी जमेपेक्षा जास्त खर्च केलेबाबत. ....152

45 आग प्रतिबंधक व जिवसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून न घेतल्याबाबत. ....153

46 मिरा भाईंदर महानगरपालिका “नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम” अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरिता संगणक व इतर साहित्य पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमितते बाबत. ....154

47 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये, इंदिरा गांधी रुग्णालय, नगरभवन येथे स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणे या कामातील अनियमिततकबाबत.......156
48 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमि/दफनभूमि इत्यादी ठिकाणची विदयुत विषयक कामाची देखभाल व दुरूस्ती करणे कामात अनियतता झाले बाबत.......159
49 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.122 येथे फ्लड लाईट बसविणे कामात अनियमितता झाले बाबत.......161
50 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गोल्डन नेस्ट जंक्शन, दिपक हॉस्पिटल, शिवार गार्डन, कनकिया एस.के.स्टोन व सिल्वर पार्क येथील सिग्नल यंत्रणा वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे कामात अनियमितता झाले बाबत. 163
51 समाज विकास व महिला बालकल्याण विभागामार्फत बालवाडी मुलांना शालेय दप्तर, पाण्याच्या बाटल्या, बुट मोजे व गणवेश वाटप करणे कामात अनियमितता झाले बाबत.......165
52 महानगरपालिकेतील विविध विभागात वार्षिक ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.......167
53 महानगरपालिकेतील विविध विभागातील आणि विभाग यांना वार्षिक ठेका पध्दतीने वाहन पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.......170
54 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.......173
55 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 50 कोटींपेक्षा अधिक खरेदी विक्री अथवा विक्रीची उलाढाल केलेल्या व्यापाऱ्यांचे कर निर्धारण (ASSESSMENT) केले नसलेबाबत.......176
56 स्थानिक स्वराज्य संस्था कर नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून वार्षिक विवरणपत्रे मुदतीत प्राप्त न झालेबाबत...177
57 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना शालेय दप्तरे व पाण्याच्या बाटल्या वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.......180
58 मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विदर्यार्थ्यांची दि.30/09/2015 अखेर पटपडताळणी न केल्याने शिक्षकांची पदे निश्चिती झाली नसलेबाबत.......183
59 शिक्षण विभागाच्या कर्मचारी/अधिकाऱ्यांकडून प्रतिभूती न घेतल्याबाबत.......184
60 सेवापुस्तकातील नोंदी अदयावत नसल्याबाबत.......185
61 शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यामधील, खाते नोंदवही, रोजकिर्द, बँक पासबुक इ. मधील अनियमिततेबाबत.......188
62 स्थावर व जंगम मालमत्तेच्या वार्षिक पडताळणी न केलेबाबत.......189
63 मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा निहाय विविध प्रकारचे साहित्य वाटप साठा नोंदवहीतील नोंदीत व शाळेतील विदयार्थ्यांच्या हजेरीत फरक असलेबाबत.......190
64 प्रभाग समिती निहाय दैनंदिन रस्ते, गटारे सफाई करणे, एकात्मिक डास नियंत्रण करणे व कचरा गोळा करून वाहतुक करणे कामी कंत्राट पध्दतीने मजूर व वाहने पुरवठा.......192

65 वैद्यकीय विभागाकरिता औषधे, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरिता निविदा मागवणे बाबतच्या अनियमिततेबाबत. ....195
66 भिमसेन जोशी रुग्णालय भाईंदर (प.) इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे ....198
67 मिरा भाईंदर महानगरपालिका नगरभवन येथे ई-लायब्ररी सुरु करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. 200
68 मिरा भाईंदर महानगरपालिका बायोमॅट्रीक पंचिंग मशिन पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ....202
69 विकास योजना आरखडा नुसार आरक्षित केलेल्या जागांच्या भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्याबाबत. ..205
70 मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध ठिकाणी पंपिंग स्टेशन देखभाल दुरुस्तीच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत. ....208
71 विवाह नोंदणी फ़ी व शास्तीची रक्कम शासन जमा न केलेबाबत. ....213
72 मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कंत्राटी पध्दतीने सशस्त्र/बिनहत्यारी खाजगी सुरक्षा रक्षक नेमणुकीबाबत. 215
73 आस्थापना विभागाने स्वतंत्र/वेगळे रोखपुस्तक न ठेवलेबाबत....217
74 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनावरील कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी खात्यातील अनियमिततेबाबत. ....217
75 मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध विभागातील प्रशासकीय कामासाठी संगणक चालक तथा लिपिक ठेका पध्दतीने भरल्याच्या कामातील अनियमिततेबाबत....219
76 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मंजूर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत. ....221
77 जाहिरात विभागातील जमा रकमेच्या पोटकीर्द, पावत्या, चलने इत्यादींमधील अनियमिततेबाबत....227
78 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागातील सेवापुस्तकातील नोंदी अद्यावत नसल्याबाबत. ....229
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....234

**विवरणपत्रे व जोडपत्रे ....235**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | | | 78 |
| सामान्य प्रशासन | 11 | | | 71, 72, 73, 74, 75, 76 |
| नगर सचिव | 5 | | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 6, 7 | 13, 14, 15, 16 | | |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | | | 48, 49, 50 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 3, 4 | 17, 18, 19 | | 70 |
| लेखा विभाग | 1 | 12 | | 38, 39 |
| नगर रचना | | 27 | | 69 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | | | 55, 56 |
| कर निर्धारण व संकलन | | 21, 22, 23, 24 | | |
| आरोग्य | | 20 | | 64, 65 |
| भूमी व मालमत्ता विभाग | | 32 | | |
| वाहन विभाग | | | | 52, 53 |
| विधी विभाग | | | | 66 |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 8 | 26 | | 40, 41, 42 |
| भांडार | | 37 | | |
| परवाना व मंडई विभाग | | 30, 31 | | 77 |
| अनधिकृत बांधकाम प्रतिबंध विभाग | | 25 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | | | | 67, 68 |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | 2 | 35, 36 | | 57, 58, 59, 60, 61, 62, 63 |
| महिला व बालकल्याण विभाग | 9, 10 | 34 | | 51 |
| अग्निशमन विभाग | | 33 | | 43, 44, 45, 46, 47 |
| उद्यान विभाग | | 28, 29 | | 54 |

# I Part I : भाग १

## *मागील लेखा परीक्षण अहवाल*

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरीक्षण वत्ति विभागाच्या शासन निर्णय क्र. स्थानिले 1010/ प्र.क्र.26 ब/ विमा प्रशा, दिनांक 31/03/2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे लेखापरीक्षण सन 2011-12 या वित्तिय वर्षापासून सुरू करण्यात आले. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रलंबित परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**लेखापरीक्षण अहवाल वर्ष 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15.**

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | प्रलंबित परिच्छेद क्रमांक | प्रलंबित एकूण परिच्छेद |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 2,3,7,11, 12,13,14,15,16,17,18,19,20,21,22, 23, 24, 30,31,32,33,34,38,39,40,41,42,43,44, 45,46,47, 48, 49, 50,51,52,53,54,55,56,58,63, 64,65,66,67, 68, 69, 72,73,74,75,76,77,78,79, 80,81,82,92,95, 96, 97, 98,99,100,101,102,103, 104,105,106, 107,108, 109, 110,111,112,113, 114,115,116, 117,118, 119,120, 122,124,126, 127,128,129, 130, 131,132,133,134, 135, 136, 137,138,139, 140,141,142,143,144 | 108 |
| 2 | 2012-2013 | 1,3,5,7,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,24,27,28,29,30,31,32,33,36,38,39,40,41, 42,43,44, 45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60, 61,62,63,64,65,66,67,68,69,70, 71,72,73,75,76, 80, 82,83,84,85,86,87,88,89,90,92,97,98,99,100,101,103,104,105 | 84 |
| 3 | 2013-2014 | 1 ते 62 | 62 |

**2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद. (चालू लेखापरिक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)**

| परिच्छेद क्रमांक | तपशिल |
|---|---|
| 1 | महानगरपालिकेचे वित्तीय स्थितीबाबत. |

| | |
|---|---|
| 2 | महानगरपालिका आस्थापनावरील सफाई कामगारांच्या सेवा वापराबाबत व खर्चाबाबत. |
| 3 | श्री. सुनिल म्हात्रे, मुख्य सर्व्हेअर यांच्या वेतन निश्चितीबाबत. |
| 4 | श्री. हरेश लक्ष्मण पाटील, नगरसचिव यांच्या वेतन निश्चितीबाबत. |
| 5 | श्री. शिवाजी बळीराम बारकुंड, शहर अभियंता यांच्या वेतन निश्चितीबाबत. |
| 6 | श्री. दिपक खांबीत, यांच्या वेतन निश्चितीबाबत व सेवापुस्तकातील अनियमितताबाबत. |
| 7 | श्री. नितीन मुकणे, यांच्या वेतन निश्चितीबाबत व सेवापुस्तकातील अनियमितताबाबत. |
| 8 | श्री. शरद नानेगांवकर, यांच्या वेतन निश्चितीबाबत व सेवापुस्तकातील अनियमितताबाबत. |
| 9 | श्री. किरण राठोड, यांच्या वेतन निश्चितीबाबत व सेवापुस्तकातील अनियमितताबाबत. |
| 10 | श्री. सुरेश वाकोडे, कार्यकारी अभियंता यांच्या वेतन निश्चितीबाबत. |
| 11 | महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी बाहय मार्गाने ठेका पद्धतीने कंत्राट देणेच्या कामाबाबत व खर्चाबाबत. |
| 12 | आस्थापना विषयक बाबींचे परीक्षण करणारी मनपांतर्गत कार्यपध्दती अस्तित्वात नसल्याबाबत. |
| 13 | सार्वजनिक आरोग्य (घनकचरा) विभागाची यंत्रसामुग्री/वाहने पुरवठा प्रमाणके तपासणीत आढळून आलेल्या अनियमितता. |
| 14 | पर्यावरण सद्यस्थिती अहवाल खर्चाबाबत. |
| 15 | पावसाळ्यापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई व खोदाई करणे, गाळ माती वाहतूक करणेकामी आवश्यक यंत्रसामुग्री, मजूर पुरवठा व इतर साहित्य पुरवठा करणेच्या निविदे व खर्चाबाबत. |
| 16 | वर्ग २ अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता देय नसताना प्रदान केलेबाबत. |
| 17 | अग्निशमन वॉटर टेंडर चेसीसवर बॉडी बांधणेच्या खर्चाबाबत. |
| 18 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कर आकारणीच्या अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केलेबाबत. |
| 19 | एकत्रित मालमत्ता कर विभागाच्या कामातील अनियमीतते बाबत. |
| 20 | एकत्रित मालमत्ता कर विभाग - संगणक प्रणालीनुसार वसुलीतील अनियमीतते बाबत. |
| 21 | संगणक विभागातील खर्चाचे प्रमाणके व संचिका उपलब्ध न झालेबाबत. |
| 22 | एच.पी.मॉडेल नं. 3330 चे 09 संगणक संच खरेदीबाबत. |
| 23 | विकास आराखडयाची अंमलबजावणीसाठी आरक्षित जागा संपादनासाठी प्रदान केलेली TDR प्रमाणपत्र उपलब्धतेबाबत. |
| 24 | स्थानिक संस्था कर वसुलीमधील अनियमीतता व अंदाजपत्रकीय उत्पन्नातील रु.43 कोटीच्या नुकसानीबाबत. |
| 25 | आर्थिक वर्ष 2014-2015 च्या वार्षिक लेख्याबाबत. |
| 26 | पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकरिता वापरलेल्या वाहनाबाबत व खर्चाबाबत. |
| 27 | पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकरिता वापरलेल्या वाहनाबाबत व खर्चाबाबत. |
| 28 | वाहन इंधन बिलावर अकाउंट ऑपरेटिंग चार्जेस (परिचलन शुल्क) अदा केलेबाबत. |
| 29 | लेखा विभागातील लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबत. |
| 30 | लेखा विभागातील लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबत. |

| | |
|---|---|
| 31 | मोकळया जागेवरील कर वसुलीमधील तफावतीबाबात. |
| 32 | निष्काषीत कामाकरीता वापरलेल्या साधनसामुग्रीचे देयक वसुली प्रलंबित ठेवलेबाबत. |
| 33 | निष्काषीत कामी पाठविण्यात आलेल्या बिलांच्या वसूलीची रक्कम प्राप्त न झाल्याबाबत. |
| 34 | मालमत्ता कराची कमी आकारणी केल्याबाबत. |
| 35 | जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभीयान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईंदर शहराचे भुयारी गटार योजना प्रकल्पावरील खर्चाबाबत. |
| 36 | उदयान व वृक्ष प्राधिकारण विभागाकरीता ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करणे या कामातील अनियमितता. |
| 37 | उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता लालमाती, शेणखत व सफेद रेतीचा पुरवठा करणे या कामातील अनियमिततेबाबत. |
| 38 | जंतुनाशके, किटकनाशके व इतर साहित्य खरेदीतील अनियमितताबाबत. |
| 39 | घनकचरा प्रकल्पासाठी पुरवठा केलेल्या मातीच्या फोटोबाबत. |
| 40 | कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात रजा, वेतनवाढी नोंदी स्वाक्षरी करून प्रमाणित केल्या नसल्याबाबत. |
| 41 | सरळ सेवा भरती व पदोन्नती प्रकरणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत. |
| 42 | देयकातुन कपात केलेली कामाच्या विम्याची रक्कम शासकिय विमा निधीकडे भरणा करणेबाबत. |
| 43 | अग्निशमन निरीक्षण शुल्क, कपिटेशन फी रक्कमेबाबत. |
| 44 | आरोग्य केंद्रांना वितरित पावती पुस्तकांनुसार जमा रकमेचा कमी भरणा झाल्याबाबत. |
| 45 | आरोग्य विभागासाठी खरेदी केलेल्या मालाचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यामुळे विलंब शुल्काची कमी आकारणी केल्याबाबत. |
| 46 | प्रभाग क्रं.6 मधील मालमत्ता हस्तांतरणामधील अनियमिततेबबात. |
| 47 | प्रभाग क्र.05 मधील मोबाईल टॉवर्सच्या करातील वसूलीबाबत. |
| 48 | मालमत्ता करापोटी प्राप्त झालेले धनादेश न वटल्याबाबत. |
| 49 | मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराच्या वसुलीबाबत. |
| 50 | मालमत्ता कराच्या जमा रक्कमेच्या तफावतीबाबत. |
| 51 | प्रभाग क्र.5 करनिर्धारण विभागाच्या अनियमिततेबाबत. |
| 52 | संगणक विभागातील टोनरची साठा नोंदवहीतील तफावतीबाबत. |
| 53 | संगणक विभागातील खरेदी साहित्याबाबींच्या नोंदी साठा नोंदवहीत न घेतल्याबाबत. |
| 54 | भाडे तत्वावर संगणक संच उपलब्ध करून घेतलेबाबत. |
| 55 | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांर्तत "पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प" - भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर चाळघर पर्यंत नाला बांधणे (डावी बाजू) |
| 56 | कर निर्धारणाअभावी महापालिकेच्या उत्पन्नात होत असलेल्या नुकसानीबाबत. |
| 57 | अतिक्रमण विभागासंबंधी विभागस्तर व प्रभागस्तरावरील अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत. |
| 58 | नगररचना विभागाकडील आरक्षणासंदर्भात विकास हक्क प्रमाणपत्र प्रदानाबाबत आढळून |

| | |
|---|---|
| | आलेल्या त्रुटीबाबत. |
| 59 | महिला बालकल्याण विभागांतर्गत बालवाडयांना सन 2014-15 या वर्षात सकस आहार पुरविणेबाबत. |
| 60 | विविध प्रकारचे फर्निचर साहित्य पुरवठयातील अनियमिततेबाबत. |
| 61 | 2014-15 चे लेखापरीक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करणेबाबत. |

उपरोक्त नमुद केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या प्रथम पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावे.

**पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशील:-**

वरील परिच्छेदांपैकी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 2011-12 व 2012-13 वर्षाच्या पुनर्विलोकन अहवालाकरिता निवडलेल्या परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **लेखापरीक्षण वर्ष** | **परिच्छेद क्रमांक** | **एकूण** |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 03, 07, 14, 34, 38, 42, 43, 44, 56 | 09 |
| 2 | 2012-2013 | 03, 05, 07, 13, 15, 16, 19, 20, 21, 24, 32, 58, 62, 73, 88, 91 | 16 |

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

### *1 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प व आर्थिक स्थिती बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 11**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30(बी) नुसार अर्थसंकल्प तयार करताना मागील तीन वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रक्कमा, दर व करात करण्यात आलेली वाढ, महानगरपालिकेच्या मालमत्तेत झालेली वाढ वा घट, पालिका हद्दीत जमीन व इमारतीत झालेली वाढ वा घट या अनुषंगाने जमेशी निगडीत खर्चाचे अंदाज वर्तविणेत आलेले नाहीत. सन 2015-16 अखेर अग्रिम रजिस्टरप्रमाणे रक्कम रु.62,89,727/- इतकी अग्रिम समायोजित होण्याची बाकी आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम मधील कलम 140 व 141 नुसार मिळकत कर वसुलीसाठी विशेष मोहिम राबवून कर वसुल करणे आवश्यक आहे. रक्कम रु.52,02,06,226/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. अपंगांसाठी रक्कम रु.60 लाख 60 हजार खर्च करणे आवश्यक होते. तथापि अपंग योजनांसाठी 2016-17 च्या अंदाजपत्रक नुसार 2015-2016 आर्थिक वर्षात रक्कम रु.5 लाख 34 हजार खर्च केला आहे. तथापि सन 2015-16 या आर्थिक वर्षात क्रिडा विभागासाठी अंदाजपत्रकात तरतूद तसेच खर्चही करण्यात आलेला नाही. सबब शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.***

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम कलम 95, 96, 100 अन्वये अनुक्रमे मा. आयुक्त, मा. स्थायी समिती, मा. महासभा अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षासाठी आरंभीची शिल्लकेसह रु.1371 कोटी 50 लाख जमेचे (आरंभीची शिल्लक 54 कोटी 84 लाख, महसुली जमा 627 कोटी 91 लाख व भांडवली जमा रु.368 कोटी 53 लाख) व रु.1366 कोटी 26 लाख खर्चाचे (महसुली खर्च रु.356 कोटी 38 लाख व भांडवली खर्च रु.631 कोटी 95 लाख) अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र. | अंदाजपत्रक | महसुली जमा | भांडवली जमा | एकूण जमा | महसुली खर्च | भांडवली खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आरंभिची शिल्लक | 5484.08 | | | | | |
| 2 | “अ” अंदाजपत्रक | 55505.21 | 26481 | 81986.31 | 28335.15 | 49337.2 | 77672.3 |
| 3 | “ब” अंदाजपत्रक परिवहन हस्तां. | | | | | | 500 |
| 4 | “क” अंदाजपत्रक (पाणीपुरवठा) | 7286.24 | 10372 | 17658.24 | 7303.4 | 13858 | 21161.4 |
| 5 | “वृक्षप्राधिकरण” अंदाजपत्रक | | | 253 | | | 2402 |
| 6 | “महिला व बाल कल्याण” | | | | | | 394.93 |
| 7 | “अंध व अपंग कल्याण” | | | | | | 101 |
| 8 | ‘JNNURM’ अंदाजपत्रक | | | 14580 | | | 13880 |
| 9 | ‘P’ अंदाजपत्रक | | | 16700.86 | | | 18706.86 |
| 10 | “शिक्षण मंडळ” अंदाजपत्रक | | | 488 | | | 1808.5 |
| | एकूण | 62791.45 | 36853 | 131666.41 | 35638.55 | 63195.2 | 136626.99 |

1. अर्थसंकल्पात महसुली व भांडवली जमेचा अंदाज एकुण रु.1316 कोटी 66 लाख इतका वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु.517 कोटी 12 लाख महसुल जमा झाला आहे. तसेच खर्च बाजुस रु.1366 कोटी 26 लाख महसुली व भांडवली खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात महसुली व भांडवली खर्च रु.733 कोटी 53 लाख करण्यात आला आहे. अंदाजपत्रकाच्या तपासणी अंती असे दिसते की, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानंतर त्यानुसार जमेच्या रक्कमा अवास्तव वाढविण्यात आल्या आहेत. वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की अंदाजपत्रकीय जमा अंदाजाच्या 82% महसुल प्रत्यक्ष जमा झाला आहे व एकूण खर्च अंदाजाच्या 53% खर्च वर्ष अखेरीस करण्यात आला आहे. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30(बी) नुसार अर्थसंकल्प तयार करताना मागील तीन वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रक्कमा, दर व करात करण्यात आलेली वाढ, महानगरपालिकेच्या मालमत्तेत झालेली वाढ वा घट, पालिका हद्दीत जमीन व इमारतीत झालेली वाढ वा घट या अनुषंगाने जमेशी निगडीत खर्चाचे अंदाज वर्तविणेत आलेले नाहीत.

2. महानगरपालिकेचा मागील तीन वर्षाचा महसुली प्रत्यक्ष जमा व खर्च पुढीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| वर्ष | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| 2012-13 | 53404.42 | 45605.06 |

| | | |
|---|---|---|
| 2013-14 | 64975.01 | 61433.04 |
| 2014-15 | 47588.55 | 59218.09 |
| एकूण | 165967.98 | 166256.19 |
| सरासरी | 55322.66 | 55418.73 |

महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30(बी) नुसार एकुण खर्चाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजीत जमा या दोहोपैकी जी कमी असेल त्यापेक्षा अधिक असू नयेत. परंतू महानगरपालिकेच्या 2012-13 ते 2014-15 या तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु.553 कोटी 22 लाख व महसुली खर्चाची सरासरी रु.554 कोटी 18 लाख आहे. महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु.1316 कोटी 66 लाख तयार केला. प्रशासनाने मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमेची सरासरी रु.553 कोटी 22 लाख या रक्कमे इतके अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता रु.1316 कोटी 66 लाखचे तयार केले असुन रु.763 कोटी 43 लाखाची वाढ केली आहे. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकानुसार करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असणे आवश्यक असता प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही न करता त्यामध्ये नियमबाह्यरित्या वाढ केल्याचे दिसुन येते.

3. अर्थसंकल्पात भांडवली खर्चाचा अंदाज एकुण रु.631 कोटी 95 लाख इतका वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु.313 कोटी 30 लाख खर्च करण्यात आला आहे. प्रत्यक्षात भांडवली खर्च अंदाजाच्या फक्त 49 टक्के इतका खर्च कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. तर महसुली जमा रक्कम रु.517 कोटी 12 लाख असताना सन 2015-16 मध्ये महसुली खर्च एकूण जमा रक्कमेच्या रु.201 कोटी 46 लाख रक्कमेने कमी करण्यात आला आहे.

4. सन 2015-16 मध्ये भांडवली जमा प्रत्यक्षात रक्कम रु.177 कोटी 54 लाख असताना प्रत्यक्ष एकूण भांडवली खर्च रु.313 कोटी 30 लाख इतका करण्यात आला आहे. म्हणजेच भांडवली जमा रक्कमेच्या 176 टक्के खर्च झालेला आहे.

5. नियमानुसार प्रत्येक वर्षी मनपा मलाकीच्या मालमतेचे 10 टक्के भाडे वाढ केलेली नाही, त्यामुळे चालू बाजार किमती नुसार जागेचे मुल्याकंन करून तसा वेळोवेळी करारणामाही केलेला नाही. त्यामुळे लेखा परीक्षणास मनपा मालकीच्या मालमत्तेची भाडे वाढ झालेबाबतची खात्री झालेली नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उदाहरणदाखल खालील मालमत्तेचे थकीत भाडे मालमत्ता विभागाने मालमत्ता भाडेने दिल्या दिनांका पासून त्या त्या वर्षी बाजार भावानुसार भाडे निश्चित न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे.

6. मिरा भाईंदर महानगरपालिकेने आर्थिक वर्ष 2015-16 मधील पुढील रोखवहया लेखा परिक्षणास

उपलब्ध केल्या होत्या. 1) सर्वसाधारण नोंदवही, 2) भविष्य निर्वाह निधी. सदर रोखवह्या व इतर लेखे तपासणीनंतर लेखा परिक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे 2015-16 या वित्तीय वर्षात ठेवलेले लेखे राष्ट्रीय महापालिका लेखा नियम पुस्तीका (National Municipal Accounts Manual) नुसार व्दिनोंदी लेखा पध्दती (Accrual Based Double Entry Accounting System) प्रमाणे लेखे ठेवलेले नसुन टॅली पध्दतीने लेखे ठेवण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय लेखासंहीतेच्या प्रकरण 29 मध्ये लेखे बंद करण्याची कार्यपध्दती, प्रकरण 30 मध्ये ताळमेळ ठेवणे व प्रकरण 31 मध्ये वार्षिक लेख्यांबाबतची सविस्तर कार्यपध्दती विषद केलेली आहे. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7. सन 2015-16 अखेर अग्रिम रजिस्टरप्रमाणे रक्कम रु.62,89,727/- इतकी अग्रिम समायोजित होण्याची बाकी आहे. मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्र.142 नुसार प्रथम घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन झाल्याशिवाय दुसरे अग्रिम मंजूर करू नये अशी तरतूद आहे. तरी महानगरपालिकेने बऱ्याच अधिकारी कर्मचारी यांना पहिले अग्रिम समायोजन केले नसतांना दुसरे अग्रिम दिले आहे. त्यामुळे सदरील नियमाचे पालन झालेले नाही. तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 मधिल नियम 58 टिपनुसार वित्तीय औचीत्याचे पालन झालेले नाही.

8. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कर झालेल्या दिनांकापासून (दि.01/11/2012 पासून) सन 2015-16 या आर्थिक वर्षा अखेर महानगरपालिका हद्दीत असलेल्या व्यापाऱ्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील नियम क्र.3 अन्वये किंवा नियम क्र.5 च्या पोटनियम 7 अन्वये नोंदणीस किवा पात्र असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्यांनी नियम क्र.29 अन्वये नमुना ड-2 मध्ये वार्षिक विवरणपत्रे वर्षे संपल्यानंतर 15 दिवसाच्या आत तसेच आयात करीत नसलेल्या व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्र निरंक दाखवून आयुक्तास सादर करणे आवश्यक आहे. तथापि विभागाकडून उपलब्ध माहितीनुसार स्थानिक संस्था कर विभागाकडे एकूण 10686 वित्तीय वर्षे सन 2015-16 साठी कर भरणसाठी नोंदणी केली असून त्यापैकी एकूण 550 व्यापाऱ्यांनी विवरणपत्रे विभागास सादर केल्याचे दिसून येते. उर्वरित 10136 नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहित कालावधीत म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर 5000 रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम शास्ती म्हणून वसूल होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील व्यापाऱ्यांकडून शास्तीची रक्कम रु.5,000/- प्रमाणे रु.10136 x 5000 = 5,06,80,000/- एवढी रक्कम प्रत्यक्ष किंवा मालमत्ता कराचे स्वरुपात वसूल करुन महानगरपालिका निधीमध्ये जमा होणे आवश्यक आहे.

9. मिरा भाईंदर महानगरपालिका कर निर्धारण व संकलन विभाग सन 2015-16 चे लेखा परिक्षण केले असता, महानगरपालिका हद्दीतील विविध मालकीच्या 544 मोकळ्या जमिनी/जागा असून त्यांची अभिलेखे/दस्तऐवज व त्यांचे कर निर्धारण केलेबाबत लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील कर निर्धारणाबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. तरी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम

मधील कलम 140 व 141 नुसार मिळकत कर वसुलीसाठी विशेष मोहिम राबवून कर वसुल करणे आवश्यक आहे. रक्कम रु.52,02,06,226/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

10. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण-2010/प्र.क्र.146/2010/न.वि.-6, दि.30.10.2010 अन्वये अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, 1995 या कायद्यातील कलम 40 अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या किमान 3% निधी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. अपंगांसाठी रक्कम रु.60 लाख 60 हजार खर्च करणे आवश्यक होते. तथापि अपंग योजनांसाठी 2016-17 च्या अंदाजपत्रक नुसार 2015-2016 आर्थिक वर्षात रक्कम रु.5 लाख 34 हजार खर्च केला आहे.

11. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जीइएन 1098/प्र.क्र.21/98/नवि 24 दि.09/03/1998 नुसार महानगरपालिकेने आपल्या वार्षिक खर्चापैकी 5 टक्के खर्च क्रिडा क्षेत्राकरीता शासन निर्णयात नमुद केलेल्या कामांवर करणे आवश्यक आहे. तथापी अंदाजपत्रकामध्ये याबाबत तरतूद केलेली नसल्याचे दिसून येत आहे.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.129 दि.12/07/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 83, Hmm No : 129)

## ***2 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचालित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : शालेय साहित्य महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 7224641.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7217841.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6800.00/-

***सदरील कामाची मुळ निविदा नस्ती व प्रमाणके उपलब्ध न झाल्याने निविदा मंजुरी तांत्रिक व व्यवहारीक दरपत्रके यांचे दस्तऐवज व त्या अनुषंगीक अभिलेखे नसल्याने सदरील निविदा प्रक्रिया ही ई-टेंडरींग पध्दतीने झालेबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. सदर कामाची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासन निर्णय क्र. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील***

***एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.6,800/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने सदरील करारनामा मुद्रांक शुल्क न भरल्याने रक्कम रु.6,800/ वसुल पात्र ठेवण्यात येत आहे. उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. सदरील कामावर झालेला खर्च रक्कम रु.72,17,841/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. केंद्रिय सर्तकता आयोगाचे ऑफिस मेमोरॅन्डम नं.12-02-1-CTE-6 दि.17/12/2002 च्या परिशिष्ट क्र.5 ब नुसार मक्तेदाराची पुर्व पात्रता (Prequalification Criteria (PQ)) ठरविण्यासाठी लगतच्या मागील 3 वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र (Annual Report- Balancesheet, Profit and loss account), लगतच्या 2 वर्षाच्या कामाचा अनुभव व लगतच्या वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (Latest ITCC) असणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे मक्तेदाराने सादर केलेले प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने मक्तेदार सदरील परिपत्रकानुसार निविदा भरण्यास पात्र असल्याची खात्री करता आली नाही. निविदेच्या अटी व शर्ती अन्वये नमुना तपासणीचा अहवाल तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर पुरवठा आदेश निर्गमित करण्याची तरतूद होती, परंतु नमुना तपासणी करण्यात आली नाही व नमुना तपासणी न करताच पुरवठा आदेश निर्गमित केला आहे.***

प्रशासकिय व आर्थिक मंजुरी:- महासभा ठराव क्र.74 दि.23/03/2015
ई-टेंडर प्रक्रियेस मंजुरी:- आयुक्त दि.10/04/2015
कामाची जाहिरात प्रसिध्द वर्तमानपत्रे व दिनांक:- 1) यशोभुमी, 2) समाधिप्रकाश दि.16/04/2015
स्थायी समितीची मंजुरी:- न्यूनतम निविदाकार मे.मफतलाल इंडस्ट्रीज लि. ठराव क्र.14 दि.8/5/2015
करारनामा व दिनांक:- क्र.118 दि.08/06/2015
कामाचा कार्यादेश:- जा.क्र.मनपा/शिमं/299/2015-16 दि.11/06/2015 रक्कम रु.72,17,841/-

उपरोक्त बाबींचे लेखापरिक्षण केले असता, खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आहे.

1. सदरील कामाची मुळ निविदा नस्ती व प्रमाणके उपलब्ध न झाल्याने निविदा मंजुरी तांत्रिक व व्यवहारीक दरपत्रके यांचे दस्तऐवज व त्या अनुषंगीक अभिलेखे नसल्याने सदरील निविदा प्रक्रिया ही ई-टेंडरींग पध्दतीने झालेबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

2. सदर कामाची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासन निर्णय क्र. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही तसेच वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे कात्रण नस्तीत नसल्याने शासन निर्णयाचे अनुपालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3. मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या शालेय गणवेशाच्या बाजारातील दरांची पडताळणी करून यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व

त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

4. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.6,800/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने सदरील करारनामा मुद्रांक शुल्क न भरल्याने वसुल पात्र ठेवण्यात येत आहे.

5. उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. तरी उपरोक्त कामावर झालेला खर्च रक्कम रु.72,17,841/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

6. केंद्रिय सर्तकता आयोगाचे ऑफिस मेमोरॅन्डम नं.12-02-1-CTE-6 दि.17/12/2002 च्या परिशिष्ट क्र.5ब नुसार मक्तेदाराची पुर्व पात्रता (Prequalification Criteria (PQ)) ठरविण्यासाठी लगतच्या मागील 3 वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र (Annual Report- Balancesheet, Profit and loss account), लगतच्या 2 वर्षाच्या कामाचा अनुभव व लगतच्या वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (Latest ITCC) असणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे मक्तेदाराने सादर केलेले प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने मक्तेदार सदरील परिपत्रकानुसार निविदा भरण्यास पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

7. निविदेच्या अटी व शर्ती अन्वये नमुना तपासणीचा अहवाल तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर पुरवठा आदेश निर्गमित करण्याची तरतूद होती, परंतु नमुना तपासणी करण्यात आली नाही व नमुना तपासणी न करताच पुरवठा आदेश निर्गमित केला आहे. त्यामुळे मालाच्या दर्जाबद्दल खात्री न करता पुरवठा आदेश देण्यात आला आहे. तसेच शालेय गणवेश व बॅच टायसह चा पुरवठा शाळानिहाय संख्येप्रामणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या सुसचनेनुसार मुख्याध्यापक यांचे कडून प्राप्त होणाऱ्या पटसंख्येप्रमाणे प्रत्येक शाळेवर पुरवठा करावयाचा आहे. त्याप्रमाणे पुरवठा केल्याचे दस्तऐवज उपलब्ध न झाल्याने विदयार्थ्यांना शालेय गणवेश पुरवठा झालेबाबतची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.88 दिनांक 27/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 20, Hmm No : 88)

***3 1.भाईंदर(पू) नवघर येथील सरस्वती नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.2.मिरा-रोड(पू) शांती नगर येथील शांतीनगर सेक्टर-4 बी/6 ते सेक्टर 1-डी-42 इमारती पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष : नविन जलवाहिनी टाकणे महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2734100.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2734100.00/-

***जिल्हा दरसुची, मोजमाप पुस्तिका, करारनामे, सुरक्षा अनामत भरणेबाबतचे दस्ताऐवज व इतर पुरक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन | कामाचे वर्णन |
|---|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | भाईंदर (पू) नवघर येथील सरस्वती नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | मिरा-रोड (पू) शांती नगर येथील शांतीनगर सेक्टर-4 बी/6 ते सेक्टर 1-डी-42 इमारती पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.13,01,200/- | रु.14,32,900/- |
| 3 | तांत्रिक मान्यता पत्र क्रमांक | पत्र क्र.15, दि.13/5/2015 | क्र.05 दि.13/5/2015 |
| 4 | प्रशासकीय मान्यता पत्र क्र. | दि.13/5/2015 | दि.13/5/2015 |
| 5 | निविदेचा क्रमांक व दिनांक | क्र.5/4 2015-16 | क्र.5/3 2015-16 दि.16/5/2015 |
| 6 | निविदेमध्ये भाग घेण्यात आलेल्या कंत्राटदारांची नावे | मे.गणेश डेव्हलपर्स<br>मे.विंध्या ट्रेडर्स | मे.विंध्या ट्रेडर्स<br>मे.गणेश डेव्हलपर्स |
| 7 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे.गणेश डेव्हलपर्स | मे.विंध्या ट्रेडर्स |
| 8 | कार्यादेश क्रमांक व दिनांक | क्र.32/15-16 दि.13/8/2015 | क्र.49/15-16 दि.7/9/2015 |
| 9 | काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि.22/12/2015 | दि.16/11/2015 |
| 10 | कामाचा कालावधी | दि.11/6/2015 ते दि.12/1/2016 | 5 महिने, दि.7/9/2015 ते दि.6/2/2016 |
| 11 | कामाचे लेखाशिर्ष | नवीन जलवाहिनी टाकणे | नविन जलवाहिनी टाकणे |
| 12 | प्रदान करण्यात आलेल्या देयकाची रक्कम व प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम रु.13,36,073/- | रक्कम रु.13,83,337/- |

उपरोक्त कामांच्या बाबींचे लेखा परीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1)जिल्हा दरसुची

2)मोजमाप पुस्तिका

3)करारनामे

4)सुरक्षा अनामत भरणेबाबतचे दस्ताऐवज व इतर पुरक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले

नाही.त्यामुळे रक्कम रु.2734100/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.30 दि.15/01/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

STDARPF8701 (Ref No : 33, Hmm No : 30)

## *4 काजूपाडा ते हटकेश पर्यंत 1350 मि.मी.व्यासाची (ID) मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे या कामात झालेल्या अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 41051360.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 41000170.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 51190.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 98977.00/-

***कामांवर वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी केल्याचे अहवाल नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत. 398 घ.मी. साहित्य कमी वाहतूक केल्याचे दर्शवून रु.67.32 प्रति घ.मी. प्रमाणे रु.26,793.36 चे निविदा 9.97% जादा दरानुसार रु.29,466/- जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदान रक्कम वसूल करून शासन खाती जमा करावी. ठेकेदारास रु.1.43/- प्रति चौ.मी. प्रमाणे रु.19755/- चे निविदा दर 9.97% जादा दराप्रमाणे रु.21724/- चे जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करून मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावी. बाहेरून आणलेल्या मालाची गौण खनिजाची रक्कम शासनास जमा केल्याचे चलनाची प्रत नस्तीमध्ये अढळ होत नाही. गौण खनिजाची रक्कम शासनास जमा केल्याची खात्री न करता देयकाचे प्रदान करण्यात आले आहे. तरी सदर मालाची गौण खनिजाची रक्कम रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रु.98976.90/- संबंधित ठेकेदाराकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी. तांत्रिक लेखा परिक्षण करून घेणे अनिवार्य आहे. ड वर्ग महापालिकेचे बाबत 50 लाखा पेक्षा अधिक रक्कमेची कामे असल्यास त्यांचे त्रयस्थ लेखा परिक्षण करून घेणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही केल्याबाबतचे अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. महानरगपालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिका-यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्याक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही. बांधकामाबाबत कलम 38 नुसार जर परिणामाचा विचार केला तर निविदेतील एखाद्या बाबीचे परिमाणाहून 125% पेक्षा जास्त परिमाणासाठी व जर रकमेचा विचार केला तर एखाद्या बाबीकरीता निविदेत असलेल्या रकमेपेक्षा रु.5,000/- हून अधिकच्या खर्चाच्या कामासाठी (जे जास्त असेल ते) हे कलम लागू होते. अशा जास्त कामासाठी चालू जिल्हा दर सूचीपेक्षा***

***जास्त नाही अशा दराने प्रदान देय होते. त्यामुळे निविदेतील तरतुदीपेक्षा सर्व जादा खर्च अथवा 125% हून वा रु.5,000/- वरील जादा खर्च संपूर्णतः अमान्य होतो. तर फक्त निविदा दरापेक्षा जास्त दरामुळे होणारा जादा खर्च वसुलपात्र होऊ शकतो. (अंदाजपत्रक चुकीचे/ निष्काळजीपणे केल्यामुळे जास्तीच्या परिणामासाठी जादा दर द्यावा लागल्याने अन्यथा ते परिमाण निविदेत अंतर्भूत झाले असते म्हणून) त्याचप्रमाणे चालू दर सूची वापरल्याने या कलमानुसार होणा-या प्रदानावर भाववाढ देय नाही. परंतु उपरोक्त 6 वे धावते देयका अखेर बाब क्र. 7 ब नुसार खोदाईपोटी प्रदान करण्यात आलेली रक्कम रु.831875.02/- व बाब क्र.17 नुसार प्रदान करण्यात आलेली 15,85,3764.26 चे निविदा दर 4.67 टक्के दरानुसार रु.779219.35/- जादा प्रदान करण्यात आलेली आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करून मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावी.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिरिक्त 75 द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेस मा. महासभा ठराव क्र.56 दि.02/03/2015 अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. मा.महासभेने दिलेल्या मंजुरी नुसार सदर योजनेचा रु.269.62 कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला. सदर अहवालास तांत्रिक दृष्ट्या योग्य (Technical Appraisal) असल्याबाबत आय.आय.टी.मुंबई या तांत्रिक संस्थेने प्रमाणित केले आहे. तद्नंतर सविस्तर प्रकल्प अहवाल मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचालनालय वरळी मुंबई यांचे मार्फ़त राज्य शासनाच्या सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत समितीपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यानुसार रु.239.29 कोटी रक्कमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास शासन निर्णय क्र. बैठक 2015/प्र.क्र.38(1)/नवी-33 दि.26/03/2015 रोजी राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

| **अ.क्र.** | **देयकाच्या तपासणीचे विषय** | **कामाचे वर्णन** |
|---|---|---|
| 1 | कामाचे/पुरवठ्याचे नाव | काजूपाडा ते हटकेश पर्यंत 1350 मि.मी.व्यासाची (ID) मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे |
| 2 | कामासाठी/पुरवठ्यासाठी अपेक्षीत खर्च | रु.29,46,10,126/- |
| 3 | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिनांक | मा. महासभा ठराव क्र.56 दि.2/3/2015<br>मा. स्थायी समिती ठराव क्र.67, दि.5/9/2015 |
| 4 | मंजूरी प्राधिकरणाचे नाव | शहर अभियंता |
| 5 | मंजूर आदेश क्र. व दिनांक | क्र.108 दि.2/3/2015 |
| 6 | तांत्रिक मंजूरी रक्कम | रु.26,79,00,451/- |
| 7 | निविदा मागविण्यात आल्याचा तपशील | निविदा सुचना क्र.8/2015-16 अन्वये दि.23/05/2015, दै.सकाळ, दै.मिड-डे, |
| 8 | जाहिर सुचना क्र. व दिनांक | निविदा सुचना क्र. 8/2 (2015-16) |
| 9 | प्रसिध्द केलेल्या वर्तमान पत्राचे नाव व दिनांक | दै.सकाळ, लोकमत व इंग्रजी मिड-डे दि.23/5/2015 |

| | | |
|---|---|---|
| 10 | निविदा/दरपत्रके प्राप्त करुन घ्यावयाची अंतिम तारीख | दि.29/6/2015 |
| 11 | प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रकांची संख्या | तीन |
| 12 | मंजूर झालेल्या निविदा धारक/ दरपत्रक धारकाचे नाव व पत्ता | मे. कोया ॲन्ड कंपनी कंस्ट्रक्शन लि. 12-2-831/38, 72 एम.आय.जी.एच., मेहदीपटनम, हैद्राबाद 500028 |
| 13 | निविदा/दरपत्रक मंजूर करण्यात आलेला ठराव क्र./आदेश क्र. व दिनांक | मा. स्थायी समिती ठराव क्र.67 दि.5/9/2015 |
| 14 | निविदा मागविल्या नसल्यास त्याची कारणे/ तपशील | निरंक |
| 15 | मंजूर निविदा धारकास देण्यात आलेला कार्यादेश क्र. व दि. | मनपा/पापु/62/2015-16 दि.17/10/2015 |
| 16 | काम पूर्ण केल्याची/ पुरवठा केल्याची दिनांक | काम पूर्ण झालेले आहे. |
| 17 | शिर्षक नाव | अतिरिक्त 75 द.ल.ली. पाणी पुरवठा योजना |
| 18 | अंदाजपत्रकीय एकूण तरतूद | रु.20 कोटी |
| 19 | प्रदान करावयाच्या बिलाची रक्कम | रु.4,10,00,170/- |

या कामाची सहावे धावते देयकाचे लेखापरीक्षण केले असता, खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेले आहेत.

1.शासन निर्णय नुसार वापरावयाच्या साहित्याची चाचणी मान्यताप्राप्त गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून ठेकेदाराने स्वखर्चाने करावयाची आहे. अशाप्रकारच्या चाचण्या न केल्यास शासन सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्देशित केलेल्या दराप्रमाणे ठेकेदाराकडून भरपाई करावयाची आहे. अशी वसुली प्रत्येक देयकासोबत सादर करण्याची जबाबदारी संबंधित कामाचे कनिष्ठ अभियंता यांची असल्याचे नमूद आहे. असे असताना खालील कामांवर वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी केल्याचे अहवाल नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत.

2.सहाव्या धावते देयकाच्या नोंदीची तपासणी केली असता खोदाईमधून निघालेले 16792 घ.मी. साहित्य वाहतूक करुन इतर ठिकाणी टाकल्याने ठेकेदारास रु.63.58 प्रति घ.मी. प्रमाणे रु.6418067.71/- चे प्रदान केले आहे. वास्तविक पाहता खोदाईमधून एकूण 36162.68 घ.मी. साहित्य निघालेले असून त्यापैकी 22567.07 घ.मी. चा भरावासाठी वापर करण्यात आला आहे. उर्वरित 13595.61 घ.मी.ची स्पेशिफ़िकेशननुसार 20% घनता वाढ विचारात घेता 16394.73 घ.मी. वाहतूक करणे आवश्यक होते. परंतु खात्याने 16792 घ.मी. साहित्याची वाहतूक केल्याचे दर्शविण्यात

आले आहे. त्यामुळे 398 घ.मी. साहित्य कमी वाहतूक केल्याचे दर्शवून रु.67.32 प्रति घ.मी. प्रमाणे रु.26,793.36 चे निविदा 9.97% जादा दरानुसार रु.29,466/- जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदान रक्कम वसूल करून शासन खाती जमा करावी.

3.काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदाराने स्वखर्चाने सदरची साईड स्वच्छ करणेचे असताना 13815.00 चौ.मी. रस्ता स्वच्छ करणेची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे ठेकेदारास रु.1.43/- प्रति चौ.मी. प्रमाणे रु.19755/- चे निविदा दर 9.97% जादा दराप्रमाणे रु.21724/- चे जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करून मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावी.

4.सदर कामासाठी भराव करणेसाठी बाहेरून 812.85 घ.मी. मुरूम व सोलींगसाठी 559.40 घ.मी. डबर असे एकूण 1372.25 घ.मी. माल पुरवठा करून काम करणेत आले आहे. बाहेरून आणलेल्या मालाची गौण खनिजाची रक्कम शासनास जमा केल्याचे चलनाची प्रत नस्तीमध्ये अढळ होत नाही. गौण खनिजाची रक्कम शासनास जमा केल्याची खात्री न करता देयकाचे प्रदान करण्यात आले आहे. तरी सदर मालाची गौण खनिजाची रक्कम रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रु.98977/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

5.शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. संकिर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नवि-20, दि.02/03/2009 अन्वये विकास कामांसाठी त्रयस्थ संस्थेकडून (Third Party Technical Audit) तांत्रिक लेखा परिक्षण करून घेणे अनिवार्य आहे. ड वर्ग महापालिकेचे बाबत 50 लाखा पेक्षा अधिक रक्कमेची कामे असल्यास त्यांचे त्रयस्थ लेखा परिक्षण करून घेणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही केल्याबाबतचे अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

6.मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम-1949 कलम (10) (दोन) (च) नुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही संविदेमध्ये पदाधिका-याचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महानरगपालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिका-यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्याक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही. सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.57 दिनांक 28/02/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 43, Hmm No : 57)

## ***5 स्थायी समितीच्या सभा प्रत्येक आठवड्यास न घेणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 73(ड) नुसार केलेल्या संविदांची माहिती स्थायी समितीस न कळविणे बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : नगरसचिव महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***मिरा भाईंदर महानगरपालिका सभा, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज नियम 1997 चे नियम 3-अ नुसार स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती संविदा केल्यापासून 15 दिवसात स्थायी समितीस कळविल्याचे दिसून न येणे.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2015-16 च्या लेखापरिक्षणात नगरसचिव विभागाच्या अभिलेख्यांची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमितता आहेत.

1. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.3097/480/प्र.क्र.71/97/नवि23 दि.17/03/1997 अन्वये महानगरपालिकेचे महानगरपालिका सभा, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज नियम 1997 मंजूर करण्यात आले आहेत. सदर मंजूर नियम 3-अ नुसार स्थायी समितीची सभा आठवडयातून एकदा घेणे आवश्यक असताना वित्तीय वर्ष 2015-16 मधील स्थायी समितीची काही इतिवृते, ठराव व विषय सूची यांचे अवलोकन करता स्थायी समितीच्या सभा प्रत्येक आठवडयास न घेता प्रती 15 दिवस व महिना घेणेत आल्याचे दिसून आले.
2. स्थायी समितीच्या इतिवृत्त, ठराव व विषय सूचीचे अवलोकन करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती संविदा केल्यापासून 15 दिवसात स्थायी समितीस कळविल्याचे दिसून येत नाही व त्याची नोंद घेतलेली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.108 दि.17/05/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

REVTVMM8801 (Ref No : 36, Hmm No : 108)

## *6 जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्रुत्थान अभियाना अंतर्गत गरीब झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी जनता नगर व काशीचर्च येथे घरे बांधणे या कामामध्ये झालेली अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 12**

*लेखा शीर्ष : जवाहरलाल नेहरु राष्ट शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 10298860.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6608134.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3690726.00/-

***कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याने कामासाठी लागणारी जमीन खात्याच्या ताब्यात असल्याची खात्री करुनच पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर योजनेंतर्गत घरे बांधण्यासाठी निविदा काढण्यापूर्वी खात्याकडे जागा उपलब्ध नसताना निविदा काढून कामाचे आदेश देण्यात आले आहेत. जागा मनपाच्या ताब्यात नसल्यामुळे कंत्राटदाराने कामाची गती कमी केली व पर्यायाने कंत्राटदार विहीत कालमर्यादेत काम करण्यास अपयशी ठरला पर्यायाने कंत्राटास मार्च-2017 पर्यंत मुदतवाढ मंजूर करावी लागली. बांधकामास मुदतवाढ दिल्यामुळे भाववाढीचे दायीत्व महानगरपालिकेवर पडले. मोजमाप पुस्तिकेतील नोंदी ह्या त्रोटक असून सखोल अंदाजपत्रकाप्रमाणे नमूद केलेल्या नसल्यामुळे प्रत्यक्षात किती काम झाले किती शिल्लक राहिलेले आहे याचा बोध होत नाही. तसेच उपरोक्त नोंदी ह्या दिनांकीत नाही. त्यामुळे मोजमापे कधी घेतली याचाही मोजमाप पुस्तिके वरून बोध होत नाही. सदर कामाचे तुकडीकरण करुन स्वतंत्र निविदा मागवून वेगवेगळे मक्तेदारामार्फत कामे करून घेतली असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील अनुसूची-ड प्रकरण पाच मधील नियमाचे व सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली परी.क्र.219 चे उल्लंघन झाले आहे. निविदा अटी शर्ती क्र.56 नुसार स्टेट बँकेच्या कर्जावरील व्याजदराप्रमाणे प्रकल्पाच्या एकूण रक्कमेवर 5 टक्के मोबालयझेशन अग्रीम मंजूर करणे व 4 समान हप्त्यात वसुली करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. लेखापरीक्षण दिनाकापर्यंत ठेकेदारास मे.दिविनीटी (जेव्ही) यांच्याकडे रक्कम रु.32,67,771/- अग्रिम व त्यावरील व्याजाची रक्कमही प्रलंबित आहे. बँक गॅरंटी वर मुद्रांक शुल्काची रक्कम कमी घेतल्यामुळे शासन महसुलाचे झालेले नुकसान मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची 1 मधील कलम 54(ii) व 40(b) 2500 पेक्षा जास्त रक्कमेच्या बँक ग्यारंटी प्रत्येक हजाराकरिता रु.5/- प्रमाणे बँक गॅरंटीच्या वैधते करिता अधिनियमातील तरतुदी नुसार मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक होते. कंत्राटदाराने बांधकामासाठी वापरलेल्या गौण खनिजावरील स्वमित्वधनाची रक्कम शासनास भरणा केल्याबाबतची पावती आढळून आली नाही. गौण खनिजावरील स्वमित्वधनाची रक्कम भरणा केल्याबाबतचा तपशिल सादर न केल्यास कंत्राटदाराच्या देयकातून स्वमित्वधनाची रक्कम वसुल करणे आवश्यक होते. विकास योजना विभागाकडून भविष्यात जमीन उपलब्ध होणार असल्याची खात्री करुन न घेता प्रकल्प अहवाल तयार***

***करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक केली. प्रकल्प अहवालातील केवळ 67.94 कोटीचे प्रकल्प कार्यान्वयीत केल्यामुळे 262.62 कोटी रक्कमेवर प्रकल्प सल्लागारास दिलेला अतिरिक्त खर्च रु.104.30 लाख एवढा खर्च निरर्थक ठरला आहे. कंत्राटदारास वेळोवेळी मुदतवाढ दयावी लागली व मार्च 2017 अखेर जनता नगर पॅकेज-जे-1, जे-2 व जे-3 मधील सिमीत केलेल्या फक्त 179 घराचे वाटप झालेले आहे. तर काशिचर्च येथीलएकाही घराचे वाटप झालेले नव्हते. परिणामी मिळणाऱ्या लाभांपासून लाभार्थी दिर्घकाळ पर्यंत वंचीत राहीले आहे. म्हणजेच 06 वर्षामध्ये केवळ 7.5 % लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. निविदा अट शर्ती नुसार मे. डिवीनीटी यांनी संक्रमण शिबिराचे उशिराने केलेल्या कामाबद्दल विभागाने केलेल्या दंडात्मक कार्यवाही बाबतची माहिति लेखापरीक्षणास उपलब्ध नाही. बी.एस.यु.पी.प्रकल्प मार्च 2017 मध्ये केंद्र शासनाने बंद केलेला आहे. प्रकल्प अहवालाची तुलना सन 2009-10 च्या दरसुचीनुसार केली असता किंमत रु.330.33 कोटी एवढी असून त्यापैकी फक्त रू.67.94 कोटी एवढाच निधी महापालिकेकडून खर्च करण्यात आला. म्हणजेच प्रकल्प अहवालाच्या 20 टक्के खर्च करण्यात आला. सदोष नियोजन व कार्यवाहीमुळे उर्वरित इमारतीचे काम (1619 सदनिका) पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेस अंदाजित 150 कोटी खर्च येणार असून महापालिकेचे दायित्व वाढणार आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम क्र.251 नुसार काम सुरु करण्यापूर्वी कामाची जागा ताब्यात असणे आवश्यक होते. परंतु कामाची जागा ताब्यात नसताना काम सुरु करण्यात आले आहे. कामाची जागा ताब्यात घेण्यास खात्याने वेळेत कार्यवाही केली नाही. त्यामुळे कामास मुदतवाढ दयावी लागली. मुळ मुदतीत काम पूर्ण न झाल्याने खात्यास वाढीव मुदतीत भाववाढ दयावी लागली. सदर काम करण्यास मुळ मुदत 24 महिने होती. तद्नंतर 48 महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. म्हणजेच काम पूर्ण करण्यास खूपच विलंब केल्याने जादा भाववाढ फरक दयावा लागला.***

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फ़त केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु शहरी पुनरुत्थान अभियानांतर्गत “शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे” या कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील जनता नगर व काशीचर्च या भागातील झोपडपट्टीयांमध्ये मुलभूत सुविधासह निवारा उपलब्ध करून झोपडपट्टी निवारा योजनेचा प्रस्ताव तयार करुन म्हाडा मार्फ़त राज्य शासनास सादर करण्यात आला. राज्य शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी देवून तद्नंतर प्रस्ताव मंजूरी साठी केंद्र शासनास सादर करण्यात आला. या प्रकल्पास केंद्र शासनाने दि.11/11/2009 रोजी मान्यता दिलेली असून प्रकल्पाची किंमत रु.279.55 कोटी एवढी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि.20/11/2009 ठराव क्र.36 अन्वये प्रकल्पाच्या रु.300 कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहेत.

ह्या प्रकल्पात अस्तित्वात असलेल्या शासकीय जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टीचे पुर्नवसन करणे अंतर्भूत आहे. सदर शासकीय जमिनीचे सर्व्हे नं मौजे काशिगाव 90,94,107/1/अ,108/1/व मौजे मिरेगाव सर्व्हे नं 77,78 या जमिनीवर अस्तित्वात आहेत. सदर जमिन BSUP प्रकल्पांसाठी मनपात हस्तांतर करण्यासाठी प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई, यांच्या मार्फ़त महसुल मा. अप्पर सचिव, व वने विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.08/03/2010 रोजी सादर केलेला आहे. हस्तांतराची अंतिम कार्यवाही अदयाप प्रलंबित आहे.

योजनेचा प्रकल्प अहवाल मे. पुनित आर्किटेट यांनी तयार केला होता. प्रकल्प अहवाल सन 2008-09 च्या दरानुसार होता. सन 2009-10 च्या दरामध्ये झालेली वाढ, झोपडपट्टी धारकांना तात्पुरत्या निवारासाठी Transit Camp बांधावा लागणार आहे. प्रथम प्रकल्प अहवालामध्ये (Transit Rent) भाड्याने घेतलेला आहे. Transit Camp मुळे योजनेच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. प्रकल्पामध्ये Land Development (Hill Cutting) एकूण कॉंटिटीच्या 50 टक्केचा समावेश घराची किंमत कमी येण्यासाठी केलेला होता असे मे. पुनित आर्किटेट यांनी कळविले आहे.

BSUP प्रकल्पाच्या एकूण जागेच्या 25% जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्स्यातील काही खर्च भागविण्यासाठी म्हाडाकडे मनपामार्फ़त प्रस्ताव सादर केलेला आहे. ठेकेदारानी दिलेले Revised price offer नुसार तुलनात्मक तक्ता अ.क्र.6 सन 2009-10 च्या दरापेक्षा 10% जास्त असले तरी दर स्पर्धात्मक असून दर मंजुरीची शिफ़ारस सल्लागार मे. टेक्नो कंसल्टंट यांनी केली आहे. तरी सदर निविदा मंजुर करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) नुसार मा.स्थायी समितीस मंजुरीस शिफ़ारस आहे. सदर प्रकल्प मार्च 2017 अखेर बंद झाला असून लेखापरीक्षण दिनांकापर्यंतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पॅकेज | ठिकाण | मूळ मंजुरी नुसार उद्दिष्टे | | सुधारीत मंजुरी नुसार CSMC बैठक दि.20/03/2015 | | लेखापरीक्षण दिनांकापर्यंतची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इमारत क्र. | सदनिका संख्या | इमारत क्र. | सदनिका संख्या | |
| 1 | जे-1 | जनता नगर | 14 | 193 | 6 | 294 | 1.इमारत क्र.06, 294 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 16 व्या मजल्या पर्यंत पूर्ण झाले आहे. 15 व्या मजल्यापर्यंत Brick Work चे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. |
| | | | 15 | 193 | 7 | 362 | 2. इमारत क्र.07, 362 सदनिका, सदर इमारतीचे खोदकाम 60% पूर्ण झाले आहे. |
| | | | 16 | 193 | | | |
| | | | 17 | 193 | | | |
| | | | 18 | 154 | | | |
| | | | 19 | 154 | | | |
| | | | 20 | 188 | | | |
| 2 | जे-2 | जनता नगर | 7 | 193 | | | सदरील प्रकल्पाचे कामास मार्च 2017 अखेर पर्यंत सुरुवातच केलेली नाही. |
| | | | 8 | 193 | | | |
| | | | 9 | 193 | | | |
| | | | 10 | 193 | | | |
| | | | 11 | 193 | | | |
| | | | 12 | 193 | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 13 | 193 | | | |
| 3 | जे-3 | जनता नगर | 1 | 179 | 1 | 179 | 1. इमारत क्र.01, (179 सदनिका) ची सर्व कामे पूर्ण झाली असून 717 पात्र लाभार्थींना सदनिकाचा ताबा देण्यात आला आहे. |
| | | | 2 | 157 | 2 | 299 | 2. इमारत क्र.02, 299 सदनिका, सदर इमारतीचे 3 -या मजल्यापर्यंतचे RCC चे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. |
| | | | 3 | 193 | 3 | 299 | 3. इमारत क्र.03, 299 सदनिका, सदर इमारतींचे RCC चे 8 व्या मजल्या पर्यंत पूर्ण झाले आहे. 5 व्या मजल्यापर्यंत Brick Work चे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. |
| | | | 4 | 193 | 4 | 299 | 4. इमारत क्र.04, 299 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 1 ला मजल्यापर्यंत RCC चे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. |
| | | | 5 | 193 | 5 | 299 | 5. इमारत क्र.05, 299 सदनिका, सदर इमारतीचे खोदकाम 50% पूर्ण झाले आहे. फ़ुटींग स्टाफ़ कॉलम आणि प्लींथ चे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. |
| | | | 6 | 193 | | | |
| 4 | | काशी चर्च | 1 | 149 | 3 | 129 | काशिचर्च इमारत क्र.04,129 सदनिका, सदर इमारतीचे 60% RCC चे काम 8 व्या मजल्यापर्यंत पूर्ण झाले आहे. सदर इमारतीचे Brick Work चे काम 7 व्या मजल्यापर्यंत पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. |
| | | | 2 | 131 | | | |
| | | | 3 | 129 | | | |
| | **एकूण** | | **4136** | | **2160** | | |

या कामाची निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका व धावते देयकाचे लेखापरीक्षण केले असता, खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेले आहेत.

1. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका मधील कलम 251 नुसार रितसर हस्तांतरीत न केलेल्या कोणत्याही जमीनीवर काम सुरु करण्यात येवू नये. कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी सक्षम

प्राधिका-याने कामासाठी लागणारी जमीन खात्याच्या ताब्यात असल्याची खात्री करुनच पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. विभागाने लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीवरून असे दिसून आले की, प्रकल्पासाठी महसूल व वन विभाग पत्र क्र. जमीन 2710/108/ज-4 मंत्रालय मुंबई अन्वये दि.16 नोव्हेंबर 2011 रोजी जागा विभागाच्या ताब्यात आल्याचे दिसून येते. सदर योजनेंतर्गत घरे बांधण्यासाठी निविदा काढण्यापूर्वी खात्याकडे जागा उपलब्ध नसताना निविदा काढून कामाचे आदेश देण्यात आले आहेत. जागा मनपाच्या ताब्यात नसल्यामुळे कंत्राटदाराने कामाची गती कमी केली व पर्यायाने कंत्राटदार विहीत कालमर्यादेत काम करण्यास अपयशी ठरला पर्यायाने कंत्राटास मार्च-2017 पर्यत मुदतवाढ मंजूर करावी लागली. बांधकामास मुदतवाढ दिल्यामुळे भाववाढीचे दायीत्व महानगरपालिकेवर पडले.

2. मोजमाप पुस्तकातील मोजमापे ही आयटमवाईज अंदाजपत्रकाप्रमाणे लिहीलेली नाहीत. मोजमाप पुस्तिकेत लिहिलेली मोजकामे टक्केवारीत लिहिलेली आहेत. J-3 पॅकेज मधील मे. श्री.जी. बिटकॉन (J.V.) यांचे मोजमाप पुस्तिका क्र.657, प्र.क्र.41 वर 11 वे रनिंग बिलाची तपासणी केली असता, आयटमवाईज सखोल मोजमापे न लिहीता फक्त टक्केवारीत काम पूर्ण झाल्याचे नमूद केलेल आहे. संबंधीत धावते देयकामध्ये Excavation of rubble soling pcc हे काम फक्त 100% पूर्ण झाले आहे फक्त अशी नोंद असून आहे. तसेच आयटम मध्ये Filling in plinth Rubble soling pcc ह्या कामाबाबतही 100% काम पूर्ण अशी नोंद करून रक्कम रु.13,54,412/- मक्तेदारास अदा केलेले आहेत. संयुक्तिक अनुपालन सादर होईपर्यंत सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. एकूण मोजमाप पुस्तिकेतील नोंदी ह्या त्रोटक असून सखोल अंदाजपत्रकाप्रमाणे नमूद केलेल्या नसल्यामुळे प्रत्यक्षात किती काम झाले किती शिल्लक राहिलेले आहे याचा बोध होत नाही तसेच उपरोक्त नोंदी ह्या दिनांकीत नाही. त्यामुळे मोजमापे कधी घेतली याचाही मोजमाप पुस्तिके वरून बोध होत नाही याबाबत संयुक्तीक खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील अनुसूची-ड प्रकरण पाच नुसार रुपये दोन लाखापेक्षा अधिक रकमेच्या कामासाठी निविदा मागविणे आवश्यक आहे. उपरोक्त कामे एकाच प्रकारची, एकाच ठिकाणी व एकच प्रशासकीय मंजुरीची व अंदाजपत्रक (र.रु.279.55) असल्याने एकच निविदा काढणे आवश्यक होते. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली परी.क्र.219 नुसार कामाचे भाग पडण्यास बंदी असताना कामाचे भाग पडले आहेत. सदर कामाची एकच निविदा मागविणे आवश्यक असतांना, सदर कामाचे तुकडीकरण करून स्वतंत्र निविदा मागवून वेगवेगळे मक्तेदामार्फत कामे करून घेतली असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील अनुसूची-ड प्रकरण पाच मधील नियमाचे व सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली परी.क्र.219 चे उल्लंघन झाले आहे.

4. ठेकेदारास मे. दिविनीटी (जेव्ही) दि.24/01/11 रोजी कार्यादेश दिला असून दि.08/07/2011 पर्यंत रु.93 कोटी 23 लाख अग्रीम दिला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता प्रकरण 10 बांधकाम लेखे (घ) कंत्राटदारांना आगाऊ रक्कमा देणे परिच्छेद क्र.10.2.21, 10.2.22 नुसार - नियमानुसार कंत्राटदारांना आगाऊ रक्कमा देण्यांस मनाई आहे. जागेवर आणलेल्या सामानाच्या/ साहित्याच्या 75% पेक्षा अधिक नसेल, इतक्या आगाऊ रक्कमा मंजुर करता येतील. असे असतांना या प्रकरणी कार्यादेश दिल्यानंतर कोणतेही साहित्य साईट वर येण्यापुर्वीच मोबीलायजेशन ॲडवान्स दिलेला आहे. तसेच ठेकेदारास मे. दिविनीटी (जेव्ही) यांनी मोबीलायजेशन ॲडवान्सपोटी बँक गॅरंटी दिलेली नसतानाही मोबीलायजेशन ॲडवान्स देणे गंभीर बाब आहे. निविदा अटी शर्ती क्र.56 नुसार स्टेट

बँकेच्या कर्जावरील व्याजदराप्रमाणे प्रकल्पाच्या एकूण रक्कमेवर 5 टक्के मोबालयझेशन अग्रीम मंजूर करणे व 4 समान हप्त्यात वसुली करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. लेखापरीक्षण दिनाकापर्यंत ठेकेदारास मे. दिविनीटी (जेव्ही) यांच्याकडे रक्कम रु.32,67,771/- अग्रिम व त्यावरील व्याजाची रक्कमही प्रलंबित आहे. तसेच ठेकेदाराकडून कामही बंद असल्याने मोबीलायजेशन अॅडवान्स कसा वसूल करणार याबाबत खुलासा करावा.

5. बँक गॅरंटी वर मुद्रांक शुल्काची रक्कम कमी घेतल्यामुळे शासन महसुलाचे झालेले नुकसान मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची 1 मधील कलम 54(ii) व 40(b) 2500 पेक्षा जास्त रक्कमेच्या बँक ग्यारंटी प्रत्येक हजाराकरिता रु.5/- प्रमाणे बँक गॅरंटीच्या वैधते करिता अधिनियमातील तरतुदी नुसार मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक होते. खालील बँक गॅरंटी वर कमी शुल्क आकारल्यामुळे शासन महसुलाचे रु.4,22,955/- चे नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | Submitted for | वसूल करावयाची मुद्रांक शुल्काची रक्कम | भरलेले मुद्रांक शुल्क | तफावतीची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.शायोना टोस्कॅनो (जेवी) (पॅकेज J-1) | Security Deposit | 133415 | 100 | 133315 |
| | | Mob.Adv. | 53000 | 100 | 52990 |
| 2 | मे.डिवीनिटी (जेवी) (पॅकेज J-2) | Security Deposit | 78000 | 0 | 78000 |
| | | | 39000 | 0 | 39000 |
| | | Mob.Adv. | 33500 | 0 | 33500 |
| | | | 25000 | 0 | 25000 |
| | | | 50000 | 0 | 50000 |
| | | | 50000 | 0 | 50000 |
| 3 | मे.श्रीजी बिटकॉन(जेवी) (पॅकेज-J3) | Security Deposit | 116600 | 100 | 116500 |
| | | Mob.Adv. | 25000 | 100 | 23900 |
| | | | 25000 | 100 | 24900 |
| | | | 25000 | 100 | 24900 |
| 4 | मे.डी.के.इन्फ्रास्ट्रक्चर (जेवी) (काशी चर्च) | Security Deposit | 46550 | 0 | 46450 |
| | | | 700065 | 0 | 422955 |

6. भारत सरकार, वित्त विभाग, अधिसूचना क्र.28/2010-सेवाकर, दि.22.08.2010 नुसार, वित्तीय अधिनियमातील विभाग 65 मधील कलम 105 चे उपकलम अन्वयें जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी

पुर्नरुत्थान अभियान योजने अंतर्गत घरांचे बांधकामास दि.01/07/2010 पासून सेवाकरातून पूर्णतः सुट देण्यात आली आहे. विभागाचे BSUP योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे व त्यात राज्य केंद्रशासनाची मंजुरी प्राप्त करवून बनविणे व त्यास राज्य व केंद्रे शासनाची मंजुरी प्राप्त करून घेणेच्या कामी मे. पुनित आर्किटेक्ट ठाणे यांचा कार्यादेश क्र. मनपा/साबां/कार्या/914/08-9 दि.26/2/2009 अन्वये नेमणूक करण्यात आली. तथापि, वरील अधिसूचनेनुसार सदर योजने अंतर्गत केलेल्या कामासाठी दि.01/07/2010 पासून सेवाकरातून सूट असतांना खात्याने सन 2010 पासून या कंत्राटदारास खालील प्रमाणे सेवाकर अदा केला आहे.

| अ.क्र. | बिलाचा क्र. | बिलाची रक्कम | सेवाकराची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | 1 | 4467859 | 460189 |
| 2. | 2 | 2680715 | 276113 |
| 3. | 3 | 26518791 | 2731435 |
| 4. | 4 | 7448082 | - |
| 5. | 5 | 6007699 | - |
| 6. | 6 | 9417117 | 1423485 |
| 7. | 7 | 2137500 | 362500 |
| | | एकूण | 5253722 |

अधिनियमातील तरतूदीनुसार दि.01/07/2010 पासून सेवाकरातून सुट असतांना ठेकेदारास सन मार्च 2016 पर्यंत रु.52,53,722/- सेवाकरापोटी अदा केलेली आहे. संयुक्तिक अनुपालन सादर होईपर्यंत सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास सेवाकर दिला नसता तर मनपाच्या महसुलाची बचत झाली असती.

7. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुर्नरुत्थान अभियाना अंतर्गत शहरी गरीबांसाठी मुलभूत सुविधा या शिर्षकाखाली शहरी, गरीब झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी निविदा मागवून जनता नगर व काशीचर्च येथे 4136 (सन 2009) घरे बांधण्याचे काम देण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीच्या आधारे कामाचे प्राकलन (पूर्वगणनपत्रक) तयार करण्यात आले. दरसूचीनुसार कामासाठी वापरण्यात आलेले खडी, मुरुम, वाळू, माती इ. गौणखनिजाच्या आधारभूत दरामध्ये स्वमित्वधनाच्या रक्कमेचा समावेश करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील दि.15/12/2006 च्या शासन निर्णयातील तरतुदीनसार कंत्राटदारास बिलाची रक्कम अदा करतांना रॉयल्टी चार्जेसची रक्क्म शासनास भरणा केल्याबाबतची खात्री करणे आवश्यक आहे. विभागाकडील उपलब्ध अभिलेखे, मोजमाप पुस्तिकेवरील बिलांचा गोषवारा इ. ची तपासणी केली असता, असे निदर्शनास आले की, कंत्राटदाराने बांधकामासाठी वापरलेल्या गौण खनिजावरील स्वमित्वधनाची रक्कम शासनास भरणा केल्याबाबतची पावती आढळून आली नाही. गौणखनिजावरील स्वमित्वधनाची रक्कम भरणा केल्याबाबतचा तपशिल सादर न केल्यास कंत्राटदाराच्या देयकातून स्वमित्वधनाची रक्कम वसुल करणे आवश्यक होते. शासन निर्णयातील तरतुदीकडे दुर्लक्ष करुन गौण खनिजावरील स्वमित्वधनाची रक्कम शासनास भरणा केल्याबाबतची खात्री न करता कंत्राटदारास बिलाची रक्कम अदा केल्यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले आहे. कंत्राटदाराच्या देयकातून स्वमित्वधनाची रक्कम वसुल

करून शासन खाती भरण्यात यावे.
8. विभागाचे BSUP योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे व त्यात राज्य केंद्रशासनाची मंजुरी प्राप्त करवून बनविणे व त्यास राज्य व केंद्रे शासनाची मंजुरी प्राप्त करून घेणेच्या कामी मे.पुनित आर्किटेक्ट ठाणे यांचा कार्यादेश क्र. मनपा/साबां/कार्या/914/08-9 दि.26/2/2009 अन्वये नेमणूक करण्यात आली. प्रकल्प सल्लागार यांनी 330.56 कोटी रक्कमेचा विकास प्रकल्प अहवाल तयार केला. त्यापैकी मनपाने केवळ 67.94 कोटीचे प्रकल्प कार्यान्वयीत केल्याचे दिसून येते. प्रकल्प सल्लागार यांनी 330.56 कोटी रक्कमेचे प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाचे प्रकल्प अंदाजपत्रक तयार करणे या कामाचे रु.16.82 लाख रक्कमेच्या सेवाकरासह रु.1.32 कोटीचे देयक मनपास सादर केले. विभागाने प्रक्लपासाठी लागणारी जमीन उपलब्ध असल्याची, किंवा भूसंपादनासाठी जबाबदार असलेल्या भूमी व जिंदगी विभाग, विकास योजना विभागाकडून भविष्यात जमीन उपलब्ध होणार असल्याची खात्री करुन न घेता प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक केली. प्रकल्प अहवालातील केवळ 67.94 कोटीचे प्रकल्प कार्यान्वयीत केल्यामुळे 262.62 कोटी रक्कमेवर प्रकल्प सल्लागारास दिलेला अतिरिक्त खर्च रु.104.30 लाख एवढा खर्च निरर्थक ठरला आहे.
9. विभागाने प्रकल्पासाठी लागणारी जागेची उपलब्धतेचा विचार न करता प्रकल्प कार्यान्वयीत करण्याबाबत कंत्राटदारास कार्यादेश दिले. तथापी प्रकल्प राबविण्याकरीता पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे कंत्राटदाराने पुरेशा क्षमतेने काम केले नाही. परिणामी कंत्राटदारास वेळोवेळी मुदतवाढ दयावी लागली व मार्च 2017 अखेर जनता नगर पॅकेज- जे-1, जे-2 व जे-3 मधील सिमीत केलेल्या फक्त 179 घराचे वाटप झालेले आहे. तर काशिचर्च येथीलएकाही घराचे वाटप झालेले नव्हते. परिणामी मिळणा-या लाभांपासून लाभार्थी दिर्घकाळ पर्यंत वंचीत राहीले आहे. म्हणजेच 06 वर्षामध्ये केवळ 7.5% लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.

| अ.क्र. | पॅकेज | ठिकाण | कार्यादेश | उद्दिष्टे लाभार्थी संख्या | वाटप लाभार्थी संख्या (मार्च 2017) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जे-1 | जनता नगर | जा.क्र.मनपा/साबा/कार्या/331/2010-11 दि.23/12/2010 | मूळ-1336 सुधारीत- 656 | - |
| 2 | जे-2 | जनता नगर | जा.क्र.मनपा/साबा/कार्या/373/2010-11 दि.24/01/2011 | मूळ-1156 | - |
| 3 | जे-3 | जनता नगर | जा.क्र.मनपा/साबा/कार्या/332/2010-11 दि.25/12/2010<br>जा.क्र.मनपा/साबा/12793/ 2015-16 दि.18/03/2016 | मूळ-1173 सुधारीत-1375 | 1 (179 सदनिका) |
| 4 | काशिचर्च | काशिचर्च | जा.क्र.मनपा/साबा/कार्या/333/2010-11 दि.28/12/2010<br>जा.क्र.मनपा/साबा/11383/ 2016-17 दि.03/05/2016 | मूळ-471 सुधारीत- 129 | - |

10. J-2 पॅकेज अंतर्गत मक्तेदार मे.डिवीनिटी (जेवी) जा.क्र. मनपा/साबा/कार्या/373/2010-11 दि.24/01/2011 अन्वये कार्यादेश देण्यात आला. परंतु प्रत्यक्ष संक्रमण शिबीर बांधकामास विलंबाने काम सुरु केले आहे. निविदा अट शर्ती नुसार बांधकाम लेखापरीक्षण दिनांकापर्यंत सुरुवातच केलेली नव्हती, त्यामुळे मक्तेदारावर केलेल्या निविदा अटी शर्ती प्रमाणे कार्यावाही न केल्याबाबत लेखा परीक्षणास खुलासा करण्यात यावा. तसेच प्रत्यक्ष कामास मे. डिवीनीटी यांनी संक्रमण शिबिराचे उशिराने केलेल्या कामाबद्दल विभागाने केलेल्या 5 दंडात्मक कार्यवाही बाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करावी.

11. बी.एस.यु.पी. प्रकल्प मार्च 2017 मध्ये केंद्र शासनाने बंद केलेला आहे. प्रकल्प अहवालाची तुलना सन 2009-10 च्या दरसुचीनुसार केली असता किंमत रु.330.33 कोटी एवढी असून त्यापैकी फक्त रू.67.94 कोटी एवढाच निधी महापालिकेकडून खर्च करण्यात आला. म्हणजेच प्रकल्प अहवालाच्या 20 टक्के खर्च करण्यात आला. सदोष नियोजन व कार्यवाहीमुळे उर्वरित इमारतीचे काम (1619 सदनिका) पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेस अंदाजित 150 कोटी खर्च येणार असून महापालिकेचे दायित्व वाढणार आहे.

12. सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम क्र.251 नुसार काम सुरु करण्यापूर्वी कामाची जागा ताब्यात असणे आवश्यक होते. परंतु कामाची जागा ताब्यात नसताना काम सुरु करण्यात आले आहे. कामाची जागा ताब्यात घेण्यास खात्याने वेळेत कार्यवाही केली नाही. त्यामुळे कामास मुदतवाढ दयावी लागली. मुळ मुदतीत काम पूर्ण न झाल्याने खात्यास वाढीव मुदतीत भाववाढ दयावी लागली. सदर काम करण्यास मुळ मुदत 24 महिने होती. तदनंतर 48 महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. म्हणजेच काम पूर्ण करण्यास खूपच विलंब केल्याने जादा भाववाढ फरक दयावा लागला. याबाबत संयुक्त खुलासा करण्यात यावा.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.39 दि.29/01/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 41, Hmm No : 39)

## *7 महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24.04.2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) अन्वये वसुलपात्र मुद्रांक शुल्क वसुल न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : मुद्रांक शुल्क महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 40300.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 40300.00/-

***महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24.04.2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) अन्वये वसुलपात्र मुद्रांक शुल्क वसुल न केल्याने शासनाला महसूलापासून वंचित राहावे लागले.***

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24.04.2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत रक्कम रु.500/- व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास रक्कम रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. बांधकाम व पाणी पुरवठा विभागातील सोबत जोडलेल्या परिशिष्ठाप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे व त्यानुसार अनुपालन सादर करण्यात यावे.

बांधकाम विभाग

| अ.क्र. | कामाचे नाव | मक्तेदाराचे नाव | करारनामा दिनांक | अंदाजित खर्च | आवश्यक मुद्रांक शुल्क | भरलेले मुद्रांक शुल्क | वसुलपात्र मुद्रांक शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | हटकेश येथील रश्मी दृष्टांत ते मंथन ते मदरसा पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | मे. ऐश्वर्या इंटरप्रायजेस | 06/12/2015 | 1527850 | 1050 | 700 | 350 |
| 2 | पांडूरंग वाडी निकिता इंडस्ट्री ते हिरेल अपार्टमेंट लिली चॅम्प हॉटेल समोरील. | मे. आर. एस. कं. | 19/01/2016 | 2147700 | 1650 | 1350 | 300 |
| 3 | मिरारोड पोलिस स्टेशन जवळ कनकिया रस्ता ते सुंदर सागर पर्यंत रस्त्यालगत गटारे बांधून स्लॅब टाकणे. | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर | 29/10/2015 | 2276450 | 1800 | 1400 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | भाईंदर (प) सालासर बिझनेस पार्क ते स्पॅन हाईट्स ते मिरा हॉस्पीटल पर्यंत रस्ता खाडीकरण करुन डांबरीकरण करणे. | मे. श्री. जी. कंस्ट्रक्शन | 29/10/2015 | 4990000 | 4500 | 4100 | 400 |
| 5 | भाईंदर(पू) प्र.क्र.4 मध्ये सुंदरम पेपर इंडस्ट्री ते एस.व्ही. रोड पर्यंत सी.सी. रस्ता व नाली तयार करणे. | मे. एन. एस. इंटरप्रायजेस | 17/10/2015 | 189100 | 500 | 100 | 400 |
| 6 | मिरारोड(पू) प्र.क्र.30 लोढा रस्त्यावरील गणपती मंदिर ते चंद्रेश अभिषेक इमारती पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | मे. मधुराणी इंटरप्रायजेस | 15/09/2015 | 1591250 | 1100 | 700 | 400 |

आमदार निधी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशिमीरा नाका येथील सनराईज हॉटेल येथे बस स्टॉप बांधणे. | मे. एस. एम. कंस्ट्रक्शन | 13/08/2015 | 500000 | 500 | 100 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर(प) नगरभवन समोर बसस्टॉप बांधणे. | मे. एस. एम. कंस्ट्रक्शन | 26/08/2015 | 300000 | 500 | 100 | 400 |
| 9 | भाईंदर (पू) नवघर रोड येथील बंदरवाडी बंगलो समोर बसस्टॉप बांधणे. | मे. एस. एम. कंस्ट्रक्शन | 26/08/2015 | 500000 | 500 | 100 | 400 |
| 10 | उत्तन कराईमोहल्ला येथील उर्दू शाळा मस्जिदजवळ गटार बांधणे. | मे. गुरूदत्त कंस्ट्रक्शन | 26/08/2015 | 125000 | 500 | 100 | 400 |
| 11 | मिरारोड (पू) पार्श्वनगर येथील सिंफ़ोनी टॉवर ते आयडीयल (एन.एच.स्कूल रस्त्यापर्यंत) सी.सी. गटार बांधणे व बंदीस्त करणे. | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | 12/06/2015 | 1498000 | 1000 | 600 | 400 |
| 12 | भाईंदर (प) लालबहादुर शास्त्रीनगर येथे शौचालय बांधणे. | मे. विकास इंटरप्रायजेस | 26/06/2015 | 1499000 | 1000 | 600 | 400 |
| 13 | भाईंदर (प) आंबेडकर नगर (गांधीनगर) येथे शौचालय बांधणे. | मे. विकास इंटरप्रायजेस | 26/06/2015 | 1499000 | 1000 | 600 | 400 |
| 14 | भाईंदर (प) नेहरूनगर येथे शौचालय बांधणे | मे. विकास इंटरप्रायजेस | 26/06/2015 | 1499000 | 1000 | 600 | 400 |
| 15 | मिरारोड (पू) पुजानगर येथील सुविधा टॉवर ते जलाराम दर्शन पर्यंत सी. सी. गटार | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | 12/06/2015 | 1498000 | 1000 | 600 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बांधणे व बंदिस्त करणे. | | | | | | |
| 16 | भाईंदर(प) येथे असलेल्या स्मशानभुमी आसनव्यवस्था, स्टँड शेड, पिण्याच्या पाण्याची टाकी इ. कामे करणे. | मे. श्री इंटरप्रायजेस | 25/05/2015 | 499000 | 500 | 100 | 400 |
| 17 | मिरारोड (पू) शांती गार्डन येथील जय माता दि चौक, नयानगर, कानुंगो इस्टेट, रजा मैदान येथे फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे. | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | 16/03/2016 | 449000 | 500 | 100 | 400 |

नविन गटारे/नाले बांधणी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | मिरारोड (पू) शांतीनगर सेक्टर 10 मधील अंतर्गत सर्व सी. सी. गटार बांधणे | मे. ऱाठोड असोसिएट्स | 29/10/2015 | 3389650 | 2900 | 2500 | 400 |
| 19 | घोडबंदर ट्रक टर्मिनल (आ.क्र.326) जागेत खडीकरण करणे | मे. ऱाठोड ब्रदर्स | 26/06/2015 | 4759133 | 4300 | 4000 | 300 |
| 20 | मिरारोड (पू) नयानगर (आ.क्र.178) जागेस कुंपणभिंत बांधणे | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | 29/10/2015 | 4493700 | 4000 | 3600 | 400 |
| 21 | कनकिया येथील (आ.क्र.264 व302) या जागेस तारेचे कुंपणभिंत बांधणे | मे. ऱिध्दीका इंटरप्रायजेस | 23/03/2016 | 581550 | 500 | 100 | 400 |

रस्ते/गटार बांधणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | हटकेश उद्योग नगर | मे. कंचन | 20/08/2015 | 1702850 | 1250 | 900 | 350 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | येथील मारुती सुझुकी मागील गल्ली K-1 गल्लीतील रस्ते पुर्न:पृष्टीकरण करणे. | कंस्ट्रक्शन | | | | | |
| 23 | मिरारोड (पू) कनकिया मुख्य रस्ता,ओ्स्तवाल हाईट्स ते संतहोम शाळेपर्यंत रस्ता तयार करणे | मे. गजानन कंस्ट्रक्शन | 02/12/2015 | 1.1E+07 | 10400 | 200 | 10200 |
| 24 | भाईंदर (पू) रामदेव पार्क येथील देवतारा सोसायटी ते बालाजी हाईट्स पर्यंत रस्ता तयार करणे | मे. आर. एस. कंस्ट्रक्शन | 15/09/2015 | 1533850 | 1050 | 700 | 350 |
| 25 | भाईंदर (पू) प्र.क्र.13 मधील सेनानगर मधील पाटील निवास ते चंदा निवास पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे | मे. रिध्दीका इंटरप्रायजेस | 20/04/2015 | 234250 | 500 | 100 | 400 |
| 26 | भाईंदर (पू) प्र.क्र.16 मधील मेघा कॉम्प्लेक्स ते सत्यदेव अपार्टमेंट पर्यंत सिमेंट कॉक्रीटचा रस्ता बनविणे | मे. श्री इंटरप्रायजेस | 23/04/2015 | 340610 | 500 | 100 | 400 |
| 27 | भाईंदर (पू) प्र.क्र.14 मधील बी.पीरोड येथील संजिवनी टॉवर ते आम्रपाली टॉवर पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. | मे. शिवम इंटरप्रायजेस | 13/08/2015 | 401680 | 500 | 100 | 400 |
| 28 | भाईंदर (पू) प्र.क्र.3 आणि 4 च्या प्रभाग कार्यालयामध्ये पॅसेजमध्ये टॉवर प्रुफिंग करणे | मे. अमृता असोसिएट्स | 29/07/2015 | 111645 | 500 | 100 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | भाईंदर (पू) रस्त्यावर महावीर पॅलेस ते राम अनुज ते रामदेव पार्क मुख्य रस्यापर्यंत रस्ता तयार करणे | मे. गजानन कंस्ट्रक्शन | 02/12/2015 | 7033600 | 6550 | 6200 | 350 |
| 30 | भाईंदर (प) गणेश देवल नगर येथे सिमला गल्ली ते आनंदनगर स्वच्छतागृह पर्यंत सी.सी.पदपथाचे रुंदीकरण करणे | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | 29/10/2015 | 1824300 | 1350 | 1000 | 350 |
| 31 | भाईंदर (प) गणेश देवल नगर येथे मोतीनगर ते नितीन चाळ पदपथांचे रूंदीकरण करणे | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | 29/10/2015 | 2126100 | 1700 | 1300 | 400 |

दलित वस्ती

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 32 | मिरारोड (पू) रामदेव पार्क रस्ता श्वेता रेसिडेन्सी ते कनकिया पाण्याची टाकी पर्यंत डी.पी. रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | मे. गजानन कंस्ट्रक्शन | 02/12/2015 | 2.2E+07 | 22000 | 21500 | 500 |
| 33 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील नाझरेथ आगर येथे सी. सी. पदपथाचे बांधकाम करणे | मे. सालासर कंस्ट्रक्शन कं | 09/02/2016 | 1041000 | 550 | 200 | 350 |
| 34 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील इले. पोल क्र.xuc2029 ते xuc2027 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे | मे. ऐश्वर्या इंटरप्रायजेस | 11/01/2016 | 4558700 | 4100 | 3800 | 300 |
| 35 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील मुर्धा ब्रिज ते इले.पोल क्र.xuc2029 | मे. ऐश्वर्या इंटरप्रायजेस | 02/12/2015 | 4642100 | 4200 | 3800 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पर्यंत आर.सी.सी नाल्याचे बांधकाम करणे | | | | | | |
| 36 | भाईंदर (प) प्र.क्र. 27 मधील मुर्धा बगीच्या ते ब्रिजपर्यंत गटाराचे व स्लॅबचे बांधकाम करणे | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर | 29/10/2015 | 2311500 | 1850 | 1500 | 350 |
| 37 | भाईंदर (प) प्र.क्र.27मधील गांधीनगर व आंबेडकरनगर येथे सी.सी.गटार व सी.सी.पदपथाचे बांधकाम करणे. | मे. गजानन कंस्ट्रक्शन | 02/12/2015 | 1280900 | 800 | 400 | 400 |
| 38 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील भोलानगर येथे गल्ली क्र.8,9,10,11 मध्ये गटाराचे व स्लॅबचे बांधकाम करणे. | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | 29/10/2015 | 2446100 | 2000 | 1600 | 400 |
| 39 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील उत्तन कडे जाणा-या मुख्य रस्त्यालगत इले.पोल क्र.xuc2027 ते इले. पोल क्र.xuc2025 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे. | मे. राठोड ब्रदर्स | 19/12/2015 | 4577210 | 4100 | 3700 | 400 |
| 40 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील कम्युनिटीहॉल ते पोल क्र.xuc/004/007 पर्यंत रस्ता तयार करणे. | मे. गजानन कंस्ट्रक्शन | 02/12/2015 | 4492150 | 4000 | 3600 | 400 |
| 41 | भाईंदर (प) प्र.क्र.27 सुभाषचंद्र बोस मैदान | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर | 29/10/2015 | 3017500 | 2550 | 2200 | 350 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ते शौचालय पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे. | | | | | | |
| 42 | भाईंदर (प) आंबेडकर नगर समोर पोल क्र.xuc004/007 ते पोल क्र.xuc/004/014 पर्यंत रस्ता तयार करणे. | मे. गजानन कंस्ड्क्शन | 02/12/2015 | 4261650 | 3800 | 3400 | 400 |
| 43 | भाईंदर (प) प्र.क्र.27 आंबेडकरनगर समोर पोल क्र.xuc/04/014 ते xuc/004/020 पर्यंत रस्ता तयार करणे. | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन | 02/12/2015 | 4668800 | 4200 | 4000 | 200 |

खासदार निधी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 44 | राई राम मंदिर तलावात प्रक्षेपण गॅलरी बांधणे. | मे. एस. एम. कंस्ट्रक्शन | 29/07/2015 | 6135000 | 5700 | 6200 | -500 |
| 45 | काशी जरीमरी तलाव येथे प्रक्षेपण गॅलरी बांधणे. | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | 29/07/2015 | 2828000 | 2500 | 2000 | 500 |
| 46 | पेणकरपाडा साईदत्त तलाव सुशोभिकरण करणे. | मे. गजानन कंस्ट्रक्शन | 29/07/2015 | 5999000 | 5500 | 5100 | 400 |
| 47 | मिरा-भाईंदर महानगरपालिका शहरात प्राप्त बसेससाठी तात्पुरत्या स्वरुपातील पार्कींग साईटवर पोर्टेबल केबीन पुरवठा करुन बसविणे | मे. मधुराणी इंटरप्रायजेस | 26/06/2015 | 1750000 | 1300 | 900 | 400 |
| 48 | हटकेश, वर्सोवा, काशीमिरा, प्रसाद हॉटेल, वेस्टर्न हॉटेल व मॅक्सेस मॉल ब्लिंकर येथील सिग्नलची | मे. युटीलिटी इंटरप्रायजेस | 28/04/2015 | 986000 | 500 | 100 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | | | | | | |
| 49 | मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमधील मा. महासभा सभागृह व मा.स्थायी समिती सभागृह येथील माईक सिस्टीम वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | मे. न्यू फ़िल्ड | 22/07/2015 | 495000 | 500 | 100 | 400 |
| 50 | रा.म.क्र.8 वरील जवळील चेना गाव मनपा शाळा क्र.10 येथील टेरेसवर वॉटर प्रुफ़ींग करणे. | मे. अमृता असोसिएट्स | 26/06/2015 | 169275 | 500 | 100 | 400 |
| 51 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य कार्यालय इमारती मध्ये लालबहादुर शास्त्री सभागृह व इतर ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे. | मे. न्यू फिल्ड | 28/08/2015 | 196206 | 500 | 100 | 400 |
| 52 | भाईंदर (प) येथील फ़ुटपाथ/गटारावरील स्लॅब दुरुस्ती करणे | मे. गुरूजी इन्फ़्रास्ट्रक्चर | 29/10/2015 | 189500 | 500 | 100 | 400 |
| 53 | राष्ट्रीय महामार्ग क्र.8 दहिसर चेकनाका जवळील राजू इंड. मागील मुख्य नाल्यावर कल्वर्ट बांधणे. | मे. शोभा इंटरप्रायजेस | 26/06/2015 | 410500 | 500 | 100 | 400 |
| 54 | भाईंदर (पू) प्रभाग क्र.17 मधील बी.पी.ऱोड येथील पारसनाथ जैंन कॉलनी ते कृष्णा इस्टेट पर्यंत डांबरी रस्ता | मे. तुषार इंटरप्रायजेस | 20/04/2015 | 535885 | 500 | 100 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नव्याने बनविणे | | | | | | |
| 55 | भाईंदर (प) प्रभाग क्र.22 मधील अण्णा नगर समाजमंदिर मागील गटाराची दुरुस्ती करुन स्लॅब करणे. | मे. ओ्मकार इंटरप्रायजेस | करारनामा नस्तीत उपलब्ध नाही | 498650 | 500 | | 500 |
| 56 | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प) येथे सुभाषचंद्र बोस मैदान ते ज्युडीशिअल ॲकॅडमी पर्यंत व छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथे सुचना फलक बसविणे. | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | 29/10/2015 | 1093300 | 600 | 200 | 400 |
| 57 | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, कनकिया रस्ता व नगरभवन येथील डिवायडर/चौथ-याची दुरुस्ती करणे. | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | 15/09/2015 | 199550 | 500 | 100 | 400 |
| 58 | भाईंदर (प) स्पॅन एक्सलेन्सी इमारती लगत गटार बांधणे. | मे. श्री इंटरप्रायजेस | 23/04/2015 | 399000 | 500 | 100 | 400 |
| 59 | भाईंदर (पू) व (प) जोडणारा जुन्या रेल्वे फ़ाटक येथील सब-वे मध्ये एव्हरक्रिट पध्दतीने गळती प्रतिबंधक कामे करणे. | मे. अमृता असोसिएट्स | 16/08/2015 | 2254400 | 1800 | 1400 | 400 |

## पाणीपुरवठा विभाग

| अ. क्र. | कामाचे नाव | मक्तेदाराचे नाव | करारनामा दिनांक | अंदाजित खर्च | आवश्यक मुद्रांक शुल्क | भरलेले मुद्रांक शुल्क | वसुलपात्र मुद्रांक शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सृष्टी | मे. ॲकॉर्ड | 13/06/201 | 2457400 | 2000 | 1600 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मलनि:सारण केंद्राची देखभाल दुरुस्ती करणे | वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 5 | | | | |
| 2 | शांतीपार्क मलनि:सारण केंद्राची (पंपगृह व मलनि:सारण पाईप) देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 13/06/2015 | 2457400 | 2000 | 1600 | 400 |
| 3 | शांती नगर सेक्टर-3 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरुस्ती करणे. | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 13/06/2015 | 2496600 | 2000 | 1600 | 400 |
| 4 | शांतीनगर से.8 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची मलनि:सारण केंद्राची देखभाल/दुरुस्ती करणे. | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 13/08/2015 | 2496600 | 2000 | 1600 | 400 |
| 5 | जेसलपार्क मलनि:सारण केंद्राची देखभाल/दुरुस्ती करणे | मे.ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | 07/09/2015 | 2457400 | 2000 | 1600 | 400 |
| 6 | मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिंग स्टेशनची देखभाल /दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 13/08/2015 | 2060900 | 1600 | 1200 | 400 |
| 7 | मिरारोड (पु) | मे. ॲकॉर्ड | 13/08/201 | 1062400 | 600 | 200 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शांतीनगर से.7 येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 5 | | | | |
| 8 | पाली, लाईट हाऊस व चवळी येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 13/08/2015 | 1062400 | 600 | 200 | 400 |
| 9 | मिरारोड (पू) शांती नगर सेक्टर 11 येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 13/08/2015 | 1982500 | 1500 | 1100 | 400 |
| 10 | काशी जनता नगर पंपिग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 13/08/2015 | 1062400 | 600 | 200 | 400 |
| 11 | भाईंदर (पू) नवघर-स्टेशन रोडवरील नवघर नाका येथील मुख्य झडपांचे स्थलांतरण करणे. | मे. गणेश डेव्हलपर्स | 13/08/2015 | 1609279 | 1200 | 800 | 400 |
| 12 | मिरागाव येथील चुना भट्टी मिरा इंडस्ट्रिज ते बाभळीचा भाट झोपडपट्टी पर्यंत बिडाची जलवाहिनी | मे. गणेश डेव्हलपर्स | 07/08/2015 | 816900 | 500 | 100 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरविणे व अंथरणे. | | | | | | |
| 13 | मिरारोड (पू) येथील अस्मिता आर्केड नं-3 ते ओस्तवाल पॅराडाईज इमारती पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | मे. विंध्या ट्रेडर्स | 07/08/2015 | 977000 | 500 | 100 | 400 |
| 14 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण मॅनहोल दुरुस्ती करणे व उंची वाढविणे. | मे. विकास इंटरप्रायजेस | 13/08/2015 | 994300 | 500 | 100 | 400 |
| 15 | मिरारोड (पू) जांगिड कॉम्प्लेक्स येथे गंगा सोसायटी ते कृष्णा सोसायटी पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | मे. विंध्या ट्रेडर्स | 07/08/2015 | 662300 | 500 | 100 | 400 |
| 16 | भाईंदर (पू) नवघर येथे हनुमान मंदिर ते सोलंकी पार्क पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | मे. गणेश डेव्हलपर्स | 07/08/2015 | 446800 | 500 | 100 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 17 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इंद्रलोक फ़ेज-2 येथील विरकर बंगला ते राम रुद्र इमारती पर्यंत गटारात बाधित होणारी जलवाहिनी स्थानांतरित करणे. | मे. विंध्या ट्रेडर्स | 07/08/2015 | 603200 | 500 | 100 | 400 |
| 18 | भाईंदर (प) उत्तन रोड येथील मोर्वा शिवसेना शाखा ते मोर्वा शिवनेरी पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | मे. गणेश डेव्हलपर्स | 22/07/2015 | 1050600 | 500 | 100 | 400 |
| 19 | काजूपाडा ते हटकेशपर्यंत 1350 मिमी व्यासाची (ID) मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | मे. कोया ॲन्ड कंपनी कंस्ट्रक्शन लि. | 17/10/2015 | 294610126 | 294200 | 293800 | 400 |
| 20 | मिरारोड (पु) मेडतीया नगर येथे पी.के. रोड ते मेडतीया रविराज पर्यंत बिडाची जलवाहिनी | मे. गणेश डेव्हलपर्स | 26/06/2015 | 750200 | 500 | 100 | 400 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरविणे व अंथरणे | | | | | | |
| 21 | भाईंदर (प) भोला नगर येथील गल्ली नं.10,11,12 व 13 येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | मे. गणेश डेव्हलपर्स | 26/06/2015 | 960300 | 500 | 100 | 400 |

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.119 दि.10/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 58, Hmm No : 119)

## *8 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागांतर्गत शहरात डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके (Larvicide) व डास नाशके पुरवठा करणे या कामातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष : सार्व. आरोग्य महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1264400.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4400.00/-

***अभ्यासपूर्ण व सखोल माहिती घेवून अंदाजपत्रकात खरेदी करावयाच्या डासनाशक व अळीनाशकाच्या समावेश करणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त प्रकरणात वरीलप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याने महापालिकेचे रक्कम रु.12,64,400/- चे नुकसान झाले आहे. सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. साठा नोंद वही प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात प्राप्त साठा, प्रभागांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन पुरवठा व वाटप तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.***

| |
|---|
| ***निविदेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेते वेळी अंदाजित वार्षिक आवश्यकता निश्चित करण्यात आलेली नव्हती. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. खालीलप्रमाणे रक्कम रु.4400/- वसुल करुन शासन खाती जमा करावी. अभ्यासपूर्ण व सखोल माहिती घेवून अंदाजपत्रकात खरेदी करावयाच्या डासनाशक व अळीनाशकाच्या समावेश करणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त प्रकरणात वरीलप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याने महापालिकेचे रक्कम रु.12,64,400/- चे नुकसान झाले आहे. पुरवठा करावयाच्या साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. पुरवठादाराने केलेल्या साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी अळी व डास नाशक साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, प्रभागांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन पुरवठा व वाटप तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही. पुरवठा करावयाच्या साहित्याबाबत शासन निर्णय दि.30 ऑक्टोबर 2015 नुसार विभागाने त्यांची वार्षिक आवश्यकता (परिमाण) निश्चित करून त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे. निविदेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेते वेळी अंदाजित वार्षिक आवश्यकता निश्चित करण्यात आलेली नव्हती. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. खालीलप्रमाणे रक्कम रु.4400/- वसुल करुन शासन खाती जमा करावी.*** |

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागांतर्गत शहरात डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके (Larvicide) पुरवठा कामाची निविदा नोटीस प्रसिध्द करून दि.07/07/2015 पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.08/07/2015 रोजी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडण्यात आला होता. निविदेतील अटीशर्तीनुसार आवश्यक ती तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता खालील निविदाकारांनी केली असून त्यांचा दराचा लिफ़ाफ़ा दि.17/07/2015 रोजी उघडण्यात आला आहे.

पात्र निविदाकारांनी निविदेत सादर केलेले दर जादा असल्याने दि.17/07/2015 रोजी निविदा निवड समिती यांच्या उपस्थितीत निविदाकारांसमवेत दर कमी करणे बाबत वाटाघाटी करण्यात आल्या होत्या. वाटाघाटी केल्यानंतर प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | अळीनाशकाचे नाव | निविदाकाराचे नाव | वाटाघाटी नंतर सादर केलेल दर | आवश्यक परिमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | Fenthion 82.5% EC ISI Mark | मे.लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 2180/- प्र.लि. | |
| 2 | M.L.O. Oil | मे.स्पाईक पेस्टो केम प्रा.लि. | रु.115/- प्र.लि. | 21000 |
| 3 | Pyrosense oil- E ISI Mark | मे. डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन | रु.635/- प्र.लि. | 3900 लि. |
| 4 | Tempephos 50% EC ISI Mark | मे.श्रीरा ॲग्रो एजन्सीस | रु.1098/- प्र.लि. | |

वरीलप्रमाणे अळी नाशके पुरवठा करणे कामी स्थायी समिती ठराव क्र.54 दि.14/08/2015 अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

1. सन 2015-16 मध्ये कार्यादेश क्र.मनपा/आरोग्य/162/2015-16 दि.31/08/2015 अन्वये मे.लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन भाईंदर यांना Fenthion 82.5% EC ISI Mark (आवश्यक परिमाण 580 लिटर) दर 2180/- प्रति लिटर याप्रमाणे कार्यादेश देण्यात आला. परंतु उपरोक्त अळी नाशक (Larvicides) हे राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग) पुणे यांच्या दि.28/03/2011 तसेच राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम दिल्ली यांच्या कडील तांत्रिक सल्लागार समितीच्या दि.09/01/2008 रोजी निर्माण भवन दिल्ली येथे आरोग्य सेवा भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केलेल्या सभेत फ़ेन्थियान 82.5% ई.सी. या अळीनाशक विरुध्द क्युलेक्स डास अळीची प्रतिकार शक्ती निर्माण झाल्याचा अहवाल सादर केला असता सदर सभेमध्ये डासोत्पतीस्थानांवर फ़वारणीसाठी वापर करण्यात येणा-या फ़ेन्थियान 82.5% ई.सी. या अळीनाशक बंद करण्याची शिफ़ारस केली असताना ही EC ISI रक्कम रु.12,64,400/- खरेदी केलेले आहे. त्यामुळे महापालिकेचे रक्कम रु.12,64,400/- चे नुकसान झाले आहे. बंदी असलेले उपरोक्त अळीनाशक (Larvicide) विभागाने खरेदी केले आहे. अभ्यासपूर्ण व सखोल माहिती घेवून अंदाजपत्रकात खरेदी करावयाच्या डासनाशक व अळीनाशकाच्या समावेश करणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त प्रकरणात वरीलप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याने महापालिकेचे रक्कम रु.12,64,400/- चे नुकसान झाले आहे.

2. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागांतर्गत शहरात डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके (Larvicide) व डास नाशके पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा

मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

3. पुरवठादाराने केलेल्या साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी अळी व डास नाशक साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, प्रभागांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन पुरवठा व वाटप तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.

4. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागांतर्गत शहरात डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके (Larvicide) व डास नाशके पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या साहित्याबाबत शासन निर्णय दि.30 ऑक्टोबर 2015 नुसार विभागाने त्यांची वार्षिक आवश्यकता (परिमाण) निश्चित करून त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे. निविदेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेते वेळी अंदाजित वार्षिक आवश्यकता निश्चित करण्यात आलेली नव्हती. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

5. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. खालीलप्रमाणे रक्कम रु.4400/- वसुल करुन शासन खाती जमा करावी.

| अ.क्र. | अळीनाशकाचे नाव | निविदाकाराचे नाव | कार्यादेश क्र. व दिनांक | वसुलपात्र मुद्रांक शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1 | M.L.O. Oil | मे.स्पाईक पेस्टो केम प्रा.लि. | क्र.160-31/8/15 | 700 |
| | | | क्र. 250 दि.15/12/15 | |
| 2 | Pyrosense oil- E ISI Mark | मे. डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन | क्र.161 दि.31/08/15 | 1200 |
| | | | क्र.247 दि.15/12/15 | |
| 3 | Tempephos 50% EC ISI Mark | मे.श्रीरा ॲग्रो एजन्सीस | क्र.164 दि.31/08/15 | 500 |
| | | | क्र.246 दि.15/12/15 | 2000 |
| | | | क्र.363 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दि.04/03/16 | |

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.47 दिनांक 20/02/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 42, Hmm No : 47)

## *9 बालवाडी विदयार्थ्यांना साहित्य पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : महिला बालकल्याण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 805800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 805000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 800.00/-

***कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.400/- ची नवकार युनिफॉर्म व प्रेयस कॉर्पोरेशन कडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड, प्रकरण 5(1) अ नुसार अशी जी कोणतीही संविदा, जर ती आयुक्ताने केली असती तर, ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने तरतुदीचे उल्लंघन झाले आहे. अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. सदर कामाची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासन निर्णय महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही.केंद्रिय सर्तकता आयोगाचे ऑफिस मेमोरॅन्डम नं.12-02-1-CTE-6 दि.17/12/2002 च्या परिशिष्ट क्र. 5ब नुसार मक्तेदाराची पुर्व पात्रता (Prequalification Criteria (PQ)) ठरविण्यासाठी लगतच्या मागील 3 वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र (Annual Report- Balancesheet, Profit and loss account), लगतच्या 2 वर्षाच्या कामाचा अनुभव व लगतच्या वर्षाचे***

***आयकर प्रमाणपत्र (Latest ITCC) असणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे मक्तेदाराने सादर केलेले प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नाही. साहित्य नमुना तपासणी न करताच पुरवठा आदेश निर्गमित केला आहे. त्यामुळे मालाच्या दर्जाबद्दल खात्री न करता पुरवठा आदेश देण्यात आला आहे.***

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चालविण्यांत येणाऱ्या बालवाडी शाळेतील विदयार्थ्यांना साहित्य पुरवठा करण्यासाठी दि.25/05/2015 रोजी “पुकार” व दि.28/05/2015 रोजी “जनखुलासा” या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच दि.27/05/2015 ते दि.04/06/2015 रोजी ई-टेडरींग व्दारे ऑन लाईन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे निविदेसाठी दोन वेळा निविदावाढ देण्यात आली होती. सदर निविदाचे तांत्रिक कागदपत्रे मा. निविदा निवड समितीची दि.09/07/2015 रोजीची मंजुरी घेवुन उघडण्यात आले. दोन्ही निविदा धारकांनी निविदेसाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यामुळे मा. निविदा निवड समितीच्या दि.21/07/2015 रोजीच्या मंजुरीअन्वये दोन्ही संस्थाचे फायनान्शीयल बीड उघडले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| Sr. No. | Details | | नवकार युनिफॉर्म | प्रेयस कॉर्पोरेशन | वाटाघाटीनंतर नवकार युनिफॉर्म यांनी मान्य केलेले दर | वाटाघाटीनंतर प्रेयस कॉर्पोरेशन यांनी मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Workbook | Marathi | 34.89 | 39.90 | 34.00 | |
| | | Gujarati | 39.89 | 49.20 | 39.00 | |
| | | Hindi | 39.89 | 41.40 | 39.00 | |
| 2 | Workbook (English A to Z) | | 34.89 | 49.90 | 34.00 | |
| 3 | Workbook (Math’s 1 to 50) | | 39.89 | 39.10 | - | 35.20 |
| 4 | Drawing book (Colouring book) (A4 size) | | 29.89 | 29.90 | 29.00 | |
| 5 | Colour box (Crayons) | | 8.89 | 9.95 | 8.00 | |
| 6 | Chalk box (10 box for each balwadi) | | 19.89 | 27.60 | 19.00 | |

वरीलप्रमाणे दोन संस्थाचे दर प्राप्त झालेले आहेत. वरील दोन संस्थापैकी अ.क्र.1,2,4,5,6 यांचे नवकार युनिफॉर्म यांचे दर कमी असुन अ.क्र.3 चा प्रेयस कॉर्पोरेशन यांचा दर कमी आहे. मा.निविदा निवड समिती दि.24/07/2015 रोजी सदर निविदेची वाटाघाटी केली असता नवकार युनिफॉर्म व प्रेयस कॉर्पोरेशन यांनी वरीलप्रमाणे दर मान्य केलेला आहे. तरी सदर साहित्य पुरवठा करणेकामी नवकार युनिफॉर्म यांना कार्यादेश जा.नं./मनपा/मबावि/94/2015-16 दि.21/12/2015 व प्रेयस कॉर्पोरेशन या

संस्थेस साहित्य पुरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात आले.

उपरोक्त कामाचे नस्ती, प्रमाणात यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रूटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.400/- ची नवकार युनिफॉर्म व प्रेयस कॉर्पोरेशन वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

2. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड, प्रकरण 5(1) अ नुसार अशी जी कोणतीही संविदा, जर ती आयुक्ताने केली असती तर, ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

3. मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या लेखन साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

4. सदर कामाची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासन निर्णय महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही तसेच वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे कात्रण नस्तीत नसल्याने शासन निर्णयाचे अनुपालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

5. उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. तरी उपरोक्त कामावर झालेला खर्च रक्कम रु.8,05,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

6. केंद्रिय सर्तकता आयोगाचे ऑफिस मेमोरॅन्डम नं.12-02-1-CTE-6 दि.17/12/2002 च्या परिशिष्ट क्र. 5ब नुसार मक्तेदाराची पुर्व पात्रता (Prequalification Criteria (PQ)) ठरविण्यासाठी लगतच्या मागील 3 वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र (Annual Report- Balancesheet, Profit and loss account), लगतच्या 2 वर्षाच्या कामाचा अनुभव व लगतच्या वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (Latest ITCC) असणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे मक्तेदाराने सादर केलेले प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नसल्याने मक्तेदार उपरोक्त परिपत्रकानुसार निविदा भरण्यास पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

7. निविदेच्या अटी व शर्ती अन्वये नमुना तपासणीचा अहवाल तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर पुरवठा आदेश निर्गमित करण्याची तरतूद होती, परंतु नमुना तपासणी करण्यात आली नाही व नमुना तपासणी न करताच पुरवठा आदेश निर्गमित केला आहे. त्यामुळे मालाच्या दर्जाबद्दल खात्री न करता पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.85 दि.26/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 48, Hmm No : 85)

## *10 महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत गरीब व गरजु महिलांना घरघंटी मशिन पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : महिला बालकल्याण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1900800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1900000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 800.00/-

***सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.500 चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100 चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.400 ची अमरदीप उदयोग (Millset Company) व ओम साई समाज सेवा संस्था (Rajratna Company) वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड, प्रकरण 5(1) अ नुसार अशी जी कोणतीही संविदा, जर ती आयुक्ताने केली असती तर, ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने तरतुदीचे उल्लंघन झाले आहे. करारनामा अटी शर्ती 10 नुसार घरघंटी मशिनची 1 वर्षाची वॉरंटी देणे बंधनकारक राहील. (इलेक्ट्रीक मोटर, इतर सुटे भाग) पुरवठा केल्यानंतर 1 वर्षाच्या कालावधी मध्ये मशिन नादुरुस्त झाल्यास ते निविदाकाराने स्वखर्चाने स्पेअर पार्टसह तक्रार मिळाल्यापासुन 7 दिवसांचे आत दुरुस्त करुन देणे बंधनकारक राहील. याप्रमाणे 1 वर्षाच्या कालावधीमध्ये (वॉरंटी कालावधी) नादुरुस्त झालेल्या माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. महिला व बालकल्याण योजने अंतर्गत नटराज कंपनीची (Hopper Container capacity 4.5 kg and Grinding capacity 7 to 10 kg hr.) घरघंटी मशिन मनपाने ठरवुन दिलेल्या अटीशर्तीनुसार पुरवठा करण्याचे आहे. तसेच करारनामा अटी शर्ती 3 नुसार निविदा पत्रकातील तपशील (स्पेसीफिकेशन) नुसार मालाचा पुरवठा करायचा आहे. परंतु याबाबतचा तपासणी अहवाल नस्तीत आढळुन आला नाही. सदर कामाची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासन निर्णय महाराष्ट्र शासन सामान्य***

***प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही तसेच वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे कात्रण नस्तीत नसल्याने शासन निर्णयाचे अनुपालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गरीब व गरजु महिलांना घरघंटी मशिन पुरवठा करण्यासाठी दि.24/06/2015 रोजी “ठाणेवैभव” व “थाने की आवज” या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच दि.25/06/2015 ते दि.06/07/2015 रोजी ई-टेडरींग दवारे ऑन लाईन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. परंतु सदर कामासाठी मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे निविदेस सात दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढीनंतर चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांपैकी अमरदीप उदयोग, जी.एस.एन.असो., ओम साई समाज सेवा संस्था या तीन निविदा धारकांनी निविदेसाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यामुळे मा. निविदा निवड समिती यांच्या दि.21/07/2015 रोजीच्या मंजुरीअन्वये फायनान्शीयल बीड उघडले असता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | अमरदिप उदयोग | जी.एस.एन.असो. | ओम साई समाज सेवा संस्था | वाटाघाटीनंतर ओम साई समाज सेवा संस्था यांनी मान्य केलेले दर | वाटाघाटीनंतर अमरदिप उदयोग यांनी मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Natraj Company | - | 20,100 | - | | |
| 2 | Rajratna Company | - | - | 19,750 | | 19,000 |
| 3 | Millset Company | 19,750 | - | - | | 19,000 |

वरीलप्रमाणे तीन संस्थाचे दर प्राप्त झालेले आहेत. वरील तीन संस्थापैकी अमरदीप उदयोग (Millset Company) व ओम साई समाज सेवा संस्था (Rajratna Company) या दोन संस्थेचे दर कमी असुन समान आहेत. निविदा निवड समिती दि.24/07/2015 रोजी सदर निविदेची वाटाघाटी केली असता अमरदीप उदयोग (Millset Company) व ओम साई समाज सेवा संस्था (Rajratna Company) यांनी वरीलप्रमाणे दर मान्य केलेला आहे. तरी सदर घरघंटी मशिन पुरवठा करणेकामी अमरदीप उदयोग (Millset Company) या संस्थेस घरघंटी मशिन पुरवठा करणेकामी कार्यादेश

जा.क्र./मनपा/म.बा.क/35/2015-16 दि.14/09/2015 (एकूण नग 50) व ओम साई समाज सेवा संस्था (Rajratna Company) (एकूण नग 50) या संस्थेस घरघंटी मशिन पुरवठा करणेकामी कार्यादेश जा.क्र./मनपा/म.बा.क/34/2015-16 दि.14/09/2015 देण्यात आला.

उपरोक्त कामाचे नस्ती, प्रमाणाक यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रूटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.400/- ची अमरदीप उदयोग (Millset Company) व ओम साई समाज सेवा संस्था (Rajratna Company) वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

2. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड, प्रकरण 5(1) अ नुसार अशी जी कोणतीही संविदा, जर ती आयुक्ताने केली असती तर, ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

3. करारनामा अटी शर्ती 10 नुसार घरघंटी मशिनची 1 वर्षाची वॉरंटी देणे बंधनकारक राहील असे नमूद आहे. व तसे देणे बंधनकारक राहील असे असताना 1 वर्षाच्या कालावधीमध्ये (वॉरंटी कालावधी) नादुरुस्त झालेल्या मशिनची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

4. महिला व बालकल्याण योजने अंतर्गत "नटराज कंपनीची (Hopper/Container capacity 4.5 kg & Grinding capacity 7 to 10 kg hr.)" घरघंटी मशिन मनपाने ठरवुन दिलेल्या अटीशर्तीनुसार ठेकेदाराने पुरवठा करावयाचे आहे. व करारनामा अट क्र. 3 नुसार निविदा पत्रकातील तपशील (स्पेसीफिकेशन) नुसार मालाचा पुरवठा करायचा आहे. परंतु याबाबतचा तपासणी अहवाल नस्तीत आढळुन आला नाही, त्यामुळे सदर अटीचे पालन झालेबाबतची लेखा खात्री झाली नाही.

5. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. अशा कामाची जाहिरात वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे कात्रण नस्तीत नसल्याने शासन निर्णयाचे अनुपालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

6. उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. तरी उपरोक्त कामावर झालेला खर्च रक्कम रु.19,00,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.87 दि.26/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 50, Hmm No : 87)

## *11 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागाने अधिकारी/कर्मचारी यांना वेतन अदा करताना संबंधितांकडून पोहोच न घेणे व रु.1 किंमतीच्या मुद्रांकाची वसुली न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्रमांक 160 व 277(1) अन्वये महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना वेतन अदा केल्यानंतर वेतन पदावर प्रत्येक कर्मचाऱ्यांची वेतन प्राप्त झाल्याबद्दल मुद्रांकित स्वाक्षरी घेतली जात असे परंतु सध्या कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात थेट इलेक्ट्रॉनिक माध्यमातून वेतन अदा केले जात असल्याने दि.10/09/2004 च्या भारताच्या राजपत्रात प्रसिध्द केल्याप्रमाणे परिशिष्ट C मधील कलम 117(3) नुसार रु.5000/- व त्यापेक्षा जास्त प्रदानाकरिता रु.1 मुदयाच्या मुद्रांक तिकिटावर अदात्याची स्वाक्षरी घेतली जाते. शासन निर्णय क्र. संकीर्ण 1007/प्र.क्र.112/भाग-4 कोषा प्रशा – 5 दि:28/06/2013 नुसार वेतन पटाची आवश्यकता नसल्याने (खात्यात थेट इलेक्ट्रॉनिक माध्यमातून वेतन अदा केल्यापासून) रु.1 मुदयाच्या मुद्रांकाऐवढा कर्मचाऱ्यांकडून त्याच्या वेतनातून रु.1 वजा करुन ते शासन खाती जमा करण्यात आलेले नाहीत. (म.शा. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण 1013/प्र.क्र.64/कोषा प्रशा – 5 दि:26/10/2015)*** |

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागतील सन 2015-16 मधील अधिकारी/कर्मचारी यांना मासिक वेतन अदा केले त्याप्रमाणे वेतन देयकाचे लेखा परिक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्रमांक 160 व 277(1) अन्वये महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना वेतन अदा केल्यानंतर वेतन पदावर प्रत्येक कर्मचाऱ्यांची वेतन प्राप्त झाल्याबद्दल मुद्रांकित स्वाक्षरी घेतली जात असे परंतु सध्या कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात थेट इलेक्ट्रॉनिक माध्यमातून वेतन अदा केले जात असल्याने दि.10/09/2004 च्या भारताच्या राजपत्रात प्रसिध्द केल्याप्रमाणे परिशिष्ट C मधील कलम 117(3) नुसार रु.5000/- व त्यापेक्षा जास्त प्रदानाकरिता रु.1 मुदयाच्या मुद्रांक तिकिटावर अदात्याची स्वाक्षरी घेतली जाते. शासन निर्णय क्र.

संकीर्ण 1007/प्र.क्र.112/भाग-4 कोषा प्रशा - 5 दि.28/06/2013 नुसार वेतन पटाची आवश्यकता नसल्याने (खात्यात थेट इलेक्ट्रॉनिक माध्यमातून वेतन अदा केल्यापासून) रु.1 मुदयाच्या मुद्रांकाऐवढा कर्मचाऱ्यांकडून त्याच्या वेतनातून रु.1 वजा करुन ते शासन खाती जमा करण्यात आलेले नाहीत. (म.शा. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण 1013/प्र.क्र.64/कोषा प्रशा - 5 दि.26/10/2015) रेव्हेन्यू स्टॅम्पच्या महसुली जमा खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे मुंबईकरिता पुढील प्रमाणे लेखाशिर्ष आहे.

0030 - मुद्रांक व नोंदणी फी

02 - मुद्रांक न्यायिकेतर 102 मुद्रांकाची विक्री

02 - इतर न्यायिकेतर मुद्रांकाची विक्री

(01)(01) मुद्रांक अधिक्षक (00300455) मुंबई करिता

उपरोक्त प्रमाणे नमुद केल्यानुसार महानगरपालिकेने कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास क्र.122 दिनांक 11/06/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 79, Hmm No : 122)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## 12 अग्रिम रक्कम रु.6289727 चे समायोजन न झाल्याबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : अग्रिम समायोजन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6289727.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 6289727.00/-

***मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्र.142 नुसार प्रथम घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन झाल्याशिवाय दुसरे अग्रिम मंजूर करू नये अशी तरतूद आहे. यामुळे त्याचेही पालन झालेले नाही. तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 मधिल नियम 58 टिपनुसार वित्तीय औचीत्याचे पालन झालेले नाही.***

लेखा विभागाचे सन 2015- 2016 या वर्षचे लेखा परिक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. सन 2015 -16 या आर्थिक वर्षातील अग्रिम रजिस्टरची तपासणी केली असता अग्रित रकमा ह्या सन 1993 सालापासून समायोजित होण्याचे प्रलंबित असून अशा रकमांचे प्रमाण फार मोठे आहे. अग्रिम रजिस्टरमध्ये प्रत्येक आर्थिक वर्षात असमायोजित असलेल्या अग्रिम रकमांची विगतवारी देण्यात आलेली नाही, तसेच त्याचे हिशेबही ठेवण्यात आलेले नाहीत. वास्तविक अग्रिम रकमांचे समायोजनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

2. सन 2015-16 अखेर अग्रिम रजिस्टरप्रमाणे रक्कम रु.62,89,727/- इतकी अग्रिम समायोजित होण्याची बाकी आहे. मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्र. 142 नुसार प्रथम घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन झाल्याशिवाय दुसरे अग्रिम मंजूर करू नये अशी तरतूद आहे. तरी महानगरपालिकेने बऱ्याच अधिकारी कर्मचारी यांना पहिले अग्रिम समायोजन केले नसतांना दुसरे अग्रिम दिले आहे. त्यामुळे सदरील नियमाचे पालन झालेले नाही. तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 मधिल नियम 58 टिपनुसार वित्तीय औचीत्याचे पालन झालेले नाही.

3. असमायोजीत अग्रीमाचे गांभीर्य लक्षात घेऊन या सर्व अग्रिमांची तातडीने वसूली करावी. दिलेल्या अग्रिमाचे समायोजन विहीत कालावधीत करावे. मागील अग्रिम वसुल झाल्याशिवाय पुढील अग्रिम देवू नये.

सदरील आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.106 दि.16/05/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

## *13 दलित वस्ती सुधारणा सन 2015-16 मधील कामात अनियमितता झाले बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष : दलित वस्ती सुधारणा शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 974149.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 974149.00/-

***कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाच्या जागेविषयी लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. तसेच कामाचे हिस्ट्री शीट/ रजिस्टर नस्तीत उपलब्ध न झाल्याने जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. कामाच्या पूर्वीचे फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फ़ोटो/ सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरी सह नस्तीत उपलब्ध झाले नाही. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गोखनि 10/1009//प्र.क्र.309/ख दि.11/02/2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे/ स्वामित्वधन वसुल न केल्याने रक्कम रुपये 316574 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. सदरील कामाच्या 1% रक्कम रुपये 45772/- विमा न उतरवल्याने विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनी-2310/ साबवि/ विमावसुली/ अभी-3 दिनांक 08/09/2010 नुसार ठेकेदाराकडून विमा रक्कम रुपये 45772 वसूल करण्यात यावी.कामाची सुरक्षा अनामत रक्कम नस्तीत उपलब्ध न झाल्याने एकत्रित रक्कम रुपये 651803 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.***

दलित वस्ती सुधारणा सन 2015-16 मधील खर्च झालेल्या कामाच्या नस्त्या व प्रमाणके तपासणी केली असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाच्या जागेविषयी लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. तसेच कामाचे हिस्ट्री शीट/ रजिस्टर नस्तीत उपलब्ध न झाल्याने जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

2. कामाच्या पूर्वीचे फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फोटो /सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरी सह नस्तीत उपलब्ध झाले नाही.

3. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र . गोखनि/10/1009//प्र.क्र.309/ख दि.11/02/2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे /स्वामित्वधन वसुल न

केल्याने खालील प्रमाणे रक्कम रुपये 3,16,574/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | Item of Estimate | कामाच्या बाबी (QTY of item) | (Metal H.br/crushed) | | RateRs. 70.67 cumt. | Amount for recovery |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate consumption | Quantity | | |
| 1 | भाईंदर(प) प्र.क्र.27 मधील नाझरेथ आगार येथे सी.सी. पदपथाचे बांधकाम करणे | Supplying 230mm soling | 148.89 | 1.20 | 178.67 | 70.67 | 12626.47 |
| 2 | भाईंदर (प) प्र.क्र. 27 मुर्धा गावातील लक्ष्मी सदन ते शिवसाई निवास आणि विनायक भोईर यांच्या घराजवळ स्लॅबचे बांधकाम करणे व सी.सी. रस्ते बांधकाम करणे . | Supplying 15cm to 20 cm soling | 53.440 | 1.20 | 64.128 | 70.67 | 4531.92 |
| 3 | भाईंदर (प) प्र.क्र.27 आंबेडक्रर नगर समोरी पोल क्र.xuc/014/014 ते xuc/04/020 रस्ता तयार करणे | Item no.3 Supplying trap/granite/quartzite / gneiss/laterite stone metal ata the road side…<br><br>Item no.4 Supplying …..crushed metal of the trap/granite/ quartize/gneiss | 514.68<br><br>171.36 | 1.00<br><br>1.00 | 514.68<br><br>171.36 | 70.67<br><br>70.67 | 36372.43<br><br>12110.01 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | stone aggregate at the road side … | | | | | |
| 4 | भाईंदर (प) प्र.क्र.27 कम्युनिटी हॉल ते पोल क्र.xuc/004/007 पर्यंत रस्ता तयार करणे | Item no.3 Supplying trap/granite/quartzite / gneiss/laterite stone metal ata the road side… | 574.20 | 1.00 | 574.20 | 70.67 | 40578.71 |
| | | Item no.4 Supplying …..crushed metal of the trap/granite/ quartize/gneiss stone aggregate at the road side … | 190.08 | 1.00 | 190.08 | 70.67 | 13432.95 |
| 5 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील गांधीनगर व आंबेडकर नगर येथे सी.सी. गटार व सी.सी. पदपथाचे बांधकाम करणे | Supplying 15cm to 20 cm soling | 61.920 | 1.20 | 74.304 | 70.67 | 5251.06 |
| 6 | भाईंदर (प) आंबेडकर नगर समोर पोल क्र.xuc/004/007 ते xuc/004/014 पर्यंत रस्ता तयार करणे | Item no.3 Supplying trap/granite/quartzite / gneiss/laterite stone metal ata the road side… | 356.40 | 1.00 | 356.40 | 70.67 | 25186.78 |
| | | Item no.4 Supplying …..crushed metal of the trap/granite/ quartize/gneiss stone aggregate at the road side … | 118.80 | 1.00 | 118.80 | 70.67 | 8395.59 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | रा.म.क्र.8 वरील वर्सोवा गाव येथे सी.सी. रस्ते व गटार दुरुस्ती करणे | Supplying 15cm to 20 cm soling | 299.15 | 1.20 | 358.98 | 70.67 | 25369.11 |
| 8 | रा.म.क्र. घोडबंदर गाव येथिल सर्वोदय क्लिनिक ते जय लहुजी संस्था पर्यंत सी.सी. गटार बनवुन स्लॅब टाकणे | Supplying 15cm to 20 cm soling | 57.45 | 1.20 | 68.94 | 70.67 | 4871.98 |
| 9 | भाईंदर(प) प्र.क्र.27 मधील उत्तनकडे जाणा-या मुख्य रस्त्यालगत इले. पोल क्र. XUC/2027 ते XUC/2025 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे | Supplying 15cm to 20 cm soling | 171.99 | 1.20 | 206.388 | 70.67 | 14585.43 |
| 10 | भाईंदर (प)प्र. क्र. 27 मधील XUC20/29 ते XUC20/27/ पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे | Supplying 15cm to 20 cm soling | 181.91 | 1.20 | 218.292 | 70.67 | 15426.69 |
| 11 | भाईंदर(प) प्र.क्र.27 मधील भोलानगर येथे गल्ली क्र. 8,9,10,11 मध्ये गटाराचे व | Supplying 15cm to 20 cm soling | 138.61 | 1.20 | 166.32 | 70.67 | 11754.68 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्लॅबचे बांधकाम करणे | | | | | | |
| 12 | भाईंदर (प) प्र.क्र.27 मधील मुर्धा ब्रीज ते पोल क्र. XUC/20/29 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे | Supplying 15cm to 20 cm soling | 183.22 | 1.20 | 219.864 | 70.67 | 15537.78 |
| 13 | मि.भा.मनपा क्षेत्रातील रा.म.क्र.08 घोडबंदर गाव जवळील वर्सोवा घोडबंदर रस्ता ते नेट्चुन फ़ॅक्टरी पर्यंत खडीकरण करून डांबरीकरण करणे | Item no.4 Supplying …..crushed metal of the trap/granite/ quartize/gneiss stone aggregate at the road side … | 167.65 | 1.00 | 167.65 | 70.67 | 11847.82 |
| | | Item No.7 Supplying….. trap/granite/ quartize/gneiss stone aggregate at the road side…. | 110.780 | 1.00 | 110.780 | 70.67 | 7828.82 |
| 14 | घोडबंदर गाव रेती बंदर ते मॉर्डन झोपडपट्टी रस्त्यालगत गटार बांधणे | Supplying 15cm to 20 cm soling | 110.37 | 1.20 | 132.444 | 70.67 | 9359.81 |
| 15 | राम.क्र. 8 वरील वर्सोवा गाव येथे सी.सी. रस्ते व गटार दुरुस्ती करणे | Supplying 15cm to 20 cm soling | 17.76 | 1.20 | 21.312 | 70.67 | 1506.11 |
| | **TOTAL** | | | | | | **2,76,574.15** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

4. भाईंदर पश्चिम प्रभाग क्र .27 मधील उत्तनकडे जाणा -या मुख्य रस्त्यालगत इले .पोल क्र.xuc/20/27 ते xuc/20/25 पर्यंत आर.सी.सी.नाल्याचे बांधकाम करणे या कामाची विमा रक्कम न भरल्याने कामाची रक्कम रुपये 45,77,210/- असून सदरील कामाच्या 1% रक्कम रुपये 45,772/- विमा न उतरवल्याने विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनी -2310/साबवि/विमावसुली/अभी-3 दि.08/09/2010 नुसार ठेकेदाराकडून विमा रक्कम रुपये 45,772/- वसूल करण्यात यावी.

5. खालील कामाचे सुरक्षा अनामत निविदेतील क्र .3.6.4 नुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी प र्यंत असणे आवश्यक आहे तरी सदरील कामाची सुरक्षा अनामत रक्कम नस्तीत उपलब्ध न झाल्याने एकत्रित रक्कम रुपये 6,51,803/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

| **अनु.क्र.** | **कामाचे नाव** | **सुरक्षा अनामत कपात केलेली रक्कम** | **सुरक्षा अनामत वसुलपात्र रक्कम** |
|---|---|---|---|
| 1 | भाईंदर पश्चिम प्र.क्र.27 मधील गांधीनगर व आंबेडकर नगर गटार बांधणे | 2% देयकातून कपात आहे 3% नस्तीत नाही | 38427/- |
| 2 | भाईंदर पश्चिम प्र.क्र.27 मधील कम्युनिटी हॉल ते पोल क्र.xuc/004/007 पर्यंत रस्ता तयार करणे | 2% देयकातून कपात आहे<br>3% नस्तीत नाही | 1,34,764/- |
| 3 | भाईंदर पश्चिम आंबेडकर नगर समोर पोल क्र.XUC/00/07 ते पोल क्र.XUC/004/014 पर्यंतचा रस्ता तयार करणे. | 2% देयकातून कपात आहे<br>3% नस्तीत नाही | 1,27,849/- |
| 4 | भाईंदर पश्चिम प्र.क्र.27 आंबेडकर समोर पोल क्र.XUC/04014 ते XUC/004/020 पर्यंत रस्ता तयार करणे | 2% देयकातून कपात आहे<br>3% नस्तीत नाही | 1,40,064/- |
| 5 | भाईंदर पश्चिम प्र.क्र.27 मधील भोलानगर येथे गल्ली क्र.8,9,10 मध्ये गटाराचे व स्लॅबचे बांधकाम करणे | 2% देयकातून कपात आहे<br>3% नस्तीत नाहीs | 73,383/- |
| 6 | भाईंदर पश्चिम प्र.क्र.27 मधील उत्तन कडे जाणा-या मुख्य रस्त्यालगत इलेक्ट्रिक पोल क्र.XUC/20/27 ते XUC2025 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे | 2% देयकातून कपात आहे<br>3% नस्तीत नाही | 1,37,316/- |
| | **TOTAL** | | **6,51,803/-** |

उपरोक्त आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र .24 दि.29/12/2018 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 2, Hmm No : 27)

## *14 नवीन रस्ता बांधणे - मिरा रोड(पू) शांतीनगर सेक्टर नं.10 मधील सर्व सी.सी. गटार बांधणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष : नवीन रस्ते बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3517949.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3389650.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 128299.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तापित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत निविदा नस्ती मध्ये आढळली नाही. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ- वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क- वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. सदरील निविदेच्या कामासाठी स्पर्धा झालेली नाही. कामाचे हिस्ट्री शीट व त्य अनुषंगीक नोंद वहया व नोंदी नस्तीत उपलब्ध न झाल्याने कामाच्या जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. कामाच्या पूर्वीचे फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फ़ोटो तारखेनिहाय सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह नस्तीत उपलब्ध झाले नाही. उर्वरित सुरक्षा अनामत रक्कम 3% देयकातून व निविदा नस्तीतून कपात केले बाबत बँक गॅरंटी किंवा मनपा ची पावती उपलब्ध नसल्याने रक्कम रु.101660/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे/स्वामित्वधन रक्कम रू.26,639/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | मिरा रोड(पु) शांतीनगर सेक्टर नं.10 मधील सर्व सी.सी. गटार बांधणे |

| | | |
|---|---|---|
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | 33,89,650/- |
| 3 | तांत्रिक मान्यता पत्र क्रमांक | 61 दि.10/7/2015 |
| 4 | प्रशासकीय मान्यता पत्र क्र. | दि.18/05/2015 |
| 5 | स्थायी समिती ठराव क्र. | 82 दि.30/9/2015 |
| 6 | जाहिरात मागविण्यात आलेल्या वृत्तपत्राचे नाव व दिनांक | दै.यशोभुमी, दै.वृत्तमानस<br>दि.30/9/2015 |
| 7 | निविदेचा क्रमांक व दिनांक | 120, दि.21/7/2015 |
| 8 | निविदेमध्ये भाग घेण्यात आलेल्या कंत्राटदारांची नावे | 1) ऱाठोड असोसि.0.01% कमी<br>2) मुस्कान इं. अंदाजपत्रकीय 16.00% जास्त<br>3) राठोड ब्रदर्स 14.00% जास्त<br>4) कंचन कंस्ट्रक्शन 16.00% जास्त |
| 9 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे. राठोड असोसिएट्स |
| 10 | कार्यादेश क्रमांक व दिनांक | 370/15-16 दि.24/10/2015 |
| 11 | काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि.25/02/2016 |
| 12 | कामाचा कालावधी | 4 महिने (दि.24/10/15 ते दि.23/02/2016) |
| 13 | मोजमाप पुस्तकाचा क्रमांक व दिनांक | 2050, दि.25/02/2016 पृ.क्र.34-37 |
| 14 | अंदाजपत्रकासाठी वापरण्यात आलेली दरसूचीचे वर्ष | 2013-14 |
| 15 | कंत्राटदारा बरोबर केलेल्या कराराचा दिनांक व नोंदणी केलेल्या कराराच्या मुद्रांक शुल्काची रक्कम | दि.29/10/2015<br>2500/- |
| 16 | कंत्राटदाराने निविदेमध्ये भरण्यात आलेले दर | 33,89,650/- |
| 17 | प्रयोग शाळेकडून कामाची तपासणी केलेल्या संस्थेचे नाव व दिनांक | दि.20/01/2016 रोजीचा लॅण्डमार्क कंसल्टंट ॲण्ड इंजि.टेक्नो. यांचा अहवाल |
| 18 | कामाचे लेखाशिर्ष | नवीन गटारे/नाले बांधकाम |
| 19 | प्रदान करण्यात येणा-या देयकाचा क्रमांक व दिनांक | दि.29/3/2016 |
| 20 | प्रदान करण्यात आलेल्या देयकाची रक्कम व प्रमाणक क्रमांक व दिनांक | 33,88,651/- |
| 21 | कामाची मापे नोंदवण्यात आलेल्या मोजमाप पुस्तकाचा क्रमांक पृष्ठ क्रमांक व दिनांक | 2050, दि.25/02/2016<br>पृ.क्र.34-37 |

उपरोक्त कामांच्या बाबींचे लेखा परीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तापित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत निविदा नस्ती मध्ये आढळली

नाही.

2.सदरील कामाची निविदा जाहिरात ही दैनिक यशोभुमी व दैनिक वृत्तमानस या वर्तमानपत्रात दि.23/07/2015 रोजी दिली आहे. तरी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. सदरील निविदेच्या कामासाठी स्पर्धा झालेली नाही.

3.कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबत अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाच्या जागेविषयी लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. तसेच कामाचे हिस्ट्री शीट व त्य अनुषंगीक नोंद वह्या व नोंदी नस्तीत उपलब्ध न झाल्याने कामाच्या जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

4.कामाच्या पूर्वीचे फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फ़ोटो तारखेनिहाय सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह नस्तीत उपलब्ध झाले नाही.

5.सदरील कामाच्या देयकाची प्रमाणक तपासणी केली असता देयकातून सुरक्षा अनामत 2% रक्कम रु.67773/- एवढी कपात केली आहे. परंतु उर्वरित सुरक्षा अनामत रक्कम 3% देयकातून व निविदा नस्तीतून कपात केले बाबत बँक गॅरंटी किंवा महानगरपालिकेची पावती उपलब्ध नसल्याने रक्कम रु.101660/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

6.महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र.गोखनि10/1009/प्र.क्र.309/ख दि.11/02/2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे/स्वामित्वधन रक्कम रु.26,639/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.29 दि.15/01/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

STDARPF8701 (Ref No : 32, Hmm No : 29)

## *15 आमदार निधी सन 2015-16 मधील कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष : आमदार निधी शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 50365.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 32018.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 18347.00/-

***कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध नाही. कामाचे हिस्ट्री शीट/रजिस्टर नस्तीत उपलब्ध न झाल्याने जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. कामाच्या पूर्वीचे***

***फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फ़ोटो/सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीसह नस्तीत नाही. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गोखनि 10/1009/प्र.क्र.309/ख दि.11/02/2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे/स्वामित्वधन वसुल न केल्याने रक्कम रु.32018/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. कामाची सुरक्षा अनामत निविदेतील क्र.3.6.4 नुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत असणे आवश्यक आहे. तरी सदरील कामाची सुरक्षा अनामत रक्कम नस्तीत उपलब्ध न झाल्याने एकत्रित रक्कम रु.18347/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.***

आमदार निधी सन 2015-16 मधील खर्च झालेल्या कामाच्या नस्त्या व प्रमाणके तपासणी केली असता खालील कामात अनियमितता आढळून आल्या.

1. कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाच्या जागेविषयी लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. तसेच कामाचे हिस्ट्री शीट/रजिस्टर नस्तीत उपलब्ध न झाल्याने जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

2. कामाच्या पूर्वीचे फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फ़ोटो/सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीसह नस्तीत नाही.

3. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गोखनि 10/1009/प्र.क्र.309/ख दि.11/02/2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे/स्वामित्वधन वसुल न केल्याने खालील प्रमाणे रक्कम रु.32018.32 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

| **अ क्र** | **कामाचे नाव** | **Item of Estimate** | **कामाच्या बाबी (QTY of item)** | **(Metal H.br/crushed)** | | **Rate Rs. 70.67 cumt.** | **Amount for recovery** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate consumption | Quantity | | |
| 1 | भाईंदर (प) लालबहादुर शास्त्रीनगर येथे शौचालय बांधणे | Item No.3 Supplying 15 to 23 cm. Trap/granite/quartzite/gneiss/laterite stone rubble ata the road side for soling/metal including conveying | 40.21 | 1.20 | 48.252 | 70.67 | 3411.41 |
| 2 | भाईंदर (प) | Item No.3 Supplying 15 to 23 | 55.22 | 1.20 | 66.264 | 70.67 | 4682.87 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आंबेडकर नगर (गांधीनगर) येथे शौचालय बांधणे | cm.Trap/granite/quartzite/gneiss/laterite stone rubble ata the road side for soling/metal including conveying | | | | | |
| 3 | भाईंदर (प) नेहरूनगर येथे शौचालय बांधणे | Item No.3 Supplying 15 to 23 cm. Trap/granite/quartzite/gneiss/laterite stone rubble ata the road side for soling/metal including conveying | 35.40 | 1.20 | 42.48 | 70.67 | 3002.06 |
| 4 | मिरारोड (पु) शांती गार्डन येथील जयमाता दी चौक नयानगर कानुंगी इस्टेट, रजा मैदान येथे फुटपाथवर पेव्हर ब्लॉक वसविणे . | Item No.3 Providing dry trap/rubble stone soling 15cm to20cm thick including hand packaging and compacting etc.complete DSR 8/6 | 51.52 | 1.20 | 61.82 | 70.67 | 4369.10 |
| 5 | मिरारोड (पु) येथील पुजानगर सुविधा टॉवर ते जलाराम दर्शन | Item No.3 Providing dry trap/rubble stone soling 15cm to20cm thick including hand packaging and compacting etc.complete DSR 7/6 | 81.15 | 1.20 | 97.38 | 70.67 | 6881.84 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पर्यंत सी.सी. गटार बांधुन स्लॅब टाकणे. | | | | | | |
| 6 | भाईंदर (प) येथे असलेल्या स्मशानभुमीत आसन व्यवस्था स्टॅण्ड शेड, पिण्याच्या पाण्याची टाकी इ. कामे करणे | Item No.3 Providing dry trap/rubble stone soling 15cm to20cm thick including hand packaging and compacting etc.complete DSR 7/6 | 30.70 | 1.20 | 36.84 | 70.67 | 2603.48 |
| 7 | उत्तन कराईमोहल्ला येथील ऊर्दु शाळा मस्जिदजवळ गटार बांधणे | Item No.3 Providing dry trap/rubble stone soling 15cm to20cm thick including hand packaging and compacting etc.complete DSR 7/6 | 2.99 | 1.20 | 3.588 | 70.67 | 253.56 |
| 8 | मिरारोड (पु) पार्श्वनगर येथील सिमकोनी टॉवर ते आय.डी.ए | Item No.3 Providing dry trap/rubble stone soling 15cm to20cm thick including hand packaging and compacting etc.complete DSR 7/6 | 80.35 | 1.20 | 96.42 | 70.67 | 6814.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ल. टॉवर (एन.एच. स्कुल रस्त्यापर्यंत) सी.सी. गटार बांधुन स्लॅब टाकणे. | | | | | | |
| | **TOTAL** | | | | | | **32018.32** |

4. खालील कामाचे सुरक्षा अनामत निविदेतील क्र.3.6.4 नुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत असणे आवश्यक आहे तरी सदरील कामाची सुरक्षा अनामत रक्कम नस्तीत उपलब्ध न झाल्याने एकत्रित रक्कम रू.18346.95/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

| **अनु.क्र.** | **कामाचे नाव** | **देयकातून कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम** | **पावतीव्दारे भरलेली सुरक्षा अनामत रक्कम** | **पावतीव्दारे कमी वसूल केलेली सुरक्षा अनामत रक्कम (3%प्रमाणे)** |
|---|---|---|---|---|
| 1 | मिरारोड(पु) शांती गार्डन येथील जयमाता दी चौक नयानगर कानुंगी इस्टेट, रजा मैदान येथे फुटपाथवर पेव्हर ब्लॉक वसविणे | **8999 (2%)** | **8980 (3%)** | **4519.55** |
| 2 | भाईंदर(प) येथे असलेल्या स्मशानभुमीत आसन व्यवस्था स्टॅण्ड शेड, पिण्याच्या पाण्याची टाकी इ. कामे करणे | **9871 (2%)** | **9980 (2%)** | **13827.4** |
| | **TOTAL** | | | **18346.95** |

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.25 दि.31/12/2018 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 61, Hmm No : 25)

## *16 पेणकर पाडा साईदत्त तलाव सुशोभिकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : खासदार निधी शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6224570.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5999000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 225570.00/-

***महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण केलेबाबत अहवाल सादर केला नाही. कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबत अभिलेखे नस्तीत उपलब्ध नाही. कामाचे हिस्ट्री शीट व त्या अनुषंगीक नोंद वहया व नोंदी नस्तीत उपलब्ध नाही. कामाच्या पूर्वीचे फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फ़ोटो तारखेनिहाय सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीसह नस्तीत उपलब्ध झाले नाही. शासन निर्णय महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ- वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क- वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. तशी विभागाने कारवाई केली नाही. त्यामुळे सदरील कामास जास्तीत जास्त स्पर्धेचा फ़ायदा झालेला नाही. सदरील कामाची मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता, मोजमाप पुस्तीकेत तारखेनिहाय बाबींची नोंद घेतलेली नाही. निविदेतील अटक 3.6.4 नुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत वैध असावी अशी असताना सदरील कामाची SD बँक गॅरेंटी नं.3315 दि.20/6/2015 ची असून युनियन बँक ऑफ़ इंडिया या बँकेची दि.30/4/2016 पर्यंतच वैधता आहे. तरी रक्कम रु.1,79,970 ची बँक गॅरेंटी नुतनिकरण न केल्याने रक्कम रु.1,79,970 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. नस्तीतील कामाच्या उपयोगितता प्रमाणपत्रात प्रत्यक्ष झालेला खर्च रक्कम रु.6293742 एवढी नमुद केलेली आहे. तरी, मा.जिल्हाअधिकारी ठाणे यांचे पत्र क्र. निमो/खास्थाविका/क्र.2/14-15/481 दि.24/3/2015 नुसार रक्कम रु.59.99 लाख एवढ्या मर्यादित रक्कमेस प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे तरी, सदर पत्रामधील अट क्र.11 नुसार रक्कम रु.59.99 एवढी अपेक्षित असताना सदरील योजनेवर ज्यादा खर्च झालेली रक्कम रु.2,94,742 एवढी दिसून येत आहे. निविदा नस्ती***

***मध्ये स्वामित्वधन भरले बाबतच्या पावत्या जोडलेल्या आहे. सदर पावतींची तपासणी केली असता मे.रोहन डेव्हलपर्स यांच्या नावे आहे, तरी सदरील कामासाठी भरलेले स्वामित्वधन हे मे. गजानन कंस्ट्रक्शन यांच्या नावे नसल्याने तसेच पावतीवर नमूद केलेले दगडखाणीचे नाव व परवाना धारकाचे नाव सुसंगत नसल्याने तसेच परवाना देणा-याची स्वाक्षरी नसल्याने कामासाठी वापरलेल्या स्वामित्वधनाच्या रक्कमेची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे सदरील कामासाठी वापरलेले स्वामित्वधन हे 114 ब्रास असून, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गोखनि 10/1009/प्र.क्र.309/ख दि.11/02/2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे/स्वामित्वधन प्रति ब्रास रु.400/- प्रमाणे वसुल न केल्याने रक्कम रू.45600/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.***

कामासाठी अपेक्षित खर्च (अंदाजित) रक्कम:- रु.59.99
प्रशासकीय वित्तीय मंजुरी ठराव/आदेश व दिनांक:- क्र. निमो/खास्थाविका/क्र.2/14-15/481 दि.24/3/2015
स्थायी समिती ठराव:- क्र.38, दि.17/06/2015
तांत्रिक मंजुरी:- क्र.102 दि.27/02/2015
जिल्हा दरसुची:- नस्ती मध्ये नमूद नाही.
ई-टेंडरींग प्रसिध्दी:- दि.10/4/2015
जाहिर सुचना क्र. व दिनांक:- 05, दि.6/4/2015
प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राचे नाव व दि.:- दै.सामना, दै.साप्ताहिक खबरे आजतक, दि.7/7/2015
निविदा प्राप्त करून घ्यावयाची अंतिम तारीख:- 16/5/2015
प्राप्त झालेल्या निविदा:- 03
मंजुर दर:- 4.99 जास्त दराने
मंजुर झालेल्या निविदाधरकाचे नाव:- मे. गजानन कंस्ट्रक्शन
कार्यादेश क्र. व दिनांक:- मनपा/साबां/कार्या/15/2015-16 दि.20/7/2015
निविदा मंजुरी:- मा.आयुक्त यांची मंजुरी दि.6/6/2015
प्रयोग शाळेकडून कामाची थर्ड पार्टीकडून तपासणी केलेल्या संस्थेचे नाव व दि.:- मे.लॅण्ड मार्क कं. प्रा.लि. यांचा दि.28/3/2016 चा अहवाल
कामाचा करारनामा:- दि.25/7/2015, मुद्रांक शुल्क रु.5,100
कामाची मुदत/ मुदतवाढ:- 4 महिने, दि.20/7/2015 ते दि.19/11/2015 मुदत वाढ दि.31/3/2016 पर्यंत
काम पूर्ण दि.:- 28/3/2016
मोजमाप पुस्तक क्र.:- 2025, दि.28/3/2016, पृष्ठ क्र.60-65
ठेकेदारास अदा केलेले देयके:- प्रथम देयक प्रमाणक क्र.3 दि.31/3/2016 रक्कम रु.30,00,00 दुसरे व अंतिम देयक रक्कम रु.29,99,000
लेखा शिर्ष:- खासदार निधी

पेणकर पाडा साईदत्त तलाव सुशोभिकरण करणे या कामाची निविदा नस्ती व इतर पुरक अभिलेखे तपासले असता लेखापरीक्षणास खालील अनियमितता आढळूण आल्या.

1) सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तापित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत निविदा नस्ती मध्ये आढळली नाही.

2) कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबत अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाच्या जागेविषयी लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. तसेच कामाचे हिस्ट्री शीट व त्य अनुषंगीक नोंद वह्या व नोंदी नस्तीत उपलब्ध न झाल्याने कामाच्या जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

3) कामाच्या पूर्वीचे फ़ोटो व कामपूर्ण झाले नंतरचे फ़ोटो तारखेनिहाय सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीसह नस्तीत उपलब्ध झाले नाही.

4) शासन निर्णय - महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. अशा प्रकारे निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक असताना तसे न केल्याने सदरील कामास जास्तीत जास्त स्पर्धेचा फ़ायदा झालेला नाही.

5) सदरील कामाची मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता, मोजमाप पुस्तीकेत तारखेनिहाय बाबींची नोंद घेतलेली नसल्याने प्रत्यक्ष कामास कधी सुरवात झाली याबाबत लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही, तसेच मोजमाप पुस्तीकेत तारखेनिहाय किती काम झाले याबाबत लेखापरीक्षणास खात्री झाली नाही.

6) निविदेतील अटक 3.6.4 नुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत वैध असावी अशी असताना सदरील कामाची SD बँक गॅरेंटी नं.3315 दि.20/6/2015 ची असून युनियन बँक ऑफ़ इंडिया या बँकेची दि.30/4/2016 पर्यंतच वैधता आहे. तरी रक्कम रु.1,79,970 ची बँक गॅरेंटी नुतनिकरण न केल्याने रक्कम रु.1,79,970 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

7) नस्तीतील कामाच्या उपयोगितता प्रमाणपत्रात प्रत्यक्ष झालेला खर्च रक्कम रु.6293742 एवढी नमुद केलेली आहे. तरी, मा. जिल्हाअधिकारी ठाणे यांचे पत्र क्र. निमो/खास्थाविका/क्र.2/14-15/481 दि.24/3/2015 नुसार रक्कम रु.59.99 लाख एवढ्या मर्यादित रक्कमेस प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे तरी, सदर पत्रामधील अट क्र.11 नुसार रक्कम रु.59.99 एवढी अपेक्षित असताना सदरील योजनेवर ज्यादा खर्च झालेली रक्कम रु.2,94,742 एवढी दिसून येत आहे.

8) निविदा नस्ती मध्ये स्वामित्वधन भरले बाबतच्या पावत्या जोडलेल्या आहे. सदर पावतींची तपासणी केली असता मे. रोहन डेव्हलपर्स यांच्या नावे आहे, तरी सदरील कामासाठी भरलेले स्वामित्वधन हे मे. गजानन कंस्ट्रक्शन यांच्या नावे नसल्याने तसेच पावतीवर नमूद केलेले दगडखाणीचे नाव व परवाना धारकाचे नाव सुसंगत नसल्याने तसेच परवाना देणा-याची स्वाक्षरी नसल्याने कामासाठी वापरलेल्या स्वामित्वधनाच्या रक्कमेची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही त्यामुळे सदरील कामासाठी वापरलेले स्वामित्वधन हे 114 ब्रास असून, महाराष्ट्र शासन महसुल व वन

विभाग शासन निर्णय क्र.गोखनि 10/1009/प्र.क्र.309/ख दि.11/02/2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात आलेले खनिजे/स्वामित्वधन प्रति ब्रास रु.400/- प्रमाणे वसुल न केल्याने रक्कम रू.45600/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.35 दि.19/01/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 62, Hmm No : 35)

## *17 शिळफाटा येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाण्याच्या संतुलीत टाकी पासून विटावा येथील मुकुंद कंपनी पर्यंत 1590 मिमी व्यासाची शुध्द पाण्याची मृदु पोलादी जलवाहिनी अंथरणे व साकेत ते पाटलीपाडा पर्यंत 1590 मिमी व्यासाची शुध्द पाण्याची मृदु पोलादी ऊर्ध्व जलवाहिनी अंथरणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष :अतिरिक्त 75 द.ल.ली. शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1312501633.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1311509278.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 992355.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करून प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत अंदाजपत्रक निविदा नस्ती मध्ये आढळली नाही. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. शासन सार्वजनिक बांधकाम परिपत्रक क्र. सीएटी–1087/सी-आर-196/ इमारत दि.04/05/1998 नुसार निविदा स्विकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% पेक्षा जास्त दराने निविदा स्विकारण्यात येऊ नये असे असताना या ठिकाणी 9.99% टक्क्यावरील निविदा स्विकारण्यात आली आहे. त्यामुळे सदरील कामासाठी शासन निर्णयाचा अवलंब झालेला दिसून येत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसुची 6 चे प्रकरण 5 नियम-2 मधील तरतुदीनुसार सर्व परिस्थितीचा विचारात घेऊन सर्वात फ़ायदेशीर निविदा स्विकारावयची आहे. असे असताना किफ़ायतशीर निविदा स्विकारलेली नाही. कामाच्या 3% सदर बँक गॅरंटी ही दि.16/10/2020 पर्यंत रक्कम रु.3,93,45,278/- ची बँक गॅरंटी नुतनिकरण न***

***केल्याने रक्कम रु.3,93,45,278/- वसुलपात्र ठेवणेत येत आहे. सदरील कामासाठी मुद्रांक शुल्क रक्कम ही रक्कम रु.13,10,510/- घेणे अपेक्षित असताना मुद्रांक शुल्क रक्कम रु.5,00,100/- एवढीच घेतली आहे, तरी रक्कम रु.810910/- एवढी कमी घेतल्याने सदरील रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. त्यामुळे कामाचा करारनामा अट क्र.8 चे कंत्राटदाराकडून पालन झालेले दिसून येत नाही. ठेकेदाराने शासनास रॉयल्टी भरलेबाबतची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने खालील रॉयल्टीची रक्कम रु.181445.225 वसूलपात्र ठेवण्यात येत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व महाराष्ट्र शासन यांच्या कडील पत्र क्र. संकिर्ण-2007/प्र.क्र.165/पापु-10 दि.29/09/2007 नुसार तसेच केंद्र शासनाच्या वित्त कंपनी कामकाज मंत्रालयाच्या महसूल विभागाने त्यांचे दि.06/09/2002 च्या परिपत्रकान्वये, अबकारी करात सूट मिळणेसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रकल्प प्राधिकार प्रमाणपत्र देणेसाठी अधिकार प्रदान केलेले आहेत. शासनाच्या केंद्रीय अबकारी विभागाने दि.1 मार्च 2007 च्या Notification No.06/2007 नुसार पाणी पुरवठा प्रकल्पातील 200 मि.मी. व त्यावरील व्यासाच्या पाईपसाठी अबकारी करात सूट लागू केली आहे. असे असताना प्रस्तुत कामामध्ये पुरवठा केलेल्या पाईप चा दर अबकारी करासह अदा करण्यात आला आहे. कामावर वापरलेल्या पाईपाचे दर अबकारी करासह अदा केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.67389093.6 इतक्या रक्कमेचे नुकसान झाले आहे. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-2008/1338/प्र.क.171/नवि-20 दि.02/03/2009 अन्वये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण केले बाबतचा अहवाल नस्ती नसल्याने सदरील शासन निर्णयाचे उल्लघन झाले आहे. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधिल नियम क्र.12.82(डि) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेले माल/साहीत्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इ. अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी सदरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशनप्रमाणे केल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत हाती घ्यावयाच्या पायाभूत सुविधांशी निगडीत प्रकल्पासाठी 70% शासकीय अनुदान (रु.188.71 कोटी) व उर्वरित 30% (रु.80.88 कोटी) मनपाचा हिस्सा त्यापैकी 80% कर्ज स्वरूपात निधी उभारणे व 20% मनपाचा हिस्सा असे आहे. सदरील बाबतीत लेखे उपलब्ध झालेले नाही, त्यामुळे मनपा अनुदान व शासकीय अनुदान यांची खातर जमा करता आली नाही.***

आयुक्तांची प्रस्तावास मान्यता:- दि.29/12/2014

प्रशासकीय आर्थिक मान्यता:- महासभा ठराव क्र.56 दि.02/03/2015 व स्थायी समिती ठराव क्र.66 दि.05/09/2015

तांत्रिक मान्यता:- क्र.108 शहर अभियंता दि.02/03/2015 रक्कम रु.1,19,23,89,561/-

निविदा सुचना क्र.:- 8/1(2015-16)

निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक:- दै.सकाळ, दै.लोकमत व इंग्रजी मिड-डे दि.23/05/2015

आयुक्तांची निविदेस मान्यता:- 28/8/2015

प्राप्त निविदा:- तीन [1) मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. 2) मे. कोया ॲन्ड कंपनी कंस्ट्रक्शन

लि. 3) मे.दि.इंडियन ह्युमन पाईप कंपनी लि.]
तांत्रिक कागदपत्रास मंजूरी:- दि.09/07/2015 दर उघडले दि.06/08/2015
निविदेतील मंजूर रक्कम रक्कम रु.:- 1,31,15,09,278/- Estimate च्या 9.99% above
करारनामा दिनांक:- दि.17/10/2015
कार्यादेश क्र.:- मनपा/पापु/61/2015-16 दि.17/10/15
कामाची मुदत:- 20 महिने दि.17/10/2015 ते दि.16/10/2018 व दोषदायित्व कालावधी दि.17/10/2018 ते दि.16/10/2020
मोजमाप पुस्तक:- उपलब्ध नाही.
प्रकल्प अहवाल तांत्रिक यांचा मान्यता:- नस्तीत उपलब्ध नाही.
IIT मुंबई यांच्याकडील तांत्रिक छाननी अहवाल:- नस्तीत उपलब्ध नाही.
प्रमाणके:-

| Sr.No. | देयके | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 1st RA Bill | 2 | 16/12/2015 | रु.83541345 |
| 2 | 2nd RA Bill | 5A | 11/03/2016 | रु.54603991 |
| 3 | 3rd RA Bill | 7 | 31/03/2016 | रु.110972492 |

उपरोक्त कामाच्या निविदा नस्तीचे व प्रमाणकांचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करून प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत अंदाजपत्रक निविदा नस्ती मध्ये आढळली नाही.

2. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे.

3. शासन सार्वजनिक बांधकाम परिपत्रक क्र. सीएटी-1087/सी-आर-196/इमारत दि.04/05/1998 नुसार निविदा स्विकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% पेक्षा जास्त दराने निविदा स्विकारण्यात येऊ नये असे असताना या ठिकाणी 9.99% टक्क्यावरील निविदा स्विकारण्यात आली आहे. त्यामुळे सदरील कामासाठी शासन निर्णयाचा अवलंब झालेला दिसून येत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसुची 6 चे प्रकरण 5 नियम-2 मधील तरतुदीनुसार सर्व परिस्थितीचा विचारात घेऊन सर्वात फ़ायदेशीर निविदा स्विकारावयची आहे. असे असताना किफ़ायतशीर निविदा स्विकारलेली नाही.

4. निविदेतील सर्वसाधारण अटीनुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत वैध असावी अशी असताना सदरील कामाची SD बँक गॅरेंटी नं.01380004315 दि.11/09/2015 ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स दि.09/05/2018 पर्यंतच वैध आहे. तरी कामाच्या 3% सदर बँक गॅरंटी ही दि.16/10/2020 पर्यंत रक्कम रु.3,93,45,278/- ची बँक गॅरेंटी नुतनिकरण न

केल्याने रक्कम रु.3,93,45,278/- वसुलपात्र ठेवणेत येत आहे.

5. सदरील कामासाठी करारनामा मुद्रांक शुल्क रक्कम रु.5,00,000/- व रक्कम रु.100/- अशी एकत्रित रक्कमेचा करारनामा करताना मुद्रांक शुल्क भरलेला आहे तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु. 500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10 लाखापर्यंत घेणे आवश्यक आहे. तसेच रक्कम 10 लाखानंतर उर्वरित कामाच्या रक्कमेच्या 0.1% मुद्रांक शुल्क रक्कम रु.25,00,000/- च्या मर्यादित घेणे आवश्यक असताना, सदरील कामासाठी मुद्रांक शुल्क रक्कम ही. रक्कम रु.13,10,510/- घेणे अपेक्षित असताना मुद्रांक शुल्क रक्कम रु.5,00,100/- एवढीच घेतली आहे, तरी रक्कम रु.8,10,910/- एवढी कमी घेतल्याने सदरील रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. त्यामुळे कामाचा करारनामा अट क्र.8 चे कंत्राटदाराकडून पालन झालेले दिसून येत नाही.

6. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.खनिज/10/1009/सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये ठेकेदाराने कामासाठी वापरलेली वाळू, खडी, दगड व मुरुम गौण खनिजांचे स्वामित्वधन (रॉयल्टी) ची रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक असल्याने ठेकेदाराने शासनास रॉयल्टी भरलेबाबतची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने खालील रॉयल्टीची रक्कम रु.181445.225 वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

| **Item of Estimate** | **कामाच्या बाबी (QTY of item)** | **(Metal H.br/crushed)** | | **RateRs. 70.67 cumt.** | **Amount of recovery** |
|---|---|---|---|---|---|
| | | Rate consumption | Quantity | | |
| Item No.9 Providing dry trap/granite/quartizile/gneiss/rubble stone soling | 2567.5 | 1.00 | 2567.5 | 70.67 | 181445.225 |

7. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व महाराष्ट्र शासन यांच्या कडील पत्र क्र. संकिर्ण - 2007/प्र.क्र.165/ पापु-10 दि.29/09/2007 नुसार तसेच केंद्र शासनाच्या वित्त कंपनी कामकाज मंत्रालयाच्या महसूल विभागाने त्यांचे दि.06/09/2002 च्या परिपत्रकान्वये, अबकारी करात सूट मिळणेसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रकल्प प्राधिकार प्रमाणपत्र देणेसाठी अधिकार प्रदान केलेले आहेत. शासनाच्या केंद्रीय अबकारी विभागाने दि.1 मार्च 2007 च्या Notification No.06/2007 नुसार पाणी पुरवठा प्रकल्पातील 200 मि.मी. व त्यावरील व्यासाच्या पाईपसाठी अबकारी करात सूट लागू केली आहे. असे असताना प्रस्तुत कामामध्ये पुरवठा केलेल्या पाईप चा दर अबकारी करासह अदा करण्यात आला आहे. तपशील खालील प्रमाणे आहे.

Work- I

| अ.क्र. | | पाईपाचा तपशील | एकूण परिमाण | अबकारी करासह दर प्रती मीटर | अबकारी करा व्यतिरिक्त दर रु. | दरातील फ़रक रु. | अदा केलेली जादा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Item No.1 | M.S.pipes 1590 mm I.D. thickeness | 12000 Rmt | 27526.44 | 24688.44 | 2838 | 34056000 |
| 2 | Item No.21 | 700 mm pipe | 53954.42 sq.m. | 422.99 | 378.99 | 44 | 2373993.6 |

Work-II

| अ.क्र. | | पाईपाचा तपशील | एकूण परिमाण | अबकारी करासह दर प्रती मीटर | अबकारी करा व्यतिरिक्त दर रु. | दरातील फ़रक रु. | अदा केलेली जादा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Item No.1 | 1590 mm (ID), 10 mm thick | 7800 R.mt. | 27526.44 | 24688.44 | 2838 | 22136400 |

Work-III

| अ.क्र. | | पाईपाचा तपशील | एकूण परिमाण | अबकारी करासह दर प्रती मीटर | अबकारी करा व्यतिरिक्त दर रु. | दरातील फ़रक रु. | अदा केलेली जादा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Item No.6A | 1350 mm dia 10mm thick | 100 mtrs | 44820 | 40199 | 4621 | 462100 |

Work-IV

| अ.क्र. | | पाईपाचा तपशील | एकूण परिमाण | अबकारी करासह दर प्रती मीटर | अबकारी करा व्यतिरिक्त दर रु. | दरातील फ़रक रु. | अदा केलेली जादा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Item No.1 | 1600 mm (ID) 18 mm thick | 100Rmt | 50185.97 | 45011.97 | 5174 | 517400 |
| | | 1850 mm (ID) 20 mm thick | 300Rmt | 64260 | 57635 | 6625 | 1987500 |
| 2 | Item No.2 | 1600 mm MS Pipe,18 mm thick | 100Rmt | 140308.14 | 125842.14 | 14466 | 1446600 |
| | | 1850 mm dia 20 mm thick | 300Rmt | 142548.06 | 127851.06 | 14697 | 4409100 |
| | | | | | | एकूण | 67389093.6 |

वरील प्रमाणे कामावर वापरलेल्या पाईपाचे दर अबकारी करासह अदा केल्यामुळे

महानगरपालिकेचे रु.67389093.6 इतक्या रक्कमेचे नुकसान झाले आहे.
8. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-2008/1338/प्र.क.171/नवि-20 दि.02/03/2009 अन्वये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण केले बाबतचा अहवाल नस्ती नसल्याने सदरील शासन निर्णयाचे उल्लघन झाले आहे.
9. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधिल नियम क्र.12.82(डि) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेले माल/साहीत्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इ. अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी सदरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशनप्रमाणे केल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही.
10. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत हाती घ्यावयाच्या पायाभूत सुविधांशी निगडीत प्रकल्पासाठी 70% शासकीय अनुदान (रु.188.71कोटी) व उर्वरित 30% (रु.80.88 कोटी) मनपाचा हिस्सा त्यापैकी 80% कर्ज स्वरूपात निधी उभारणे व 20% मनपाचा हिस्सा असे आहे. सदरील बाबतीत लेखे उपलब्ध झालेले नाही, त्यामुळे मनपा अनुदान व शासकीय अनुदान यांची खातर जमा झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.55 दि.28/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 4, Hmm No : 55)

## *18 मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत सी.आय. व डी.आय. पाईप्स 150 मि.मी. ते 600 मि.मी. व्यासाचे पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष : नविन अतिरिक्त पाणी प शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 365454832.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 365454832.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करून प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत अंदाजपत्रक निविदा नस्ती मध्ये आढळली नाही. सदरील कामाची निविदा जाहिरात ही दै.सकाळ, दै.लोकमत व दै.मिड-डे या वर्तमानपत्रात दिली आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका***

| |
|---|
| ***कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. शासन सार्वजनिक बांधकाम परिपत्रक क्र. सीएटी–1087/सी-आर-196/इमारत दि.04/05/1998 नुसार निविदा स्विकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% पेक्षा जास्त दराने निविदा स्विकारण्यात येऊ नये असे असताना या ठिकाणी 14% टक्क्यावरील निविदा स्विकारण्यात आली आहे. त्यामुळे सदरील कामासाठी शासन निर्णयाचा अवलंब झालेला दिसून येत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसुची 6 चे प्रकरण 5 नियम-2 मधील तरतुदीनुसार सर्व परिस्थितीचा विचारात घेऊन सर्वात फायदेशीर निविदा स्विकारावयची आहे. असे असताना किफायतशीर निविदा स्विकारलेली नाही. निविदेतील सर्वसाधारण अटीनुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत वैध असावी अशी असताना सदरील कामाची SD ची बँक गॅरेंटी 3% रक्कम रु.1,09,63,645/- लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने बँक गॅरंटी बाबतची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. शासनाच्या केंद्रीय अबकारी विभागाने दि.1 मार्च 2007 च्या Notification No.06/2007 नुसार पाणी पुरवठा प्रकल्पातील 200 मि.मी. व त्यावरील व्यासाच्या पाईपसाठी अबकारी करात सूट लागू केली आहे. असे असताना प्रस्तुत कामामध्ये पुरवठा केलेल्या पाईप चा दर अबकारी करासह अदा करण्यात आला आहे. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-2008/1338/प्र.क.171/नवि-20 दि.02/03/2009 अन्वये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखा परीक्षण केले बाबतचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील अहवालाबाबत खात्री झाली नाही. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधिल नियम क्र.12.82(डि) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेले माल/साहीत्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इ. अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी सदरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशनप्रमाणे केल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही. मूळ निविदा नस्ती उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाकारांचे तांत्रिक दस्ताएवजांची लेखापरीक्षणा कडून पडताळणी झाली नाही, व कामाचा करारनामा पत्र उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी ठेकेदाराने मुद्रांक शुल्क किती भरले याबाबतही लेखापरीक्षणाला खात्री झाली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियामवली, परिच्छेद क्रमांक २८९ नुसार बांधकामाच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल प्रमाणका सोबत नाही, तसेच मूळ मोजमाप पुस्तिका उपलब्ध न झाल्याने सदरील देयकातील बाबींची पडताळणी करता आली नाही.*** |

कामासाठी अपेक्षित खर्च:- रु.32,05,71,809/-
आर्थिक व प्रशासकीय मंजूरी:- दि.29/12/2014
तांत्रिक मंजूरीचा तपशील:- शहर अभियंता सन 2015-16, क्र.49 दि.-निरंक, रक्कम रु.32,05,71,809/-
जाहीर सुचना क्र. व दि.:- क्र.18 दि.03/09/2015
प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राचे नाव:-3 [1)दै. लोकसत्ता दि. 03/09/2015 2)दै. सामना दि.

03/09/2015 3)दै. मिड-डे दि. 03/09/2015]
प्राप्त झालेल्या निविदा:- 04
मंजूर झालेल्या निविदाकाराचे नाव:- मे.आर.बी.क्रिष्णानी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14% जास्त दराने रु.36,54,54,832/-
निविदा/दरपत्रक मंजूर करण्यात आलेला ठराव क्र. व दि.:- मा.महासभा ठराव क्र.58 दि.02/03/2015 मा.स्थायी समिती ठराव क्र.94 दि.14/10/2015
कामाचे स्विकृतीपत्र:- मनपा/पापु/1414/2015-16 दि.14/10/2015
कामाचे कार्यादेश:- मनपा/पापु/कार्या/66/2015-16 दि.17/10/2015
कामाची मुदत:- 20 महिने दि.17/10/2015 ते दि.16/06/2017
मोजमाप पुस्तिका क्र.:- 960 पृष्ठ 6 ते 8 (लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.)
प्रमाणके:-

| Sr.No. | देयके | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 1st RA Bill | 2 | 18/12/2015 | 44300362/- |
| 2 | 2nd RA Bill | 4 | 30/01/2016 | 32554019/- |

उपरोक्त प्रमाणकांचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करून प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत अंदाजपत्रक निविदा नस्ती मध्ये आढळली नाही.

2. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे.

3. शासन सार्वजनिक बांधकाम परिपत्रक क्र. सीएटी-1087/सी-आर-196/इमारत दि.04/05/1998 नुसार निविदा स्विकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% पेक्षा जास्त दराने निविदा स्विकारण्यात येऊ नये असे असताना या ठिकाणी 14% टक्क्यावरील निविदा स्विकारण्यात आली आहे. त्यामुळे सदरील कामासाठी शासन निर्णयाचा अवलंब झालेला दिसून येत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसुची 6 चे प्रकरण 5 नियम-2 मधील तरतुदीनुसार सर्व परिस्थितीचा विचारात घेऊन सर्वात फायदेशीर निविदा स्विकारावयची आहे. असे असताना किफायतशीर निविदा स्विकारलेली नाही.

4. निविदेतील सर्वसाधारण अटीनुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत वैध असावी अशी असताना सदरील कामाची SD ची बँक गॅरेंटी 3% रक्कम रु.1,09,63,645/- लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने बँक गॅरंटी बाबतची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही.

5. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.खनिज/10/1009/सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये

ठेकेदाराने कामासाठी वापरलेली वाळू, खडी, दगड व मुरुम गौण खनिजांचे स्वामित्वधन (रॉयल्टी) ची रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक असल्याने ठेकेदाराने शासनास रॉयल्टी भरलेबाबतची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने खालील रॉयल्टीची रक्कम किती भरली याबाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

6. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व महाराष्ट्र शासन यांच्या कडील पत्र क्र. संकिर्ण-2007/प्र.क्र.165/ पापु-10 दि.29/09/2007 नुसार तसेच केंद्र शासनाच्या वित्त कंपनी कामकाज मंत्रालयाच्या महसूल विभागाने त्यांचे दि.06/09/2002 च्या परिपत्रकान्वये, अबकारी करात सूट मिळणेसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रकल्प प्राधिकार प्रमाणपत्र देणेसाठी अधिकार प्रदान केलेले आहेत. शासनाच्या केंद्रीय अबकारी विभागाने दि.1 मार्च 2007 च्या Notification No.06/2007 नुसार पाणी पुरवठा प्रकल्पातील 200 मि.मी. व त्यावरील व्यासाच्या पाईपसाठी अबकारी करात सूट लागू केली आहे. असे असताना प्रस्तुत कामामध्ये पुरवठा केलेल्या पाईप चा दर अबकारी करासह अदा करण्यात आला आहे. तपशील खालील प्रमाणे आहे.

1st RA Bill

| अ.क्र. | | पाईपाचा तपशील | एकूण परिमाण | अबकारी करासह दर प्रती मीटर | अबकारी करा व्यतिरिक्त दर रु. | दरातील फ़रक रु. | अदा केलेली जादा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Item No.1 | Providing and supplying ISI mark C.I. S.S.pipes 250mm | 2750 Rmt | 4590 | 4089 | 501 | 13,77,750 |
| 2 | | Providing and supplying ISI mark C.I. S.S.pipes 300 mm | 3157.50 Rmt | 5916 | 5271 | 645 | 20,36,587 |
| | | | | | | **एकूण** | **34,14,337/-** |

वरील प्रमाणे कामावर वापरलेल्या पाईपाचे दर अबकारी करासह अदा केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.34,14,337/- इतक्या रक्कमेचे नुकसान झाले आहे.

7. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-2008/1338/प्र.क.171/नवि-20 दि.02/03/2009 अन्वये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण केले बाबतचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील अहवालाबाबत खात्री झाली नाही.

8. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधिल नियम क्र.12.82(डि) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेले माल/साहीत्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इ. अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी सदरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशनप्रमाणे केल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही.

9. मूळ निविदा नस्ती उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाकारांचे तांत्रिक दस्ताएवजांची लेखापरीक्षणा कडून पडताळणी झाली नाही, व कामाचा करारनामा पत्र उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी ठेकेदाराने मुद्रांक शुल्क किती भरले याबाबतही लेखापरीक्षणाला खात्री

झाली नाही.

10. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियामवली, परिच्छेद क्रमांक 289 नुसार बांधकामाच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल प्रमाणका सोबत नाही, तसेच मूळ मोजमाप पुस्तिका उपलब्ध न झाल्याने सदरील देयकातील बाबींची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.56 दि.28/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 5, Hmm No : 56)

## *19 भाईंदर(प)उत्तन रोड येथील मोर्वा शिवसेना शाखा ते मोर्वा शिवनेरी पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : नविन जलवाहिनी टाकणे महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1103425.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1103025.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

***महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम 165 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याने स्थळ निरीक्षण केलेली प्रत नस्तीमध्ये आढळुन आलेली नाही. मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34), 63, i(a) ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीत कमी रु.500/- चे मुद्रांक शुल्क 10 लाखाच्या मर्यादेत घेणे आवश्यक असताना रु.200/- च्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. रु.600/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक होते. त्यामुळे रक्कम रु.400/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि 220 दि.02/03/2009 अन्वये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरिक्षण केलेला अहवाल नस्तीत नाही. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधील नियम क्र.12.82(डि) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या साहित्याचे अभिलेखे (चलन, इन्हवॉईस, वाहतूकीचे पास) लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेसिफिकेशनप्रमाणे केल्याची लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिशिष्ट 24 मधील तरतूदीनुसार वापरण्या योगय साहित्याची प्रमाणित नोंद मोजमाप पुस्तीकेमध्ये आढळून आलेली नाही.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे/पुरवठ्याचे नाव | भाईंदर(प) उत्तन रोड येथील मोर्वा शिवसेना शाखा ते मोर्वा शिवनेरी पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. |
| 2 | कामासाठी/पुरवठ्यासाठी अपेक्षीत खर्च | 10,50,600/- |
| 3 | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दि. | मा.आयुक्त यांची 31/01/2015 रोजीची मंजूरी |
| 4 | तांत्रिक मंजूरीचा तपशील | कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा,मिभामनपा यांची क्र.78 दि.31/01/2015 |
| 5 | मंजूर झालेल्या निविदा धारक/दरपत्रक धारकाचे नाव व पत्ता | मे.गणेश डेव्हलपर्स 4.99% जास्त दराने |
| 6 | मंजूर निविदा धारकास देण्यात आलेला कार्यादेश क्र. व दि. | मनपा/पापु/11/15-16 दि.17/07/2015 |
| 7 | मंजूर दरानुसार अपेक्षित खर्च रु. | 11,03,025/- |
| 8 | काम पूर्ण केल्याची/पुरवठा केल्याची दि. | 10/11/2015 |
| 9 | शिर्षक नाव | नविन जलवाहिनी टाकणे |
| 10 | इतर माहिती/तपशील<br>बँक गॅरंटी रक्कम व नंबर | रक्कम रु.31518/- समाप्त दि.14/01/2016<br>0157151GFIN0024 Dt.15/7/2015 |

उपरोक्त कामाची निविदा नस्ती तपासली असता खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1. सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार तांत्रिक अधिकाऱ्याने जागेचे स्थळ निरीक्षण करून प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत अंदाजपत्रक निविदा नस्ती मध्ये आढळली नाही.

2. सदरील कामासाठी करारनामा मुद्रांक शुल्क रक्कम रु.200/- भरून केलेले आहे तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34), 63, i(a)ii(b), दिनांक 24/04/2015 नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु.500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10 लाखापर्यंत घेणे आवश्यक आहे. तसेच रक्कम 10 लाखानंतर उर्वरित कामाच्या रक्कमेच्या 0.1% मुद्रांक शुल्क रक्कम रु.25,00,000/- च्या मर्यादित घेणे आवश्यक असताना, सदरील कामासाठी मुद्रांक शुल्क रक्कम ही रक्कम रु.600/- घेणे अपेक्षित असताना मुद्रांक शुल्क रक्कम रु.200/- एवढीच घेतली आहे, तरी रक्कम रु.400/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

3. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-2008/1338/प्र.क.171/नवि-20 दि.02/03/2009 अन्वये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण केले बाबतचा अहवाल नस्तीत नसल्याने सदरील शासन निर्णयाचे उल्लघन झाले आहे.

4. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधिल नियम क्र.12.82(डि) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेले माल/साहीत्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इ. अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी सदरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशनप्रमाणे केल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे

ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही.

5. बांधकाम चालू असताना पालिका अभियंत्यांनी वेळोवेळी कामाचे मोजमाप नोंदवहीत वेळच्या वेळी नोंदी केल्याबाबतची क्षेत्रीय नोंदवही (Field Book/site Register) नस्तीसोबत उपलब्ध झाली नाही.

6. खोदाईमधून निघालेली माती, मुरुम हे भरावासाठी किती उपयुक्त आहे व किती उपयुक्त नाही याबाबत मोजमाप पुस्तकामध्ये दाखला देणे आवश्यक आहे. तसा दाखला मोजमाप पुस्तकामध्ये नमुद करण्यात आला नाही.

7. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिशिष्ट 24 मधील असलेल्या तरतूदीनुसार वापरण्या योग्य नसलेल्या साहित्याची नोंद मोजमाप नोंदवहीमध्ये घेऊन ती प्रमाणीत करणे आवश्यक असताना तशी नोंद घेण्यात आली नसल्याने अशा वाहतूक केलेल्या साहित्याची विल्हेवाट कशाप्रकारे व कोठे लावण्यात आली याबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.48 दि.22/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 66, Hmm No : 48)

## *20 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी व भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयाकरिता आवश्यक हाऊसकिपींग पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष : रुग्णालयीन कपडे धुला महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 7938673.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7506190.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 432483.00/-

***महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. तरी सदर कामाची जाहिर निविदा सुचना कोणत्या वर्तमानपत्रात दिली याबाबत नस्तीत उल्लेख केलेला नाही तसेच वर्तमानपत्राचे कात्रण नस्तीमध्ये आढळून आले नाहीत त्यामुळे कामाच्या जाहिरातीची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. मे.सुमीत फ़ॅसिलिटी प्रा.लि. यांना देण्यात आल्याने सदरील कामाच्या सुरक्षा अनामत रकमेची बँक गॅरंटी नुतनीकरण न केल्याने रक्कम रु.4,22,223/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. सन 2014-15 मध्ये कामासाठी आयुक्त यांनी दि.16/12/2000 रोजी***

***दिड वर्ष मुदतीसाठी काम दिले बाबत टिपणीत नमुद आहे, तरी सदरील कामाचा कार्यादेश नसल्याने व करारनामा न केल्याने सदरील काम त्याच कंत्राटदाराला दिले बाबत व कामाची मुदत वाढ दिले बाबत लेखापरीक्षणाला खात्री झाली नाही. सन 2015-16 सदरील कामासाठी केलेला करारनामा हा मुद्रांक शुल्क रक्कम रु.1,500/- या रकमेचा केला आहे. तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार मुद्रांक शुल्कासाठी रक्कम रु.1,02,59,264/- एवढी आहे, तरी 1,02,59,264 X 0.1% = 10,260/- एवढी रक्कम घेणे अपेक्षित असताना सदरील मुद्रांक शुल्क रक्कम न घेतल्याने रक्कम रु.10260/- एवढी वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. कंत्राटदाराने कामगारांचे बँकेतून वेतन अदा केले बाबतचे अभिलेखे तसेच कामगारांची तीन पाळीनिहाय दैनंदिन हजेरी पत्रक व बायोमेट्रीक हजेरी पत्रक मासिक विवरणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने कामगारांच्या हजेरी बाबत लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. कामगार किमान वेतन कायदा 1948 व परिपत्रक क्र.12(142)/11/MW/Lab/2023-47 दि.26/07/2011 तसेच Government of NCT of Delhi यांचे परिपत्रक क्र.F.No.12(142)/13/mw/Lab/2231 दि.16/10/2015 नुसार अकुशल कामगारांना किमान वेतन रु.9,048/- देणे आवश्यक असून त्यावर 46% (रजा भत्ता 6% धरुन) लेव्ही देणे आवश्यक आहे.***

प्रशासकीय वित्तीय मंजूरीः- महासभा ठराव क्र.69 दि.22/12/2010
निविदा जाहीर सुचना क्र. व दि.:- मनपा/वैद्यकीय/1191/2012-13 दि.23/10/2012
कंत्राटदारः- मे.सुमित फ़ॅसिलिटीज प्रा.लि.
निविदा/दरपत्रके प्राप्त करून घ्यावयाची अंतिम तारीखः- दि.05/11/2012
प्राप्त निविदाः- 3 [1)Quick cleaning 2)Sumit Facilities 3)Utility Enterprises]
निविदा/दरपत्रक मंजूर करण्यात आलेला ठरावः- स्थायी समिती ठराव क्र.3 दि.09/04/2013
मंजुरीनुसार पुरवठा/कामाचे कार्यादेशः- मनपा/वैद्यकीय/431/1284/2013-14 दि.27/06/2013 व मनपा/वैद्यकीय/485/2016-17 दि.27/06/2016

2015-16 मध्ये मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. यांना अदा केलेली देयके

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | मे - जून 2015 | रु.938274 | भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय |
| 2 | मार्च - एप्रिल 2015 | रु.938274 | |
| 3 | जुलै - ऑगस्ट 2015 | रु.938274 | |
| 4 | सप्टेंबर - ऑक्टोबर 2015 | रु.938274 | |
| 5 | नोव्हेंबर - डिसेंबर 2015 | रु.1876547 | भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रूग्णालय |
| 6 | जानेवारी - फेब्रुवारी 2016 | रु.1876547 | |

उपरोक्त कामाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. तरी सदर कामाची जाहिर निविदा सुचना कोणत्या वर्तमानपत्रात दिली याबाबत नस्तीत उल्लेख केलेला नाही तसेच

वर्तमानपत्राचे कात्रण नस्तीमध्ये आढळून आले नाहीत त्यामुळे कामाच्या जाहिरातीची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही.

2. निविदेतील अट क्र.H16 नुसार कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या कालावधी नंतर 12 महिने पर्यंत वैध असावी असे नमुद केले आहे, तरी सदरील कामाची SD बँक गॅरेंटी नं. BOM/0170/2013/other/196 दि.24/08/2013 रोजी रक्कम रु.4,22,223/- या रकमेची दि.31/03/2015 पर्यंत वैध आहे तरी सदरील काम हे नवीन कार्यादेश दि.27/06/2016 पासून पुढील निविदा होईपर्यंत मे. सुमीत फॅसिलिटी प्रा.लि. यांना देण्यात आल्याने सदरील कामाच्या सुरक्षा अनामत रकमेची बँक गॅरंटी नुतनीकरण न केल्याने रक्कम रु.4,22,223/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

3. सन 2014-15 मध्ये कामासाठी आयुक्त यांनी दि.16/12/2000 रोजी दिड वर्ष मुदतीसाठी काम दिले बाबत टिपणीत नमुद आहे, तरी सदरील कामाचा कार्यादेश नसल्याने व करारनामा न केल्याने सदरील काम त्याच कंत्राटदाराला दिले बाबत व कामाची मुदत वाढ दिले बाबत लेखापरीक्षणाला खात्री झाली नाही.

4. सन 2015-16 सदरील कामासाठी केलेला करारनामा हा मुद्रांक शुल्क रक्कम रु.1,500/- या रकमेचा केला आहे. तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु.500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10 लाखापर्यंत घेणे आवश्यक आहे. तसेच रक्कम 10 लाखानंतर उर्वरित कामाच्या रक्कमेच्या 0.1% मुद्रांक शुल्क रक्कम रु.25,00,000/- च्या मर्यादित घेणे आवश्यक असताना, सदरील दोन्ही कामासाठी वार्षिक खर्चाची होणारी रक्कम रु.1,12,59,264/- एवढी असून वजा रु.10,00,000/- जाता मुद्रांक शुल्कासाठी रक्कम रु.1,02,59,264/- एवढी आहे, तरी 1,02,59,264 X 0.1% = 10,260/- एवढी रक्कम घेणे अपेक्षित असताना सदरील मुद्रांक शुल्क रक्कम न घेतल्याने रक्कम रु.10,260/- एवढी वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

5. कंत्राटदाराने कामगारांचे बँकेतून वेतन अदा केले बाबतचे अभिलेखे तसेच कामगारांची तीन पाळीनिहाय दैंनंदिन हजेरी पत्रक व बायोमेट्रीक हजेरी पत्रक मासिक विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने कामगारांच्या हजेरी बाबत लेखापरीक्षणास खात्री झाली नाही.

6.कामगार किमान वेतन कायदा 1948 व परिपत्रक क्र.12(142)/11/MW/Lab/2023-47 दि.26/07/2011 तसेच Government of NCT of Delhi यांचे परिपत्रक क्र. F.No.12(142)/13/mw/Lab/2231 दि.16/10/2015 नुसार अकुशल कामगारांना किमान वेतन रु.9,048/- देणे आवश्यक असून त्यावर 46%(रजा भत्ता 6% धरुन) लेव्ही देणे आवश्यक आहे. ती खालीलप्रमाणे

| **46% लेव्ही च्या बाबी (रजा भत्ता 6% धरुन)** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मूळ वेतन + महागाई भत्ता** | **भविष्य निर्वाह निधी 12%** | **कामगार बोनस 8.33%** | **उपदान (Gratuity) 4%** | **ESIC 4.75%** | **गणवेश (पावसाळी साहित्य वाटप) 4%** | **प्रशासकीय खर्च 5.25%** | **कामाचा भरपाई विमा 1.67%** | **एकूण** |
| 9048 + 130 | 1101 | 765 | 367 | 436 | 367 | 482 | 153 | 12849 |

उपरोक्त प्रमाणे कामगारांना मासिक वेतन अदा करणे आवश्यक आहे. तरी सदरील बाबीनुसार कामगारांना वेतन अदा केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने कामगारांच्या मसिक वेतनाची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. तसेच सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.43 दि.15/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 7, Hmm No : 43)

## *21 सन 2015-16 या आर्थिक वर्षातील मोबाईल टॉवरशी संबंधीत मालमत्ता कर वसुलीसाठी जलद व प्रभावी उपाययोजना न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 89647905.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 89647905.00/-

***सन 2015-16 या आर्थिक वर्षात मोबाईल टॉवरशी संबंधित मालमत्ता कर व संबंधित अनधिकृत बांधकामावर लादलेल्या शास्तीसह रु.8,96,47,905/- इतकी मोठया प्रमाणात रक्कम थकित असल्याचे दिसून आले. एकूण मागणी रु.11,47,14,018/- असून त्यापैकी रु.2,50,66,113/- इतकी म्हणजेच एकूण मागणीच्या केवळ 21.85% इतकी अत्यल्प प्रमाणात वसूली केली असल्याचे दिसून येते, मालमत्ता कर हा महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून, सदर कराचाच भाग असलेल्या मोबाईल टॉवरशी संबंधित मालमत्ता कराच्या वसुलीसाठी विभागाने जलद व प्रभावी उपाय योजना केली नसल्याचे दिसून येते.***

मालमत्ता कर हा महापालिकेच्या महसुली उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे व त्याअनुषंगाने दुरसंचार सेवा पुरविणा-या विविध पुरवठादारांकडून मोबाईल टॉवरशी संबंधित मालमत्ता कर आकारणी व वसुलीचे काम महापालिकेचे कर निर्धारक व संकलक हे करतात.

लेखापरिक्षणाच्या वेळी मालमत्ता कर विभागाने उपलब्ध केलेले अभिलेख व पुरविलेल्या माहितीची तपासणी केली असता सन 2015-16 या आर्थिक वर्षात मोबाईल टॉवरशी संबंधित मालमत्ता कर व संबंधित अनधिकृत बांधकामावर लादलेल्या शास्तीसह रु .8,96,47,905/- इतकी मोठया प्रमाणात रक्कम थकित असल्याचे दिसून आले याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

| मागणी | वसुली | थकित रक्कम |
|---|---|---|
| 11,47,14,018/- | 2,50,66,113/- | 8,96,47,905/- |

उपरोक्त विवरणावरुन असे दिसून येते की , एकूण मागणी रु.11,47,14,018/- असून त्यापैकी रु.2,50,66,113/- इतकी म्हणजेच एकूण मागणीच्या केवळ 21.85% इतकी अत्यल्प प्रमाणात वसूली केली असल्याचे दिसून येते , मालमत्ता कर हा महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून , सदर कराचाच भाग असलेल्या मोबाईल टॉवरशी संबंधित मालमत्ता कराच्या वसुलीसाठी विभागाने जलद व प्रभावी उपाय योजना केली नसल्याचे दिसून येते , त्यामुळे महापालिका हद्दीतील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविणे व पायाभूत सुविधा उभारणी इत्यादी कामासाठी कमी प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येते.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र . 51 दि.22/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 8, Hmm No : 51)

## *22 मालमत्ता कराचे धनादेश न वटलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 11493381.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 11493381.00/-

***मालमत्ता धारकांना नियमानुसार शास्ती/दंड लावून मालमत्ता कराच्या देयकातून थकीत मालमत्ता कर वसूल करावे. तोपर्यंत सदरील मालमत्ता धारकांची थकीत रक्कम रु.1,14,93,381/- वसुलपात्र ठेवणेत येत आहे.***

मिरा-भाईंदर महानगरपालिका कर निर्धारण व संकलन विभागाचे सन 2015-16 चे लेखापरीक्षण केले असता दि.01/04/2015 ते दि.31/03/2016 मधील मालमत्ता कर धारकांनी, मालमत्ता कर भरणेसाठी दिलेल्या धनादेशांची तपासणी केली असता, एकूण 2142 मालमत्ता धारकांचे धनादेश रक्कमा महानगरपालिका खात्यात जमा झालेल्या नाहीत

तरी मालमत्ता धारकांना नियमानुसार शास्ती/दंड लावून पुढील मालमत्ता कराच्या देयकातून थकीत मालमत्ता कर वसूल करावे. तोपर्यंत सदरील मालमत्ता धारकांची थकीत रक्कम रु.1,14,93,381/- वसुलपात्र ठेवणेत येत आहे.

चेक रिटर्न नोंदवही एकूण थकबाकी माहीती सन 2015-16

| मालमत्ता क्र. | जमा दिनांक | चेक नंबर | रक्कम | चेक दिनांक |
|---|---|---|---|---|
| B060004134003 | 26/11/2015 | 177729 | 7358 | 26/11/2015 |
| B060037194089 | 22/02/2016 | 551818 | 19046 | 22/02/2016 |
| B060040142006 | 16/02/2016 | 118208 | 4436 | 16/02/2016 |
| B070002564154 | 21/03/2016 | 257693 | 23782 | 21/03/2016 |
| D030003696007 | 22/03/2016 | 721005 | 21096 | 20/03/2016 |
| E010024784015 | 19/03/2016 | 40167 | 16535 | 19/03/2016 |
| E010026063017 | 31/03/2016 | 307651 | 5019 | 01/04/2016 |
| E010033582002 | 28/03/2016 | 119523 | 10000 | 28/03/2016 |
| E020026372003 | 23/07/2015 | 92 | 7662 | 22/07/2015 |
| E020026864013 | 19/03/2016 | 21 | 10000 | 19/03/2016 |
| E040029675005 | 05/03/2016 | 314493 | 721 | 05/03/2016 |
| E080030109012 | 06/11/2015 | 7 | 5498 | 07/10/2015 |
| E080030167014 | 31/12/2015 | 427394 | 39355 | 31/12/2015 |
| E080030587093 | 19/03/2016 | 423823 | 3852 | 18/03/2016 |
| E100031136001 | 12/02/2016 | 16 | 4826 | 12/02/2016 |
| E100031136002 | 12/02/2016 | 16 | 3232 | 12/02/2016 |
| E100031350003 | 21/11/2015 | 478862 | 10000 | 21/11/2015 |
| E110030293013 | 04/12/2015 | 229187 | 1947 | 16/11/2015 |
| E110030878035 | 22/03/2016 | 136362 | 22000 | 22/03/2016 |
| E110038173052 | 22/02/2016 | 1 | 3228 | 22/02/2016 |
| E110038173056 | 22/02/2016 | 2 | 4886 | 22/02/2016 |
| E120035108013 | 14/12/2015 | 15047 | 17952 | 14/12/2015 |
| E120035625057 | 01/01/2016 | 31328 | 2664 | 31/12/2015 |
| E130029676004 | 16/11/2015 | 59234 | 3519 | 16/11/2015 |
| E130029947007 | 09/12/2015 | 197298 | 434 | 09/12/2015 |
| E130030320014 | 30/12/2015 | 62443 | 17433 | 28/12/2015 |
| E160031494022 | 03/11/2015 | 528452 | 970 | 03/11/2015 |
| E170031628006 | 29/04/2015 | 9784 | 1381 | 29/04/2015 |
| E170031684035 | 26/11/2015 | 30 | 3314 | 26/11/2015 |
| E180031438031 | 17/02/2016 | 100050 | 5146 | 17/02/2016 |
| E180031661006 | 09/03/2016 | 122045 | 7262 | 09/03/2016 |
| E190031439036 | 16/11/2015 | 68035 | 2236 | 16/11/2015 |
| E190031752004 | 29/02/2016 | 148 | 11826 | 29/02/2016 |
| E200031553015 | 10/02/2016 | 522759 | 10000 | 10/02/2016 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| E200031642022 | 22/02/2016 | 738065 | 6875 | 22/02/2016 |
| E200031795025 | 19/03/2016 | 22920 | 3527 | 19/03/2016 |
| E200033443016 | 21/11/2015 | 37 | 11661 | 21/11/2015 |
| E200034895011 | 30/11/2015 | 1558 | 6922 | 17/11/2015 |
| F010034864004 | 22/01/2016 | 609614 | 3018 | 22/01/2016 |
| F010034864020 | 22/01/2016 | 609614 | 3018 | 22/01/2016 |
| F010038630003 | 31/03/2016 | 100081 | 15042 | 31/03/2016 |
| F010038630009 | 31/03/2016 | 100081 | 21022 | 31/03/2016 |
| F010038630016 | 31/03/2016 | 100081 | 14488 | 31/03/2016 |
| F010038630022 | 31/03/2016 | 100081 | 20252 | 31/03/2016 |
| F020012722027 | 19/12/2015 | 317632 | 3732 | 17/12/2015 |
| F020037382090 | 11/01/2016 | 30924 | 4981 | 11/01/2016 |
| F030012296034 | 04/11/2015 | 25 | 4164 | 03/11/2015 |
| F040007167014 | 29/02/2016 | 100023 | 3001 | 28/02/2016 |
| F040007242041 | 21/12/2015 | 438892 | 4020 | 20/12/2015 |
| F040007806016 | 11/01/2016 | 812120 | 4038 | 11/01/2016 |
| F040009602007 | 16/01/2016 | 124 | 4138 | 16/01/2016 |
| F040012351010 | 17/02/2016 | 4 | 863 | 17/02/2016 |
| F040012818018 | 31/03/2016 | 114264 | 3165 | 31/03/2016 |
| F040012859010 | 04/12/2015 | 12 | 8254 | 04/12/2015 |
| F040033653015 | 28/12/2015 | 67 | 3675 | 28/12/2015 |
| F040034950012 | 28/03/2016 | 566433 | 13090 | 15/03/2016 |
| F040035150006 | 09/03/2016 | 101651 | 2320 | 09/03/2016 |
| F040036102016 | 23/11/2015 | 491294 | 2962 | 23/11/2015 |
| F040036648009 | 10/04/2015 | 780765 | 11407 | 23/02/2015 |
| F040036649022 | 24/09/2015 | 326426 | 9287 | 24/09/2015 |
| F040036703050 | 15/05/2015 | 676343 | 7529 | 04/04/2015 |
| F040036778019 | 21/12/2015 | 580520 | 4563 | 21/12/2015 |
| F040038179022 | 10/06/2015 | 277679 | 3300 | 29/04/2015 |
| F040039369049 | 20/02/2016 | 95223 | 3490 | 18/02/2016 |
| F040039369094 | 22/02/2016 | 104 | 3799 | 22/02/2016 |
| F040039822032 | 02/03/2016 | 100081 | 5267 | 02/03/2016 |
| F040039822064 | 31/03/2016 | 216782 | 4620 | 31/03/2016 |
| F040041638012 | 21/12/2015 | 100077 | 4708 | 20/12/2015 |
| F050010044013 | 31/03/2016 | 3358 | 25000 | 31/03/2016 |
| F050010143018 | 31/03/2016 | 3359 | 125000 | 31/03/2016 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| F050010988013 | 23/02/2016 | 256170 | 5844 | 23/02/2016 |
| F050033488023 | 02/12/2015 | 456405 | 2944 | 02/12/2015 |
| F050036321024 | 18/05/2015 | 250132 | 12507 | 15/05/2015 |
| F050036402000 | 29/02/2016 | 45886 | 65000 | 18/01/2016 |
| F050036688036 | 09/04/2015 | 524504 | 11596 | 09/04/2015 |
| F050039984027 | 09/03/2016 | 117081 | 17000 | 09/03/2016 |
| F060010018021 | 18/03/2016 | 1827 | 3622 | 18/03/2016 |
| F060010018022 | 18/03/2016 | 1828 | 3622 | 18/03/2016 |
| F060010018028 | 18/03/2016 | 1824 | 2409 | 18/03/2016 |
| F060034295002 | 13/01/2016 | 32 | 3720 | 13/01/2016 |
| F060034771055 | 29/12/2015 | 339105 | 2007 | 29/12/2015 |
| F060034771065 | 30/03/2016 | 103941 | 2093 | 14/03/2016 |
| F060036368102 | 26/02/2016 | 59291 | 3662 | 25/02/2016 |
| F060033505002 | 31/03/2016 | 374915 | 481825 | 31/03/2016 |
| F060033505003 | 31/03/2016 | 374915 | 481825 | 31/03/2016 |
| F060037117079 | 10/02/2016 | 146230 | 4071 | 10/02/2016 |
| F060037121068 | 29/02/2016 | 54038 | 4265 | 26/02/2016 |
| F060037351031 | 03/12/2015 | 11 | 3362 | 29/11/2015 |
| F060039597085 | 07/01/2016 | 127 | 5227 | 02/12/2015 |
| F060039597107 | 07/01/2016 | 491 | 6000 | 10/12/2015 |
| F060039597150 | 01/12/2015 | 58 | 6730 | 07/11/2015 |
| F060039950077 | 01/01/2016 | 73 | 7196 | 01/01/2016 |
| F060040139070 | 02/12/2015 | 271547 | 4314 | 01/12/2015 |
| F060042614026 | 16/12/2015 | 712893 | 6596 | 09/12/2015 |
| F060042721148 | 17/03/2016 | 369860 | 13419 | 17/03/2016 |
| G060006588049 | 22/03/2016 | 141 | 8734 | 22/03/2016 |
| G080005823023 | 01/02/2016 | 944746 | 5965 | 01/02/2016 |
| H010007753003 | 31/03/2016 | 645694 | 4694 | 31/03/2016 |
| H010012422029 | 25/03/2016 | 167875 | 19385 | 12/03/2016 |
| H020006792030 | 09/04/2015 | 722908 | 721 | 09/04/2015 |
| H020008077021 | 31/03/2016 | 911329 | 25000 | 31/03/2016 |
| H020009085029 | 14/12/2015 | 644975 | 555 | 12/12/2015 |
| H020009427131 | 16/03/2016 | 475043 | 29410 | 16/03/2016 |
| H030010245005 | 10/09/2015 | 306071 | 1322 | 07/09/2015 |
| H040007418048 | 19/12/2015 | 385878 | 674 | 18/12/2015 |
| H050007110017 | 30/11/2015 | 321089 | 1497 | 30/11/2015 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| I040009597024 | 29/12/2015 | 327323 | 1535 | 15/10/2015 |
| J020004511012 | 16/03/2016 | 797340 | 10839 | 16/03/2016 |
| J030001676013 | 21/12/2015 | 50087 | 454 | 21/12/2015 |
| K010020243000 | 29/01/2016 | 203243 | 3066 | 25/01/2016 |
| K030013141010 | 25/01/2016 | 6 | 9193 | 25/01/2016 |
| K030032085006 | 31/07/2015 | 803982 | 42783 | 31/07/2015 |
| K040014088004 | 15/03/2016 | 25 | 3271 | 15/03/2016 |
| K040042202057 | 31/03/2016 | 561634 | 19971 | 31/03/2016 |
| L010017711063 | 19/12/2015 | 173140 | 7788 | 17/12/2015 |
| L010035974020 | 15/10/2015 | 606575 | 2851 | 15/10/2015 |
| L010036717002 | 19/03/2016 | 676670 | 500000 | 12/03/2016 |
| L010036717002 | 31/03/2016 | 676672 | 1000000 | 31/03/2016 |
| L010036717002 | 31/03/2016 | 676668 | 500000 | 31/03/2016 |
| L010036717003 | 31/03/2016 | 676666 | 500000 | 31/03/2016 |
| L010036717004 | 31/03/2016 | 676665 | 500000 | 31/03/2016 |
| L010036717004 | 31/03/2016 | 676671 | 1000000 | 31/03/2016 |
| L010036717004 | 31/03/2016 | 676667 | 500000 | 31/03/2016 |
| L020020408000 | 31/03/2016 | 683413 | 6457 | 31/03/2016 |
| L040036850013 | 03/12/2015 | 53 | 11681 | 03/12/2015 |
| L040039411114 | 03/10/2015 | 7 | 5913 | 03/10/2015 |
| M010021599000 | 17/11/2015 | 1032 | 659 | 03/11/2015 |
| M010021601000 | 17/11/2015 | 1032 | 6819 | 03/11/2015 |
| N010015722113 | 02/05/2015 | 136920 | 3457 | 02/05/2015 |
| N010033551005 | 10/03/2016 | 863134 | 22145 | 11/03/2016 |
| N010033562026 | 17/12/2015 | 934273 | 13516 | 17/12/2015 |
| N010037235035 | 28/03/2016 | 376436 | 2802 | 28/03/2016 |
| N010039906083 | 26/11/2015 | 35 | 4228 | 26/11/2015 |
| O010028952004 | 23/11/2015 | 189971 | 16388 | 16/11/2015 |
| O010029887018 | 17/03/2016 | 260865 | 7798 | 17/03/2016 |
| O010036808015 | 13/03/2016 | 43585 | 4502 | 13/03/2016 |
| O020012292007 | 04/03/2016 | 459485 | 2706 | 29/02/2016 |
| O020016456005 | 19/01/2016 | 74715 | 3421 | 15/01/2016 |
| O020032974062 | 20/06/2015 | 219048 | 10311 | 09/06/2015 |
| O020033462092 | 03/11/2015 | 277 | 40125 | 02/11/2015 |
| O020034335014 | 28/01/2016 | 367690 | 12976 | 24/01/2016 |
| O020034337020 | 16/12/2015 | 55995 | 3112 | 16/12/2015 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| O020034369265 | 29/12/2015 | 124395 | 1742 | 29/12/2015 |
| O020034396044 | 16/03/2016 | 446707 | 8041 | 29/02/2016 |
| O020034399079 | 30/11/2015 | 167 | 7240 | 17/11/2015 |
| O020034402021 | 30/11/2015 | 481783 | 3636 | 26/11/2015 |
| O020034463106 | 16/02/2016 | 509619 | 6883 | 16/02/2016 |
| O020034463126 | 01/12/2015 | 500850 | 3334 | 01/12/2015 |
| O020034476126 | 10/03/2016 | 149362 | 2089 | 10/03/2016 |
| O020034479021 | 23/03/2016 | 51404 | 6830 | 23/03/2016 |
| O020034486005 | 22/12/2015 | 222804 | 1083 | 22/12/2015 |
| O020035948018 | 30/04/2015 | 251682 | 3207 | 09/04/2015 |
| O020036274031 | 09/12/2015 | 26513 | 3286 | 09/12/2015 |
| O020038377008 | 05/12/2015 | 91 | 7302 | 05/12/2015 |
| O020038389046 | 09/12/2015 | 26512 | 6809 | 09/12/2015 |
| O020038934078 | 24/09/2015 | 51559 | 87767 | 24/09/2015 |
| O020039896083 | 27/01/2016 | 801322 | 26877 | 25/01/2016 |
| O020040333042 | 01/03/2016 | 100079 | 17446 | 01/03/2016 |
| O020040431003 | 14/12/2015 | 21 | 2797 | 14/12/2015 |
| O020040431079 | 02/11/2015 | 40678 | 2692 | 02/11/2015 |
| O020040431115 | 30/11/2015 | 617573 | 2716 | 17/11/2015 |
| O020040431177 | 02/11/2015 | 40677 | 8366 | 02/11/2015 |
| O020040452105 | 21/01/2016 | 2531 | 10995 | 18/01/2016 |
| P010039936001 | 02/03/2016 | 100011 | 47849 | 02/03/2016 |
| एकूण | | | 6993381 | |

| | |
|---|---|
| 1978 मिळकती कोर्टमार्फत जप्ती केलेली मालमत्ता थकित रक्कम | 45,00,000/- |
| एकूण चेक रिटर्न थकबाकी | 1,14,93,381/- |

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.50 दि.22/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 9, Hmm No : 50)

## *23 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तेवरील कर थकीत असलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 894055838.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 894055838.00/-

***मिरा भाईंदर महानगरपालिका करनिर्धारण व संकलन विभागाचे सन 2015-16 चे लेखापरीक्षण केले असता व लेखापरीक्षणास विभागाने उपलब्ध करून दिलेल्या संगणकीय विवरण पत्रानुसार प्रभाग निहाय ब-याच मालमत्ता धारकांची थकबाकी दिसून येत आहे. मनपाने विशेष मोहिम राबवून थकित मालमत्ता कर वसुल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम 76(2) नुसार निर्धारण सुचिवरून व मागील मागणी पुस्तकावरून मागण्याच्या नोंदी अचूकपणे आक्षेपित केल्याची खात्री कर निर्धारण व संकलक यांनी करावयाची आहे. मागील वर्षाच्या थकीत रक्कमा पुढील म्हणजे चालू वर्षात ओढल्याची खातरजमा विभाग प्रमुखाने केल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. संगणक विभागाने प्रणालीत ऑडीट्रेल (Audit Trail) ची सुविधा लेखापरीक्षणास उपलब्ध न करुन दिल्याने सदरील मागणी व वसुलीच्या थकीत रकमांबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खात्री झालेली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका करनिर्धारण व संकलन विभागाचे सन 2015-16 चे लेखापरीक्षण केले असता व लेखापरीक्षणास विभागाने उपलब्ध करून दिलेल्या संगणकीय विवरण पत्रानुसार प्रभाग निहाय ब -याच मालमत्ता धारकांची थकबाकी दिसून येत आहे . ती खालीलप्रमाणे आहे.

| प्रभाग कार्यालय | मागील/चालू मागणी | 31 मार्च 2016 अखेर वसुल केलेली रक्कम | वसुल करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1 Ward | 140128307 | 91284912 | 48843395 |
| 2 Ward | 66360103 | 50347634 | 16012469 |
| 3 Ward | 142272831 | 64226099 | 78046732 |
| 4 Ward | 489331612 | 258018611 | 164642711 |
| 5 Ward | 422661322 | 216760622 | 272570990 |
| 6 Ward | 322341128 | 8401587 | 313939541 |
| **Total** | **1583095303** | **689039465** | **894055838** |

उपरोक्त थकित रक्कमेबाबत , मनपाने विशेष मोहिम राबवून थकित मालमत्ता कर वसुल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम 76(2) नुसार निर्धारण सुचिवरून व मागील मागणी पुस्तकावरून मागण्याच्या नोंदी अचूकपणे आक्षेपित केल्याची खात्री कर निर्धारण व संकलक यांनी करावयाची आहे . म्हणजेच मागील वर्षाच्या थकीत रक्कमा पुढील म्हणजे चालू वर्षात ओढल्याची खातरजमा विभाग प्रमुखाने केल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे . 2015-16 चे अशा

बाबतचे प्रमाणपत्र कर निर्धारण व संकलक यांनी दिलेले नाही..

संगणक विभागाने प्रणालीत ऑडीट्रेल (Audit Trail) ची सुविधा लेखापरीक्षणास उपलब्ध न करुन दिल्याने सदरील मागणी व वसुलीच्या थकीत रकमांबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खात्री झालेली नाही. 2015-16 मधील मालमत्ता कर विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण विभागाने लेखा परीक्षण केलेबाबतचे अंतर्गत तपासणी (Internal checks) व Internal Audit अहवाल लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेला नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र . 61 दि.01/03/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 10, Hmm No : 61)

## *24 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकळ्या जागेची कर आकारणी व थकित रक्कम वसूल केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : मिळकत कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 520206226.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 520206226.00/-

***कराची वसुली ही मोठया प्रमाणात थकीत असल्याचे लेखापरिक्षणाच्या निर्दशनास आले आहे. सदरील रक्कम ही फार मोठया प्रमाणात असल्याने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम मधील कलम 140 व 141 नुसार मिळकत कर वसुलीसाठी विशेष मोहिम राबविणे आवश्यक आहे.***

मिरा भाईंदर महानगरपालिका कर निर्धारण व संकलन विभागचे सन 2015-16 चे लेखा परिक्षण केले असता, महानगरपालिका हद्दीतील विविध मालकीच्या 544 मोकळया जमिनी/जागा असून त्यांची मागणी, वसुली व थकबाकी खालीलप्रमाणे आहे.

| एकूण मागणी 2015-16 | एकूण वसुली 2015-16 | सन 2015-16 मधील मार्च-2016 अखेर थकबाकी रक्कम |
|---|---|---|
| 69,34,48,040/- | 17,32,41,814/- | 52,02,06,226/- |

मोकळ्या जागा ह्या 544 असून, त्यांची वसुली फार मोठ्या प्रमाणावर आहे.मनपाने वेळच्या

वेळी थकीत रकमेची वसुली केली असती तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर थकीत रक्कमा राहिल्या नसत्या. तरी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम मधील कलम 140 व 141 नुसार मिळकत कर वसुलीसाठी विशेष मोहिम राबवून कर वसुल करणे आवश्यक आहे. रक्कम रु.52,02,06,226/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

सदरील आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.104 दि.15/05/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 27, Hmm No : 104)

## *25 अनधिकृत बांधकामावरील खर्च वसूल न केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष : अनधिकृत बांधकामावरील महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5524000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5524000.00/-

***मिरा भाईंदर महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामे निष्कासित केलेले असून, सदरील निष्कासित केलेल्या बांधकामावर खर्च झालेली रकक्म वसूल होत नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका अनधिकृत बांधकाम सन 2015-2016 चे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता आढळून आल्या.

1) अनधिकृत बांधकाम निष्कासनावरील जमा रक्कम ही रु .10,000/- वसूल केली असून सदरील कामावर खर्च केलेली रक्कम रु.55,34,000/- एवढी करण्यात आली आहे.

2) मिरा भाईंदर महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामे , प्रभाग निहाय निष्कासित केलेले असून , सदरील निष्कासित केलेल्या बांधकामावर खर्च झालेली रकक्म वसूल होत नसलेचे लेखापरीक्षणास दिसून आले आहे.

3) अंदाजपत्रकामधील निष्कासित प्रकरणासाठी सन 2015-2016 मध्ये अधिकारी , कर्मचारी, पोलिस पथक, वाहन साधन सामुग्री व इंधन इ . बाबींचा वापर केला असून त्याच्यावर प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम रु . 55,34,000/- एवढी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267(2) व कलम 478(2) प्रमाणे बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकामे नष्ट (निष्कासित) केल्यावर त्यावर खर्च झालेल्या रकमेची यथास्थिती अशा व्यक्तीला किंवा मालकाला दयावा लागले असे नमूद असतांना त्याप्रमाणे प्रभाग निहाय व विभागाने सदरील अधिनियमाचा वापर करून तशी

रक्कम वसूल के ली नसलेबाबत लेखापरीक्षणास दिसून येत आहे . तसेच वसुल झालेली रक्कम रु.10,000/- वजा जाता रक्कम रु.55,24,000/- एवढी वसुलपात्र ठेवणेत येत आहे.

4) तसेच सदरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेसाठी वापरले अधिकारी कर्मचारी , पोलिस पथक, वाहन साधन सामुग्री व इंधन यां च्या दरपत्रकातील दर कशाच्या आधारे घेतले याबाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र . 60 दि.01/03/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 11, Hmm No : 60)

## *26 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 1 ते 6 मधील कच्चे/पक्के नाले पावसाळ्यापूर्वी सफ़ाई व खोदाई कामे व भाड्याने यंत्र सामुग्री पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 9**

*लेखा शीर्ष : साफ़सफ़ाई व सोयी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 16244550.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 14576506.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1668044.00/-

***50 लाखापेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी निविदा कालावधी हा प्रथम सुचना 25 दिवसाचा व व्दितीय सुचना 15 दिवसांची नमूद असताना सदरील अटीचे विभागाकडून पालन झालेले दिसून येत नाही. सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परी.क्र.136 मधील तरतुदी नुसार कामाची विभागणी न करण्याबाबतच्या सुचना असताना सदर एकाच कामाचे वेगवेगळे भाग पाडून केल्याने निविदेस स्पर्धा झालेले दिसून येत नाही. करारनाम्यातील अट क्र.10 नुसार निविदाकाराने नाले सफ़ाईचे काम सुरू होण्यापूर्वी काम सुरू असताना व काम पूर्ण झाल्यानंतर तारखेनिहाय कामाचे दररोजचे फ़ोटो व छायाचित्रीकरण केले बाबतचे दस्तऍवज नस्तीत उपलब्ध न झाल्याने सदरील अटीबाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. कंत्राट रक्कमेच्या 1% दराने शासकीय विमा निधीकडे विमा भरणे आवश्यक आहे. मा.आयुक्त केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/2011 चे नोटीफ़िकेशन व कर्मचारी भविष्य निर्वाह अधिनियम 1952 मधील तरतुदी ठेका पध्दतीने रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी योजना दि.08/01/2011 पासून लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्मचा-यांच्या नावाने वैयक्तिक कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खाती काढून त्या खात्यामध्ये त्यांचे वेतनामधून तसेच ठेकेदाराची स्वहिश्याची रक्कम कपात करून भरणा करणे आवश्यक आहे. या योजनेमधील उपरोक्त कलमानुसार कर्मचा-यांच्या मासिक वेतनामधून 12% व कंत्राटदाराच्या***

***स्व: निधिमधून 13.61% प्रमाणे रक्कम कपात करून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यांमध्ये महिनाच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. करारनाम्यातील अट क्र.17 नुसार निविदाकारांनी ठेक्याच्या कालावधीत Risk Insurance Policy काढणे बंधनकारक आहे, तरी सदरील Policy नस्तीत उपलब्ध नसल्याने, करारनाम्याच्या अटीचे पालन न झाल्याने लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले आहे. सदरील यंत्रसामुग्री व मजूर पुरवठा करण्याच्या कामाच्या दराचे लेखापरीक्षण केले असता सन 2015-16 मधील घनकचरा विभागाने मौजे उत्तन येथील घनकचरा ठिकाणी यंत्रसामुग्री वापरले बाबतचे दर व सन 2015-16 मधील पावसाळ्यापूर्वी कच्चे पक्के नाले साफ़सफ़ाईसाठी वापरलेली यंत्रसामग्री यांची तुलना केली असता सदरील कामाच्या यंत्रसामग्रीचे दर जास्तीचे दिसून येत आहे. सदरील कामासाठी एकत्रित खर्च रक्कम रु.1,45,76,506/- या खर्चाची प्रमाणके उपलब्ध न झाल्याने प्रमाणकांची पडताळणी करता आली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 1 ते 6 मधील कच्चे/पक्के नाले पावसाळ्यापूर्वी सफ़ाई व खोदाई कामे व भाड्याने यंत्र सामुग्री पुरवठा करणे या कामाकरीता खालील कंत्राटदाराकडून कामे करून घेतली आहेत.

| अ.क्र. | कामाच्या मंजुरी | कंत्राटदारांचे नाव | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| | | मे.एम.ई.प्रोजेक्टर्स प्रा.लि. | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी |
| 1 | लेखाशीर्ष | साफ़सफ़ाई व सोयी | साफ़सफ़ाई व सोयी |
| 2 | अंदाजे वार्षिक खर्च | 1,50,00,000 | 1,50,00,000 |
| 3 | आयुक्तांची मंजुरी | दि.13/05/2015 | दि.13/05/2015 |
| 4 | महासभेची मंजुरी | ठराव क्र.77 दि.23/03/2015 | ठराव क्र.77 दि.23/03/2015 |
| 5 | स्थायी समितीची मंजुरी | ठराव क्र.21 दि.15/05/2015 | ठराव क्र.21 दि.15/05/2015 |
| 6 | निविदा प्रसिध्दी | प्रथम दि.09/04/2015 ते दि.21/04/2015, व्दितीय दि.30/04/2015 ते दि.11/04/2015 | प्रथम दि.09/04/2015 ते दि.21/04/2015, व्दितीय दि.30/04/2015 ते दि.11/04/2015 |
| 7 | निविदा प्रसिध्दी जाहिरात वर्तमानपत्रे | दै.वार्ताहार व दै.जनादेश दि.08/04/2015 | दै.वार्ताहार व दै.जनादेश दि.08/04/2015 |
| 8 | कामाचा तांत्रिक लिफ़ापा उघडलेली दिनांक | दि.12/05/2015 | दि.12/05/2015 |
| 9 | पात्र निविदाकारचे दर मंजूर | दि.13/05/2015 रोजी निवड समिती बैठकीत दर मंजुर (प्रभाग समिती 1 ते 3) | दि.13/05/2015 रोजी निवड समिती बैठकीत दर मंजुर (प्रभाग समिती 4 ते 6) |
| 10 | कामाचा करारनामा | दि.15/05/2015 | दि.15/05/2015 |
| 11 | कामाचा कार्यादेश | क्र.मनपा/आरोग्य/36/2015-16 दि.15/05/2015 | क्र.मनपा/आरोग्य/37/2015-16 दि.15/05/2015 |

कामासाठी खालील न्युनतम दर मंजुर केले आहे.

| अ.क्र. | बाबी | मंजूर दर |
|---|---|---|
| 1 | Poclain machine -200 | 2026 per hours |
| 2 | Poclain machine with boat | 2291 per hours |
| 3 | JCB machine | 1110 per hours |
| 4 | Dumper | 6192 per shift |
| 5 | Torus | 9065 per shift |
| 6 | Hydra machine | 1120 per hours |
| 7 | Crain machine | 4583 per hours |
| 8 | Man power | 626 per day per man |

सन 2015-16 प्रभाग समिती 1 ते 6 मधील पावसाळ्यापूर्वी नाले सफ़ाई कामे पुरवठा केलेल्या यंत्रसामग्री व मजूर यांची नोंद वहीत नमूद असलेले देयके

प्रभाग क्र.1 मध्ये झालेला खर्च रक्कम रु.1836835/-

प्रभाग क्र.2 मध्ये झालेला खर्च रक्कम रु.945795/-

प्रभाग क्र.3 मध्ये झालेला खर्च रक्कम रु.1350975/-

प्रभाग क्र.4 मध्ये झालेला खर्च रक्कम रु.1164727/-

प्रभाग क्र.5 मध्ये झालेला खर्च रक्कम रु.3279194/-

प्रभाग क्र.6 मध्ये झालेला खर्च रक्कम रु.5998980/-

एकूण रक्कम रु.14576506/-

उपरोक्त यंत्रसामुग्री नाले साफ़सफ़ाई व खोदाई करणे, गाळ माती वाहतुक व मजूर पुरवठा करण्याची निविदा नस्ती तपासणी केली असता, खालील अनियमितता आढळून आल्या.

1) कामाची निविदा जाहिरात ही दै.वार्ताहर व दै.जनादेश या वर्तमानपत्रात दिली आहे. तरी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयक सीएटी 10/2006/प्र.क्र.133/इमारती-2 दि.02/11/2006 अन्वये 50 लाखापेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी निविदा कालावधी हा प्रथम सुचना 25 दिवसाचा व व्दितीय सुचना 15 दिवसांची नमूद असताना सदरील अटीचे विभागाकडून पालन झालेले दिसून येत नाही.

2) सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परी.क्र.136 मधील तरतुदी नुसार कामाची विभागणी न करण्याबाबतच्या सुचना असताना सदर एकाच कामाचे वेगवेगळे भाग पाडून केल्याने निविदेस स्पर्धा झालेले दिसून येत नाही.

3) उपरोक्त दर निविदा निवड समितीने मंजुर केले आहे, तरी सदरील कामासाठी वापरलेले वाहने (यंत्रसामग्री) निहाय लॉगबुक (स्कंदनोंदवही) लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने लॉगबुक ची तपासणी करता आली नाही.

4) करारनाम्यातील अट क्र.10 नुसार निविदाकाराने नालेसफ़ाईचे काम सुरू होण्यापूर्वी काम सुरू

असताना व काम पूर्ण झाल्यानंतर तारखेनिहाय कामाचे दररोजचे फ़ोटो व छायाचित्रीकरण केले बाबतचे दस्तऐवज नस्तीत उपलब्ध न झाल्याने सदरील अटीबाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

5) करारनाम्यातील अट क्र.16 नुसार निविदाकाराने प्रचलीत कामगार वेतन कायद्यानुसार मजुरांना वेतन अदा केलेबाबतचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने कामगारांना वेतन अदा केल्याची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही, तसेच कंत्राटदाराच्या कंत्राटी अनुकज्ञेय असलेले वेतन व 46% लेव्हीपोटीच्या रक्कमा अदा केले बाबतची कंत्राटदाराची देयके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे कामगारांना किमान वेतन अधिनियम 1948(11) नुसार वेतन व लेव्ही दिलेबाबत लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही.

6) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे परीपत्रक क्र. जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98 नवि-28 नगरविकास विभाग दि.3 नोव्हेंबर 2003 अन्वये महानगरपालिकेच्या सर्व कंत्राटी कामाचा विमा कामाच्या कंत्राटाच्या पूर्ण रक्कमेस व कंत्राटाच्या पूर्ण कालावधीसाठी शासकीय विमा संचलनालयाने निश्चित केलेल्या कंत्राट जोखीम विमापत्र व उभारणी जोखीम विमापत्र या विमापत्राखाली कंत्राट रक्कमेच्या 1% दराने शासकीय विमा निधीकडे भरणे आवश्यक आहे, तरी सदरील एकत्रित कामाची रक्कम रु.14576506/- कंत्राटदाराला अदा केली असता सदरील रक्कमेवर 1% विमा कपात न केल्याने रक्कम रु.145765/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

7) मा.आयुक्त केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/2011 चे नोटीफ़िकेशन व कर्मचारी भविष्य निर्वाह अधिनियम 1952 मधील तरतुदी ठेका पध्दतीने रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी योजना दि.08/01/2011 पासून लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्मचा-यांच्या नावाने वैयक्तिक कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खाती काढून त्या खात्यामध्ये त्यांचे वेतनामधून तसेच ठेकेदाराची स्वहिश्याची रक्कम कपात करून भरणा करणे आवश्यक आहे. या योजनेमधील उपरोक्त कलमानुसार कर्मचा-यांच्या मासिक वेतनामधून 12% व कंत्राटदाराच्या स्व:निधिमधून 13.61% प्रमाणे रक्कम कपात करून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यांमध्ये महिनाच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. त्यानुसार कंत्राटदाराने कामगारांची भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणा केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

8) करारनाम्यातील अट क्र.17 नुसार निविदाकारांनी ठेक्याच्या कालावधीत Risk Insurance Policy काढणे बंधनकारक आहे, तरी सदरील Policy नस्तीत उपलब्ध नसल्याने, करारनाम्याच्या अटीचे पालन न झाल्याने लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले आहे.

9) सदरील यंत्रसामुग्री व मजूर पुरवठा करण्याच्या कामाच्या दराचे लेखापरीक्षण केले असता सन 2015-16 मधील घनकचरा विभागाने मौजे उत्तन येथील घनकचरा ठिकाणी यंत्रसामुग्री वापरले बाबतचे दर व सन 2015-16 मधील पावसाळ्यापूर्वी कच्चे पक्के नाले साफ़सफ़ाईसाठी वापरलेली यंत्रसामग्री यांची तुलना केली असता सदरील कामाच्या यंत्रसामग्रीचे दर जास्तीचे दिसून येत आहे.

| अ.क्र. | बाबी | मौजे उत्तन येथील घनकचरा ठिकाणी यंत्रसामुग्री वापरलेले बाबतचे दर | पावसाळ्यापुर्वी कच्चे पक्के नाले सफाईसाठी पावरलेली यंत्र सामग्री यांची तुलना केली असता सदरील कामाच्या यंत्र सामग्रीचे दर | दोन्ही दरामधील फरकाची रक्कम | एकूण वापरलेली यंत्र सामग्री | वसुलीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Poclain machine - 200 | 1600 per hours | 2026 per hours | 426 | 1071.15 | 456309 |
| 2 | Poclain machine with boat | - | 2291 per hours | - | - | |
| 3 | JCB machine | 990 per hours | 1110 per hours | 120 | 1159.2 | 139104 |
| 4 | Dumper | 4800 per shift | 6192 per shift | 1392 | 133 | 185136 |
| 5 | Torus | 750 per hours (6000 per shift) | 9065 per shift | 3065 | 242 | 741730 |
| 6 | Hydra machine | - | 1120 per hours | - | - | |
| 7 | Crain machine | - | 4583 per hours | - | - | |
| 8 | Man power | - | 626 per day per man | - | - | |
| | | | | | एकूण | 1522279 |

उपरोक्त यांत्रिकी सामग्री भाडेतत्त्वावर घेण्यासाठी मुख्य अभियंता (यांत्रिकी जलसंपदा विभाग नाशिक-2) यांचे दरवर्षी प्रसिध्द होणारे यंत्रसामुग्री वापर दर पुस्तिकेतील दराशी शाहनिशा करुन निविदा मंजूर केली असती तर, जास्तीचा खर्च झाला नसता.

सदरील कामासाठी एकत्रित खर्च रक्कम रु.14576506/- या खर्चाची प्रमाणके उपलब्ध न झाल्याने प्रमाणकांची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.38 दि.25/01/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 13, Hmm No : 38)

## *27 मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील बांधकाम करण्याचे काम हाती घेतलेल्या बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांनी स्थानिक संस्था कर न भरलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : नगररचना विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4828747.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4828747.00/-

***नगररचना विभागाने बांधकाम व्यावसायिकांकडून स्थानिक संस्था कर वसूल न केल्याने महानगरपालिकेला रक्कम रु.4828747/- महसूलापासून वंचीत राहावे लागले आहे.***

मिरा भाईंदर महानगरपालिका नगररचना विभागाचे सन 2015-16च्या निवडक बांधकाम प्रारंभ दाखल्याचे लेखापरिक्षण केले असता, नगररचना विभागाने सन 2015-16 मध्ये एकूण 30 बांधकाम व्यावसायिकांना बांधकाम प्रारंभ दाखला दिला असून, मराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील स्थानिक संस्था कर नियम व नगरविकास विभाग अधिसूचना क्र.:-स्थासंक0209/प्र.क्र.65/09/ नवि.34 दि.25 मार्च 2010 मधील नियम 27 (4) मधील महानगरपालिकेच्या हद्दीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा कोणताही बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार स्थानिक संस्था कर या खाली महानगरपालिकेकडील स्वत:ची नोंदणी करील आणि त्याला शहराच्या हद्दीतील बांधकामाकरीता किंवा व्यापाराकरीता आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय असेल किंवा खालील मानकांनुसार स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करण्याचा पर्याय असेल असे नमूद आहे. ते पुढील प्रमाणे:-

(क) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उव्दाहन नसेल तेथे) - रु.100 (रु.शंभर) प्रति चौ.मी.

(ख) सातव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उव्दाहन असेल तेथे) - रु.150 (रु.दीडशे) प्रति चौ.मी.

(ग) उत्तुंग इमारतींचे बांधकाम (सात मजल्यांपेक्षा अधिक) - रु.200 (रु.दोनशे) प्रति चौ.मी.

जो कंत्राटदार ठोक कर प्रदानाचा पर्याय स्वीकारेल तो प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यावर स्थानिक संस्था कराच्या अशा देय रकमेपैकी 50 टक्के आगाऊ रकमेचे प्रदान करू शकेल असतांना नगररचना विभागाने खालील बांधकाम व्यावसायिकांकडून स्थानिक संस्था कर वसूल न केल्याने महानगरपालिकेला महसूलापासून वंचीत राहावे लागले आहे.

| अ.क्र. | मौजे | सर्वे क्र./हिस्सा क्र. | वास्तुविशारदाचे नांव | परवानगी क्रमांक | इमारत मजले | इमारत क्षेत्र (चौ.मी.) | प्रति चौ.मी. दर | वसूल न केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नवघर | 407/3, 408/2,3,5, 409/1,2, 410/2,3,4,6,8, 411/1,2,4,7,8 | मे. आर.जे. आशर | मनपा/नर/100/15-16, दि.10/04/15 | G+4 | 9769.06 | रु.100 | 976906 |
| 2 | नवघर | 267/1, 266/7, 268/1,6 पै. | मे. अनिष ऑन्ड असो. | मनपा/नर/132/15-16, दि.13/04/15 | G+4 | 5785.3 | रु.100 | 578530 |
| 3 | नवघर | 459/2,3,5,6,7, 133/2,3,5,6,7 | मे. अविनाश म्हात्रे ऑन्ड असो. | मनपा/नर/156/15-16, दि.15/04/15 | G+11 | 12891.55 | रु.200 | 2578310 |
| 4 | पेणकर पाडा, भाईंदर | 215पै., 216पै., 221पै., 222पै., 223, 224, 226पै., 227, 728पै., 730, 731 | मे. अविनाश म्हात्रे ऑन्ड असो. | मनपा/नर/157/15-16, दि.15/04/15 | G+7 | 4633.34 | रु.150 | 695001 |
| एकूण वसूलपात्र | | | | | | | | 4828747 |

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.70 दिनांक 02/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 19, Hmm No : 70)

## *28 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने, स्मशाने, मैदाने व दुभाजकामध्ये सुशोभिकरण (Landscaping) करणे कामात अनियमितता झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 05**

मिरा -भाईंदर महानगरपालिका

*लेखा शीर्ष : उदयाने सुशोभिकरण करण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 40014000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 40000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14000.00/-

***कामाची जाहिर निविदा सुचना हि दै. सामना, दै. मुंबई केसरी टाईम्स या वर्तमानपत्रात दिली असून शासन निर्णय – महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ- वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क- वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. या शासन निर्णयानुसार विभागाने अवलंब न केल्याने सदरील कामास स्पर्धा झालेली दिसून येत नाही. नियमानुसार रक्कम रु.39,000/- चे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते, तरी मुद्रांक शुल्क रक्कम रु.14,000/- ने कमी भरल्याने सदरील रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. उदयान विभागाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग (उदयान, मुंबई) विभागाचे सन 2015-16 मधील दरपत्रकांची खात्री न करता निविदा मागवली असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेला सदरील शासनाच्या दराचा वाजवी फायदा झालेला नाही. सदरील काम हे स्क्वेअर फुटानुसार दिले असून करारनामा व कार्यादेशामध्ये कामाचा दोषदायित्व कालावधी नमूद नसल्याने सदरील कामाच्या दोषदायित्व कालावधीबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.***

कंत्राटदार:- मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट
वृक्ष प्राधिकरण समिती मंजूरी:- ठराव क्र.6 दि.08/05/2015
निविदा प्रसिध्दी वृत्तपत्रे:- दि.15/05/2015 1) दै. सामना 2) दै. मुंबई केशरी टाईम्स व [E-Tendering and N.I.C (National Information Centre, Pune)]
आयुक्त मंजूरी:- दि.06/06/2015
अंदाजीत कामाची रक्कम:- 4,00,00,000/-
स्थायी समिती मंजूरी:- ठराव क्र.42 दि.17/06/2015
करारनामा:- दि.20/06/2015 सचिव दि.07/07/2015 (कालावधी दि.20/06/15 ते दि.19/06/16)
कार्यादेश:- मनपा/वृ.प्रा./160/2015-16 दि.20/06/2015
एकूण 22 बाबींसाठी निविदा आहे.

| Sr.No. | Items | दर sq.mt. |
|---|---|---|
| 1 | Preparing Lawn (30) cm depth | 650/- |
| 2 | Preparing Lawn (20) cm depth | 540/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | Preparing Insert Lawn | 710/- |
| 4 | Preparing Edging or Border | 455/- |
| 5 | Planting Clipped Hedge | 570/- |
| 6 | Preparing Flower Bed | 638/- |
| 7 | Preparing Canna Bed | 565/- |
| 8 | Preparing Shrubbery | 612/- |
| 9 | Rose Plant | 192/- |
| 10 | Mogra Plant/Creepers/Climbers | 168/- |
| 11 | Preparing Large Flowering/Shady trees (Ht.1Mtr.) | 775/- |
| 12 | Preparing Large Flowering/Shady trees (Ht.2Mtr.) | 865/- |
| 13 | Planting Small and Medium Size Ornametal/Flowering Plant | 440/- |
| 14 | Preparing Ground Covers | 485/- |
| 15 | Areca Plam (4-5 Feet) | 155/- Per No. |
| 16 | Areca Plam (6-8 Feet) | 230/- Per No. |
| 17 | Plam Varities (Polybag size 13x13) (Plant Hight 4-5 Feet) | 680/- Per No. |
| 18 | Plam Varities (Polybag size 16x16) (Plant Hight 6-8 Feet) | 1360/- Per No. |
| 19 | Plam Varities (Polybag size 30x30) (Plant Hight 10-12 Feet) | 3140/- Per No. |
| 20 | Plants Required For Landscaping (Polybag size 16x16) (Plant Hight 5-6 Feet) | 470/- Per No. |
| 21 | Plants Required Divider (Polybag size 6x8) (Plant Hight 1-2 Feet) | 65/- Per No. |
| 22 | Plants Required Divider (Polybag size 5x6) (Plant Hight 1-2 Feet) | 85/- Per No. |

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हया चे काम असेल त्या जिल्हयातील एका क -वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे . तरी सदर कामाची जाहिर निविदा सुचना हि दै . सामना, दै. मुंबई केसरी टाईम्स या वर्तमानपत्रात दिली असून सदर शासन निर्णयाचा अवलंब न केल्याने सदरील कामास स्पर्धा झालेली दिसून येत नाही.

2. सन 2015-16 सदरील कामासाठी केलेला करारनामा हा मुद्रांक शुल्क रक्कम रु .25,000/- या रकमेचा केला आहे . तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु .500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10 लाखापर्यंत घेणे आवश्यक

आहे. तसेच रक्कम 10 लाखानंतर उर्वरित कामाच्या रक्कमेच्या 0.1% मुद्रांक शुल्क रक्कम रु.25,00,000/- च्या मर्यादित घेणे आवश्यक असताना , सदरील कामासाठी कंत्राट दाराने रक्कम रु.25,000/- चे मुद्रांक शुल्क भरले आहे, तरी सदरील कामासाठी नियमानुसार रक्कम रु.39,000/- चे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते, तरी मुद्रांक शुल्क रक्कम रु.14,000/- ने कमी भरल्याने वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. (कामासाठी वार्षिक खर्चाची होणारी रक्कम रु .4,00,00,000/- एवढी असून वजा 10,00,000/- जाता मुद्रांक शुल्कासाठी रक्कम रु .3,90,00,000/- एवढी आहे, तरी 3,90,00,000 X 0.1% = 39,000/- एवढी रक्कम घेणे अपेक्षित असताना सदरील मुद्रांक शुल्क रक्कम रु .25,000/- एवढेच घेतले आहे).

3. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र .4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अं तर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ :करण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये . तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये . असे असतांना विभागाने उदयाने सुशोभिकरण करणेसाठी दर बाजारभावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे . केवळ त्याचप्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले . परंतु उदयान विभागाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग (उदयान, मुंबई) विभागाचे सन 2015-16 मधील दरपत्रकांची खात्री न करता निविदा मागवली असल्याने मि रा भाईंदर महानगरपालिकेला सदरील शासनाच्या दराचा वाजवी फायदा झालेला नाही.

5. सदरील काम हे स्क्वेअर फुटानुसार दिले असून करारनामा व कार्यादेशामध्ये कामाचा दोषदायित्व कालावधी नमूद नसल्याने सदरील कामाच्या दोषदायित्व कालावधीबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.98 दि.26/04/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 23, Hmm No : 98)

## *29 उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उदयानांना/दुभाजकांना भाडे तत्वावर पाण्याचा टँकर पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष : उदयान विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2766960.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2766960.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1700.00/-

***सन 2015-16 करीता पणी पुरवठा विभागाची निविदा अंतिम झालेली नाही. तथापी, मागील मंजूर दराने एक महिन्यासाठी टँकर भाडेतत्वावर घेणेस मा.आयुक्त यांनी दि.09/10/2015 रोजी मंजुरी एक महिन्याच्या आत निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याच्या अधिन राहुन एक महिन्यासाठी मुदत वाढ देण्यात आली होती परंतु विभागाकडुन एक महिन्याच्या आत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने मा.आयुक्त यांच्या आदेशाचे पालन झाले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, प्रकरण 7, 73(क) ज्यात पंचवीस लाख रुपयांहून अधिक परंतु पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचाखर्च अंतर्भूत असेल अशी इतर कोणतीही संविदा महापौराने पूर्व मान्यता दिल्याशिवाय आयुक्ताने करता कामा नये. वरील तरतुदींच्या अधीनतेने, पंचवीस लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पूर्व मान्यता आवश्यक असेल. याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने वरील तरतुदीचे उल्लंघन झाले आहे. निविदा ऑगस्ट 2015 पर्यंत मुदतीचे असतांना विभागाने ऑगस्ट 2015 पूर्वीच निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश देणे अपेक्षित होते. परंतु जानेवारी 2016 पर्यंतही निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नव्हती. त्यामुळे मागील मक्तेदारालाच मूदत वाढ दयावी लागल्याने महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही.सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.2,300/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने वाढीव मुदतीच्या कामासाठी रु.500/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कम रु.1,700/- ची मे. सागर वॉटर सप्लाय यांच्याकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावी. दररोज पाणीपुरवठा केलेल्या टँकरची ठिकाणे, टँकर क्रमांक व दिनांकासह असलेली नोंदवही, फेऱ्यांचे रजिस्टर लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने देयकात नमूद केलेल्या फेऱ्याप्रमाणे देयक अदा झाल्याची खात्री करता आली नाही. करारनामा अटी शर्ती 26 नुसार टँकरचे रजिस्ट्रेशन, परमिट, इन्शुरन्स, पी.यु.सी., टँकर चालकांचे लाईसन्स इत्यादी सर्व कागदपत्रे अदयावत ठेवणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध न झाल्याने करारनामा अटी शर्ती नुसार कागदपत्रे, अभिलेखे अदयावत होती याची खात्री करता आली नाही.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उदयानांना/दुभाजकांना भाडे तत्वावर पाण्याचा टँकर पुरवठा करणे |
| 2 | प्रशासकीय मान्यता पत्र क्र. | दि.09/11/2015 (मुदत वाढ कामासाठी) |
| 3 | स्थायी समिती ठराव क्र. (2014-15 साठी) | क्र.67 दि.16/08/2014 |

| | | |
|---|---|---|
| 4 | स्थायी समिती ठराव क्र. | मान्यता घेतली नाही |
| 5 | मुदत वाढ कामाची रक्कम | 27,66,960/- |
| 6 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे. सागर वॉटर सप्लाय |
| 7 | कार्यादेश क्रमांक व दिनांक | 1)जा.क्र./मनपा/पापु/कार्या/36/2014-15 दि.21/08/2014<br>2)जा.क्र./मनपा/वृ.प्रा./486/2015-16 दि.09/11/2015 (मुदत वाढ कामासाठी) |
| 8 | कंत्राटदारा बरोबर केलेल्या कराराचा दिनांक व नोंदणी केलेल्या कराराच्या मुद्रांक शुल्काची रक्कम | दि.09/11/2015 - मुद्रांक शुल्क रक्कम रु.500/- (मुदत वाढ कामासाठी) |
| 9 | कामाचे लेखाशीर्ष व मंजुर रक्कम | उदयाने/दुभाजक सुशोभिकरण करणे र.रु.4,50,00,000/- |

| प्रमाणक क्र. | दिनांक | कामाचा कालावधी | देयक रक्कम |
|---|---|---|---|
| 14 | 19/03/2016 | दि.12/11/2015 ते दि.30/11/2015 | 6,26,940/- |
| | | दि.01/12/2015 ते दि.31/12/2015 | 10,78,920/- |
| | | दि.01/01/2016 ते दि.31/01/2016 | 10,61,100/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उदयाने, स्मशाने, मैदान, दुभाजक आदी ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळण्याकरीता दरवर्षी ऑक्टोंबर महिन्यापासून पाणी पुरवठा विभागाकडील मंजुर दर प्रती फेरा रु.540/- (रु. पाचशे चाळीस मात्र) या दराने भाडेतत्वाव्दारे टँकरव्दारे तलावातील पाण झाडांना, गवतास देणेसाठी माहे ऑक्टोंबर 2014 ते जुन 2015 या कालावधीत कार्यादेश जा.क्र./मनपा/पापु/कार्या/36/2014-15 दि.21/08/2014 अन्वये देण्यात आला. परंतु सन 2015-16 ची निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाने मे. सागर वॉटर सप्लाय यांना भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणेबाबत कार्यादेश दि.12/11/2015 पासुन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.1,2,3,4,5 व 6 अंतर्गत येणाऱ्या 58 उदयाने, 11 मैदाने, 14 स्मशाने, 2 चौपाटया, 1 नर्सरी, 16 किमी लांबीचे दुभाजक इत्यादी ठिकाणी पाण्याचे टँकर भाडेतत्वावर पुरवठा करण्यासाठी प्रती फेरा रु.540/- (रु. पाचशे चाळीस मात्र) याप्रमाणे कार्यादेश (मुदत वाढीच्या कामासाठी) जा.क्र./मनपा/वृ.प्रा./486/2015-16 दि.09/11/2015 देण्यात आला.

सन 2015-16 या वर्षातील उदयान विभागाच्या मंजुर अंदाजपत्रकामधील 'उदयाने/दुभाजक सुशोभिकरण करणे' या लेखाशिर्षाखाली रु.4,50,00,000/- (रु.चार कोटी पन्नास लाख मात्र)

रक्कमेची तरतुद करण्यात आलेली असुन सदर तरतुदीमधुन खर्च करण्यात आला आहे.

सदर कामाचे नस्ती, प्रमाणाक यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रूटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

1. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राती विविध उदयाने, दुभाजक आदि ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणेकामी पाणी पुरवठा विभागाकडील मंजुर दराने टँकर भाडेतत्वावर घेण्यात येतात. सन 2015-16 करीता पणी पुरवठा विभागाची निविदा अंतिम झालेली नाही. तथापी, मागील मंजूर दराने एक महिन्यासाठी टँकर भाडेतत्वावर घेणेस मा.आयुक्त यांनी दि.09/10/2015 रोजी मंजुरी एक महिन्याच्या आत निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याच्या अधिन राहुन एक महिन्यासाठी मुदत वाढ देण्यात आली होती परंतु विभागाकडुन एक महिन्याच्या आत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने मा.आयुक्त यांच्या आदेशाचे पालन झाले नाही.

2. सन 2014-15 साठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची उदयाने, दुभाजक आदि ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणेकामी पाणी पुरवठा करण्याकामी कार्यादेश जा.क्र./मनपा/पापु/कार्या/36/2014-15 दि.21/08/2014 देऊन पाणी पुरवठा करण्यात आला परंतु सन 2015-16 साठीची निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत माहे सप्टेंबर 2015 पासुन मुदत वाढ देण्यात आली. परंतु मुदत वाढ दिल्यानंतर झालेला खर्च हा र.रु. पंचवीस लाखापेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, प्रकरण 7, 73(क) ज्यात पंचवीस लाख रुपयांहून अधिक परंतु पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचाखर्च अंतर्भूत असेल अशी इतर कोणतीही संविदा महापौराने पूर्व मान्यता दिल्याशिवाय आयुक्ताने करता कामा नये. वरील तरतुदींच्या अधीनतेने, पंचवीस लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पूर्व मान्यता आवश्यक असेल. याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने वरील तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

3. उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग टिपणी दि.16/09/2015 अन्वये मनपा क्षेत्रातील विविध उदयाने, स्मशाने, मैदान, दुभाजक आदी ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्याकरीता दरवर्षी साधारणत: ऑक्टोंबर महिन्यापासून पाणी पुरवठा विभागाकडील मंजुर दराने भाडेतत्वावर टँकरव्दारे तलावातील पाणी प्रत्येक वर्षी झाडांना, गवततास दिले जाते, असे नमूद असतांना व मागील वर्षाची निविदा ऑगस्ट 2015 पर्यंत मुदतीचे असतांना विभागाने ऑगस्ट 2015 पूर्वीच निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश देणे अपेक्षित होते. परंतु जानेवारी 2016 पर्यंतही निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नव्हती. त्यामुळे मागील मक्तेदारालाच मूदत वाढ दयावी लागल्याने महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही.

4. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सन 2015-16 मध्ये मे. सागर वॉटर सप्लायर

यांना रक्कम रु.27,66,960/- (कालावधी माहे नोव्हेंबर ते जानेवारी पर्यंत) प्रदान झालेली आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.2,300/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने वाढीव मुदतीच्या कामासाठी रु.500/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कम रु.1,700/- ची मे. सागर वॉटर सप्लाय यांच्याकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावी.

5. करारनामा अटी शर्ती 22 नुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे कामासाठी व्दितीय पक्षीय यांना एकुण फेऱ्यांचे रजिस्टर ठेवणे व महानगरपालिकेने निर्देशित केलेल्या ठिकाणी फेऱ्या करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल, परंतु दररोज पाणीपुरवठा केलेल्या टँकरची ठिकाणे, टँकर क्रमांक व दिनांकासह असलेली नोंदवही, फेऱ्यांचे रजिस्टर लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने देयकात नमूद केलेल्या फेऱ्याप्रमाणे देयक अदा झाल्याची खात्री करता आली नाही.

6. करारनामा अटी शर्ती 26 नुसार टँकरचे रजिस्ट्रेशन, परमिट, इन्शुरन्स, पी.यु.सी., टँकर चालकांचे लाईसन्स इत्यादी सर्व कागदपत्रे अदयावत ठेवणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध न झाल्याने करारनामा अटी शर्ती नुसार कागदपत्रे, अभिलेखे अदयावत होती याची खात्री करता आली नाही. सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.84 दि.26/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 47, Hmm No : 84)

## *30 मिरा भाईंदर महानगरपालिका जाहिरात विभागाअंतर्गत जाहिरात कर व होर्डिंग्ज व जाहिरात फी वसूल न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : जाहिरात कर व होर्डिंग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5669192.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5669192.00/-

***सदरील एकूण थकित रक्कम रु.5201612 एवढी असून वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. तसेच सदरील ठेकेदाराकडून करारनाम्यानुसार विलंब शुल्क वसुल केलेबाबतचे अभिलेखे उपलब्ध नसल्याने सदरील विलंब शुल्काबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. तसेच खालील एजन्सीकडून धनादेश रक्कम जमा झाल्या नसल्याने रक्कम रु.467580 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.***

मिरा भाईंदर महानगरपालिका जाहिरात विभागाचे सन 2015-16 चे लेखापरिक्षण केले असता खालीलप्रमाणे जाहिरात कर व होर्डिग्ज फलकावरील जाहिर फी/कॅन्टीलिव्हर फी थकित असल्याबाबत लेखापरिक्षणात दिसून येत आहे.

| लेखाशिर्ष | 2015-16 मधील एकूण मागणी | 2015-16 मधील एकूण वसूली | 2015-16 मधील एकूण थकित रक्कम |
|---|---|---|---|
| जाहिरातीवरील जाहिरात फी | 8878518 | 8083715 | 794803 |
| कमानीवरील जाहिरात फी | 3225628 | 608110 | 2617518 |
| ठेका होर्डिग्ज | 13635439 | 11846148 | 1789291 |
| एकूण | | | 5201612 |

सदरील एकूण थकित रक्कम रु.5201612/- एवढी असून वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. तसेच सदरील ठेकेदाराकडून करारनाम्यानुसार विलंब शुल्क वसुल केलेबाबतचे अभिलेखे उपलब्ध नसल्याने सदरील विलंब शुल्काबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. तसेच खालील एजन्सीकडून धनादेश रक्कम मनपा खात्यात जमा न झाल्याने वसुली होईपर्यंत रक्कम रु.4,67,580/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

धनादेश न वटलेली एजन्सीची नावे

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | बँकेचे नांव | धनादेश क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | विवेक लावंड | कार्पोरेशन बँक | 645688 | 7560 |
| 2 | संजय पटेल/नोव्हेल टयुटोरीअल | एस.व्ही.सी. बँक | 118231 | 4320 |
| 3 | रेअर ऑटो | एच.डी.एफ.सी. बँक | 000469 | 4800 |
| 4 | सरस पब्लीसीटी | बँक ऑफ इंडीया | 096581 | 18900 |
| 5 | एगेंज आऊटडोर | युनीयन बँक ऑफ इंडीया | 177524 | 80640 |
| 6 | एशीयन ॲडस | ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स | 692235 | 20160 |
| 7 | एगेंज आऊटडोर | युनीयन बँक ऑफ इंडीया | 177547 | 80640 |
| 8 | एगेंज आऊटडोर | युनीयन बँक ऑफ इंडीया | 177548 | 80640 |
| 9 | एगेंज पब्लीसीटी प्रा.लि. | युनीयन बँक ऑफ इंडीया | 101709 | 80640 |
| 10 | एगेंज पब्लीसीटी प्रा.लि. | युनीयन बँक ऑफ इंडीया | 101710 | 80640 |
| 11 | बँक ऑफ महाराष्ट्र | बँक ऑफ महाराष्ट्र | 963987 | 4320 |
| 12 | बँक ऑफ महाराष्ट्र | बँक ऑफ महाराष्ट्र | 963988 | 4320 |
| एकूण | | | | 467580 |

सदरील आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.103 दिनांक 15/05/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 26, Hmm No : 103)

## *31 भाईंदर (पश्चिम) विभागाच्या बाजार वसुलीकरीता अभिकर्ता (एजंट) नेमणूकिबाबत. (दि:08/09/2015 ते दि:27/09/2016)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : बाजार/मंडई महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 8041209.00/-

***मिरा भाईंदर महानगरपालिकेस बाजारापासून मिळणारे अंदाजित उत्पन्न निश्चित व अधिकृत नसल्याने मक्तेदाराला मिळणारा मोबदला हा किफायतशिर/ फायदयाचा आहे किंवा कसा याची खात्री करता आली नाही. स्थायी समिती ठराव क्र.56 दि.14/08/2015 अन्वये मे. श्री. विजय गजाधर सोमाणी यांच्या कडून Risk and Cost Clause नूसार रक्कम रु.62,25,310/- वसूल करणे आवश्यक असून ती रक्कम वसूल केलेली नसल्याने रक्कम रु.62,25,310/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. करारनाम्यातील अट क्र.6 नुसार "बाजार फी" वसुली करीता प्रत्येक विभागासाठी वेगवेगळी पावती पुस्तके महानगरपालिकेकडून पुरविण्यात येतील असे नमूद आहे तरी सदरील अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नसल्याने "बाजार फी" वसूली व पावती पुस्तकांची लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही. करारनाम्यातील अट क्र.16(ब) नुसार ठेकेदाराने दयावयाच्या धनादेशाची अभिलेखे उपलब्ध न झाल्याने सदरील अटीची लेखापरिक्षणाला पडताळणी करता आली नाही. करारनाम्यातील अट क्र.20 नुसार अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नसल्याने सदरील अटीची तक्रार व "बाजार फी" वसूलीबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. करारनाम्यातील अट क्र.22 नुसार ठेकेदाराने फेरीवाले व फळ विक्रेते यांच्याकडून "बाजार फी" प्रती चौरस मीटरनुसार वसूल केलेली अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील अटीची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. करारनाम्यातील अट क्र.23 नुसार लिलाव बोलीची बाजार हप्त्याची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसूल करण्यात येईल असे नमूद आहे तरी मे. श्री. किरण चेऊळकर यांची दि:31/03/2016 पर्यंत थकित रक्कम रु.1,00,86,600/- एवढी असून सदर रक्कमेवर 18% व्याजाची रक्कम रु.18,15,588/- वसूल केलेली नाही. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24.04.2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रक्कम रु.311/- ची मे. श्री. किरण चेऊळकर यांच्याकडून वसूल करुन शासनखाती जमा करण्यात यावी.***

महासभा ठराव क्र.29 दि.19/07/2008 (ना फेरीवाला व फेरीवाला क्षेत्र).

दि.18/07/2015 दै. सामना, दै. फ्री जनरल प्रेस व साप्ताहिक ठाणे की आवाज (या वृत्तपत्रातील जाहिर बाजारबोली लिलाव सुचना).
दि.06/08/2015 रोजी जाहिर बोली पध्दतीने झालेला लिलाव.
मा. स्थायी समिती ठराव क्र.56 दि.14/08/2015.
दि.17/10/2015 रोजीचा करारनामा.
कार्यादेश:- जा.क्र.मनपा/मिळकत/बाजार/132/2015-16 दि.24/09/2015.
कंत्राटदार/बोली अभिकर्ता:- मे. श्री. किरण नरहरी चेऊळकर.
मंजूर देकार रक्कम रु.1,98,11,000/- दहा समान हप्त्यातील धनादेश रक्कम रु.19,81,100/- प्रमाणे आगाऊ घेणे.

उपरोक्त नस्तीचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. मिरा भाईंदर महानगरपालिकेने बाजार सर्वेक्षण केले नसल्याने बाजार वसुलीकरीता किती रक्कम वसुल होणे हे अपेक्षित आहे किंवा महानगरपालिकेला बाजारापासून जास्तीत जास्त किती उत्पन्न प्राप्त होईल याचा अंदाज न बांधता बोली देकार प्रक्रिया राबविण्यात आली. सदरील ठेका बोली लावून देण्यात आला. यामध्ये मक्तेदारास मिळणारा मोबदला हा बोली रक्कमेच्या वरील सर्व रक्कम मक्तेदाराचा मोबदला म्हणून गृहित धरण्यात आलेले दिसून येते, परंतू यामध्ये महानगरपालिकेकडून मक्तेदारास मिळालेला मोबदला याबाबतची अभिलेखे व त्याचा घेतलेला ताळमेळ लेखापरिक्षणास उपलब्ध झालेला नाही. बोली पध्दतीने ठेका देतावेळी बाजारापासून मिळणारे उत्पन्न हे निश्चित व अधिकृत असणे आवश्यक आहे. कारण या रक्कमेवरच मक्तेदाराचा मिळणारा मोबदला निश्चित होतो. परंतू या प्रक्रियेमध्ये बाजारापासून मिळणारे अंदाजित उत्पन्न निश्चित व अधिकृत नसल्याने मक्तेदाराला मिळणारा मोबदला हा किफायतशिर/फायदयाचा आहे किंवा कसा याची खात्री करता आली नाही.

2. सदरील कंत्राटापूर्वी मे. श्री. विजय गजाधर सोमाणी यांना स्थायी समिती ठराव क्र.2 दि.20/04/2015 नुसार सदरील बाबतचा ठेका रक्कम रु.2,60,36,310/- ने घेण्यास दिला होता. परंतू सोमाणी यांनी ठेका अर्धवट सोडल्याने “बाजार फी” वसुलीकरीता नविन अभिकर्ता नेमण्याकरीता बाजार बोली लिलाव करण्यात आला. सदरील बोली लिलाव महानगरपालिकेस किमान रु.2,60,36,310/- किंवा त्यापेक्षा जास्त उत्पन्न मिळणे अपेक्षित असतांना बोली धारकांनी सर्वांत जास्त बोली रक्कम रु.1,98,11,000/- ची अंतिम बोली केली तरी मे. श्री. किरण नरहरी चेऊळकर यांनी अंतिम बोली रक्कम रु.1,98,11,000/- स्विकार करून ह्याने महानगरपालिकेला पूर्वीच्या ठेक्याच्या व आत्याच्या बोली लिलावात रक्कम रु.62,25,310/- चे आर्थिक नुकसान महानगरपालिकेला सोसावे लागले आहे. तरी स्थायी समिती ठराव क्र.56 दि.14/08/2015 अन्वये मे. श्री. विजय गजाधर सोमाणी यांच्या कडून Risk and Cost Clause नूसार रक्कम रु.62,25,310/- वसूल करणे आवश्यक असून ती रक्कम वसूल केलेली नसल्याने रक्कम रु.62,25,310/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

3. करारनाम्यातील अट क्र.6 नुसार “बाजार फी” वसुली करता वापरण्यात येणारी पावती पुस्तके महानगरपालिकेकडून पूरविण्यात येतील. तसेच प्रत्येक पावतीवर महानगरपालिकेचा शिक्का व दररोजची तारिख असल्याशिवाय “बाजार फी” वसूल करता येणार नाही. तसेच प्रत्येक विभागासाठी वेगवेगळी पावती पुस्तके महानगरपालिकेकडून पुरविण्यात येतील असे नमूद आहे तरी सदरील अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नसल्याने “बाजार फी” वसूली व पावती पुस्तकांची लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही.

4. करारनाम्यातील अट क्र.16(ब) नुसार निविदेच्या/देकार 10 समान हप्ते महानगरपालिकेत आगाऊ धनादेश जमा करने आवश्यक सदर धनादेश संबंधित महिन्याच्या 7 तारखेपर्यंत महानगरपालिकेच्या खात्यात जमा करणे आवश्यक आहे. ते महानगरपालिकेमध्ये जमा केलेबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही त्यामुळे सदरील धनादेशाची लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही.

5. करारनाम्यातील अट क्र.20 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मंजूर दरापेक्षा ठेकेदाराने जास्त दराने “बाजार फी” वसूल करीत असल्याबाबतची तक्रार आली व “बाजार फी” वसूलीबाबत सतत 3 वेळा तक्रार आल्यास वस्तूस्थितीची पाहणी करून प्रती तक्रारी मागे रु.1000/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल असे नमूद आहे याबाबतची अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नसल्याने सदरील अटीची तक्रार व “बाजार फी” वसूलीबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

6. करारनाम्यातील अट क्र.22 नुसार ठेकेदाराने फेरीवाले व फळ विक्रेते यांच्याकडून “बाजार फी” प्रती चौरस मीटरकरीता रु.25/- आकारावयाचे आहेत. एखादा फेरीवाल्याने 2 चौरस मीटरपेक्षा जागा व्याप्त केली असल्यास अशा फेरीवाले व भाजी, फळ विक्रेते यांच्याकडून रु.50/- “बाजार फी” ठेकेदाराने वसूल करावी. 2 चौरस मीटरपेक्षा जास्त जागा असल्यास त्या भागाच्या प्रमाणात “बाजार फी” वसूल करावी याबाबतची अभिलेखे उपलब्ध झाली नसल्याने “बाजार फी” व चौरस मीटर बाबतची लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही.

7. करारनाम्यातील अट क्र.23 नुसार लिलाव बोलीची बाजार हप्त्याची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसूल करण्यात येईल असे नमूद आहे तरी मे. श्री. किरण चेऊळकर यांची दि.31/03/2016 पर्यंत थकित रक्कम रु.1,00,86,600/- एवढी असून सदर रक्कमेवर 18% व्याजाची रक्कम रु.18,15,588/- वसूल केलेली नाही याबाबत सत्वर अनुपालन व्हावे.

8. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24.04.2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/- व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेने रु.100/-

चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कमेवर रक्कम रु.311/- ची मे. श्री. किरण चेऊळकर यांच्याकडून वसूल करुन शासनखाती जमा करण्यात यावी.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.127 दि.24/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 60, Hmm No : 127)

## *32 मिरा भाईंदर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता इमारती, भाजी/मासळी मार्केट गाळे वगैर यांच्या थकीत रक्कमा असलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : मिळकत भाडे महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 12457131.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 12457131.00/-

***मालमत्ता विभागाने सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार मनपा मालकींचे मालमत्ता भाडयाचे मागणी पुस्तक नमुना क्र.81 प्रमाणे ठेवलेले नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेने मालमत्ता विभागाकडील मालमत्ता भाडे थकबाकी वसुलीसाठी विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 8अ कलम 81(ब) प्रमाणे (1) नुसार मालमतेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीपर्यंत थकीत असल्यास अशा सर्व थकबाकीदारांना भाडे जमा करणेबाबत नोटीस देणे आवश्यक होते तशा प्रकारच्या नोटीसा दिलेबाबत लेखा परीक्षणास पहावयास मिळालेले नाही. त्यामुळे थकबाकी विषय लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 79(ड) अन्वये जागेचे भाडे चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद केली आहे. त्यानुसार नियमाप्रमाणे भाडे आकारणी करणेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे मार्फत निश्चित केलेल्या मनपाच्या मालकीची वेगवेगळया जागा/इमारती यांची भाडे निश्चित केलेबाबत अभिलेखे उपलब्ध न झाल्याने भाडेवाढबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. नियमानुसार प्रत्येक वर्षी मनपा मलाकीच्या मालमतेचे 10 टक्के भाडे वाढ केलेली नाही, त्यामुळे चालू बाजार किमती नुसार जागेचे मुल्याकंन करून तसा वेळोवेळी करारणामाही केलेला नाही. मालमत्ता विभागाने मालमत्ता भाडेने दिल्या दिनांका पासून त्या त्या वर्षी बाजार भावानुसार भाडे निश्चित न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. थकीत भाडयावर केद्रीय वित्तीय आधिनियम 1994, 65B(105), zzzz नुसार मालमत्तेवर सेवाकर घेतलेबाबत लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्याप्रमाणे सेवाकराबाबत केंद्रशासनाकडील वेळोवेळी विहीत केलेले सेवाकर***

***आकारणी टक्केवारी नुसार, आकारणी केलेली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता विभागाचे सन 2015-16 मधील मनपा मालकी मालमत्ताचे लेखा परीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. मालमत्ता विभागाने महाराष्ट्र नगरपरिषेद लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 110 नुसार मनपा मालकींचे मालमत्ता भाडयाचे मागणी पुस्तक नमुना क्र. 81 प्रमाणे ठेवलेले नाही त्यामुळे मनपा मालकी इमारती, भाजी/मासळी मार्केट गाळे, गटई कामगार व्यवसाय, मैदाने, मोकळी जागा वगैरे या मालमतेचे भाडे 2015-16 अखेर किती येणे बाकी आहे व शिल्लक किती आहे याची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही.

2. मिरा भाईंदर महानगरपालिकेने मालमत्ता विभागाकडील मालमत्ता भाडे थकबाकी वसुलीसाठी विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 8अ कलम 81(ब) प्रमाणे (1) नुसार मालमतेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीपर्यत थकीत असल्यास अशा सर्व थकबाकीदारांना भाडे जमा करणेबाबत नोटीस देणे आवश्यक होते तशा प्रकारच्या नोटीसा दिलेबाबत लेखा परीक्षणास पहावयास मिळालेले नाही. त्यामुळे थकबाकी विषय लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 79(ड) अन्वये जागेचे भाडे चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद केली आहे. त्यानुसार नियमाप्रमाणे भाडे आकारणी करणेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे मार्फत निश्चित केलेल्या मनपाच्या मालकीची वेगवेगळया जागा/इमारती यांची भाडे निश्चित केलेबाबत अभिलेखे उपलब्ध न झाल्याने भाडेवाढबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही व त्यानुसार मालमत्ता विभागाने जागा/इमारती यांची भाडेवसुली केलेली दिसुन येत नाही.

4. नियमानुसार प्रत्येक वर्षी मनपा मलाकीच्या मालमतेचे 10 टक्के भाडे वाढ केलेली नाही, त्यामुळे चालू बाजार किमती नुसार जागेचे मुल्यांकन करून तसा वेळोवेळी करारणामाही केलेला नाही. त्यामुळे लेखापरीक्षणास मनपा मालकीच्या मालमत्तेची भाडे वाढ झालेबाबतची खात्री झालेली नाही.

5. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उदाहरणदाखल खालील मालमत्तेचे थकीत भाडे मालमत्ता विभागाने मालमत्ता भाडेने दिल्या दिनांका पासून त्या त्या वर्षी बाजार भावानुसार भाडे निश्चित न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे.

खालील मालमत्तेची भाडेवाढ न करता थकित असलेल्या रक्कमेची वसुली केली नसल्याने महानगरपालिकेला स्वत:च्या मालकिच्या मालकिच्या मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पनाला महानगरपालिकेला वंचित राहवे लागले आहे.

| अ.क्र. | सदनिकेचे/इमारतीचे/शॉपींग सेंटर/शासकिय कार्यालय/ समाज मंदीर/मासळी मार्केट इ. | एकूण संख्या (भाडेकरू निहाय) | एकूण मागणी | एकूण वसुली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एम.बी.एम.सी. अपार्टमेंट | 30 | 58600 | 41400 | 17200 |
| 2 | अमृता अपार्टमेंट | 14 | 35600 | 15200 | 20400 |
| 3 | रमेश अपार्टमेंट | 21 | 31100 | 19100 | 12000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | तिरुपती वंदना अपार्टमेंट | 4 | 7300 | 2400 | 4900 |
| 5 | राम झरोखा अपार्टमेंट | 12 | 28600 | 19500 | 9100 |
| 6 | आरक्षण क्र. बि.ओ.टी. | 3 | 11479375 | 6745000 | 4734350 |
| 7 | शासकिय कार्यालय | 4 | 7548291 | 2678434 | 4869857 |
| 8 | गाळे धारक | 5 | 181000 | - | 181000 |
| 9 | मासळी मार्केट गोडदेव, भाईंदर (पु) | 20 | 218840 | - | 218840 |
| 10 | मासळी मार्केट खारीगांव, भाईंदर (पु) | 56 | 654480 | - | 654480 |
| 11 | मासळी मार्केट नवघर, भाईंदर (पु) | 27 | 340080 | 19400 | 320680 |
| 12 | मासळी मार्केट, भाईंदर (प.) | 44 | 561420 | 17700 | 543720 |
| 13 | मासळी मार्केट नेहरू नगर, भाईंदर (प.) | 8 | 1562 | 878 | 684 |
| 14 | मासळी मार्केट छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भाईंदर (प.) | 6 | 2816 | 768 | 2048 |
| 15 | मासळी मार्केट उत्तन विभाग, भाईंदर (प.) | 17 | 353520 | 25200 | 328320 |
| 16 | मासळी मार्केट काशी विभाग, भाईंदर (प.) | 11 | 131300 | 44700 | 86600 |
| 17 | मासळी मार्केट मुर्धा-राई-मोर्वा विभाग, भाईंदर (प.) | 14 | 254880 | - | 254880 |
| 18 | मासळी मार्केट राई-मुर्धा जुने गाळे धारक, भाईंदर (प.) | 18 | 7682 | 3609 | 4073 |
| 19 | मासळी मार्केट घोडबंदर विभाग, भाईंदर (पु.) | 18 | 88300 | 12052 | 76248 |
| 20 | नविन इमारत शॉपींग सेंटर भाईंदर (प.) | 15 | 304979 | 187228 | 117751 |
| एकूण | | | 22289725 | 9832569 | 12457131 |

उपरोक्त थकीत भाडयावर केंद्रीय वित्तीय आधिनियम 1994, 65B(105), zzzz नुसार मालमत्तेवर सेवाकर घेतलेबाबत लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्याप्रमाणे सेवाकराबाबत केंद्रशासनाकडील वेळोवेळी विहीत केलेले सेवाकर आकारणी करणे आवश्यक आहे.

सदरील आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.107 दि.17/05/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 30, Hmm No : 107)

## *33 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात उपलब्ध असलेल्या 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफ़ॉर्म (टी.टी.एल.) वाहन क्र.एम एच 04 एफ़ बी 2425 या वाहना करिता नविन टायर खरेदी करणे या कामात झालेल्या अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : अग्निशमन पेट्रोल/इंध महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 400555.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 400555.00/-

***महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 अनुसूची ड, प्रकरण 5.2 चा अवलंब केला नाही. उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शा.नि.क्र. भांखस-1088/2512/उद्योग-6 दि.2 जानेवारी 1992 नुसार कमीत कमी 03 वैध दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक आहे. खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. शासन निर्णय दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.6 (क) नुसार साहित्य पाठविल्याची पावती किंवा निरीक्षणाची अट असल्यास निरिक्षणपत्र मिळाल्यानंतर पुरवठादार/ठेकेदार यांना 90 टक्के रक्कम प्रदान करावी व उर्वरित 10 टक्के रक्कम साहित्याची तपशीलवार तपासणी झाल्याशिवाय व प्राप्त झालेल साहित्य विनिर्देशाप्रमाणे असल्याची खात्री झाल्यानंतर प्रदान करावी. असे असतांना विभागाने टायर खरेदीवर येणा-या खर्चाची रक्कम रु.400555/- मक्तेदारास टायर प्राप्त होण्यापूर्वी अदा केले आहे.मे.ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्युशन प्रायवेट लिमिटेड हे कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे नस्तीत नमुद आहे. मात्र त्याबाबतचा अधिकृत पुरावा नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या दस्तेएवजावरून दिसून आलेला नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात उपलब्ध असलेल्या 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफ़ॉर्म (टी.टी.एल.) वाहन क्र.एम एच 04 एफ़ बी 2425 या वाहना करिता नविन 7DR 19.5 M729 व 285/7DR 19.5 M788 या बनावटीचे टायर्स खरेदी करणे कामी दरपत्रके मागवून मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्युशन प्रा.लि. खरेदी करण्यात आले आहे. सदरील कामाची नस्ती व बिले तपासणी केली असता आढळून आलेल्या उणीवा बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 अनुसूची ड, प्रकरण 5.2 अन्वये रक्कम रु.2 लाख रुपयांपेक्षा अधिक किंवा महानगरपालिका (राज्य) शासनाच्या मन्यतेने वेळोवेळी विहित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा अधिक खर्च होणार असेल असे कोणतेही काम करण्याबाबत किंवा कोणतीही सामग्री किंवा माल पुरवण्याबाबत कोणताही संविदा करण्यापूर्वी, निदान सात दिवस आगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीव्दारे नोटीस देऊन अशा संविदासाठी निविदा मागविल्या पाहिजेत. परंतु याप्रमाणे कार्यवाही न करता दरपत्रकाव्दारे खरेदी करण्यात आली नाही.

2. उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शा.नि.क्र. भांखस-1088/2512/उद्योग-6 दि.2 जानेवारी 1992 नुसार कमीत कमी 03 वैध दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक आहे. परंतु वरील बाबींसाठी एकच

वैध प्राप्त दरपत्रक स्विकारण्यात आल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दरांचा फायदा झाला नाही.

3.उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही.

4. शासन निर्णय दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.6 (क) नुसार साहित्य पाठविल्याची पावती किंवा निरीक्षणाची अट असल्यास निरिक्षणपत्र मिळाल्यानंतर पुरवठादार/ठेकेदार यांना 90 टक्के रक्कम प्रदान करावी व उर्वरित 10 टक्के रक्कम साहित्याची तपशीलवार तपासणी झाल्याशिवाय व प्राप्त झालेले साहित्य विनिर्देशाप्रमाणे असल्याची खात्री झाल्यानंतर प्रदान करावी. असे असतांना विभागाने टायर खरेदीवर येणा-या खर्चाची रक्कम रु.400555/- मक्तेदारास टायर प्राप्त होण्यापूर्वी अदा केले आहे.

5. मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्युशन प्रायवेट लिमिटेड हे कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे नस्तीत नमुद आहे. मात्र त्याबाबतचा अधिकृत पुरावा नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या दस्तेएवजावरून दिसून आलेला नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.59 दि.01/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 45, Hmm No : 59)

## *34 महानगरपालिका मधील महिला व बालकल्याण अंतर्गत बालवाडयामधील विदयार्थ्यांना सकस आहार पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष : महिला बालकल्याण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1582500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1582000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 500.00/-

***केवळ ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु विभागाने स्वतःचे बाजारभावानुसार दर निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्व गणन पत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड, प्रकरण 5(1) अ नुसार अशी जी कोणतीही संविदा, जर ती आयुक्ताने केली असती तर, ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.1,500/-***

***चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.1,000/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कम रु.500/- ची प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक संस्थेकडुन वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. सदर कामाची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही तसेच वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे कात्रण नस्तीत नसल्याने शासन निर्णयाचे अनुपालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. अनामत रक्कम रु.60,000/- निविदा अटी/शर्ती प्रमाणे कार्यादेश स्वीकारताना अनामत भरणे आवश्यक होते. परंतु अनामत रक्कम वसुल केल्याबाबतचे चलन अथवा अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही. मक्तेदाराने सादर केलेले प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नसल्याने मक्तेदार खालील परिपत्रकानुसार निविदा भरण्यास पात्र असल्याची खात्री करता आली नाही. तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दर दिवशी बालकांना कॅलरीज व प्रोटीन मिळणे आवश्यक आहे. सकस आहार योजनेतून पुरवठा करण्यात आलेल्या आहारामधून उपरोक्त प्रमाणे कॅलरीज व प्रोटीन मिळत असल्याबाबतचा तंज्ञांचा अभिप्राय दिसून येत नाही. त्यामुळे सकस आहार योजनेतून पुरवठा करण्यात आलेल्या पदार्थामधून योग्य प्रमाणात व समतोल पोषण आहार मिळाल्याची खात्री करता आली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चालविण्यांत येणाऱ्या बालवाडी शाळेतील विदयार्थ्यांना सकस आहार पुरवठा करण्यासाठी दि.27/05/2015 रोजी “दै.आफ्टरनुन” व “नवशक्ती” या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच दि.27/05/2015 ते दि.04/06/2015 रोजी ई-टेडरींग दवारे ऑन लाईन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. बालवाडी विदयार्थ्यांना सकस आहार पुरवठा करणेकामी एक वेळा निविदा व दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदाचे तांत्रिक कागदपत्रे मा. निविदा निवड समितीची दि.09/07/2015 रोजीची मंजुरी घेवुन उघडण्यात आले. सदर निविदेमध्ये “प्रज्वलीत ज्ञानदीप सामाजिक महिला संस्था” या संस्थने निविदेसाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यामुळे निविदा समितीच्या दि.21/07/2015 रोजीच्या मंजुरी अन्वये फायनान्शीयल बीड उघडण्यात आले असता सदर संस्थने खालीलप्रमाणे दर सादर केले होते.

| अ.क्र. | वार | तपशिल | प्रति विदयार्थी दयावयाचे परिमाण (पॅकिंग, वाहन खर्च व इतर खर्चासहित) | प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक संस्था यांनी निविदेत सादर केलेले दर | वाटाघाटीनंतर मंजुर करण्यात आलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सोमवार | मोड आलेले कडधान्य | 75 ग्रॅम | 09.35 | 09.35 |
| 2 | मंगळवार | केळी | प्रति विदयार्थी दोन | 10.95 | 09.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | बुधवार | अंडी | प्रति विदयार्थी एक | 07.25 | 06.50 |
| 4 | गुरुवार | डिंक लाडु | प्रति विदयार्थी दोन | 14.70 | 13.60 |
| 5 | शुक्रवार | खिचडी | 60 ग्रॅम | 08.75 | 07.30 |
| 6 | शनिवार | गुळ शेंगदाणा लाडु | प्रति विदयार्थी दोन | 12.95 | 11.50 |

वरील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत. मा. निविदा निवड समिती दि.24/07/2015 रोजी सदर निविदेची वाटाघाटी केली असता सकस आहार पुरवठा करणेकामी प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक संस्था यांनी वरीलप्रमाणे दरमान्य केलेला आहे. तरी सदर सकस आहार पुरवठा करणेकामी वाटाघाटीनंतरचे दर स्विकारणेस तसेच प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक संस्था या संस्थेस सकस आहार पुरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात आला आहे.

उपरोक्त कामाचे नस्ती, प्रमाणात यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रूटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

1. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र. 4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. असे असताना विभागाने तयार कलेल्या अंदाजपत्रकात पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित केली नसून सकस आहार पुरवठा करण्यासाठी बाजारभावानुसार दर न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. केवळ ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु विभागाने स्वतःचे बाजारभावानुसार दर निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्व गणन पत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून उपरोक्त परिपत्रकातील तरतुदींचे उल्लंघन झाले असून सदोष निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे.

2. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड, प्रकरण 5(1) अ नुसार अशी जी कोणतीही संविदा, जर ती आयुक्ताने केली असती तर, ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे. परंतु याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

3. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.1,500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.1,000/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कम रु.500/- ची प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक संस्थेकडुन वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

4. सदर कामाची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासन निर्णय महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही तसेच वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे कात्रण नस्तीत नसल्याने शासन निर्णयाचे अनुपालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

5. उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. तरी उपरोक्त कामावर झालेला खर्च रक्कम रु.15,82,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

6. बालवाडी च्या विध्यार्थांना एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत शासनाकडून विदयार्थ्यांना आवश्यक असणारा पोषण आहार देण्यात येत असून या व्यतिरिक्त सकस आहार देणेबाबतचे प्रयोजन व आवश्यकता लेखा परीक्षणास सादर करण्यात यावी.

7. पुरावठादारासोबत दि.01/08/2015 रोजी करारनामा करण्यात आला आहे व दि.02/01/2015 रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. तथापि अनामत रक्कम रु.60,000/- निविदा अटी/शर्ती प्रमाणे कार्यादेश स्वीकारताना अनामत भरणे आवश्यक होते. परंतु अनामत रक्कम वसुल केल्याबाबतचे चलन अथवा अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही.

8. केंद्रिय सर्तकता आयोगाचे ऑफिस मेमोरॅन्डम नं.12-02-1-CTE-6 दि.17/12/2002 च्या परिशिष्ट क्र.5ब नुसार मक्तेदाराची पुर्व पात्रता (Prequalification Criteria (PQ)) ठरविण्यासाठी लगतच्या मागील 3 वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र (Annual Report- Balancesheet, Profit and loss account), लगतच्या 2 वर्षाच्या कामाचा अनुभव व लगतच्या वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (Latest ITCC) असणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे मक्तेदाराने सादर केलेले प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नसल्याने मक्तेदार उपरोक्त परिपत्रकानुसार निविदा भरण्यास पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

9. Revised Nutritional Norms in ICDS (since February, 2009)

| **Beneficiaries** | **Calories** | **Protein (g)** |
|---|---|---|
| Children<br>(6 months to 72 months) | 500 | 12-15 |
| Severely malnourished Children (SAM)<br>(6 months- 72 months) | 800 | 20-25 |
| Pregnant women and lactating mothers | 600 | 18-20 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दर दिवशी बालकांना कॅलरीज व प्रोटीन मिळणे आवश्यक आहे. सकस आहार योजनेतून पुरवठा करण्यात आलेल्या आहारामधून उपरोक्त प्रमाणे कॅलरीज व प्रोटीन मिळत असल्याबाबतचा तंज्ञांचा अभिप्राय दिसून येत नाही. त्यामुळे सकस आहार योजनेतून पुरवठा करण्यात आलेल्या पदार्थांमधून योग्य प्रमाणात व समतोल पोषण आहार मिळाल्याची खात्री

करता आली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.86 दि.26/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 49, Hmm No : 86)

## *35 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना बुट व मोजे वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 300.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 300.00/-

***कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.3000 चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.2700 चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.300 ची मे. टेक्नोक्राफ्ट असोसिऐट वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. शासन निर्णय दि.2/01/1992 मधील परि.8.6 नुसार पुरवठा प्राप्त झाल्यापासून 15 दिवसाच्याआंत तपासणी करणे आवश्यक आहे. निविदा अटी व शर्ती नुसार बुट व मोजे अधिकृत मूळ उत्पादक/ मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. निविदा प्रक्रियेमध्ये सदरील अटीची पूर्तता होत नसतानाही दराचा लिफाफा उघडून निविदाधारक अंतिम करण्यात आला आहे.केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र. 4(3)/2007 क्र.005/ सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 नुसार बुट व मोजे पुरवठा करणेसाठी बुट व मोजेचे दर बाजार भावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. केवळ त्याचप्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु मंडळाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. वित्तीय वर्ष 2015-16 साठी बुट व मोजे पुरवठ्याबाबत निविदा प्रसिद्ध करण्यापूर्वी शेड्युल बी नुसार बुट व मोजे पुरवठा करणेसाठी निविदेमध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु सदर साहित्याची गुणवत्तेविषयक मानके शासनमान्य संस्थेकडून मान्यता किंवा त्यांच्या सल्ल्यानुसार घेवून तयार करण्यात आली किंवा कसे याबबत लेखापरीक्षणास अनुपालन अप्राप्त आहे. पुरवठादाराने शाळा निहाय वाटप केलेल्या लेखन साहित्याच्या***

***पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी लेखन साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन साहित्य पुरवठा व वाटप योग्यतेची तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभाग (प्राथमिक) कडून सन 2015-16 साठी बुट व मोजे वाटप करण्याकामी मे.टेक्नोक्राफ्ट असोसिऐट यांना कार्यादेश क्र. मनपा/शिमं/394/2015-16 दि.16/06/2015 अन्वये महापालिकेतील प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना बुट व मोजे पुरवठा करण्यात आला.

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना बुट व मोजे वाटप करणे. |
| 2 | प्रशासकीय मान्यता पत्र क्र. | दि.10/04/2015 |
| 3 | स्थायी समिती ठराव क्र. | ठराव क्र.14 दि.08/05/2015 |
| 4 | जाहिरात मागविण्यात आलेल्या वृत्तपत्राचे नाव व दिनांक | मिरा भाईंदर महानगरपालिका संकेतस्थळावर व यशोभुमी व समाधिप्रकाश दि.16/04/2015 |
| 5 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे. टेक्नोक्राफ्ट असोसिऐट |

उपरोक्त कामाचे नस्ती, प्रमाणाक यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रूटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.3000/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.2700/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.300/- ची मे. टेक्नोक्राफ्ट असोसिऐट वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

2. शासन निर्णय दि.2/01/1992 मधील परि.8.6 नुसार पुरवठा प्राप्त झाल्यापासून 15 दिवसाच्या आंत तपासणी करणे आवश्यक आहे. उपरोक्त तरतुदीप्रमाणे तपासणी करण्यात आली नाही. पुरवठा कालावधीत बुट व मोजे पुरवठा विनिर्देशानुसार प्राप्त होत असल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3. निविदा अटी व शर्ती नुसार बुट व मोजे अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. निविदा प्रक्रियेमध्ये उपरोक्त अटीची पूर्तता होत नसतानाही दराचा लिफाफा उघडून निविदाधारक अंतिम करण्यात आला आहे. या बाबत अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक असल्याबाबतच्या प्रमाणपत्रासह अनुपालन सादर करावे.
4. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र. 4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथःकरण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. बुट व मोजे पुरवठा करणेसाठी बुट व मोजेचे दर बाजारभावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. केवळ त्याचप्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु मंडळाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. उपरोक्त परिपत्रकातील तरतुदींचे उल्लंघन झाले असून सदोष निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे.
5. वित्तीय वर्ष 2015-16 साठी बुट व मोजे पुरवठ्याबाबत निविदा प्रसिद्ध करण्यापूर्वी शेड्युल बी नुसार बुट व मोजे पुरवठा करणेसाठी निविदेमध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु सदर साहित्याची गुणवत्तेविषयक मानके शासनमान्य संस्थेकडून मान्यता किंवा त्यांच्या सल्ल्यानुसार घेवून तयार करण्यात आली किंवा कसे याबबत लेखापरीक्षणास खुलासा करण्यात आला नाही.
6. पुरवठादाराने शाळा निहाय वाटप केलेल्या लेखन साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी लेखन साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन साहित्य पुरवठा व वाटप योग्यतेची तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.95 दि.24/04/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 54, Hmm No : 95)

## *36 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना वहया वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 300.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 300.00/-

***केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. वहया पुरवठा करणेसाठी वहयाचे दर बाजारभावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. शिक्षण विभागाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.2600 चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.2300 चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.300 ची मे.अमरदिप उदयोग वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. शासन निर्णय दि.2/01/1992 मधील परि.8.6 नुसार पुरवठा प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांच्या आत तपासणी करणे आवश्यक आहे. निविदा अटी व शर्ती नुसार वहया अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पादकाने नियुक्त केलेला वितरक यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. निविदा प्रक्रियेमध्ये उपरोक्त अटीची पूर्तता होत नसतानाही दराचा लिफाफा उघडून निविदाधारक अंतिम करण्यात आला आहे. सदर साहित्याची गुणवत्तेविषयक मानके शासनमान्य संस्थेकडून मान्यता किंवा त्यांच्या सल्ल्यानुसार घेवून तयार करण्यात आली किंवा कसे याबबत खुलासा करण्यात आला नाही. पुरवठादाराने शाळा निहाय वाटप केलेल्या लेखन साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी लेखन साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन साहित्य पुरवठा व वाटप योग्यतेची तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभाग (प्राथमिक) कडून सन 2015-16 साठी वह्या वाटप करण्याकामी मे. अमरदिप उदयोग यांना कार्यादेश क्र. मनपा/शिमं/394/2015-16 दि.16/06/2015 अन्वये महापालिकेतील प्राथमिक शाळेतील 1 ते 5 च्या विदयार्थ्यांना वह्या पुरवठा करण्यात आला.

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना वह्या वाटप करणे. |
| 2 | प्रशासकीय मान्यता पत्र क्र. | दि.10/04/2015 |
| 3 | स्थायी समिती ठराव क्र. | ठराव क्र.14 दि.08/05/2015 |
| 4 | जाहिरात मागविण्यात आलेल्या वृत्तपत्राचे नाव व दिनांक | मिरा भाईंदर महानगरपालिका संकेतस्थळावर व यशोभुमी व समाधिप्रकाश दि.16/04/2015 |
| 5 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे. अमरदिप उदयोग |
| 6 | कार्यादेश क्रमांक व दिनांक | मनपा/शिमं/394/2015-16 दि.16/06/2015 |

उपरोक्त कामाचे नस्ती, प्रमाणाक यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रूटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

1. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र. 4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथःकरण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. वह्या पुरवठा करणेसाठी वह्याचे दर बाजारभावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. केवळ त्याचप्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु मंडळाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. उपरोक्त परिपत्रकातील तरतुदींचे उल्लंघन झाले असून सदोष निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे.

2. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये

केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.2600/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.2300/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.300/- ची मे. अमरदिप उदयोग वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

3. शासन निर्णय दि.2/01/1992 मधील परि.8.6 नुसार पुरवठा प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांच्या आत तपासणी करणे आवश्यक आहे. उपरोक्त तरतुदीप्रमाणे तपासणी करण्यात आली नाही. पुरवठा कालावधीत वह्या पुरवठा विनिर्देशानुसार प्राप्त होत असल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

4. निविदा अटी व शर्ती नुसार वह्या अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. निविदा प्रक्रियेमध्ये उपरोक्त अटीची पूर्तता होत नसतानाही दराचा लिफाफा उघडून निविदाधारक अंतिम करण्यात आला आहे. या बाबत अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक असल्याबाबतच्या प्रमाणपत्रासह अनुपालन सादर करावे.

5. वित्तीय वर्ष 2015-16 साठी वह्या पुरवठ्याबाबत निविदा प्रसिद्ध करण्यापूर्वी शेड्युल बी नुसार वह्या पुरवठा करणेसाठी निविदेमध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु सदर साहित्याची गुणवत्ते विषयक मानके शासनमान्य संस्थेकडून मान्यता किंवा त्यांच्या सल्ल्यानुसार घेवून तयार करण्यात आली किंवा कसे याबबत लेखापरीक्षणास खुलासा करण्यात आला नाही.

6. पुरवठादाराने शाळा निहाय वाटप केलेल्या लेखन साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी लेखन साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन साहित्य पुरवठा व वाटप योग्यतेची तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.96 दि.24/04/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 55, Hmm No : 96)

## *37 सन 2014-15 या आर्थिक वर्षाकरिता स्टेशनरी, विविध प्रकारची नमुने छपाई, बोर्ड बॅनर छपाई करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : भांडार विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4991513.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4991513.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1200.00/-

***कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. त्यानुसार रक्कम रु.400/- याप्रमाणे एकूण रक्कम रु.1200/- वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. मक्तेदार केंद्रिय सर्तकता आयोगाच्या परिपत्रकानुसार निविदा भरण्यास पात्र असल्याची खात्री करता आली नाही. बोर्ड बॅनर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने महानगरपालिका क्षेत्रात कोणत्या ठिकाणी बोर्ड बॅनर लावले व त्याप्रमाणेच देयक अदा केले आहेत याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. कार्यादेशाप्रमाणे पुरवठा केलेल्या बोर्ड बॅनर दर्जा (स्पेसिफिकेशन) निविदा अटी शर्ती व करारनाम्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणे असणे पुरवठादारास बंधनकारक असताना पुरवठा केलेल्या बोर्ड बॅनर (स्पेसिफिकेशन) प्रमाणे असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचा तपासणी अहवाल नस्ती मध्ये आढळून येत नाही. जुने अस्तित्वात असलेल्या बोर्ड बॅनर साहित्य मध्यवर्ती भांडारगृह, कोंबडपाडा येथे पोहोच करुन त्याची पोहोच पावती घेणे आवश्यक होते याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

कामाचे नाव:- स्टेशनरी, विविध प्रकारची नमुने छपाई, बोर्ड बॅनर छपाई करणे

मक्तेदाराचे नाव:- श्री.ए.डी. इंटरप्रायजेस, श्री.एम.एस. इंटरप्रायजेस, मे. नवकार युनिफॉर्म

प्रशासकिय मंजुरी:- मा. आयुक्त सो. यांच्या दि.16/08/2014

जाहिरात प्रसिध्दी:- दि.05/09/2014 दै.मिड डे व दै.चौफेर

अंदाज पत्रकिय रक्कम:- रु.50,00,000/-

लेखाशिर्ष:- सामान्य प्रशासन स्टेशनरी व छपाई

सन 2014-15 या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकीय तरतुदीत "अ) सामान्य प्रशासन स्टेशनरी व छपाई" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.50,00,000/- (रु. पन्नास लाख मात्र) ची तरतुद करण्यात आलेली आहे तसेच विविध विभागाअंतर्गत कर वसुली (अ) स्थानिक संस्था उपकर (3) स्टेशनरी व छपाई खर्च रु.10,00,000/- (रु. दहा लाख मात्र) कर विभाग स्टेशनरी व छपाई खर्च रु.5,00,000/- (रु. पाच लाख मात्र) जन्म मृत्यु विवाह नोंदणी स्टेशनरी छपाई रु.1,00,000/- (रु. एक लाख मात्र) ग्रंथालये/संग्रालये छपाई स्टेशनरी रु .1,00,000/- (रु. एक लाख मात्र ) अशी सर्व विभागाची मिळुन एकूण रु.67,00,000/- (रु. सदुसष्ठ लाख मात्र) तरतुदीतून विविध प्रकारची नमुने छपाई, बोर्ड बॅनर, दैनंदिनी छपाई, लेटरपॅड, व्हिझीटींग कार्ड व इनव्हलप इत्यादींबाबत होणारा खर्चाबाबतचे निवडक देयके व नस्ती तपासली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरिक्षण आक्षेप आहेत.

1. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ , असाधारण दि.24.04.2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र . 34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10/- लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे . सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. नवकार युनिफॉर्म, श्री. ए.डी. इंटरप्रायजेस व श्री. एम.एस. इंटरप्रायजेस यांच्याकडून प्रत्येकी रक्कम रु .400/- याप्रमाणे एकूण रक्कम रु .1200/- वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

2. केंद्रिय सर्तकता आयोगाचे ऑफिस मेमोरॅन्डम नं.12-02-1-CTE-6 दि.17/12/2002 च्या परिशिष्ट क्र.5ब नुसार मक्तेदाराची पुर्व पात्रता (Prequalification Criteria (PQ)) ठरविण्यासाठी लगतच्या मागील 3 वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र (Annual Report - Balancesheet, Profit and loss account), लगतच्या 2 वर्षाच्या कामाचा अनुभव व लगतच्या वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (Latest ITCC) असणे आवश्यक आहे . परंतु याप्रमाणे मक्तेदाराने सादर केलेले प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नसल्याने मक्तेदार उपरोक्त परिपत्रकानुसार निविदा भरण्यास पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

3. बोर्ड बॅनर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने महानगरपालिका क्षेत्रात कोणत्या ठिकाणी बोर्ड बॅनर लावले व त्याप्रमाणेच देयक अदा केले आहेत याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. कामावर झालेला खर्च रक्कम रु.49,91,513/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4. बोर्ड बॅनर पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे . बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

5. कार्यादेशाप्रमाणे पुरवठा केलेल्या बोर्ड बॅनर दर्जा (स्पेसिफिकेशन) निविदा अटी शर्ती व करारनाम्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणे असणे पुरवठादारास बंधनकारक असताना पुरवठा केलेल्या बोर्ड बॅनर (स्पेसिफिकेशन) प्रमाणे असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचा तपासणी अहवाल नस्ती मध्ये आढळून येत नाही. त्यामुळे विभागाच्या मागणी प्रमाणेच बोर्ड बॅनर लावण्यात आल्याचे व त्याप्रमाणे देयक प्रदान केल्याचे खात्री करता आली नाही.

6. जुने अस्तित्वात असलेल्या बोर्ड बॅनर साहित्य मध्यवर्ती भांडारगृह , कोंबडपाडा येथे पोहोच करुन त्याची पोहोच पावती घेणे आवश्यक होते याप्रमाणे कार्यवाही केलेले अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.120 दि.10/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 59, Hmm No : 120)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

**------------------- निरंक -------------------**

# <u>भाग दोन</u>

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *38 द्विनोंद पध्दतीने (Double Entry) लेखे ठेवणे तसेच राष्ट्रीय लेखासंहिता (NMAM) प्रमाणे लेखा कार्यपध्दतीच्या अंमलबजावणी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***नगरविकास मंत्रालय शासन निर्णय क्रमांक लेखास-10200/प्र.क्र5 नवि-31 दि.06/07/2005 नुसार महानगरपालिकेने दि.01/04/2005 पासून द्विनोंद पध्दतीने लेखे (Double Entry) ठेवण्यात आले नाही. राष्ट्रीय लेखासंहिता (NMAM) मधील तरतुदीनुसार cash book, लेजर, लेखाशिर्षासह खर्च बिलाचे विहीत नमूने, धनादेश विवरण रजिस्टर, अनामत नोंदवहया, बँक ताळमेळ यांचे विहीत नमुने राष्ट्रीय लेखा संहितेच्या (NMAM) प्र.क्र.5 मध्ये दिलेले आहेत. त्या नमुन्यात लेखे ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केली नसल्याने सदर लेखासंहीतेचे पालन झालेले नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका 2015-2016 मधिल लेखा विभागातील रोखवही व इतर तत्सम लेख्यांची तपासणी केली असता,खालील अनियमितता आढळून आल्या.

1. नगरविकास मंत्रालय शासन निर्णय क्रमांक लेखास-10200/प्र.क्र5 नवि-31 दि.06/07/2005 नुसार महानगरपालिकेने दि.01/04/2005 पासून द्विनोंद पध्दतीने लेखे (Double Entry) ठेवण्यात आले नाही. तरी सदरील लेखे विहित नमून्यात ठेवलेबाबत लेखा विभागाने अनुपालनामध्ये कळविले आहे. परंतू सदरील लेख्यांची संगणकिय गोषवारा व लेखे लेखापरिक्षणास दिले नसल्याने द्विनोंद पध्दतीच्या लेख्याची पडताळणी करता आली नाही. त्याप्रमाणे ताळमेळ पत्रक, लेजर, नफा तोटा विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2. राष्ट्रीय लेखासंहिता (NMAM) मधील तरतुदीनुसार cash book, लेजर, लेखाशिर्षासह खर्च बिलाचे विहीत नमूने, धनादेश विवरण रजिस्टर, अनामत नोंदवहया, बँक ताळमेळ यांचे विहीत नमुने राष्ट्रीय लेखासंहितेच्या (NMAM) प्र.क्र.5 मध्ये दिलेले आहेत. त्या नमुन्यात लेखे ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केली नसल्याने सदर लेखासंहीतेचे पालन झालेले नाही. त्यामुळे लेखापरीक्षणाला सदरील नियमानुसार लेख्यांची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.112 दि.28/05/2019 अन्वये

कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

REVTVMM8801 (Ref No : 38, Hmm No : 112)

## *39 सामान्य प्रशासन विभागाकडील व लेखा विभागाकडील सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी खात्यामधील रक्कमांच्या तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष : मनपा निधी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2001613.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2001613.00/-

***मिरा भाईंदर महानगरपालिका सन 2015-16 मधील कॅश बुक व ठेव रजिस्टर नोंदवही लेख्याची तपासणी केली असता 31 मार्च 2016 अखेर भविष्य निर्वाह निधीच्या तफावतीची रक्कम रु.20,01,613/- एवढी असून सदरील रक्कमेबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत महानगरपालिकेमधील कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी लेखा ठेवला जातो. तसेच सदर विभागामार्फत कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी अग्रिम देऊन लेखा अद्यावत ठेवला जातो. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दर माहे भविष्य निर्वाह निधी वर्गणी कपात करुन सदर वर्गणी भविष्य निर्वाह निधी खात्यावर वर्ग केली जाते. याबाबतची सर्व लेखाविषयी कार्यवाही मुख्य लेखाधिकारी यांच्या मार्फत केली जाते.
याबाबत सन 2015-16 मधील कॅश बुक व ठेव रजिस्टर नोंदवही लेख्याची तपासणी केली असता 31 मार्च 2016 अखेर भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेचे खालील प्रमाणे तफावत आढळून आलेली आहे. तफावतीची रक्कम रु.20,01,613/- एवढी असून सदरील रक्कमेबाबत लेखापरिक्षणाला खात्री न झाल्याने सदरील रक्कम अनूपालन होईपर्यंत आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| लेखा विभागातील दाखविलेली जमा रक्कम 31 मार्च 2016 | आस्थापना विभागातील दाखविलेली जमा रक्कम 31 मार्च 2016 | तफावत रक्कम |
|---|---|---|
| 280338897 | 278337284 | 2001613 |

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.113 दि.28/05/2019 अन्वये

कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

REVTVMM8801 (Ref No : 39, Hmm No : 113)

## *40 मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथील घनकचरा ठिकाणी पोकलन, जे.सी.बी., क्रेन, डोझर, डंपर, टोरस व माती पुरवठा करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष : घनकचरा व्यवस्थापन (स महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 17556250.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 17556250.00/-

***50 लाखापेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी निविदा कालावधी हा प्रथम सुचना 25 दिवसाचा नमूद असताना सदरील निविदेचा कालावधी 12 दिवसाचा दिला असल्याने कामासाठी स्पर्धा झालेली नाही. सदरील कामासाठी वापरलेले वाहने (यंत्रसामग्री) निहाय लॉगबुक (स्कंदनोंदवही) लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी नक्की किती तास वाहन चालले या बाबतची खात्री झाली नाही. कामाचा Risk Insurance Policy काढणे बंधनकारक करारनाम्यातील अट क्र.21 वर नमूद आहे, तरी नस्तीत सदरील विमा उपलब्ध नसल्याने सदरील अटीचे पालन झाले बाबत लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. करारनाम्यातील अट क्र.14 पोकलन, जे.सी.बी, डोझर, डंपर, टोरस चा नंबर, वाहन चालकाचे नाव लायसन्स आर.सी.बुक आदींच्या नक्कल प्रत याबाबतचे प्रमाणापत्र स्वच्छता निरिक्षक/कनिष्ठ अभियंता यांच्याकडून प्रमाणीत करणे आवश्यक आहे, त्याबाबतची अभिलेखे उपलब्ध नसल्याने सदरील अटीचे पालन केले बाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. करारनाम्यातील अट क्र.30 मशिन रोज सुरू झाल्यानंतर त्याचे फ़ोटो व व्हिडीओ शुटींग काढलेबाबतचे प्रमाणित केलेले अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने व मोजमाप पुस्तिका नसल्याने सदरील अटीचे पालन झाले बाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. कामासाठी वापरलेल्या मातीची रॉयल्टी भरले बाबतची चलने उपलब्ध न झाल्याने करारनाम्यातील अट क्र.24 व 27 चे विभागाकडून पालन न झाल्याचे लेखा परीक्षणाच्या निदर्शनास येत आहे. तसेच प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने देयकातून आयकर व इतर शासकीय कर कपात केलेबाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.***

लेखा शिर्ष:- घनकचरा व्यवस्थापन (सकवार) प्रक्रिया/विल्हेवाट/स्थानांतर/क्लोजर

अंदाजे वार्षिक खर्च:- रक्कम रु. 1,50,00,000

कंत्राटदाराचे नाव:- मे.गणेश अर्थ मुव्हींग कंपनी

आयुक्तांची मंजुरी:- दि.02/07/2014
स्थायी समिती मंजुरी:- ठराव क्र.9 दि.30/05/2014 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी व ठराव क्र.35 दि. 18/7/2014 अन्वये निविदा मंजुरी
निविदा निवड समिती मंजुरी:- दि.01/07/2014
कामाचा करारनामा दिनांक:- दि.30/07/2014
कार्यादेश:- मनपा/आरोग्य/80/2014-15 दि.31/07/2014
निविदा प्रसिध्दी:- दि.10/06/2014 ते दि.21/06/2014 पर्यंत
जाहिरात प्रसिध्द वर्तमानपत्र:- दै.ठाणे वैभव व दै.मुंबई चौफ़ेर
कामाचा तांत्रिक लिफापा:- दि.23/06/2014 उघडले व निविदा समितीने दि.24/06/2014 तीन निविदाकाराना पात्र केले. 1)मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. 2)मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी 3)मे.आशापुरा कन्ट्रनपक्शन कंपनी

सदरील कामासाठी खालील बाबींसाठी न्यूनतम निविदाकार मे.गणेश अर्थ मुव्हींग कंपनी यांचे दर मंजूर केलेले आहे.

| अ.क्र . | बाबी | मंजूर दर |
|---|---|---|
| 1 | Poclain machine-200 | 1600 per hour |
| 2 | JCB machine | 990 per hour |
| 3 | Chain Dozer | 1400 per hour |
| 4 | Dumper | 600 per hour |
| 5 | Torus | 750 per hour |
| 6 | Soil | 778 per brass |

उपरोक्त यंत्रसामुग्री/वाहने व माती पुरवठा केल्याबाबतची निविदा नस्ती तपासणी केली असता, खालील अनियमितता आढळून आल्या.

1. कामाची निविदा जाहिरात ही दै. ठाणे वैभव व दै. मुंबई चौफ़ेर या वर्तमानपत्रात दिली आहे तरी शा.नि.क्र. पीयूबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/3/2001 अन्वये जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.50,00,001/- पेक्षा अधिक आहे अशी जाहिरात अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग दैंनिकास देणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयक सीएटी 10/2006/प्र.क्र.133/ इमारती-2 दि.02/11/2006 अन्वये 50 लाखापेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी निविदा कालावधी हा प्रथम सुचना 25 दिवसाचा नमूद असताना सदरील निविदेचा कालावधी 12 दिवसाचा दिला असल्याने कामासाठी स्पर्धा झालेली नाही.

2. उपरोक्त दर निविदा निवड समितीने मंजुर केले आहे, तरी सदरील कामासाठी वापरलेले वाहने

(यंत्रसामग्री) निहाय लॉगबुक (स्कंदनोंदवही) लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी नक्की किती तास वाहन चालले या बाबतची खात्री झाली नाही.

3. कामाचा Risk Insurance Policy काढणे बंधनकारक करारनाम्यातील अट क्र.21 वर नमूद आहे, तरी नस्तीत सदरील विमा उपलब्ध नसल्याने सदरील अटीचे पालन झाले बाबत लेखापरीक्षणास खात्री झाली नाही.

4. करारनाम्यातील अट क्र.14 पोकलन, जे.सी.बी, डोझर, डंपर, टोरस चा नंबर, वाहन चालकाचे नाव लायसन्स आर.सी. बुक आदींच्या नक्कल प्रत याबाबतचे प्रमाणापत्र स्वच्छता निरिक्षक/कनिष्ठ अभियंता यांच्याकडून प्रमाणीत करणे आवश्यक आहे, त्याबाबतची अभिलेखे उपलब्ध नसल्याने सदरील अटीचे पालन केले बाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

5. करारनाम्यातील अट क्र.30 मशिन रोज सुरू झाल्यानंतर त्याचे फ़ोटो व व्हिडीओ शुटींग काढलेबाबतचे प्रमाणित केलेले अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने व मोजमाप पुस्तिका नसल्याने सदरील अटीचे पालन झाले बाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

6. सदरील कामासाठी एकत्रित खर्च रक्कम रु.1,75,56,250/- या खर्चाची प्रमाणके उपलब्ध न झाल्याने प्रमाणकांची पडताळणी करता आली नाही. करारनाम्यातील अट क्र.24 व 27 नुसार कंत्राटदाराने कामासाठी वापरलेली माती हयाची चलने व मोजमाप पुस्तिका उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी किती ब्रास माती लागली या बाबतची खात्री झाली नाही, कामासाठी वापरलेल्या मातीची रॉयल्टी भरले बाबतची चलने उपलब्ध न झाल्याने करारनाम्यातील अट क्र.24 व 27 चे विभागाकडून पालन न झाल्याचे लेखा परीक्षणाच्या निदर्शनास येत आहे. तसेच प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने देयकातून आयकर व इतर शासकीय कर कपात केलेबाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र. 36 दि.23/01/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 12, Hmm No : 36)

## *41 मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागाकरिता दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तूचा वार्षिक पुरवठा करणे कामामधील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : दुर्गंधी नाशके व साह महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2663850.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2663850.00/-

***अनु. क्र. 1 ते 11 मधील दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तूचे स्वीकृत निविदाकार मुळ उत्पादक/ कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे नस्तीसोबत प्रमाणपत्रे नाहीत. स्वीकृत निविदाकाराने पुरवठा केलेल्या दुर्गंधी नाशक मालाचा रासायनिक तपासणी अहवाल शासन मान्यता प्राप्त प्रयोग शाळेचा नस्तीमध्ये नाही. निविदा इसारा रक्कमेचा भरलेल्या चलनाची प्रत नाही. व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र नस्ती सोबत नाही. दुकाने नोंदणी प्रमाणपत्र नाही. उत्पादक कंपनी किंवा कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे चालू वर्षातील प्रमाणपत्र नस्तीत नाहीत. दुर्गंधी नाशक साठविणे व वितरण करणे बाबत सक्षम प्राधिकरणाचा चालू वर्षाचा परवाना नस्ती सोबत नाही. शासकीय/ निमशासकीय संस्थांना नाशक व साहित्य वस्तू यांचा समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्तीत नाहीत. वस्तू/ मालाच्या बाबतीत केवळ एक किंवा दोन निविदा पात्र झालेल्या असताना पुरेशा प्रमाणात स्पर्धा झालेली नाही. अनु. क्र.1 ते 9 बाबतीत पुरवठा दाराशी करारनामा करताना फ़क्त मे. जिनोबा बायोटेक यांच्याशी केलेल्या करारनाम्यात पुरवठा केलेल्या मालाची प्रयोगशाळेत तापासणी करण्याबाबत अट नमुद केलेली आहे. मे.डॅपमन्स पेस्ट ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस, मे.डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन, मे. एस.आर.बी. इंडस्ट्रीज या पुरवठादाराशी केलेल्या करारामध्ये सदर अट नमुद नाही त्यामुळे त्यांनी पुरवठा केलेल्या मालाच्या दर्जा बाबत मनपाने कशाच्या आधारे खात्री केली याबाबत लेखापरीक्षणास अवगत झाले नाही.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे/पुरवठ्याचे नाव | मिरा-भाईंदर मनपा आरोग्य विभागांसाठी दुर्गंधी नाशके व साहित्य वस्तू खरेदी करणे. |
| 2 | कामासाठी/पुरवठ्यासाठी अपेक्षित खर्च | 2663850 |
| 3 | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिनांक | दि.09/09/2015 |
| 4 | मंजूरी प्राधिकरणाचे नाव | मा.आयुक्त |
| 5 | प्रसिध्द केलेल्या वर्तमान पत्राचे नाव व दिनांक | नवाकाळ दि.04/03/2016,<br>मिड मॉर्निंग दि.9 ते 15 मार्च 2016 |
| 6 | मंजूर झालेल्या निविदा धारक/दरपत्रक धारकाचे नाव व पत्ता | मे.जिनोबा बायोटेक, मे.डॅपमन्स पेस्ट ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस, मे.डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन, मे.एस.आर.बी इंडस्ट्रीज |
| 7 | निविदा/दरपत्रक मंजूर करण्यात आलेला ठराव क्र. व दिनांक | ठराव क्र.30 दि.29/03/2016 |
| 8 | मंजूरी नुसार पुरवठा कामाचे आदेश दिनांक | दि.16/07/2016 |
| 9 | करारनामा दिनांक | 16/07/2016 (प्रत्येकी रु.500 च्या मुद्रांक |

| | | |
|---|---|---|
| | | शुल्कावर) |

मिरा-भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागातील दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तुची वार्षिक खरेदीसाठी दि.01/01/2016 पर्यंत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दि.07/01/2016 रोजी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडण्यात आला असता, निविदाकारानी तांत्रिक लिफ़ाफ़्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्राची पूर्तता केल्याने दराचा लिफ़ाफ़ा दि.22/01/2016 रोजी उघडण्यात आला.

मात्र मे. जिनोबा बायोटेक, मे. सुपारीबाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ लि. यांनी दुर्गंधी नाशक पुरवठा कामी सादर केलेल्या दरासाठी उत्पादित कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे चालू वर्षातील प्रमाणपत्र तांत्रिक लिफ़ाफ़्यात सादर केलेले नसताना त्यांनी दुर्गंधी नाशक उत्पादनाकरिता दर भरण्यात आले होते. त्यानुसार सदरचे निविदाकार सर्वात कमी दरासाठी पात्र ठरले होते, परंतु ते अधिकृत विक्रेते असल्याचे चालू वर्षातील प्रमाणपत्र तांत्रिक लिफ़ाफ़्यात नसल्यामुळे दुर्गंधी नाशक पुरवठा करणे कामी निविदा अटीशर्तीनुसार मुळ उत्पादक कंपनी/कंपनीचे अधिकृत विक्रेते आवश्यक आहे. त्यामुळे सुधारित अटीशर्तीसह नव्याने निविदा मागविण्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुन्हा दि.15/03/2016 पर्यंत निविदा मागविण्यात आल्या व दि.16/03/2016 रोजी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडण्यात आला. कागदपत्राची पूर्तता करणा-या निविदाकारांचा दराचा लिफ़ाफ़ा दि.09/06/2016 रोजी उघडण्यात आला कमी दर असलेल्या निविदाकारांशी वाटाघाटीनंतर दर निश्चित करण्यात आले.

सदर नस्तीची तपासणी केली असता करार नाम्यातील अटीशर्ती नुसार कंत्राटदाराकडून खालील अटींचे दस्तएवज नस्तीत आढळून आले नाही.

1) अनु. क्र. 1 ते 11 मधील दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तूचे स्वीकृत निविदाकार मुळ उत्पादक/ कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे नस्तीसोबत प्रमाणपत्रे नाहीत.

2) स्वीकृत निविदाकाराने पुरवठा केलेल्या दुर्गंधी नाशक मालाचा रासायनिक तपासणी अहवाल शासन मान्यता प्राप्त प्रयोग शाळेचा नस्तीमध्ये नाही.

3) निविदा इसारा रक्कमेचा भरलेल्या चलनाची प्रत नाही.

4) व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र नस्ती सोबत नाही.

5) दुकाने नोंदणी प्रमाणपत्र नाही.

6) उत्पादक कंपनी किंवा कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे चालू वर्षातील प्रमाणपत्र नस्तीत नाहीत

7) दुर्गंधी नाशक साठविणे व वितरण करणे बाबत सक्षम प्राधिकरणाचा चालू वर्षाचा परवाना नस्ती सोबत नाही. शासकीय/निमशासकीय संस्थांना नाशक व साहित्य वस्तू यांचा समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्तीत नाहीत.

खालील वस्तू/मालाच्या बाबतीत केवळ एक किंवा दोन निविदा पात्र झालेल्या असताना पुरेशा प्रमाणात स्पर्धा झालेली नाही.

| अ.क्र. | दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तूचे नाव | निविदाकाराचे नाव |
|---|---|---|
| 1 | Acid | 1) मे. जिनोबा बायोटेक रु.20.50 प्रति लिटर<br>2) मे.सुपारीबाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ. रु.21 प्रति लिटर |
| 2 | Napthaline ball | मे.जिनोबा बायोटेक रु.174 प्रति कि.ग्रॅ. |
| 3 | Napthline scented cube | मे. जिनोबा बायोटेक रू.224 प्रति कि.ग्रॅ. |
| 4 | Germinil liquid | मे.डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन रु.289 प्रति लिटर |
| 5 | Germitox Plus D.P | 1) मे.डॉल्फ़ीन रु.49 प्रति कि.ग्रॅ.,<br>2) मे.रमेश अॅग्रो कं. रु.59 प्रति.कि.ग्रॅ. |
| 6 | Carbophenyl Powder DP | मे.डॅपमन्स पेस्ट कंट्रोल अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस रु.61 प्रति कि.ग्रॅ. |
| 7 | Herbo Dust powder | 1) मे.डॉल्फ़ीन रु.135 प्रति कि.ग्रॅ.,<br>2) मे.एस.आरबी कं. रु.113 प्रति कि.ग्रॅ. |
| 8 | Zinc Phosphoric powder ISI rank | 1) मे.डॉल्फ़ीन रु.630 प्रति.कि.ग्रॅ.,<br>2) मे.रमेश अॅग्रो रु.640 प्रति. कि.ग्रॅ. |
| 9 | Feenoline super Forte | 1) मे.डॉल्फ़ीन रु.125 प्रति लिटर<br>2) मे.एस.आरबी कं. रु.171 प्रति लिटर |
| 10 | HDPE 120 litters Bin | 1) मे.जिनोबा रु.2239 प्रति नग<br>2) मे. निता इन्टरप्राझेस रु.2420 प्रति नग |

8) अनु.क्र.1 ते 9 बाबतीत पुरवठा दाराशी करारनामा करताना फ़क्त मे. जिनोबा बायोटेक यांच्याशी केलेल्या करारनाम्यात पुरवठा केलेल्या मालाची प्रयोगशाळेत तापासणी करण्याबाबत अट नमुद केलेली आहे. मे.डॅपमन्स पेस्ट अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस, मे.डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन, मे.एस.आर.बी. इंडस्ट्रीज या पुरवठादाराशी केलेल्या करारामध्ये सदर अट नमुद नाही त्यामुळे त्यांनी पुरवठा केलेल्या मालाच्या दर्जा बाबत मनपाने कशाच्या आधारे खात्री केली याबाबत लेखापरीक्षणास अवगत करावे.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.41 दि.29/01/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 63, Hmm No : 41)

***42 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे, प्रसिध्द करणे कामाच्या निविदेबाबत.***

मिरा -भाईंदर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : पर्यावरण अहवाल तयार महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1000000.00/-

***1) मे. एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. 2) मे. महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. यांनी निविदेतील अटीशर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली होती. त्यानुसार मे.एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. पात्र ठरत होते परंतु सदर निविदेकरिता स्पर्धा दिसून आली नाही. निविदेमध्ये दर्शविलेल्या बाबी वेगवेगळ्या असल्याने/कामे वेगवेगळी असल्याने ज्या बाबींसाठी ज्याचे दर कमी आहेत त्याबाबी करिता संबंधित निविदाकारास वाटाघाटीसाठी न बोलवता मे.एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. यांना वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले. त्यांनी वाटाघाटीनंतर खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत. वाटाघाटीनंतर उपरोक्त बाबतीत Item No. II, III(b)(c)(d) चे स्वीकृत केलेले मे.एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे दर मे.महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स यांच्या निविदेतील दरापेक्षा जास्त आहेत. तरी महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स यांचे वरीलप्रमाणे बाब निहाय दर कमी असताना जास्त दराच्या बाबी मान्य करण्यात आलेल्या आहेत. तरी याबाबत मनपाला कमी दराचा फ़ायदा झालेला नाही. सन 2015-16 मध्ये पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी मनपाने दहा लाखाची तरतूद केली असताना सन 2015-16 मध्ये अहवाल तयार न करता, याबाबतचे कार्यादेश दि.18/07/2016 ला देण्यात आले. व सदरचा 2015-16 चा अहवाल शासनास सादर करण्यात आला नाही. बयाना रक्कम भरल्याची पावती नस्तीसोबत नाही. म.शा. पर्यावरण विभाग मंत्रालय शा.नि.क्र.एस.आर.2010/प्र.क्र.40/2010/ता.क्र.1 दि:04/06/2010 नुसार 31 जुलै पर्यंत अहवाल शासनाच्या नगर विकास विभाग व पर्यावरण विभाग तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करणे आवश्यक आहे.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे/पुरवठ्याचे नाव | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे, प्रसिध्द करणे कामाच्या निविदेबाबत |
| 2 | कामासाठी/पुरवठ्यासाठी अपेक्षित खर्च | 10,00,000 |
| 3 | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिनांक | मा.आयुक्त दि.15/07/2015 |
| 4 | स्थायी समिती ठराव क्र. | 38 दि.15/07/2016 |
| 5 | निविदेचा क्र. व दिनांक | Tender I.D.23667 |
| 6 | स्विकृत निविदेचा कालावधी व दिनांक. | दि.23/03/2016 |
| 7 | निविदा उघडल्याची दिनांक | 03/05/2016 |

| | | |
|---|---|---|
| 8 | प्रसिध्द केलेल्या वर्तमान पत्राचे नाव व दिनांक | 1.दै.ठाणे वैभव, पहिली खबर दि.04/08/2015<br>2.दै.नवाकाळ, दै.नवशक्ती दि.31/01/2016<br>3.दै.लोकसत्ता दि.16/03/2016 |
| 9 | मंजूर झालेल्या निविदा धारक/दरपत्रक धारकाचे नाव व पत्ता | मे.एनव्हायरो ॲनालिस्ट प्रा.लि. |
| 10 | निविदेमध्ये भाग घेण्यात आलेल्या कंत्राटदारांची नावे | मे.एनव्हायरो ॲनालिस्ट प्रा.लि.<br>मे.महाबल एनव्हायरो इंजि.प्रा.लि. |
| 11 | कार्यादेश क्रमांक. व दिनांक | मनपा/आरोग्य/272/16-17 दि.18/07/2016 |
| 12 | करारनामा दिनांक | दि.15/07/2016 (मुद्रांक शुल्क-500) |

मिरा भाईंदर मनपा आरोग्य विभागाकरिता पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे, प्रसिध्द करणे कामाची दै. ठाणे वैभव, पहिली खबर या वृत्तपत्रात दि.04/08/2015 जाहिर निविदा प्रसिध्द करून दि.28/08/2015 रोजी ई-टेंडरींगव्दारे निविदा मागविण्यात आली होती.

1. दि.09/09/2015 रोजी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडण्यात आला असता 1) मे. एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. 2) मे. महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. यांनी निविदेतील अटी शर्ती नुसार कागदपत्रे सादर केलेली होती. त्यानुसार मे. एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. पात्र ठरत होते परंतु सदर निविदेकरिता स्पर्धा दिसून आली नाही याकरिता उपरोक्त कामाची ई-टेडरींगव्दारे दि.13/10/2015 रोजी पर्यंत फ़ेर मागविण्यात आली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. याकरिता पुनश्च सदर निविदेस 5 दिवसांची मुदतवाढ देऊन दि.04/11/2015 रोजी पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु सदर निविदेकरिता एकही निविदा प्राप्त झाली नाही, उपरोक्त कामाकरिता दोन वेळा निविदा मागवून व मुदतवाढ देवून देखील निविदा प्राप्त झाली नाही.

2. वरील सर्व बाबी विचारात घेऊन सार्व.आरोग्य विभागामार्फ़त नव्याने पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे, प्रसिध्द करणे कामाची दै. नवाकाळ, दै.नवशक्ती या वृत्तपत्रात जाहिरात निविदा नोटीस प्रसिध्द करून दि.08/02/2016 रोजी पर्यंत ई-टेंडरींगव्दारा निविदा मागविण्यात आली आहे, त्यानुसार दि.10/02/2016 रोजी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडण्यात आला असता एकच निविदा प्राप्त झाली असता सदर निविदेस 5 दिवस (29/02/2015 पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली असता, एकच निविदा प्राप्त झाली त्यामुळे पुन्हा दि.23/03/2016 रोजी लोकसत्ता या वृत्तपत्रात जाहिर निविदा नोटीस प्रसिध्द करून व ई-टेंडरींगव्दारे निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार दि.30/06/2016 रोजी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडण्यात आला असता 1) मे. एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. 2) मे. महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. हे दोन निविदाकार पात्र ठरले. उपरोक्त कामाकरिता यापूर्वी दि.04/08/2015, दि.17/08/2015 व दि.01/10/2015, दि.30/01/2016 रोजी चार वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. पाचव्या वेळेस निविदा मागविल्या असता त्यानुसार खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| Sr. No. | Item No. | Enviro Analysts & Engineers Pvt Ltd. | Mahabal Enviro Engineers Pvt Ltd |
|---|---|---|---|
| 1 | I | 1,79,000 | 2,05,800 |
| 2 | II | 59,800 | 41,600 |
| 3 | III (a) | 4,33,000 | 5,97,000 |
| 4 | (b) | 80,000 | 65,500 |
| 5 | (c) | 79,000 | 65,500 |
| 6 | (d) | 78,000 | 65,500 |
| 7 | IV | 48,200 | 78,200 |
| 8 | V | 12,000 | 18,200 |
| 9 | VI | 66,000 | 93,000 |
| TOTAL | | 10,35,000 | 12,30,300 |

3. उपरोक्त दराचे अवलोकन केले असता एनव्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे Item No. I, III(a), IV, V, VI यांचे दर कमी आहेत व Item No. II, III(b)(c)(d) साठी महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स यांचे दर कमी आहेत. निविदेमध्ये दर्शविलेल्या बाबी वेगवेगळ्या असल्याने/कामे वेगवेगळी असल्याने ज्या बाबींसाठी ज्याचे दर कमी आहेत त्याबाबी करिता संबंधित निविदाकारास वाटाघाटीसाठी न बोलवता मे.एनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. यांना वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले. त्यांनी वाटाघाटीनंतर खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत.

| Sr. No | Item No. | निविदेतील दर | वाटाघाटीनंतर कमी केलेले दर | मे.महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स यांनी निविदेत दिलेले दर | फ़रक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | I | 1,79,000 | 1,49,000 | - | - |
| 2 | II | 59,800 | 59,800 | 41600 | 18200 |
| 3 | III (a) | 4,33,000 | 3,66,000 | - | - |
| 4 | (b) | 80,000 | 70,000 | 65500 | 4500 |
| 5 | (c) | 79,000 | 69,000 | 65500 | 3500 |
| 6 | (d) | 78,000 | 78,000 | 65500 | 12500 |
| 7 | IV | 48,200 | 48,200 | - | - |
| 8 | V | 12,000 | 10,000 | - | - |
| एकूण | | 10,35,000 | 8,50,000 | - | - |

4. वाटाघाटीनंतर उपरोक्त बाबतीत Item No. II, III(b)(c)(d) चे स्वीकृत केलेले मे. एनव्हायरो

ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे दर मे. महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स यांच्या निविदेतील दरापेक्षा जास्त आहेत. तरी महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स यांचे वरीलप्रमाणे बाब निहाय दर कमी असताना जास्त दराच्या बाबी मान्य करण्यात आलेल्या आहेत. तरी याबाबत मनपाला कमी दराचा फ़ायदा झालेला नाही.

5. सन 2015-16 मध्ये पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी मनपाने दहा लाखाची तरतूद केली असताना सन 2015-16 मध्ये अहवाल तयार न करता, याबाबतचे कार्यादेश दि.18/07/2016 ला देण्यात आले. व सदरचा 2015-16 चा अहवाल शासनास सादर करण्यात आला नाही. तसेच बयाना रक्कम भरल्याची पावती नस्तीसोबत नाही.

6. म.शा. पर्यावरण विभाग मंत्रालय शा.नि.क्र. एस.आर.2010/प्र.क्र.40/2010/ता.क्र.1 दि.04/06/2010 नुसार 31 जुलै पर्यंत अहवाल शासनाच्या नगर विकास विभाग व पर्यावरण विभाग तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करणे आवश्यक आहे.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.42 दि.29/01/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 64, Hmm No : 42)

## *43 अग्निशमन विभागाकरीता अत्यावश्यक साहित्य पुरविणे कामात अनियमितता झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : सार्वजनिक सुरक्षितता महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2959082.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2959082.00/-

***सदरील कामासाठी उद्योग व कामगार विभाग यांचे शा.नि.क्र. भांखस-1088/2512/उद्योग-6 दि.02 जानेवारी 1992 नुसार कमीत कमी 3 वैध दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक आहे, परंतू एकच वैध प्राप्त दरपत्रक स्विकारण्यात आल्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा कायदा झाला नाही. अग्निशमन विभागाने स्वतः चे दर निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आलेली असून, केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007 क्र.005/सिआरडी/012 दि.03 मार्च 2007 सदरील परिपत्रकातील तरतूदीचे विभागाकडून उल्लंघन झाले आहे. सदरील कामाची निविदा जाहिरात ही राजबंजार, जनादेश स्थानिक साप्ताहीक वर्तमानपत्र***

| |
|---|
| ***व The Free Press या वर्तमानपत्रात दिली आहे तरी शा.नि.क्र. पीयूबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/3/2001 चे विभागाकडून पालन झाले नाही. सदरील कामासाठी मे. शाह भोगीलाल ॲण्ड जेठालाल ब्रदर्स तर्फे श्री. प्रमेकुमार नायर एक्झीक्युटिव्ह मार्केटिंग यांना भागीदारीसाठी अधिकृत स्वाक्षरीकर्तासाठी 100 रुपयाच्या मुद्रांक शुल्कावर नोटरी केलेले आहे. तरी सदरील भागीदारीसाठी नियमानुसार अभिहंस्तनतरण करणे आवश्यक आहे ते केलेले नाही. सदरील कामासाठी संचालक अग्निशमन सेवा महाराष्ट्र राज्य व डी.जी.एस.एन.डी. यांचे मार्गदर्शनानुसार साहित्य खरेदी करणे आवश्यक होते त्यानुसार विभागाने कार्यवाही केलेली दिसून येत नाही.*** |

विषय:- अग्निशमन विभागाकरिता अत्यावश्यक साहीत्य पुरविणेबाबत.
लेखाशिर्ष:- सार्वजनिक सुरक्षितता/साधन सामग्री व भांडार खरेदी.
प्रशासकिय मंजुरी:- मा.आयुक्त दि.30/09/2015.
स्थायी समिती मंजुरी:- ठराव क्र.79 दि.30/09/2015.
निविदेस मंजुरी:- मे. शाह भोगीलाल ॲण्ड ब्रदर्स (निविदा समितीने दि.12/08/2015)
कार्यादेश:- मनपा/उप-आयुक्त/अग्नि/843/2015-16 दि.30/10/2015.

उपरोक्त कामाच्या निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या

1. सदरील कामासाठी उद्योग व कामगार विभाग यांचे शा.नि.क्र. भांखस-1088/2512/उद्योग-6 दि.02 जानेवारी 1992 नुसार कमीत कमी 3 वैध दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक आहे, परंतू एकच वैध प्राप्त दरपत्रक स्विकारण्यात आल्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा कायदा झाला नाही.
2. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007 क्र.005/सिआरडी/012 दि.03 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढतांना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दरपत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबंधित सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणन पत्रकात समाविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम प्राधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये, तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये असे असतांना अग्निशमन विभागाने सन 2015-16 मध्ये अग्निशमन विभागाकरिता अत्यावश्यक साहित्य 35 बाबींसाठी पुरवठा करणेसाठी बाजार भावानुसार दर न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निच्छित करण्यात आलेली आहे. केवळ त्याच प्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आलेले आहेत. तरी अग्निशमन विभागाने स्वत:चे दर निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आलेली असून सदरील परिपत्रकातील तरतूदीचे विभागाकडून उल्लंघन झाले आहे.

3. सदरील कामाची निविदा जाहिरात ही राजबंजार, जनादेश स्थानिक साप्ताहीक वर्तमानपत्र व The Free Press या वर्तमानपत्रात दिली आहे तरी शा.नि.क्र. पीयूबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/3/2001 अन्वये जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.50,00,001 पेक्षा अधिक आहे अशी जाहिरात अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग दैंनिकास देणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयक सीएटी 10/2006/प्र.क्र.133/इमारती-2 दि.02/11/2006 अन्वये 50 लाखापेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी निविदा कालावधी हा प्रथम सुचना 25 दिवसाचा नमूद असताना सदरील निविदेचा कालावधी 07 दिवसाचा दिला असल्याने कामासाठी स्पर्धा झालेली नाही.

4. सदरील कामासाठी मे.शाह भोगीलाल ॲण्ड जेठालाल ब्रदर्स तर्फे श्री.प्रमेकुमार नायर एक्झीक्युटिव्ह मार्केटिंग यांना भागीदारीसाठी अधिकृत स्वाक्षरीकर्तासाठी 100 रुपयाच्या मुद्रांक शुल्कावर नोटरी केलेले आहे. तरी सदरील भागीदारीसाठी नियमानुसार अभिहंस्तनतरण करणे आवश्यक आहे ते केलेले नाही.

5. सदरील कामासाठी संचालक अग्निशमन सेवा महाराष्ट्र राज्य व डी.जी.एस.एन.डी. यांचे मार्गदर्शनानुसार साहित्य खरेदी करणे आवश्यक होते त्यानुसार विभागाने कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.62 दि.01/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 14, Hmm No : 62)

## *44 आग सुरक्षा निधी जमेपेक्षा जास्त खर्च केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष :आग सुरक्षा निधी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 6570000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6570000.00/-

***सन 2015-16 मध्ये 1026.23 लाख एवढा प्रत्यक्ष आग सुरक्षा निधी जमा झालेला आहे. तरी सन 2015-16 मध्ये आग सुरक्षा निधी रक्कमेमधून 1091.93 लाख एवढा निधी खर्च केलेला आहे. तरी उर्वरीत जादा खर्च झालेली रक्कम रु.65.70 ही कोणत्या निधीमधून खर्च केली त्याची अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिली नाही.***

महाराष्ट्र आग प्रतिबंध व जीवन सुरक्षा अधिनियम 2006 मधील सेक्शन 25 नुसार फायर

सुरक्षा फी, वार्षिक फी हा महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून बिल्डींगचे मालक व मालमत्ताधारक यांच्याकडून वसूल करण्यात येतो. सदरील निधी हा अग्निशमन केंद्र देखभाल दुरूस्ती साठी खर्च करणे व महानगरपालिका क्षेत्रातील इमारीतीमध्ये अग्निशमन उपकरणे खरेदी करणेकामी उपयोगात आणला जातो. तरी सदरील निधीचे लेखापरिक्षण केले असता, सदरील निधी जमेपेक्षा खर्च जास्त झाला आहे.

सन 2015-16 मधील अग्निशमन विभागाने उपलब्ध करून दिलेल्या नस्ती व इतर लेख्यांची तपासणी केली असता सन 2015-16 मध्ये 1026.23 लाख एवढा प्रत्यक्ष निधी जमा झालेला आहे. तरी सन 2015-16 मध्ये आग सुरक्षा निधी रक्कमेमधून 1091.93 लाख एवढा निधी खर्च केलेला आहे. तरी उर्वरीत जादा खर्च झालेली रक्कम रु.65.70 ही कोणत्या निधीमधून खर्च केली त्याची अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे सदरील रक्कम रु.65.70 लाख ही आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.69 दिनांक 02/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 18, Hmm No : 69)

## *45 आग प्रतिबंधक व जिवसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून न घेतल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : अग्निशमन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम 2009 नियम 4 (1) अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून नमुना अ मध्ये प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. व नियम 4 (2) नुसार अधिनियमाच्या कलम 3 च्या पोट – कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उत्तम व कार्यक्षम स्थितीत असलेल्या इमारती किंवा तिच्या जागेतील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या परीक्षणासंबंधी वर्षातून दोनदा, जानेवारी व जुलै महिन्यात अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून परीक्षण करून नमुना ब मध्ये प्रमाणपत्र घेतले नाही.***

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 व नगरविकास

विभागाकडील अधिसूचना क्र. अशस-2008/प्र.क्र.181/08/नवी-20, दि.13 जानेवारी 2009 द्वारे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम 2009 विहित केलेले आहेत. सदर नियमातील नियम 4(1) नुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे इमारतीतील किंवा त्याच्या भागातील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनाचे अनुपालना संबंधी अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून नमुना अ मध्ये प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

नियम 4(2) नुसार अधिनियमाच्या कलम 3 च्या पोट - कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उत्तम व कार्यक्षम स्थितीत असलेल्या इमारती किंवा तिच्या जागेतील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या परीक्षणासंबंधी वर्षातून दोनदा, जानेवारी व जुलै महिन्यात अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून परीक्षण करून नमुना ब मध्ये प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे वरील नियमांची कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही. सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.58 दि.01/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 44, Hmm No : 58)

## *46 मिरा भाईंदर महानगरपालिका "नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम" अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरिता संगणक व इतर साहित्य पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमितते बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : अग्निशमन महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*
आक्षेपाधीन रक्कम रु. 1301120.00/-

***शासन निर्णय क्र. भांखस-1044/(2512)/उद्योग – 6 दि.02/01/1992 च्या परिशिष्ट 12 मध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जमानत ठेव व करारपत्र याबाबी पुर्ण केल्याखेरीज अंतीम मागणी आदेश देण्यात येऊ नयेत असे स्पष्ट आदेश असतांना कार्यादेश दिल्यानंतर सुरक्षा अनामत रकमा स्विकारण्यात आल्या आहेत. यावरुन शासन आदेशाचे पालन केलेनाही. मंजुर दर हे दर करारावरील दर व खुल्या बाजारातील दरापेक्षा कमी असल्याचे अभिलेख्यावर दिसुन आले नाही. त्यामुळे मंजुर केलेल्या निविदांचे दर हे योग्य व वाजवी असल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही. कामासंदर्भात करारनामा अटी शर्ती नुसार करारनामा झाल्यापासून म्हणजेच दि.11/03/2015 पासून 7 दिवसांमध्ये बँक गॅरंटी सादर करणे आवश्यक असताना बँक***

***गॅरंटी नं. BYD/5/2015-2016, दि.15/05/2015 रोजी सादर करण्यात आल्याने करारनामा अटी शर्तींचे उल्लंघन झाले आहे. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग (मदत व पुर्नवसन) शासन निर्णय आ.व्य. प्र.2012/ प्र.क्र.111/आव्य प्र.-1, मंत्रालय मुंबई – 400 032 दि.4 फ़ेब्रुवारी 2013 अन्वये 50 लक्ष अनुदान प्राप्त झाले असून खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. मनपाने मागविलेल्या तांत्रिक तपशीलाप्रमाणे साहित्य पुरवठा केलेबाबतचे मान्यताप्राप्त तांत्रिक संस्थेकडून तपशीलाप्रमाणे साहित्य पुरवठा झालेबाबतचे प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध झाले नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेत शहरी आपत्ती धोके निवारज उपक्रम राबविणेसाठी, महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग (मदत व पुर्नवसन) शासन निर्णय आ.व्य. प्र.2012/प्र.क्र.111/आव्य प्र.-1, मंत्रालय मुंबई - 400 032 दि.4 फ़ेब्रुवारी 2013 अन्वये 50 लक्ष अनुदान प्राप्त झाले. मिरा भाईंदर महानगरपालिका “नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम” अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरिता संगणक व इतर साहित्य पुरवठा करणे कामी अन्वये मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांना कार्यादेश देण्यात आला.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | मिरा भाईंदर महानगरपालिका “नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम” अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरिता संगणक व इतर साहित्य पुरवठा करणे |
| ठेकेदाराचे नाव | मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट |
| स्थायी समिती ठराव क्र. दि. | ठराव क्र.134, दि.28/01/2014 |
| करारनामा दि. | दि.18/03/2015 |
| कार्यादेश क्र. दि. | जा.क्र.मनपा/उप-आयुक्त/आ.व्य./222/2014-15, दि.18/03/2015 |
| बँक गॅरंटी | BYD/5/2015-2016, दि.15/05/2015 |
| लेखाशिर्ष | नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम |
| खर्च | रक्कम रुपये 1301120 |

उपरोक्त कामाचे नस्ती, प्रमाणात यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रूटीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

1. कार्यादेश दि.18/03/2015 रोजी देण्यात आलेला आहे व करारपत्र दि.18/03/2015 रोजी व सुरक्षा अनामत रक्कम दि.15/05/2015 रोजी जमा करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र. भांखस-1044/(2512)/उद्योग - 6 दि.02/01/1992 च्या परिशिष्ट 12 मध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जमानत ठेव व करारपत्र याबाबी पुर्ण केल्याखेरीज अंतीम मागणी आदेश देण्यात येऊ नयेत असे स्पष्ट आदेश असतांना कार्यादेश दिल्यानंतर सुरक्षा अनामत रकमा स्विकारण्यात आल्या आहेत. यावरुन शासन आदेशाचे पालन केले नाही.

2. खरेदी नियमपुस्तिकेतील नियम 1(ड) नुसार खरेदी करावयाच्या वस्तु CSPO/DGSD च्या दर करारावर उपलब्ध नसल्याबाबत खात्री करण्यात आल्याचे अभिलेख तसेच मंजुर दर हे दर करारावरील दर व खुल्या बाजारातील दरापेक्षा कमी असल्याचे अभिलेख्यावर दिसुन आले नाही. त्यामुळे मंजुर केलेल्या निविदांचे दर हे योग्य व वाजवी असल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.
3. उपरोक्त कामासंदर्भात करारनामा अटी शर्ती नुसार करारनामा झाल्यापासून म्हणजेच दि.11/03/2015 पासून 7 दिवसांमध्ये बँक गॅरंटी सादर करणे आवश्यक असताना बँक गॅरंटी नं. BYD/5/2015-2016, दि.15/05/2015 रोजी सादर करण्यात आल्याने करारनामा अटी शर्तीचे उल्लंघन झाले आहे.
4. मिरा भाईंदर महानगरपालिकेत शहरी आपत्ती धोके न्युनीकरण उपक्रम राबविणेसाठी, महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग (मदत व पुर्नवसन) शासन निर्णय आ.व्य. प्र.2012/प्र.क्र.111/आव्य प्र.-1, मंत्रालय मुंबई - 400 032 दि.4 फ़ेब्रुवारी 2013 अन्वये 50 लक्ष अनुदान प्राप्त झाले असून खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.
5. टिपणीत नमूद केल्याप्रमाणे मनपाने मागविलेल्या तांत्रिक तपशीलाप्रमाणे साहित्य पुरवठा केलेबाबतचे मान्यताप्राप्त तांत्रिक संस्थेकडून तपशीलाप्रमाणे साहित्य पुरवठा झालेबाबतचे प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध झाले नाही. सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.63 दि.01/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 46, Hmm No : 63)

## *47 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये, इंदिरा गांधी रुग्णालय, नगरभवन येथे स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणे या कामातील अनियमिततकबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : अग्निशमन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 11900000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11900000.00/-

***अग्निशमन विभागाने मुख्य कार्यलय इमारतीमध्ये wet hydrant system व sprinkler system बसविणेचा अंदाजित खर्च 30 व 35 लाख दर्शविलेला आहे. वाटाघाटीनंतर रु.6550000/- निविदा दाराकडून दर स्वीकृत***

***केलेला आहे. परंतु नस्तीमध्ये याबाबत तपशीलावर खर्च दर्शविलेला नसल्यामुळे सदर रक्कम कशाच्या आधारे निश्चित करण्यात आली याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007 क्र.005/सिआरडी/012 दि.03 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्गत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितररकाकडून दरपत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजार भावाची प्रत्यक्ष खात्री करुन दरपृथ:करण सक्षम प्राधिकाऱ्याच्या तपासणी अंती, पूर्वगणनपत्रकास तांत्रिक/प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे व बाजार भावानुसार दर ठरवून पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करणे आवश्यक आहे याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. निविदा काढताना विभागाने स्वत: चे दर निश्चित न करता ठेकेदाराने सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचे दर सदर कामासाठी लागू केलेले आहेत. अग्निशमन यंत्रणा उभारताना मा.संचालक अग्निशमन सेवा संचालनालय यांनी 13 शिफारशी केल्या होत्या त्यापैकी 4 शिफारशीची पूर्तता करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर काम परिपूर्ण व कार्यक्षम झाल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.***

कामाचे नाव:- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये, इंदिरा गांधी रुग्णालय, नगरभवन येथे स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणे.
ठेकेदाराचे नाव:- मे. एक्सीड स्पार्क फायर सिस्टीम इंडिया प्रा.लि.
करारनामा दि.:- 27/08/2014
कार्यादेश दि.:- क्रमांक/मिभा/अग्नि/165/14-15/दि.28/08/2014
स्थायी समिती ठराव प्रकरण क्र.63, ठराव क्र.62, दि.16/08/2014
लेखाशिर्ष:- सुरक्षा निधी.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मुख्य इमारतीमध्ये, इंदिरा गांधी रुग्णालय, नगरभवन येथे स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणेसाठी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर बाबतीत दुसरी फेरनिविदा मागविली असता एक निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदा धारकाने वाटाघाटीनंतर खालीलप्रमाणे दर स्वीकृत करण्यात आलेले आहेत.

| क्र | कामाचे नाव | अंदाजीत खर्च | निविदा धारकाने सादर केलेले दर | वाटाघाटीनंतर दिलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1. | मुख्य कार्यालय अग्निशमन यंत्रणा बसवणे बाबतचे काम<br>1) Wet hydrant system<br>2) Sprinkler system | 3500000<br>3000000<br>6500000 | 6607000 | 6550000 |
| 2. | इंदिरा गांधी रुग्णालय<br>1) Wet hydrant system | 2000000<br>200000 | 3220000 | 2198000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 2) Sprinkler system | 2200000 | | |
| 3. | नगरभवन<br>1) Wet hydrant system<br>2) Fire extinguishers | 3000000<br>200000<br>3200000<br>एकूण 11900000 | 2215000 | 3195000 |

सदर खर्चाची नस्ती तपासणी असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही तसेच वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे कात्रण नस्तीत नसल्याने शासन निर्णयाचे अनुपालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

2) सुरक्षा अनामत भरण्याचा पावत्या नस्तीमध्ये आढळुन आलेल्या नाहीत.

3) निविदा नस्तीमध्ये मुख्य कार्यालय इमारतीमध्ये wet hydrant system बसविणेबाबत अंदाजीत खर्च 3500000 व sprinkler system बसविणेबाबत अंदाजीत खर्च 3000000 असा एकूण 6500000 अंदाजीत खर्च दर्शविलेला आहेत व वाटाघाटीनंतर 6550000 दर निविदा दाराकडून स्वीकृत केलेला आहे. याबाबत नस्तीमध्ये तपशीलवार/बाबनिहाय खर्च दर्शविलेला नाही. त्यामुळे सदर अंदाजीत खर्च रक्कम कशाच्या आधारे ठरविण्यात आली याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. कामाचे तपशीलवार/बाबनिहाय अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

4) केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007 क्र.005/सिआरडी/012 दि.03 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढतांना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दरपत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबंधित सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणन पत्रकात समाविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम प्राधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये, तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये असे असतांना मुख्य इमारतीमध्ये, इंदिरा गांधी रुग्णालय, नगरभवन येथे स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारण्यासाठी अग्निशमन विभागाने सन 2015-16 मध्ये अग्निशमन यंत्रणा उभारण्यासाठी विभागाने बाजार भावानुसार दर न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. केवळ त्याच प्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आलेले आहेत. तरी अग्निशमन विभागाने स्वत:चे दर निविदा काढताना निच्छित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आलेली असून सदरील परिपत्रकातील तरतूदीचे विभागाकडून उल्लंघन झाले आहे.

5) अग्निशमन यंत्रणा उभारणेबाबत मा. संचालक अग्निशमन सेवा संचालनालय यांचे अभिप्राय घेण्यात आलेले होते. त्यांनी सदर यंत्रणा बसविण्याबाबत 13 कामाच्या शिफारसी केल्या होत्या त्यापैकी

4 कामांच्या शिफारसींची पूर्तता सदर कामावर करण्यात आलेली नाही. केवळ सदर बाबीचा निविदेमध्ये समावेश नसल्याने व महासभा ठराव क्र.23 व दि.14/12/2012 यांनी त्यास मंजूरी न दिल्याने सदर काम परिपूर्ण व कार्यक्षम असल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.64 दि.01/03/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 68, Hmm No : 64)

## *48 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमि/दफनभूमि इत्यादी ठिकाणची विदयुत विषयक कामाची देखभाल व दुरूस्ती करणे कामात अनियतता झाले बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष : स्मशानभूमि/ दफनभूमि महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 880400.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 880000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

***कामाचा करारनामा हा कामाच्या कार्यादेशाच्या अगोदर करणे आवश्यक आहे. सुरक्षा अनामत रक्कम कामाच्या 3% रक्कम रु.26,400/- कंत्राटदाराकडून वसूल न केल्याने रक्कम रू.26,400/- तात्पूरती वसूल पात्र ठेवण्यात येत आहे.कामाची निविदा पुस्तिका उपलब्ध नसल्याने कामाबाबत दिलेल्या अटी व शर्तीचे लेखापरिक्षण करता आले नाही. कार्यादेशानुसार 12 महिन्यात काम पुर्ण करणे आवश्यक होते तरी सदरिल काम हे दि.24/10/2016 ला पुर्ण केल्याने एकंदर 30 दिवस उशिराचे काम झाले आहे. कामास मुदतवाढ दिलेबाबत व कंत्राटदाराने कामास मुदतवाढ मागितले बाबतचे दस्तएवज नस्तीत उपलब्ध नसल्याने काम 30 दिवस उशिराने झाल्याने कंत्राटदाराकडून दंड वसूल केलेला नाही. कामाच्या पूर्वीचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित करून निविदा नस्तीत लावलेले नाही. सदरिल कामासाठी सन 2014-15 या वर्षाची ठाणे जिल्हा दर सुची नमुद केली आहे परंतु सदरिल जिल्हा दर सुची उपलब्ध करून न दिल्याने कार्यकारी अभियंता यांनी दर पृथ:करण केलेले लेखापरिक्षणास पडताळणी करता आले नाही. सदरील कामासाठी करारनामा मुद्रांक शुल्क रक्कम रु.100/- एवढी घेतलेली आहे. तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु.500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10 लाखापर्यंत घेणे आवश्यक आहे. तरी रक्कम रु.400/- एवढी कमी घेतल्याने सदरील रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. कामाच्या देयकाचे मुळ प्रमाण लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने कंत्राटदाराला अदा केलेल्या रक्कमेबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही. कामाची मुळ मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने***

***सदरिल कामाबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.***

कामासाठी अपेक्षित खर्च:- 8,80,000/-

प्रशासकिय वित्तीय मंजूरी:- आयुक्त यांचे दि.01/06/2015

तांत्रिक मंजूरीचा तपशिल:- कार्यकारी अभियंता बाब क्र.149/15-16 दि.17/07/2015 र.रू.8,80,000/-

काम प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्र व दिनांक:- 1) दैनिक पुढारी 2) बहुजन लोकनायक, साप्ताहिक दि.07/06/2015

निविदा/दरपत्रके प्राप्त करून घ्यावयाची अंतिम तारिख:- दि.26/06/2015

प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रकांची संख्या:- 3, 1) मे. न्यू फिल्ड 2) मे. शेखर इलेक्ट्रीकल्स 3) मे. एकता कन्स्ट्रक्शन

मंजूर दर:- अंदाजपत्रकिय दरानुसार

मंजूर झालेले निविदा धारक:- मे. शेखर इलेक्ट्रीकल्स

निविदा/दरपत्रक मंजूर करण्यात आलेला ठराव:- स्थायी समिती ठराव क्र.97 दि.14/10/2015

मंजूर निविदा धारकांना देण्यात आलेला कार्यादेश:- मनपा/साबां/कार्या/261/15-16 दि.24/09/2015

कामाची मुदत:- 12 महिने (दि.24/09/2015 ते दि.23/09/2016 पर्यंत)

काम पूर्ण केल्याचा दिनांक:- 24/10/2016

उपरोक्त कामाच्या निविदा नस्तीचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

1. नियमानुसार कामाचा करारनामा हा कामाच्या कार्यादेशाच्या अगोदर करणे आवश्यक आहे.

2. सुरक्षा अनामत रक्कम कामाच्या 3% रक्कम रु.26,400/- कंत्राटदाराकडून वसूल न केल्याने रक्कम रु.26,400/- तात्पूरती वसूल पात्र ठेवण्यात येत आहे.

3. कामाची निविदा पुस्तिका उपलब्ध नसल्याने कामाबाबत दिलेल्या अटी व शर्तीचे लेखापरिक्षण करता आले नाही.

4. सदरिल कामासाठी कार्यादेशानुसार 12 महिन्यात काम पुर्ण करणे आवश्यक होते तरी सदरिल काम हे दि.24/10/2016 ला पुर्ण केल्याने एकंदर 30 दिवस उशिराचे काम झाले आहे तरी सदरिल कामास मुदतवाढ दिलेबाबत व कंत्राटदाराने कामास मुदतवाढ मागितले बाबतचे दस्तएवज नस्तीत उपलब्ध नसल्याने काम 30 दिवस उशिराने झाल्याने कंत्राटदाराकडून दंड वसूल केलेला नाही.

5. कामाच्या पूर्वीचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित करून निविदा नस्तीत लावलेले नाही.

6. सदरिल कामासाठी सन 2014-15 या वर्षाची ठाणे जिल्हा दर सुची नमुद केली आहे परंतु सदरिल जिल्हा दर सुची उपलब्ध करून न दिल्याने कार्यकारी अभियंता यांनी दर पृथ:करण केलेले

लेखापरिक्षणास पडताळणी करता आले नाही.

7. सदरील कामासाठी करारनामा मुद्रांक शुल्क रक्कम रु.100/- एवढी घेतलेली आहे. तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु.500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10 लाखापर्यंत घेणे आवश्यक आहे. तरी रक्कम रु.400/- एवढी कमी घेतल्याने सदरील रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. त्यामुळे कामाचा करारनामा अट क्र.8 चे कंत्राटदाराकडून पालन झालेले दिसून येत नाही.

8. कामाच्या देयकाचे मुळ प्रमाण लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने कंत्राटदाराला अदा केलेल्या रक्कमेबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.

9. कामाची मुळ मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरिल कामाबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.66 दिनांक 02/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 15, Hmm No : 66)

## *49 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.122 येथे फ्लड लाईट बसविणे कामात अनियमितता झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : विज बिलाचा खर्च/पथदि महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 894500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 894100.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

***कामाचा करारनामा हा दि.03/03/2016 रोजी केलेला आहे तरी नियमानुसार कामाचा करारनामा हा कामाच्या कार्यादेश दि.02/03/2016 च्या अगोदर करणे आवश्यक आहे. कामाची निविदा पुस्तिका उपलब्ध नसल्याने कामाबाबत दिलेल्या अटी व शर्तीचे लेखापरिक्षण करता आले नाही. कामाच्या पूर्वीचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित करून निविदा नस्तीत लावलेले नाही. कामासाठी सन 2013-14 या वर्षांची ठाणे जिल्हा दर सुची नमुद केली आहे परंतु सदरिल जिल्हा दर सुची उपलब्ध करून न दिल्याने कार्यकारी अभियंता यांनी दर पृथ:करण केलेले लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही. कामासाठी करारनामा मुद्रांक शुल्क रक्कम रु.100/- एवढी घेतलेली आहे. तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु.500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10***

| |
|---|
| ***लाखापर्यंत घेणे आवश्यक आहे. तरी रक्कम रु.400/- एवढी कमी घेतल्याने सदरील रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. कामाच्या देयकाचे मुळ प्रमाण लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने कंत्राटदाराला अदा केलेल्या रक्कमेबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही. कामाची मुळ मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरिल कामाबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही. कामाचे History Sheet लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरिल जागा ही महानगरपालिकेच्या मालकिची असलेबाबत लेखापरिक्षाणास खात्री झाली नाही.*** |

कामासाठी अपेक्षित खर्च:- रु.8,94,100/-

प्रशासकिय वित्तीय मंजूरी:- आयुक्त यांचे दि.31/12/2015

तांत्रिक मंजूरीचा तपशिल:- कार्यकारी अभियंता (साबां) बाब क्र.369/15-16 दि.17/02/2016 र.रू.8,94,100/-

जाहिरात सुचना क्रंमाक व दिनांक:- क्र.357/15-16 दि.05/01/2016

जाहिरात प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्र व दिनांक:- 1) दैनिक मुंबई मित्र 2) सुरज प्रकाश दि.07/01/2016

निविदा/दरपत्रके प्राप्त करून घ्यावयाची अंतिम तारिख:- दि.22/01/2016

प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रकांची संख्या:- 3, 1) मे. शेखर इलेक्ट्रीकल्स 2) मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल्स 3) मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स

मंजूर दर:- निविदेच्या 0.1% कमी दराने

मंजूर झालेले निविदा धारक/दरपत्रकाचे नाव:- मे. शेखर इलेक्ट्रीकल्स

मंजूर निविदा धारकांना देण्यात आलेला कार्यादेश:- मनपा/साबां/कार्या/670/15-16 दि.02/03/2016

कामाची मुदत:- 02 महिने (दि.02/03/2016 ते दि.01/05/2016 पर्यंत)

काम पूर्ण केल्याचा दिनांक:- 15/03/2016

उपरोक्त कामाच्या निविदा नस्तीचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

1. सदरिल कामाचा करारनामा हा दि.03/03/2016 रोजी केलेला आहे तरी नियमानुसार कामाचा करारनामा हा कामाच्या कार्यादेश दि.02/03/2016 च्या अगोदर करणे आवश्यक आहे.

2. कामाची निविदा पुस्तिका उपलब्ध नसल्याने कामाबाबत दिलेल्या अटी व शर्तीचे लेखापरिक्षण करता आले नाही.

3. कामाच्या पूर्वीचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित करून निविदा नस्तीत लावलेले नाही.

4. सदरिल कामासाठी सन 2013-14 या वर्षाची ठाणे जिल्हा दर सुची नमुद केली आहे परंतु सदरिल जिल्हा दर सुची उपलब्ध करून न दिल्याने कार्यकारी अभियंता यांनी दर पृथ:करण केलेले

लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही.

5. सदरील कामासाठी करारनामा मुद्रांक शुल्क रक्कम रु.100/- एवढी घेतलेली आहे. तरी, मुद्रांक शुल्क सुधारीत अधिनियम 2015(34),63,i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीतकमी रक्कम रु.500/- चे मुद्रांक शुल्क मर्यादित 10 लाखापर्यंत घेणे आवश्यक आहे. तरी रक्कम रु.400/- एवढी कमी घेतल्याने सदरील रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. त्यामुळे कामाचा करारनामा अट क्र.8 चे कंत्राटदाराकडून पालन झालेले दिसून येत नाही.

6. कामाच्या देयकाचे मुळ प्रमाण लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने कंत्राटदाराला अदा केलेल्या रक्कमेबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.

7. कामाची मुळ मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरिल कामाबाबत लेखा परिक्षणाला खात्री झाली नाही.

8. कामाचे History Sheet लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरिल जागा ही महानगरपालिकेच्या मालकिची असलेबाबत लेखापरिक्षाणास खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.67 दिनांक 02/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 16, Hmm No : 67)

## *50 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गोल्डन नेस्ट जंक्शन, दिपक हॉस्पिटल, शिवार गार्डन, कनकिया एस.के.स्टोन व सिल्वर पार्क येथील सिग्नल यंत्रणा वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे कामात अनियमितता झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : सिग्नल यंत्रणा/सी.सी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1788872.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1788072.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 800.00/-

***शासन निर्णय – पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 नुसार कामाची जाहिर निविदा प्रसिद्ध करताना सदरील शासन निर्णयाचा अवलंब केला नाही. करारनाम्यातील अट क्र.30 नुसार कामाच्या अगोदरचे व कामाच्या नंतरचे फ़ोटो काढलेबाबतचे प्रमाणित केलेले अभिलेखे नस्तीत उपलब्ध नाही. कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार रक्कम रु.900/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कम रु.800/- ची मे. युटीलिटी इंटरप्रायजेस***

***यांच्याकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबत अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाच्या जागेविषयी लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. कामाचा कालावधी हा दि.26/10/2016 पर्यंत होता परंतु सदरील काम हे दि.13/02/2017 रोजी म्हणजेच 3 महिने 18 दिवस उशिराने केल्याने कंत्राटदाराने कामास मुदतवाढ मागणीचे पत्र व कार्यकारी अभियंता मुदतवाढ दिलेबाबतचे आदेश नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. तसेच कंत्राटदाराने उशिराने काम केल्याने कंत्राटदाराकडून दंड वसूल केलेला दिसून येत नाही.***

कामासाठी अपेक्षित खर्च:- 17,88,072/- (दरपत्रकाप्रमाणे)
प्रशासकिय वित्तीय मंजूरी:- आयुक्त यांचे दि.29/06/2015
तांत्रिक मंजूरीचा तपशिल:- कार्यकारी अभियंता बाब क्र.08 दि.29/06/2015 रक्कम रु.17,88,072/-
जाहिरात सुचना:- क्र.102 दि.04/07/2015
जाहिरात प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्रे व दिनांक:- 1) दैनिक सामना 2) महाराष्ट्र सम्राट, दि.05/07/2015
निविदा/दरपत्रके प्राप्त करून घ्यावयाची अंतिम तारिख:- दि.25/07/2015
प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रकांची संख्या:- 5, 1) मे. आदित्य इलेक्ट्रीकल 2) मे. न्यु फिल्ड 3) मे. रिलायबल इलेक्ट्रीकल 4) मे. युटीलिटी इंटरप्रायजेस 5) मे. न्यूक्लिनिअर्स ट्रॅफिक सोल्यूशन
मंजूर दर:- अंदाजपत्रकिय दरानुसार
मंजूर झालेले निविदा धारक:- मे. युटीलिटी इंटरप्रायजेस
निविदा/दरपत्रक मंजूर करण्यात आलेला ठराव:- स्थायी समिती ठराव क्र.97 दि.14/10/2015
मंजूर निविदा धारकांना देण्यात आलेला कार्यादेश:- मनपा/साबां/कार्या/380/15-16 दि.27/10/2015
कामाची मुदत:- 2 वर्ष (दि.27/10/2015 ते दि.26/10/2016 पर्यंत)
काम पूर्ण केल्याचा दिनांक:- दि.13/02/2017 (3 महिने 18 दिवस काम उशिराने झाले)
लेखाशिर्ष:- सिग्नल यंत्रणा/ सी.सी.टिव्ही बसविणे
मोजमाप पुस्तिका:- क्र.2160 दि.13/02/2017 पृष्ठ क्र.22-25 (उपलब्ध नाही)
प्रमाणके:- उपलब्ध नाही
करारनामा:- सचिव मनपा 2015-16 अनु.क्र.466 दि.29/10/2015 Stamp 900

सदरील कामाच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील त्रुटी आढळून आल्या.

1. शासन निर्णय - महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे, अशा प्रकारे निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक होते. तरी सदर कामाची जाहिर निविदा ही दैनिक सामना व महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात सुचना दिली आहे. तरी सदरील शासन निर्णयाचा अवलंब न करता निविदा प्रसिध्द केलेल्या दिसून येते.

2. करारनाम्यातील अट क्र.30 नुसार कामाच्या अगोदरचे व कामाच्या नंतरचे फ़ोटो काढलेबाबतचे

प्रमाणित केलेले अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने व मोजमाप पुस्तिका नसल्याने सदरील अटीचे पालन झाले बाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

3. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र. 34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.900/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.100/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित प्रत्येकी रक्कम रु.800/- ची मे. युटीलिटी इंटरप्रायजेस यांच्याकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

4. कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबत अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाच्या जागेविषयी लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. तसेच कामाचे हिस्ट्री शीट व त्या अनुषंगीक नोंद वह्या व नोंदी नस्तीत उपलब्ध न झाल्याने कामाच्या जागेविषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

5. कामाचा कालावधी हा दि.26/10/2016 पर्यंत होता परंतु सदरील काम हे दि.13/02/2017 रोजी म्हणजेच 3 महिने 18 दिवस उशिराने केल्याने कंत्राटदाराने कामास मुदतवाढ मागणीचे पत्र व कार्यकारी अभियंता मुदतवाढ दिलेबाबतचे आदेश नस्तीत उपलब्ध नसल्याने कामाबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. तसेच कंत्राटदाराने उशिराने काम केल्याने कंत्राटदाराकडून दंड वसूल केलेला दिसून येत नाही. त्यामुळे सदरील बाबतीत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.68 दिनांक 02/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 17, Hmm No : 68)

## *51 समाज विकास व महिला बालकल्याण विभागामार्फत बालवाडी मुलांना शालेय दप्तर, पाण्याच्या बाटल्या, बुट मोजे व गणवेश वाटप करणे कामात अनियमितता झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : महिला बालकल्याण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 922118.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 922118.00/-

***मुळ निविदा नस्ती व जाहिरात प्रसिध्द केलेली पत्रके सदरील विदयार्थ्यांचे हजेरीपत्रक, मुख्याध्यापक यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पटसंख्या साहित्य वाटप केलेबाबतचे बालवाडी शाळेनिहाय साठा नोंदवही कंत्राटदाराचे साहित्य पुरवठा चलने व देयके लेखा विभागात पारीत केलेले प्रमाणके कामाचे करारनामे लेखा***

***परीक्षणास उपलब्ध झाले नाही.***

समाज विकास

| अ.क्र. | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | कार्यादेश क्र. | शालेय दप्तर दर प्रति संच | एकूण मुले/मुली | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बालवाडी मुलांना शालेय दप्तर व पाण्याच्या बाटल्या वाटप करणेबाबत. | मे. भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्या. मुंबई | मनपा/स.वि.वि./104/2015-16 दि.06/07/2015 | 318.50 | 868 | 276458 |
| 2 | बालवाडी विदयार्थ्यांना बुट व मोजे वाटप करणेबाबत. (1 जोडी बुट व 2 जोडी मोजे) | मे. टेक्नोक्राफ्ट असोसिऐट | मनपा/स.वि.वि./102/2015-16 दि.06/07/2015 | 324.40 | 868 | 281579 |
| 3 | बालवाडी शाळेतील विदयार्थ्यांना गणवेश वाटप करणेबाबत. 1)Half Pant and Half Shirt, Tie 2)Pino and Blouse, Tie | मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. | मनपा/स.वि.वि./103/2015-16 दि.06/07/2015 | 262.65<br>344.00 | 412<br>456 | 108211<br>156864 |
| | | | | | एकूण | 823112 |

महिला बालकल्याण

| अ.क्र. | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | कार्यादेश क्र. | शालेय दप्तर | एकूण मुले/मुली | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | दर प्रति संच | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बालवाडी विदयार्थ्यांना बुट व मोजे वाटप करणेबाबत. (1 जोडी बुट व 2 जोडी मोजे) | मे. टेक्नोक्राफ्ट असोसिऐट | मनपा/म.बा.वि/104/2015-16 दि.31/12/2015 | 324.40 | 154 | 49957 |
| 2 | बालवाडी मुलांना शालेय दप्तर व पाण्याच्या बाटल्या वाटप करणेबाबत. | मे. भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्या. मुंबई | मनपा/म.बा.वि/102/2015-16 दि.31/12/2015 | 318.50 | 154 | 49049 |
| | | | | | एकूण | 99006 |

उपरोक्त कार्यादेशानुसार समाज विकास व महिला बालकल्याण विभागाअंतर्गत बालवाडी मुलांना शालेय साहित्य दिले आहे. तरी सदरील बाबतीत खालीलप्रमाणे लेखापरिक्षणास अभिलेखे दिलेले नसल्याने एकत्रित रक्कम रु.9,22,118/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

1. मुळ निविदा नस्ती व जाहिरात प्रसिध्द केलेली पत्रके
2. सदरील विदयार्थ्यांचे हजेरीपत्रक, मुख्याध्यापक यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पटसंख्या
3. साहित्य वाटप केलेबाबतचे बालवाडी शाळेनिहाय साठा नोंदवही
4. कंत्राटदाराचे साहित्य पुरवठा चलने व देयके
5. लेखा विभागात पारीत केलेले प्रमाणके
6. कामाचे करारनामे

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.90 दि.30/03/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 21, Hmm No : 90)

## *52 महानगरपालिकेतील विविध विभागात वार्षिक ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : वाहन चालक पुरवठा करण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 959060.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 959060.00/-

***सदरील कामाची मुळ निविदा नस्तीत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निविदा पध्दत ही ई-टेंडरींग पध्दतीने अवलंब झाला किंवा कसे याबाबत खात्री झाली नाही. शासन निर्णय – पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 कामाची जाहिर निविदा ही दैनिक पुन्यनगरी व फ्रि प्रेस जनरल वृत्तपत्रात सुचना दिली आहे. तरी शासन निर्णय – पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 या शासन निर्णयाचा अवलंब न करता निविदा प्रसिध्द केल्या आहेत. कामगार किमान वेतन कायदा 1948 व परिपत्रक क्र.12(142)/11/MW/Lab/2023-47 दि.26/07/2011 तसेच Government of NCT of Delhi यांचे परिपत्रक क्र.F.No.12(142)/13/mw/Lab/2231 दि.16/10/2015 नुसार कुशल कामगारांना किमान वेतन देणे आवश्यक असून त्यावर 46% लेव्ही देणे आवश्यक आहे. त्याबाबतची अभिलेखे व कंत्राटदारांना अदा केलेली देयके उपलब्ध नसल्याने सदरील शासन निर्णयाचे/ परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे. कंत्राटी वाहन चालकाने वाहन चालवलेले व त्या अनुषंगीक लॉगबुकला नोंदी घेतलेले वाहनांचे लॉगबुक उपलब्ध न झाल्याने सदरील वाहन चालकाला वेतन अदा केलेबाबतची खात्री झाली नाही.***

कंत्राटदाराचे नाव:- मे. के.आर. सोनावणे ॲण्ड सन्स

कामाची निविदा जाहिर प्रसिध्दी:- मनपा/वाहन/30/2014-15 दि.18/06/2014

काम प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्र व दिनांक:- दै.पुण्यनगरी व दै.फ्रि प्रेस जनरल, दि.02/07/2014

प्रशासकिय वित्तीय मंजूरी:- मा.आयुक्त यांची दि.12/08/2014.

स्थायी समिती मंजुरी:- ठराव क्र.59 दि.16/08/2014

कार्यादेश:- 1) मनपा/वाहन/94/2014-15 दि.25/08/2014, 2) मनपा/वाहन/132/2014-15 दि.15/11/2014, 3) मनपा/वाहन/69/2015-16 दि.04/08/2015.

| अ. क्र. | वाहन चालक वापरलेल्या विभागाचे नाव | मंजूर दर (दर महिना) | वाहन चालक संख्या | काम केलेला महिना | | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोव्हें.15 | डिसें. 15 | जाने. 16 | |
| 1. | मुख्य कार्यालय | 12545 | 6 | | 75270 | 75270 | 150540 |
| 2. | मिरारोड-पिकअप-वन विभाग | 12545 | 2 | 25090 | 25090 | 25090 | 75270 |
| 3. | ट्रक्टर-वन विभाग | 13995 | 2 | | 27990 | 27990 | 55980 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4. | भाईंदर(प.) जी-वन विभाग | 12545 | 1 | | 12545 | 12545 | 25090 |
| 5. | हायड्रॉक्लीक सिडी-वन विभाग | 14550 | 1 | 14550 | 14550 | 14550 | 43650 |
| 6. | आरोग्य विभाग (ऐपी पिपागो टेम्पो) | 12545 | 1 | | 12545 | 12545 | 25090 |
| 7. | रूग्णवाहिका व शववाहिनी | 13995 | 13 | | 181935 | 181935 | 363870 |
| 8. | स्व. इंदिरा गांधी रूग्णालय | 13995 | 3 | | 41985 | 41985 | 83970 |
| 9. | उप-आयुक्त (मु.) कार | 12545 | 1 | | 12545 | 12545 | 25090 |
| 10. | रूग्णवाहिका | 13995 | 2 | | 27990 | 27990 | 55980 |
| 11. | नगररचना | 12545 | 1 | | 12545 | 12545 | 25090 |
| 12. | नगररचना विभाग (कार) प्रति दिन | 435 | 1 | | 0 | 4350 (10 दिवस) | 4350 |
| 13. | जीप वन विभाग | 12545 | 1 | 25090 | | | 25090 |
| एकूण | | | | | | | 959060 |

उपरोक्त बाबींची तपासणी केली असता लेखापरिक्षणास खालील त्रुटी आढळुन आल्या.

1. सदरील कामाची मुळ निविदा नस्तीत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निविदा पध्दत ही ई-टेंडरींग पध्दतीने अवलंब झाला किंवा कसे याबाबत खात्री झाली नाही.

2. शासन निर्णय - पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 अन्वये जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु.50,00,001/- पेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग दैंनिकास देणे आवश्यक आहे. तसेच जिल्हास्तर–मराठी (1वृत्तपत्र) राज्यस्तर–मराठी (2 वृत्तपत्र), हिंदी (1वृत्तपत्र) व राष्ट्रीय स्तर-इंग्रजी (2वृत्तपत्र), हिंदी (1वृत्तपत्र) अशा प्रकारे निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. तरी सदर कामाची जाहिर निविदा ही दैनिक पुन्यनगरी व फ्रि प्रेस जनरल वृत्तपत्रात सुचना दिली आहे. तरी सदरील शासन निर्णयाचा अवलंब न करता निविदा प्रसिध्द केल्या आहेत.

3. कामगार किमान वेतन कायदा 1948 व परिपत्रक क्र.12(142)/11/MW/Lab/2023-47 दि.26/07/2011 तसेच Government of NCT of Delhi यांचे परिपत्रक क्र.F.No.12(142)/13/ mw/Lab/2231 दि.16/10/2015 नुसार कुशल कामगारांना किमान वेतन देणे आवश्यक असून त्यावर 46% लेव्ही देणे आवश्यक आहे. त्याबाबतची अभिलेखे व कंत्राटदारांना अदा केलेली देयके उपलब्ध नसल्याने सदरील शासन निर्णयाचे/परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे.

4. कंत्राटी वाहन चालकाने वाहन चालवलेले व त्या अनुषंगीक लॉगबुकला नोंदी घेतलेले वाहनांचे लॉगबुक उपलब्ध न झाल्याने सदरील वाहन चालकाला वेतन अदा केलेबाबतची खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.97 दि.26/04/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 22, Hmm No : 97)

## *53 महानगरपालिकेतील विविध विभागातील आणि विभाग यांना वार्षिक ठेका पध्दतीने वाहन पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : खाजगी गाडया भाडयाने महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 35000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 35000.00/-

***वापरण्यात आलेल्या भाडोत्री वाहनांचा परवाना लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यासाठी सूचित केलेले होते, परंतू उपलब्ध केला नाही. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. जीईएल-1093/2365/प्र.क्र.126/93 नवि-14 दि.20/10/93 मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जिल्हा परिवहन अधिका-याकडून या क्षेत्रातील कंत्राटदारांची यादी घेउन त्यांना स्वतंत्रपणे कळविणे आवश्यक होते, त्यामुळे स्पर्धा निर्माण होऊन त्याचा फायदा महानगरपालिकेस झाला असता, परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. याबाबतची मूळ निविदा कागदपत्रांची नस्ती उपलब्ध करण्यात न आल्याने निविदेतील अटी शर्ती नुसार पात्र ठरविण्यात आलेला ठेकेदार तांत्रिक अटींची पूर्तता करीत असल्याची कार्यवाही तपासता आली नाही. तसेच जाहिरातीचे कात्रण नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही. मासिक प्रकारानुसार केलेल्या कामाचे प्रदान करताना त्यासाबत आवश्यक ती कागदपत्रे उदा.वाहनाचे लॉगबुक, वाहन दुरुस्तीचे हिस्ट्रीशीट, केलेल्या कामाच्या अनुषंगाने किलो मीटरनुसार इंधनाचा झालेला वापर, प्रादेशिक परिवहन विभागाकडून दरवर्षी करण्यात आलेले वाहनांचे पासिंग, वाहन चालकांचे लायसन्स इ. बाबतची आवश्यक माहिती उपलब्ध नस्तीमध्ये पहावयास मिळाली नाही. वेतन अधिनियम 1948 नुसार ठेकेदाराकडून कामगाराना करण्यात येणा-या वेतन/मजूरीचे प्रदान प्रत्येकाच्या बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. तरी त्यानुसार केलेली कार्यवाही व अट क्र.27 नुसार एक ब्रेक डाऊन वाहन पुरविण्यात आल्याची माहिती उपलब्ध करण्यात आली नाही. प्रमाणक क्र.1090 दि.31/03/2016 मधील बिल क्र.V-8-15-10 दि.17/08/2003 अन्वये मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स या कंत्राट दाराने सादर केलेल्या या बिलानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील नगरसचिव विभागात अंजेडा व परिपत्रक वाटप***

***करिता लागणाऱ्या रिक्षाचे देयक कालावधी दि.24/07/2015 ते दि.02/09/2015 या कालावधी करीता प्रति दिन रु.875/- प्रमाणे 40 दिवस रिक्षा पुरविल्याबाबत बिल सादर केलेले असून त्यानुसार संबंधितास रक्कम रु.35,000/- चे प्रदान करण्यात आलेले आहे. रिक्षा पुरविणेबाबत पुरवठादारास देण्यात आलेले आदेश लेखापरिक्षणास आढळुन आलेले नाही. निवीदाकाराने करारनाम्यातील अटीनुसार वाहनाची मालकी पुरवठादाराची असणे आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन विभाग ठाणे यांच्या नियमानुसार टुरिस्ट परवाना असलेली वाहनेच शासकीय कामासाठी भाडयाने घेणे आवश्यक आहे. सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही केलेले अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्यामुळे आरटीओ, ठाणे यांचेकडील शासकीय कार्यालयासाठी वाहन भाडयाने घेणेबाबत असलेल्या नियमांचे पालन झाल्याबाबतची खात्री करता आली नाही.***

कामाचे नाव:- महानगरपालिकेतील विविध विभागातील आणि विभाग यांना वार्षिक ठेका पध्दतीने वाहन पुरवठा करणे.

मक्तेदाराचे नाव:- मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स

प्रशासकिय मंजुरी:- मा. स्थायी समिती सभा दि.26/02/2014 ठराव क्र.153 अन्वये निविदा मंजुर.

कार्यादेश:- मनपा/वाहन/250/2013-14 दि.05/03/2014

करारनामा दिनांक:- 05/03/2014

लेखाशिर्ष:- खाजगी गाडया भाडयाने घेणे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | वाहनाचा प्रकार | कामाचे नाव | परिमाण | कालावधी | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो | सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम) | 1 | दि.1/8/15 ते दि.30/9/15 | 67,240/- |
| 2 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | मालमत्ता कर वसुलीकरिता | 8 नग | दि.1/4/15 ते दि.15/4/15 | 1,15,920/- |
| 3 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | मालमत्ता कर वसुलीकरिता | 8 नग | दि.1/3/15 ते दि.31/3/15 | 2,32,000/- |
| 4 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | विविध विभागातील अधिकारी | 1 | दि.1/1/16 ते दि.31/1/16 | 3,43,500/- |
| 5 | | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | विविध विभागातील | 1 | दि.1/8/15 ते | 4,19,875/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अधिकारी | | दि.31/8/15 | |
| 6 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | आपतकालीन विभागाकरिता | 10/1 | दि.21/6/15 ते दि.30/9/15 | 3,86,640/- |
| 7 | 1090 | 31/03/2016 | स्विफ्ट डिझायर | वै. आरोग्य अधिकारी (भिवंडी) | 1 नग/ 129 अधिक कि.मी. | दि. 25/5/2015 | 3,590/- |
| 8 | 1090 | 31/03/2016 | ध्वनीक्षेपणासह रिक्षा एकुण- 4 नग | मालमत्ता कर वसुलीकरिता | 30/31 दिवस | दि.1/3/15 ते दि.31/3/15 | 1,59,900/- |
| 9 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | स्थायी समिती सभापती | 1 | दि.3/1/15 ते दि.2/7/15 | 1,94,196/- |
| 10 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | विविध विभागातील अधिकारी | 1 | दि.1/10/15 ते दि.31/10/15 | 4,04,416/- |
| 11 | 1090 | 31/03/2016 | टाटा सुमो (नॉन एसी) | विविध विभागातील अधिकारी | 1 | दि.1/11/15 ते दि.30/11/15 | 3,61,854/- |

महानगरपालिकेतील विविध विभागातील अधिकारी आणि विभाग यांना ठेका पध्दतीने वाहन उपलब्ध करून देणाऱ्या नस्ती व माहे मार्च मधील देयकांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटी बाबत खालीलप्रमाणे लेखापरिक्षण आक्षेप आहेत.

1. वापरण्यात आलेल्या भाडोत्री वाहनांचा परवाना लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यासाठी सूचित केलेले होते, परंतू उपलब्ध केला नाही.

2. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.जीईएल-1093/2365/प्र.क्र.126/93 नवि-14 दि.20/10/93 मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जिल्हा परिवहन अधिका-याकडून या क्षेत्रातील कंत्राटदारांची यादी घेउन त्यांना स्वतंत्रपणे कळविणे आवश्यक होते,त्यामुळे स्पर्धा निर्माण होऊन त्याचा फायदा महानगरपालिकेस झाला असता, परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. याबाबतची मूळ निविदा कागदपत्रांची नस्ती उपलब्ध करण्यात न आल्याने निविदेतील अटी शर्ती नुसार पात्र ठरविण्यात आलेला ठेकेदार तांत्रिक अटींची पूर्तता करीत असल्याची कार्यवाही तपासता आली नाही. तसेच जाहिरातीचे कात्रण नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

4. मासिक प्रकारानुसार केलेल्या कामाचे प्रदान करताना त्यासाबत आवश्यक ती कागदपत्रे उदा.वाहनाचे लॉगबुक, वाहन दुरुस्तीचे हिस्ट्रीशीट, केलेल्या कामाच्या अनुषंगाने किलो मीटरनुसार इंधनाचा झालेला वापर, प्रादेशिक परिवहन विभागाकडून दरवर्षी करण्यात आलेले वाहनांचे पासिंग, वाहन चालकांचे लायसन्स इ. बाबतची आवश्यक माहिती उपलब्ध नस्तीमध्ये पहावयास मिळाली नाही. वरील अटीची पूर्तता होत असल्याची खात्री लेखापरीक्षणात करण्यात आलेली नाही.

5. वेतन अधिनियम 1948 नुसार ठेकेदाराकडून कामगाराना करण्यात येणा-या वेतन/मजूरीचे प्रदान प्रत्येकाच्या बॅंक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. तरी त्यानुसार केलेली कार्यवाही व अट क्र.27 नुसार एक ब्रेक डाऊन वाहन पुरविण्यात आल्याची माहिती उपलब्ध करण्यात आली नाही.

6. प्रमाणक क्र.1090 दि.31/03/2016 मधील बिल क्र.V-8-15-10 दि.17/08/2003 अन्वये मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स या कंत्राटदाराने सादर केलेल्या या बिलानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील नगर-सचिव विभागात अंजेडा व परिपत्रक वाटप करिता लागणाऱ्या रिक्षाचे देयक कालावधी दि.24/07/2015 ते दि.02/09/2015 या कालावधी करीता प्रति दिन रु.875/- प्रमाणे 40 दिवस रिक्षा पुरविल्याबाबत बिल सादर केलेले असून त्यानुसार संबंधितास रक्कम रु.35,000/- चे प्रदान करण्यात आलेले आहे. रिक्षा पुरविणेबाबत पुरवठादारास देण्यात आलेले आदेश लेखापरिक्षणास आढळुन आलेले नाही. यावरून सदर वाहने ही पुरवठा दाराने कोणत्याही कार्यादेशाशिवाय पुरविलेले आहेत. सदर रक्कम रु.35,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. तसेच उपरोक्त सादर केलेले बिल हे दि.17/08/2003 असे दिनांकित केलेले असून कालावधी हा जुलै 2015 ते सप्टेंबर 2015 असल्याबाबत दिसून येते तरी याबाबत खुलासा करण्यात यावा.

7. निवीदाकाराने करारनाम्यातील अटीनुसार वाहनाची मालकी पुरवठादाराची असणे आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन विभाग ठाणे यांच्या नियमानुसार टुरिस्ट परवाना असलेली वाहनेच शासकीय कामासाठी भाडयाने घेणे आवश्यक आहे. उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही केलेले अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्यामुळे आर.टी.ओ, ठाणे यांचेकडील शासकीय कार्यालयासाठी वाहन भाडयाने घेणेबाबत असलेल्या नियमांचे पालन झाल्याबाबतची खात्री करता आली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.94 दि.22/04/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 53, Hmm No : 94)

## ***54 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.***

मिरा -भाईंदर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : वृक्षारोपण करणे महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

गुंतलेली रक्कम रु. 4472500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4472500.00/-

***तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तापित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत निविदा नस्ती मध्ये आढळली नाही. कामाची जाहिर निविदा सुचना हि दै. लक्षव्दिप, साप्ताहिक ठाणे की आवाज या वर्तमानपत्रात दिली असून शासन निर्णय – पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 नुसार विभागाने शासन निर्णयाचा अवलंब न केल्याने सदरील कामास स्पर्धा झालेली दिसून येत नाही. उदयान विभागाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग (उदयान, मुंबई) विभागाचे सन 2015-16 मधील दरपत्रकांची खात्री न करता निविदा मागवली असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेला सदरील शासनाच्या दराचा वाजवी फायदा झालेला नाही. सदरील वृक्षारोपण हे 45 दिवसात करण्यात यावे असे करारपत्रात नमूद केले असून सदरील वृक्षारोपण 45 दिवसात केलेबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. तरी सदरील करारनाम्यातील अटीची विभागाने अमंलबजावणी केलेबाबतची लेखापरिक्षणास खात्री झालेली नाही. तसेच सदरील वृक्षारोपण करणेसाठी दिलेल्या कालावधीत वृक्षारोपण झालेबाबत तसा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तापित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत निविदा नस्ती मध्ये आढळली नाही. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता मोजमाप पुस्तिकेत सदरील वृक्षारोपण तारखेनिहाय केलेबाबतची नोंद नसल्याने सदरील काम हे विहित वेळेत पूर्ण झालेबाबत खात्री झाली नाही.***

जाहिरात प्रसिध्दी:- MBMC/Tree Authority/62/2015-16 दि.15/05/2015
कंत्राटदार:- मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस
वृक्षप्राधिकरण समिती मंजूरी:- ठराव क्र.3 दि.30/05/2015
कामाची जाहिरात प्रसिध्दी:- दै. लक्षव्दिप व साप्ताहिक ठाणे की आवाज व E-Tendering
प्रशासकिय मंजूरी:- आयुक्त दि.08/06/2015
स्थायी समिती मंजूरी:- ठराव क्र.41 दि.17/06/2015
कामाची रक्कम:- 44,72,500/-

करारनामा:- दि.20/06/2015 सचिव दि.07/07/2015
कार्यादेश:- मनपा/वृ.प्रा./165/2015-16 दि.20/06/2015

निविदेचे मंजूर दर

| Sr. No. | Work Description | Tree Verities | Quantity | Approval Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Digging of pid size 0.75m x 0.75m x 0.75m removal of debris murum and waste material disposal of excavated material away from plantation site filling of good garden soil and manure, leveling and plantation (plant height 8-10 feet) staking with bamboo stick 1 feet taller than plant height. Watering and maintenance for 6 month (weeding, insecticide, pesticide, fungicide spray, fertilizer application etc.) Top dressing with soil and manure, cutting and replacement of damaged plants etc. | वनिकरणाची रोपे (Forest Plant) Peltophorum, ashok, gulmohar lagistromia, rosia, alstonia, etc. | 1800 Nos. | रु.1850 | रु.3330000 |
| | | Wad, Pimpal, Umbar | 100 Nos. | रु.2300 | रु.230000 |
| | | Samudrafal | 250 Nos. | रु.2690 | रु.672500 |
| | | Coconut | 100 Nos. | रु.2400 | रु.240000 |
| | | | | Total | 4472500 |

1. सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करुन प्रस्तापित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत निविदा नस्ती मध्ये आढळली नाही.

2. शासन निर्णय - महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. तरी सदर कामाची जाहिर निविदा सुचना हि दै. लक्षव्दिप, साप्ताहिक ठाणे की आवाज या वर्तमानपत्रात दिली असून सदर शासन निर्णयाचा अवलंब न केल्याने सदरील कामास स्पर्धा झालेली

दिसून येत नाही.

3. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. असे असतांना विभागाने वृक्षारोपण करणेसाठी दर बाजारभावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. केवळ त्याचप्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु उदयान विभागाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग (उदयान, मुंबई) विभागाचे सन 2015-16 मधील दरपत्रकांची खात्री न करता निविदा मागवली असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेला सदरील शासनाच्या दराचा वाजवी फायदा झालेला नाही.

5. सदरील वृक्षारोपण हे 45 दिवसात करण्यात यावे असे करारपत्रात नमूद केले असून सदरील वृक्षारोपण 45 दिवसात केलेबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. तरी सदरील करारनाम्यातील अटीची विभागाने अमंलबजावणी केलेबाबतची लेखापरिक्षणास खात्री झालेली नाही. तसेच सदरील वृक्षारोपण करणेसाठी दिलेल्या कालावधीत वृक्षारोपण झालेबाबत तसा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

6. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम 165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरिक्षण करून प्रस्तापित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्या आधारे कामाच्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना सदर अहवालाची प्रत निविदा नस्ती मध्ये आढळली नाही.

7. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता मोजमाप पुस्तिकेत सदरील वृक्षारोपण तारखेनिहाय केलेबाबतची नोंद नसल्याने सदरील काम हे विहित वेळेत पूर्ण झालेबाबत खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.99 दिनांक 26/04/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 24, Hmm No : 99)

## ***55 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 50 कोटींपेक्षा अधिक खरेदी विक्री अथवा विक्रीची उलाढाल केलेल्या व्यापाऱ्यांचे कर निर्धारण (Assessment) केले नसलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिका क्षेत्रातील 50 कोटींपेक्षा अधिक खरेदी विक्री अथवा उलाढाल केलेल्या व्यापाऱ्यांची संख्या ही 14 (चौदा) असून सदर व्यापाऱ्यांचे महानगरपालिकेने कर निर्धारण (Assessment) केले नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थानिक संस्था कर विभागाचे सन 2015-16 चे लेखापरिक्षण केले असता, खालील अनियमितता आढळून आल्या.

1. महानगरपालिका क्षेत्रातील 50 कोटींपेक्षा अधिक खरेदी विक्री अथवा उलाढाल केलेल्या व्यापाऱ्यांची संख्या ही 14 (चौदा) असून सदर व्यापाऱ्यांचे महानगरपालिकेने कर निर्धारण (Assessment) केले नसल्याने, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.89 दि.01/08/2015 नुसार कार्यवाही न केल्याने महानगरपालिका क्षेत्रातील 14 व्यापारी यांचे सन 2015-16 च्या उलाढालीचे लेखापरिक्षण करता आले नाही.

2. 14 व्यापाऱ्यांकडून सन 2015-16 मधील स्थानिक संस्था कर यांचेकडून मागणी किती होती व किती वसूली झाली याबाबतची अभिलेखे उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षणास सदरील मागणी व वसूलीची खात्री झाली नाही.

3. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 210 च्या नियम 3 मधील उपनियम (1) व कलम 152-प., 152-र. प्रकरण अकरा (अ), 152-स. (व्यापाऱ्यांचे कर निर्धारण) करणे या कलमान्व्ये कार्यवाही केले बाबतची अभिलेखे उपलब्ध न झाल्याने सदरील नियम व अधिनियमांबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास क्र.102 दि.09/05/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 25, Hmm No : 102)

## *56 स्थानिक स्वराज्य संस्था कर नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून वार्षिक विवरणपत्रे मुदतीत प्राप्त न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 50680000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 50680000.00/-

***स्थानिक संस्था कर विभाग अधिसूचना क्र.209/प्र.क्र.209/प्र.क्र.65/09/न.वि-34 दि.25/03/2010 नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) दि.01/11/2012 पासून स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला. विभागाने रोख पुस्तकाप्रमाणे स्थानिक संस्था कराची दि.30 मार्च 2016 अखेर शिल्लक व बँक विवरणपत्राप्रमाणे शिल्लक याबाबतचे अभिलेखे व स्थानिक संस्था कर लागू केल्यानंतर 1 महिन्याच्या आत नोंद न केल्याने व्यापाऱ्याकडून आकारल्याच्या दंडाबाबतचे अभिलेखे तसेच नियम क्र.10 अन्वये, नियम क्र.3 च्या उपनियम 2 अन्वये व्यापाऱ्याकडून सुरक्षा ठेव घेणेबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या माहिती नुसार सन 2015-16 मध्ये एकूण 10686 व्यापाऱ्यांनी कर भरण्यासाठी नोंदणी केली त्यापैकी 550 व्यापाऱ्यांनी विवरणपत्रे सादर केली. उर्वरित 1136 व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्र विहित मुदत सादर न केल्यामुळे त्यांना वाजवी संधी दिल्यानंतर रु.5000/- पर्यंत जास्तीची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे. सन 2015-16 मध्ये एकूण 371 व्यापाऱ्यांचे कर निर्धारण प्रलंबित आहे. परिणामी करावरील महसुलापासून महानगरपालिका वंचित आहे. पात्र नोंदणी धारक 10686 असून सन 2015-16 मध्ये प्राप्त विवरणपत्र संस्था 550 असून त्यापैकी सन 215-16 मध्ये फक्त 179 व्यापाऱ्याचे कर निर्धारण झाल्याचे दिसून येते.***

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थानिक संस्था कर विभागाचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. स्थानिक संस्था कर विभाग अधिसूचना क्र.209/प्र.क्र.209/प्र.क्र.65/09/न.वि-34 दि.25/03/2010 नुसार महाराष्ट महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) दि.01/11/2012 पासून लागू करण्यात आला. त्यानुसार नोंदणी झालेल्या व्यापारी परस्पर बँकामध्ये चलनाव्दारे स्थानिक संस्था कर जमा करतात, आर्थिक वर्ष संपल्यावर त्यांच्या विक्रीच्या अनुषंगाने कराचे निर्धारण केले जाते. रोख पुस्तकाप्रमाणे स्थानिक संस्था कराची 31 मार्च 2016 अखेर शिल्लक व बँक विवरणपत्राप्रमाणे शिल्लक याबाबत लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध झालेले नाही.

2. स्थानिक संस्था कर दि.01/11/2012 पासून लागू असून त्यानंतर 1 महिन्याच्या आत व्यापाऱ्यांनी महानगरपालिकेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केल्याचे व अभय योजना लागू केली असल्यास त्यापूर्वी किती व्यापाऱ्यांकडून दंड वसूल केला याचे लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध झालेले नाही.

3. नियम क्र.10 अन्वये व्यापाऱ्यांना नोंदणी प्रमाणपत्र देताना नियम क्र.3 च्या उपनियम 2 अन्वये नोंदणीस पात्र ठरलेल्या व्यापाऱ्यांकडून स्थानिक संस्था कर व्याज अथवा दंडाची रक्कम समायोजित

करण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी ठरवून दिलेल्या दिनांकापर्यंत सुरक्षा ठेव रक्कम म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून सन 2015-16 मध्ये सुरक्षा ठेवीची किती रक्कम स्वीकारली आहे याबाबत लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध झालेले नाही.

4. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कर लागू झालेल्या दिनांकापासून (दि.01/11/2012 पासून) सन 2015-16 या आर्थिक वर्षा अखेर महानगरपालिका हद्दीत असलेल्या व्यापाऱ्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील नियम क्र.3 अन्वये किंवा नियम क्र.5 च्या पोटनियम 7 अन्वये नोंदणीस किवा पात्र असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्यांनी नियम क्र.29 अन्वये नमुना ड-2 मध्ये वार्षिक विवरणपत्रे वर्षे संपल्यानंतर 15 दिवसाच्या आत तसेच आयात करीत नसलेल्या व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्र निरंक दाखवून आयुक्तास सादर करणे आवश्यक आहे. तथापि विभागाकडून उपलब्ध माहितीनुसार स्थानिक संस्था कर विभागाकडे एकूण 10686 वित्तीय वर्षे सन 2015-16 साठी कर भरणसाठी नोंदणी केली असून त्यापैकी एकूण 550 व्यापाऱ्यांनी विवरणपत्रे विभागास सादर केल्याचे दिसून येते. उर्वरित 10136 नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहित कालावधीत म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर 5000 रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम शास्ती म्हणून वसूल होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील व्यापाऱ्यांकडून शास्तीची रक्कम रु.5,000/- प्रमाणे रु.10136 X 5000 = 5,06,80,000/- एवढी रक्कम प्रत्यक्ष किंवा मालमत्ता कराचे स्वरुपात वसूल करुन महानगरपालिका निधीमध्ये जमा होणे आवश्यक आहे.

5. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम क्र.33 नुसार आयुक्त व्यापाऱ्यांना नमुना 'ख' मध्ये नोटिस देवून नोटिसीच्या अनुपालनाकरीता नोटीस बजावयांच्या दिनांकापासून 15 दिवसापेक्षा अधिक नसेल हे निश्चित करून त्याव्दारे अशा संबंधित निर्धारणाच्या वर्षाच्या अंतिम दिनांकापासून 5 वर्षाच्या आत व्यापाऱ्याने निर्धारण करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश असताना उपलब्ध केलेल्या माहितीनुसार वित्तीय वर्षे सन 2015-16 मधील एकूण 371 व्यापाऱ्यांचे कर निर्धारण प्रलंबित आहे असे महानगरपालिकेने पुरविलेल्या अभिलेखावरुन आढळून आले आहे. परिणामी करावरील महसुलापासून महानगरपालिका वंचित आहे. पात्र नोंदणी धारक 10686 असून सन 2015-16 मध्ये प्राप्त विवरणपत्र संस्था 550 असून त्यापैकी सन 215-16 मध्ये फक्त 179 व्यापाऱ्याचे कर निर्धारण झाल्याचे दिसून येते.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.101 दि.07/05/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 73, Hmm No : 101)

### *57 मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग संचलित प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना शालेय दप्तरे व पाण्याच्या बाटल्या वाटप करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : शालेय साहित्य वाटप महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 3336858.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3336858.00/-

***कामाची जाहिर निविदा सुचना हि यशोभूमी व समाधिप्रकाश या वर्तमानपत्रात दिली असून शासन निर्णय – पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 चा अवलंब न केल्याने सदरील कामास स्पर्धा झालेली दिसून येत नाही. शासन निर्णय दि.2/01/1992 मधील परि.8.6 नुसार साहित्य पुरवठा प्राप्त झाल्यापासून 15 दिवसाच्याआंत तपासणी करणे आवश्यक आहे. निविदा अटी व शर्ती नुसार दप्तरे व पाण्याच्या बाटल्या अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. निविदा प्रक्रियेमध्ये उपरोक्त अटीची पूर्तता होत नसतानाही दराचा लिफाफा उघडून निविदाधारक अंतिम करण्यात आला आहे. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. दप्तरे व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेसाठी दप्तरे व पाण्याच्या बाटल्या दर बाजारभावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. केवळ त्याचप्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु शिक्षण विभागाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. तरी परिपत्रकातील तरतुदींचे उल्लंघन झाले असून सदोष निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे. वित्तीय वर्ष 2015-16 साठी दप्तरे व पाण्याच्या बाटल्या पुरवठ्याबाबत निविदा प्रसिद्ध करण्यापूर्वी शेड्युल बी नुसार दप्तरे व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेसाठी निविदेमध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु सदर साहित्याची गुणवत्तेविषयक मानके शासनमान्य संस्थेकडून मान्यता किंवा त्यांच्या सल्ल्यानुसार घेवून तयार करण्यात आली किंवा कसे याबबत***

***लेखापरीक्षणास खुलासा करण्यात आला नाही. पुरवठादाराने शाळा निहाय वाटप केलेल्या लेखन साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी लेखन साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन साहित्य पुरवठा व वाटप योग्यतेची तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही. मा. महासभा ठराव क्र.74 दि.23/03/2015 मध्ये नमूद केल्या प्रमाणे शैक्षणिक साहित्य शाळा सुरू झाल्यानंतर 15 दिवसाच्या आत वितरित करण्यात यावे असे असून सदरील साहित्य कंत्राटदाराने पुरवठा केलेबाबतची चलने व साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध नसल्याने सदरील ठरावाची लेखापरिक्षणाकडून खात्री झाली नाही. सदरील कामाच्या खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध न करून दिल्याने कंत्राट दाराला देयक अदा केलेबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.***

प्रशासकिय व आर्थिक मंजूरी:- महासभा ठराव क्र.74 दि.23/03/2015
ई-टेंडरींग मंजूरी:- आयुक्त दि.10/04/2015
जाहिरात प्रसिध्दी:- यशोभूमी व समाधिप्रकाश दि.16/04/2015
आयुक्तांची खर्चास मंजूरी:- दि.08/05/2015
खर्चास मंजूरी:- स्थायी समिती ठराव क्र.14 दि.08/05/2015
न्युनतम निविदार:- मे. भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ
करारनामा:- दि.08/06/2015
कार्यादेश:- मनपा/शिमं/298/2015-16 दि.11/06/2015
मंजूर रक्कम:- रु.33,36,858/-

| इयत्ता | मुले | मुली | एकूण मुले/मुली | दप्तर व पाण्याची बाटली दर प्रती संच | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 554 | 556 | 1110 | 318.50 | 353535 |
| 2 | 585 | 705 | 1290 | 318.50 | 410865 |
| 3 | 637 | 722 | 1359 | 351.80 | 478096.20 |
| 4 | 647 | 815 | 1462 | 351.80 | 514331.60 |
| 5 | 606 | 633 | 1239 | 391.00 | 484449.00 |
| 6 | 558 | 728 | 1286 | 391.00 | 502826.00 |
| 7 | 537 | 621 | 1188 | 391.00 | 464508.00 |
| 8 | 137 | 191 | 328 | 391.00 | 128248.00 |
| एकूण | 4291 | 4971 | 9262 | | 3336858.80 |

सदरील कामाची दस्तऐवज/अभिलेखे व निविदा नस्ती यांच्या मुळ प्रति लेखा परिक्षणास

दाखविण्यात आल्या नाहित. तसेच सदरील कामाची निविदा नस्ती व त्या अनुषंगीक अभिलेखे यांची छायांकित प्रत लेखापरिक्षणास दिलेल्या आहेत, त्यानुसार खालील अनियमितता आढळून आल्या.

1. शासन निर्णय - पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 अन्वये जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु.50,00,001/- पेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग दैंनिकास देणे आवश्यक आहे. तसेच जिल्हास्तर–मराठी (1वृत्तपत्र) राज्यस्तर–मराठी (2 वृत्तपत्र), हिंदी (1वृत्तपत्र) व राष्ट्रीय स्तर-इंग्रजी (2वृत्तपत्र), हिंदी (1वृत्तपत्र) अशा प्रकारे निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. तरी सदर कामाची जाहिर निविदा सुचना हि यशोभूमी व समाधिप्रकाश या वर्तमानपत्रात दिली असून सदर शासन निर्णयाचा अवलंब न केल्याने सदरील कामास स्पर्धा झालेली दिसून येत नाही.

2. शासन निर्णय दि.2/01/1992 मधील परि.8.6 नुसार साहित्य पुरवठा प्राप्त झाल्यापासून 15 दिवसाच्या आंत तपासणी करणे आवश्यक आहे. उपरोक्त तरतुदीप्रमाणे तपासणी करण्यात आली नाही. पुरवठा कालावधीत दप्तरे व पाण्याच्या बाटल्या पुरवठा विनिर्देशानुसार प्राप्त होत असल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3. निविदा अटी व शर्ती नुसार दप्तरे व पाण्याच्या बाटल्या अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. निविदा प्रक्रियेमध्ये उपरोक्त अटीची पूर्तता होत नसतानाही दराचा लिफाफा उघडून निविदाधारक अंतिम करण्यात आला आहे. या बाबत अधिकृत मूळ उत्पादक/मूळ उत्पांदकाने नियुक्त केलेला वितरक असल्याबाबतच्या प्रमाणपत्रासह अनुपालन सादर करावे.

4. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र. 4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि.3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबींच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथःकरण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. दप्तरे व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेसाठी दप्तरे व पाण्याच्या बाटल्या दर बाजारभावानुसार न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निश्चित करण्यात आली आहे. केवळ त्याचप्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आले. परंतु शिक्षण विभागाने स्वतःचे दर बाजारभावानुसार निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आली असून अंदाजपत्रकीय रक्कम अचूक निश्चित झाली असल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. उपरोक्त परिपत्रकातील तरतुदींचे उल्लंघन झाले असून सदोष निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे.

5. वित्तीय वर्ष 2015-16 साठी दप्तरे व पाण्याच्या बाटल्या पुरवठ्याबाबत निविदा प्रसिद्ध करण्यापूर्वी

शेड्युल बी नुसार दप्तरे व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेसाठी निविदेमध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु सदर साहित्याची गुणवत्तेविषयक मानके शासनमान्य संस्थेकडून मान्यता किंवा त्यांच्या सल्ल्यानुसार घेवून तयार करण्यात आली किंवा कसे याबबत लेखापरीक्षणास खुलासा करण्यात आला नाही.

6. पुरवठादाराने शाळा निहाय वाटप केलेल्या लेखन साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी लेखन साहित्याची साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन साहित्य पुरवठा व वाटप योग्यतेची तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.

7. मा.महासभा ठराव क्र.74 दि.23/03/2015 मध्ये नमूद केल्या प्रमाणे शैक्षणिक साहित्य शाळा सुरू झाल्यानंतर 15 दिवसाच्या आत वितरित करण्यात यावे असे असून सदरील साहित्य कंत्राटदाराने पुरवठा केलेबाबतची चलने व साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध नसल्याने सदरील ठरावाची लेखापरिक्षणाकडून खात्री झाली नाही.

8. सदरील कामाच्या खर्चाची प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध न करून दिल्याने कंत्राट दाराला देयक अदा केलेबाबत लेखापरिक्षणाला खात्री झाली नाही.

सदरील आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.105 दिनांक 16/05/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 28, Hmm No : 105)

## ***58 मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विदर्यार्थ्यांची दि.30/09/2015 अखेर पटपडताळणी न केल्याने शिक्षकांची पदे निश्चिती झाली नसलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्णय क्र. जीआई-1993/221/प्राशि-1 दि.30/01/1996 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाने शाळा माध्यमनिहाय शिक्षक निश्चिती व एकत्रित गोषवारा, शिक्षण उपसंचालक बृहन्मुंबई यांचेकडून तपासणी करून घेतलेला नाही. त्यामुळे शिक्षकांची निश्चित पदे व अतिरिक्त पदे याबाबत खात्री झालेली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेचे लेखा परीक्षण केले असता मनपा शिक्षण विभागाने पटपडताळणी न केल्याने प्राथमिक शिक्षण विभागात मराठी माध्यमाच्या 21 शाळा व हिन्दी माध्यमाच्या 05 शाळा, गुजराती माध्यमाची 05 शाळा व उर्दू माध्यमाच्या 05 शाळा अशा एकूण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व माध्यमाच्या 36 शाळा असून दि.30 सप्टेंबर 2015 च्या विद्यार्थी पट संख्या व सरासरी उपस्थितीनुसार शिक्षक संख्या निश्चित करणे आवश्यक होते, त्याप्रमाणे केले नाही तरी मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा माध्यमनिहाय शिक्षक निश्चिती व एकत्रित गोषवारा शिक्षण उपसंचालक बृहन्मुंबई यांचेकडून शासनमान्य पायाभूत पदे/आवश्यक पदे प्रत्यक्ष कार्यरत पदे असा माध्यमनिहाय शिक्षक निश्चिती गोषवारा उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे तपासून घेतलेला नाही. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका मधील प्राथमिक शिक्षकांची निश्चित पदे व अतिरिक्त पदे किती आहे याबाबत लेखापरिक्षणास खात्री झालेली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.109 दि.17/05/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

REVTVMM8801 (Ref No : 37, Hmm No : 109)

## *59 शिक्षण विभागाच्या कर्मचारी/अधिकाऱ्यांकडून प्रतिभूती न घेतल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***प्रशासन अधिकारी तसेच कर्मचारी वृंदाकडून प्रतिभूती घेतलेली नसून विहीत नमुन्यात नोंदवही ठेवलेली नाही.***

मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 मधील नियम 65 नुसार शासनाने नियुक्त केलेल्या प्रशासन अधिकाऱ्याने परिशिष्ट फ नुसार राज्यपालांच्या नांवे रु.2000/- रक्कमेच्या जात मुचलक्याचा नमुना राज्यपालांच्या नांवे भरुन देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 मधील कलम 80(अ) अन्वये रोखपाल, भांडारपाल, उपभांडारपाल, मुद्रांक लिपिक तसेच ज्यांच्याकडे स्वायत्त संस्थेच्या वतीने रक्कमा जमा करणे ताब्यात ठेवणे हे काम सोपविण्यात आले आहे. असे कर्मचारी किंवा ज्यांच्याकडे स्वायत्त संस्थेच्या मालकीची मालमत्ता सोपविली आहे. त्यांनी परिस्थितीप्रमाणे नियमीत केलेल्या व सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेल्या नमुन्यात जमानत किंवा प्रतिभूती देणे आवश्यक आहे. कामावर हजर झाल्यापासून 30 दिवसांचे आत प्रतिभूती घेवून त्याबाबतची नोंदवही महाराष्ट्र नगरपलिका लेखा संहिता 1971 मधील

नियम 138 प्रमाणे विहीत नमूना 106 मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

शिक्षण विभागाचे अधिनस्त 34 शाळा आहेत. शाळांमधील मुख्याध्यापकांचे/कर्मचाऱ्यांचे तसेच प्रशासन अधिकाऱ्यांचे प्रतिभूती कागदपत्र व नोंदवहीबाबतचे अभिलेखे उपलब्ध करून दिली नाहीत. त्यावरुन असे निदर्शनास येते की, शिक्षण विभागांर्तगत प्रशासन अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकारी तसेच लेखापाल, रोखपाल, भांडारपाल व मुद्रांक लिपीक तसेच 34 शाळांमधील मुख्याध्यापक व रोखपाल या कर्मचारी वृन्दांकडून प्रतिभूती घेतलेली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.124 दि.14/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

REVTVMM8801 (Ref No : 40, Hmm No : 124)

## *60 सेवापुस्तकातील नोंदी अदयावत नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***रजेच्या नोंदीखाली प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे लेखा परिक्षणास रजेविषयी खात्री झाली नाही. वेतन वाढ मंजूर केल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी या रखान्यामध्ये सेवापुस्तकात संबंधितांची स्वाक्षरी नाही. वेतन निश्चिती, वेतन निश्चिती मंजूर केल्याबाबतच्या आदेशाची नोंद व सही सेवापुस्तकामध्ये नाही. जातीच्या प्रमाणपत्राची नोंद, पदवीत्तर अर्हता आणि नावात बदल या नोंदीखाली सही नाही. सहाव्या वेतन आयोगानुसार विकल्पाचा नमूना संबंधितांकडून भरून घेतला असून सहावा वेतन आयोग कधीपासून लागू करावा याबाबतचा विकल्प प्रमाणपत्रात सिलेक्ट केलेला नाही. प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतच्या नोंदीखाली, रजा लेखेखाली प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. संगणक अर्हता इ. नोंद सेवापुस्तकात नाही. मृत्यू उपदान, कुटुंब निवृत्ती वेतन, भनिनि इ. बाबतच्या नामनिर्देशनाच्या नोंदी सेवापुस्तकात नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाचे सन 2015-16 चे लेखापरिक्षण करत असताना उपलब्ध करून दिलेल्या शिक्षकांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आलेल्या आहेत.

1. सौ. समिरा हेमंत अधिकारी, उपशिक्षिका

(1) दि.09/09/2000 ते दि.07/12/2000 = 90 दिवस रजा, दि.30/05/2006 ते दि.10/06/2006 = 11 दिवस प्रशिक्षण रजा, वैदयकिय रजा दि.21/06/2011 ते दि.01/07/2011, दि.05/06/2005 ते दि.02/09/2005 = 90 दिवस रजा, दि.03/09/2005 ते दि.17/10/2005 वैदयकिय रजा, जनगणनेची रजा दि.10/05/2010 ते दि.12/06/2010 या रजेच्या नोंदी सेवापुस्तकात आढळुन आलेल्या आहेत, परंतु या रजेच्या नोंदीखाली प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे लेखा परिक्षणास रजेविषयी खात्री झाली नाही.

(2) वेतन वाढ मंजूर केल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी या रखान्यामध्ये सेवापुस्तकात संबंधितांची स्वाक्षरी नाही.

(3) सौ. समिरा हेमंत अधिकारी, उपशिक्षिका यांना दि.01/07/2012 रोजी कालबध्द पदोन्नतीची वेतन श्रेणी दिलेली आहे याबाबतची वेतन निश्चिती, वेतन निश्चिती मंजूर केल्याबाबतच्या आदेशाची नोंद व सही सेवापुस्तकामध्ये नाही.

(4) जातीच्या प्रमाणपत्राची नोंद, पदवीत्तर अर्हता आणि नावात बदल या नोंदीखाली सही नाही.

(5) रजा लेखा दि.31/12/2017 पर्यंत आहे, रजा लेखा अपूर्ण आहे. प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

2. ममता तेजस यादव, उपशिक्षिका

(1) पदवीत्तर अर्हता, कालबध्द पदोन्नती, रजा या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेण्यात आलेल्या आहेत, परंतू प्रशासन अधिकारी यांची नोंदीखाली स्वाक्षरी नाही.

(2) संगणक अर्हता परिक्षा उत्तिर्ण/सुट दिल्याबाबत सेवापुस्तकात नोंद नाही.

3. प्रज्ञा प्रविण माडिये (उर्फ) मंगला परशुराम नाईक, उपशिक्षिका

(1) सहाव्या वेतन आयोगानुसार विकल्पाचा नमूना संबंधितांकडून भरून घेतला असून सहावा वेतन आयोग कधीपासून लागू करावा याबाबतचा विकल्प प्रमाणपत्रात सिलेक्ट केलेला नाही.

(2) जात प्रमाणपत्र पडताळणीची सेवापुस्तकात नोंद घेण्यात आलेली नाही.

(3) दि.01/01/2017 पासून पुढील रजा लेखा अपूर्ण आहेत.

4. सिंह सत्यप्रकाश रामजनम, शिक्षक

(1) सेवापुस्तकात वेतन वाढीच्या नोंदीपुढे संबंधितांची स्वाक्षरी नाही.

(2) दि.01/07/2012 रोजी वरीष्ठ वेतन श्रेणी दिलेली असून मंजूरी आदेश इ. नोंद सेवापुस्तकात नाही.

(3) रजेच्या नोंदीखाली प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

(4) संगणक अर्हता, जात प्रमाणपत्र इ. बाबतच्या नोंदी सेवापुस्तकात नाही.

5. शिला केतन तन्ना, सहा. शिक्षक

(1) दि.01/07/2014 पासून वरीष्ठ श्रेणी मंजूर केल्याबाबतचे आदेश वेतन निश्चिती याची नोंद सेवापुस्तकात नाही.

(2) प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतच्या नोंदीखाली, रजा लेखेखाली प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

(3) संगणक अर्हता इ. नोंद सेवापुस्तकात नाही.

6. श्रध्दा संजय दोंदे, उपशिक्षिका

(1) दि.01/07/2015 रोजी वरीष्ठ श्रेणी सेवापुस्तकात दर्शवलेली आहे, परंतू याबाबतचे मंजूरी आदेश, वेतन निश्चिती इ. नोंद सेवापुस्तकात नाही.

(2) वेतन वाढ दिल्याच्या नोंदीपुढे संबंधित कर्मचाऱ्याची स्वाक्षरी नाही.

(3) संगणक अर्हता बाबतच्या नोंदी सेवापुस्तकात नाही.

7. सौ. लता दशरथ धोडिया, उपशिक्षिका

(1) रजा लेखा दि.31/12/2017 पर्यंत आहे, पुढील रजा लेखा नाही आणि रजा लेखाखाली संबंधितांची स्वाक्षरी नाही.

(2) वेतन वाढीनंतर कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही.

(3) मृत्यू आणि सेवानिवृत्ती उपदान, कुटुंब निवृत्ती वेतन यासाठीच्या नामनिर्देशन नोंदी सेवापुस्तकात नाही.

(4) संगणक अर्हतेबाबत सेवापुस्तकात नोंद नाही.

8. सौ. गिता तुकाराम गायकवाड, उपशिक्षिका

(1) कुटुंब निवृत्ती वेतनासाठीचे नामनिर्देशन सेवापुस्तकात नोंद नाही.

(2) रजा लेखा दि.31/12/2016 पर्यंत आहे, पुढील रजा लेखा नाही, प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी लेखेखाली नाही.

9. श्रीम. वर्षा उत्तम काटकर, सहा. शिक्षिका

(1) दि.01/07/2014 पासून वरीष्ठ श्रेणी दिलेली आहे, परंतू आदेशाची नोंद सेवापुस्तकात नाही.

(2) रजा लेखा दि.31/12/2015 पर्यंत दर्शवलेला आहे, या पुढील रजा लेखा दर्शवलेल्या नाही व रजा लेखेखाली प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

(3) संगणक अर्हतेच्या नोंद सेवापुस्तकात नाही.

10. जॉयसी हेन्ड्रीक्स लोपीस, उपशिक्षिका

(1) दि.01/07/2012 रोजी वरीष्ठ श्रेणी मंजूर केलेल्या आदेशाची नोंद सेवापुस्तकात नाही.

(2) संगणक अर्हता नोंदीखाली प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

(3) मृत्यू उपदान, कुटुंब निवृत्ती वेतन, भनिनि इ. बाबतच्या नामनिर्देशनाच्या नोंदी सेवापुस्तकात नाही.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.92 दि.15/04/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 71, Hmm No : 92)

## *61 शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यामधील, खाते नोंदवही, रोजकिर्द, बँक पासबुक इ. मधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

गुंतलेली रक्कम रु. 2412094.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2412094.00/-

***शिक्षण विभागातील वेतन पटावरील 191 शिक्षक कर्मचाऱ्यांपैकी केवळ 21 शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही मध्ये सन 2015-16 चे लेखे अदयावत केलेले आहेत. 37 शिक्षकांचा खाते वहीतील लेखा अपूर्ण आहे. लेखे पूर्ण नसतांना प्रशासन अधिकारी यांनी लेख्याखाली स्वाक्षरी केलेली आहे. याबाबत गंभीर बाब निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिक्षकांच्या लेख्यामध्ये संबंधित शिक्षकांचे मुळ वेतन नमूद नसल्याने त्यांच्या वेतनातून कपात करावयाची मूळ वेतनाच्या कमीत कमी 6% रक्कम खात्यावर जमा केली असल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. शिक्षकांच्या वेतनामधून माहे जुन 2015 ची वर्गणी (वेतन दि.06/07/2015) रक्कम रु.803198 व माहे जुलै 2015 ची वर्गणी (वेतन दि.17/08/2015) रु.803198 भविष्य निर्वाह निधी बँक खात्यावर सप्टेंबर 2015 मध्ये विलंबाने जमा केलेली आहे. तसेच माहे नोव्हेंबर 2015 ची वर्गणी (वेतन दि.07/12/2015) रक्कम रु.805698 जानेवारी 2016 मध्ये बँकेतील भविष्य निर्वाह निधी खात्यावर विलंबाने जमा केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे बँकेमधील भविष्य निर्वाह निधी खात्यावरील व्याजाचे नुकसान झालेले आहे.***

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे सन 2015-16 मधील भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही, रोजकिर्द, बँक पासबुक इ. लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1. शिक्षण विभागातील वेतन पटावरील 191 शिक्षक कर्मचाऱ्यांपैकी केवळ 21 शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही मध्ये सन 2015-16 चे लेखे अदयावत केलेले आहेत. उर्वरित शिक्षकांचे सन 2015-16 चे भविष्य निर्वाह निधीचे लेखे अपूर्ण आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षकांनी सन 2015-16 मध्ये भविष्य निर्वाह निधी खात्यामधून परतावा ना-परतावा अग्रिम घेतल्याबाबतची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

2. 37 शिक्षकांचा खाते वहीतील लेखा अपूर्ण आहे. लेखे पूर्ण नसतांना प्रशासन अधिकारी यांनी लेख्याखाली स्वाक्षरी केलेली आहे. याबाबत गंभीर बाब निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. संबंधित शिक्षकांच्या लेख्यामध्ये संबंधित शिक्षकांचे मुळ वेतन नमूद नसल्याने त्यांच्या वेतनातून

कपात करावयाची मूळ वेतनाच्या कमीत कमी 6% रक्कम खात्यावर जमा केली असल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

4. शिक्षकांच्या वेतनामधून माहे जुन 2015 ची वर्गणी (वेतन दि.06/07/2015) रक्कम रु.803198 व माहे जुलै 2015 ची वर्गणी (वेतन दि.17/08/2015) रु.803198 भविष्य निर्वाह निधी बँक खात्यावर सप्टेंबर 2015 मध्ये विलंबाने जमा केलेली आहे. तसेच माहे नोव्हेंबर 2015 ची वर्गणी (वेतन दि.07/12/2015) रक्कम रु.805698 जानेवारी 2016 मध्ये बँकेतील भविष्य निर्वाह निधी खात्यावर विलंबाने जमा केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे बँकेमधील भविष्य निर्वाह निधी खात्यावरील व्याजाचे नुकसान झालेले आहे.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.93 दि.15/04/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 72, Hmm No : 93)

## *62 स्थावर व जंगम मालमत्तेच्या वार्षिक पडताळणी न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***स्थावर व जंगम मालमत्तेच्या वार्षिक तसेच नियतकालीक पडताळणी केलेली नाही.***

मुंबई शिक्षण मंडळ लेखा संहिता, 1953 मधील नियम 29 प्रमाणे शिक्षण मंडळाची स्थावर व जंगम मालमत्तेची प्रशासन अधिकाऱ्यांनी दरवर्षी पडताळणी केली पाहिजे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 च्या नियम 156 प्रमाणे जडवस्तू संग्रह पुस्तकातील जंगम मालमत्तेची तसेच स्थावर मालमत्तेची कार्यालय प्रमुखांनी दरवर्षी पडताळणी केली पाहिजे. पडताळणीच्या वेळी नोंदवहीमधील नोंदवहीसमोर अद्याक्षरी करुन त्याविषयीचे निष्कर्ष दर्शविणारे प्रमाणपत्रही देणे अनिवार्य आहे. याशिवाय महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य व नगरविकास, मुंबई यांचा शासन निर्णय क्र.व्ही.ओ.एस/059/बी दि.3/10/1961 अन्वये पडताळणीचे प्रमाणपत्र संबंधित नोंदवहीत अभिलिखीत करणे आवश्यक आहे. जर पडताळणीत कोणतीही गंभीर विसंगती आढळल्यास त्याविषयीचा अहवाल मा. सभापती शिक्षण विभाग यांना तात्काळ दिला पाहिजे. महाराष्ट्र आकस्मिक

खर्च नियम 98 प्रमाणेही वार्षिक तपासणीचे प्रमाणपत्र विभाग प्रमुखाला सादर करण्याविषयी सुचित केलेले आहे त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.125 दि.14/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

REVTVMM8801 (Ref No : 81, Hmm No : 125)

## *63 मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा निहाय विविध प्रकारचे साहित्य वाटप साठा नोंदवहीतील नोंदीत व शाळेतील विदयार्थ्यांच्या हजेरीत फरक असलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेच्या शाळेमधील 1 ते 7 वी च्या विदयार्थ्यांना (दप्तर, पाण्याच्या बाटल्या, वह्या, बुट व मोजे, गणवेश इ.) साहित्य वाटप केले आहे. माहे जून 2015 चे विदयार्थ्यांचे हजेरीपट शाळेनिहाय वाटप केलेली साहित्य संख्या तपासणी केले असता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विदयार्थ्यांचे हजेरीपट व साठा नोंदवही यांच्यात तफावती झालेल्या आहेत.***

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग (प्राथमिक) सन 2015-16 चे लेखापरिक्षण केले असता विभागाअंतर्गत सन 2015-16 मध्ये महानगरपालिकेच्या शाळेमधील 1 ते 7 वी च्या विदयार्थ्यांना (दप्तर, पाण्याच्या बाटल्या, वह्या, बुट व मोजे, गणवेश इ.) साहित्य वाटप केले आहे. माहे जून 2015 चे विदयार्थ्यांचे हजेरीपट शाळेनिहाय वाटप केलेली साहित्य संख्या तपासणी केले असता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विदयार्थ्यांचे हजेरीपट व साठा नोंदवही यांच्यात तफावती आढळून आल्या त्या खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | शाळेचे नाव | दि.30/09/2015 चे प्रत्यक्ष हजेरीपट | प्रत्यक्ष साहित्य वाटप केलेले हजेरीपट | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | उत्तन मराठी शाळा क्र.1 | 21 | 27 | 6 |
| 2 | उत्तन ऊर्दू शाळा क्र.2 | हजेरीपट उपलब्ध नाही | 44 | उपलब्ध नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | काजूपाडा शाळा क्र.3 | हजेरीपट उपलब्ध नाही | 122 | उपलब्ध नाही |
| 4 | काशी मराठी शाळा क्र.4 | हजेरीपट उपलब्ध नाही | 643 | उपलब्ध नाही |
| 5 | काशी ऊर्दू शाळा क्र.5 | हजेरीपट उपलब्ध नाही | 301 | उपलब्ध नाही |
| 6 | खारी मराठी शाळा क्र.6 | 146 | 112 | -35 |
| 7 | खारी गुजराती शाळा क्र.7 | 59 | 46 | -14 |
| 8 | गोडदेव मराठी शाळा क्र.8 | हजेरीपट उपलब्ध नाही | 207 | उपलब्ध नाही |
| 9 | घोडबंदर मराठी शाळा क्र.9 | हजेरीपट उपलब्ध नाही | 337 | उपलब्ध नाही |
| 10 | चेणे मराठी शाळा क्र.10 | हजेरीपट उपलब्ध नाही | 144 | उपलब्ध नाही |
| 11 | चौक मराठी शाळा क्र.11 | 89 | 77 | -13 |
| 12 | डोंगरपाली मराठी शाळा क्र.12 | 24 | 26 | 2 |
| 13 | नवघर मराठी शाळा क्र.13 | 165 | 118 | 48 |
| 14 | पेणकरपाडा मराठी शाळा क्र.14 | हजेरीपट उपलब्ध नाही | 249 | उपलब्ध नाही |
| 15 | बंदरवाडी मराठी शाळा क्र.15 | 128 | 103 | -26 |
| 16 | भाईंदर मराठी शाळा क्र.16 | 219 | 173 | -46 |
| 17 | भाईंदर गुजराती शाळा क्र.17 | 186 | 117 | -69 |
| 18 | भाईंदर हिंदी शाळा क्र.18 | 971 | 690 | -281 |
| 19 | माशाचापाडा मराठी शाळा क्र.19 | हजेरीपट उपलब्ध नाही | 182 | उपलब्ध नाही |
| 20 | मिरे मराठी शाळा क्र.20 | हजेरीपट उपलब्ध नाही | 191 | उपलब्ध नाही |
| 21 | मिरे गुजराती शाळा क्र.21 | हजेरीपट उपलब्ध नाही | 51 | उपलब्ध नाही |
| 22 | मुर्धा मराठी शाळा क्र.22 | हजेरीपट उपलब्ध नाही | 175 | उपलब्ध नाही |
| 23 | मुर्धा खाडी गुजराती शाळा क्र.23 | 21 | 29 | 8 |
| 24 | मोर्वा मराठी शाळा क्र.24 | हजेरीपट उपलब्ध नाही | 135 | उपलब्ध नाही |
| 25 | राई मराठी शाळा क्र.25 | 139 | 114 | -25 |
| 26 | सई गुजराती शाळा क्र.26 | 42 | 45 | 3 |
| 27 | रेतीबंदर मराठी शाळा क्र.27 | हजेरीपट उपलब्ध नाही | 37 | उपलब्ध नाही |
| 28 | वरसावे मराठी शाळा क्र.28 | हजेरीपट उपलब्ध नाही | 62 | उपलब्ध नाही |
| 29 | नवघर हिंदी शाळा क्र.29 | 439 | 440 | 1 |
| 30 | भाईंदर हिंदी शाळा क्र.30 | 831 | 665 | 166 |
| 31 | भाईंदर ऊर्दू शाळा क्र.31 | हजेरीपट उपलब्ध नाही | 120 | उपलब्ध नाही |
| 32 | मिरे ऊर्दू शाळा क्र.32 | हजेरीपट उपलब्ध नाही | 235 | उपलब्ध नाही |
| 33 | मुर्धा हिंदी शाळा क्र.33 | हजेरीपट उपलब्ध नाही | 274 | उपलब्ध नाही |
| 34 | मिरारोड ऊर्दू शाळा क्र.34 | हजेरीपट उपलब्ध नाही | 193 | उपलब्ध नाही |

उपरोक्त तफावतीबाबत विदयार्थ्यांची संख्या कमी जास्त असताना आवश्यक तेवढयाच साहित्याची मागणी शाळांनी करणे आवश्यक होते. उर्वरित (शिल्लक राहिलेल्या) साहित्याचा विनियोग वाटपानंतर कशाप्रकारे करण्यात आला. ते नंतर कोणाला वाटप करण्यात आले किंवा परत करण्यात आले याबाबतच्या नोंदी घेणे आवश्यक होते. तशा नोंदी लेखापरिक्षणास दाखविण्यात आल्या नाहीत त्यामुळे उपरोक्त तफावतीमुळे शिल्लक साहित्याच्या विनियोगाबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. तसेच ज्या शाळांचे हजेरीपट व प्रत्यक्ष वाटप साहित्यांचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहित त्याच्याबाबत साहित्याचे वाटप विदयार्थी संख्या एवढया प्रमाणात झाल्याचे लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.126 दि.14/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

REVTVMM8801 (Ref No : 82, Hmm No : 126)

## *64 प्रभाग समिती निहाय दैनंदिन रस्ते, गटारे सफाई करणे, एकात्मिक डास नियंत्रण करणे व कचरा गोळा करून वाहतुक करणे कामी कंत्राट पध्दतीने मजूर व वाहने पुरवठा.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 423623276.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 389879232.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 33744044.00/-

***ज्या एका कामाचे मूल्य रु.50,00,001/- पेक्षा अधिक आहे अशी जाहिरात अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग दैनिकास देणे आवश्यक आहे. तरी सदरील कामासाठी महानगरपालिकेला स्पर्धात्मक फायदा झालेला दिसून येत नाही. कामासाठी वापरलेले वाहने (यंत्रसामग्री) निहाय लॉगबुक (स्कंदनोंदवही) लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी नक्की किती तास वाहन चालले या बाबतची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. करारनामा अट क्र.3.2 नुसार कंत्राटदाराने कामाची सुरक्षा अनामत 2% वार्षिक टेंडरच्या रक्कमेवर जमा केल्याचे नमुद केले आहे, तरी सदरील पावती नस्तीत उपलब्ध नाही. करारनामा अट क्र.3.2(B) नुसार कंत्राटदाराने कामगिरी (Performance Bank Guarantee) हि वार्षिक रक्कमेच्या 5% अधिक 10% भाव वाढ धरून रक्कमेवर घेणे आवश्यक असताना सदरील नस्तीत बँक गॅरंटी उपलब्ध न झाल्याने रक्कमेची पडताळणी करता आली नाही. करारनाम्यातील अट क्र.3.3 नुसार निविदाकाराने प्रचलित कामगार वेतन कायदयानुसार मजुरांना वेतन अदा केलेबाबतचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने कामगारांना वेतन अदा केल्याची लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.***

***कंत्राटदाराच्या कंत्राटी अनुज्ञेय असलेले वेतन व 46% लेव्हीपोटीच्या रक्कमा अदा केले बाबतची कंत्राटदाराची देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे कामगारांना किमान वेतन अधिनियम 1948(11) नुसार वेतन व लेव्ही दिलेबाबत लेखापरिक्षणास खात्री झालेली नाही. मा.आयुक्त केंद्रिय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/2011 चे कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनामधून 12% व कंत्राटदाराच्या स्व: निधिमधून 13.61% प्रमाणे रक्कम कपात करून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यांमध्ये महिन्याच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. त्यानुसार कंत्राटदाराने कामगारांची भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणा केल्याचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नसल्याने कंत्राटदाराने कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी भरलेबाबतची खात्री झाली नाही.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामचे नाव | प्रभाग समिती निहाय दैनंदिन रस्ते, गटारे सफाई करणे, एकात्मिक डास नियंत्रण करणे व कचरा गोळा करून वाहतुक करणे कामी कंत्राट पध्दतीने मजूर व वाहने पुरवठा. |
| 2 | लेखाशिर्ष | वॉर्ड सफाई/नाले सफाई |
| 3 | अंदाजे वार्षिक खर्च | प्रभाग क्र.1 - 8,60,77,250/-<br>प्रभाग क्र.2 - 10,16,13,840/-<br>प्रभाग क्र.3 - 11,44,54,157/-<br>प्रभाग क्र.4 - 8,77,33,985/- |
| 4 | मंजुरी प्राधिकरणाचे नाव | मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा प्रकल्प विभाग |
| 5 | प्रशासकिय मान्यता पत्र क्र. | मा.महासभा दि.01/02/2011 ठराव क्र.86 |
| 6 | स्थायी समितीची मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.125 व दि.09/03/2012 |
| 7 | निविदा प्रसिध्दी क्र. व दि. | दि.22/09/2011 |
| 8 | निविदा प्रसिध्दी जाहिरात वर्तमानपत्रे | दै.लोकसत्ता दि.13/05/2011 |
| 9 | निविदेमध्ये भाग घेण्यात आलेल्या कंत्राटदारांची नावे | मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. व<br>मे.गूडलक सिव्हिल कॉन्ट्रक्टर प्रा.लि. |
| 10 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. |
| 11 | भाववाढ देण्यात आलेली रक्कम | 10% दरवर्षी एप्रिल महिन्यास |
| 12 | कामाचा करारनामा | दि.24/04/2012 |
| 13 | कामाचा कालावधी | 2012-13 ते 5 वर्ष |
| 14 | कामाचा कार्यादेश | मनपा/आरोग्य/39/2012-13 दि.26/04/2012<br>मनपा/आरोग्य/40/2012-13 दि.26/04/2012<br>मनपा/आरोग्य/41/2013-13 दि.26/04/2012 |

| | | |
|---|---|---|
| 15 | वॉर्ड निहाय कामगारांची संख्या | प्रभाग समिती क्र.1 - 348 साफसफाई मजुर व 62 औषध फवारणी मजुर<br>प्रभाग समिती क्र.2 - 347 साफसफाई मजुर व 68 औषध फवारणी मजुर<br>प्रभाग समिती क्र.3 - 425 साफसफाई मजुर व 65 औषध फवारणी मजुर<br>प्रभाग समिती क्र.4 - 230 साफसफाई मजुर व 54 औषध फवारणी मजुर |

उपरोक्त कामाच्या निविदा नस्तीचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. कामाची निविदा जाहिरात हि दै.लोकसत्ता या वर्तमानपत्रात दिली आहे तरी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. तरी सदरील कामासाठी महानगरपालिकेला स्पर्धात्मक फायदा झालेला दिसून येत नाही.

2. सदरील कामासाठी वापरलेली वाहने (यंत्रसामग्री) निहाय लॉगबुक (स्कंदनोंदवही) लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरील कामासाठी नक्की किती तास वाहन चालले या बाबतची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

3. करारनामा अट क्र.3.2 नुसार कंत्राटदाराने कामाची सुरक्षा अनामत 2% वार्षिक टेंडरच्या रक्कमेवर जमा केल्याचे नमुद केले आहे, तरी सदरील पावती नस्तीत उपलब्ध नाही. तसेच अट क्र.3.2(B) नुसार कंत्राटदाराने कामगिरी (Performance Bank Guarantee) हि वार्षिक रक्कमेच्या 5% अधिक 10% भाव वाढ धरून रक्कमेवर घेणे आवश्यक असताना सदरील नस्तीत बँक गॅरंटी उपलब्ध न झाल्याने खालील रक्कमेची पडताळणी करता आली नाही, तरी खालील रक्कमा वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत.

| प्रभागाचे नाव | सुरक्षा अनामत रक्कम 2% (पावतीने भरावयाच्या) | Performance Bank Guarantee 5% रक्कमा |
|---|---|---|
| प्रभाग क्र.1 | 17,21,545/- | 57,28,440/- |
| प्रभाग क्र.2 | 20,32,276/- | 67,62,401/- |
| प्रभाग क्र.3 | 22,89,083/- | 76,16,924/- |
| प्रभाग क्र.4 | 17,54,679/- | 58,38,696/- |

4. करारनाम्यातील अट क्र.3.3 नुसार निविदाकाराने प्रचलित कामगार वेतन कायदयानुसार मजुरांना वेतन अदा केलेबाबतचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने कामगारांना वेतन अदा केल्याची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. तसेच कंत्राटदाराच्या कंत्राटी अनुज्ञेय असलेले वेतन व 46% लेव्हीपोटीच्या रक्कमा

अदा केले बाबतची कंत्राटदाराची देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे कामगारांना किमान वेतन अधिनियम 1948(11) नुसार वेतन व लेव्ही दिलेबाबत लेखापरिक्षणास खात्री झालेली नाही.

5. मा.आयुक्त केंद्रिय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/2011 चे नोटीफिकेशन व कर्मचारी भविष्य निर्वाह अधिनियम 1952 मधील तरतुदी ठेका पध्दतीने रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना दि.08/01/2011 पासून लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या नावाने वैयक्तिक कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खाती काढून त्या खात्यामध्ये त्यांचे वेतनामधून तसेच ठेकेदाराची स्वहिश्याची रक्कम कपात करून भरणा करणे आवश्यक आहे. या योजनेमधील उपरोक्त कलमानुसार कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनामधून 12% व कंत्राटदाराच्या स्व:निधिमधून 13.61% प्रमाणे रक्कम कपात करून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यांमध्ये महिन्याच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. त्यानुसार कंत्राटदाराने कामगारांची भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणा केल्याचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नसल्याने कंत्राटदाराने कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी भरलेबाबतची खात्री झाली नाही.

उपरोक्त आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.45 दि.15/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

STDARPF8701 (Ref No : 34, Hmm No : 45)

## *65 वैद्यकीय विभागाकरिता औषधे, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरिता निविदा मागवणे बाबतच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : औषध खरेदी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 13633548.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13633548.00/-

***कामाची जाहिरात देताना शासन निर्णय – पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 चा अवलंब केला नाही. मनपाने केवळ जागरुक टाईम्स व आपलं महानगर या स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केलेली आहे. तरी सदरील बाबतीत महानगरपालिकेला स्पर्धात्मक दराचा फ़ायदा झालेला नाही. साहित्य खरेदीकरिता पुरेसे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नसताना सदरील बाबींसाठी निविदा फेर निविदा न मागविता प्राप्त निविदाकारांना पात्र करुन पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहे. सदरील बाबतीत महानगरपालिकेला स्पर्धात्मक फ़ायदा झालेला दिसून येत नाही. सदर औषध खरेदी/सर्जिकल साहित्य खरेदी संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन मुंबई (डीएमईआर) यांच्याकडील दर कराराप्रमाणे सदरील बाबी खरेदी केलेल्या नाहीत. शासनाने दर***

***करार उपलब्ध नसल्यास अ) डी.जी.एस.अ‍ॅण्ड डी चे दर करार आ) केंद्रीय राज्य कामगार विमा योजने अंतर्गत दर करार इ) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे दर संविदेचे दर करार याव्दारे खरेदी कमीत कमी दर असलेल्या संस्थेकडून करण्यात आलेली नाही. मे. धन्वंतरी मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स याच्याशी औषध खरेदी बाबतचा रक्कम रु.3330 चा दर करार 100 रुपयाच्या स्टँप पेपरवर करण्यात आलेला आहे. तरी मुद्रांक शुल्क सुधारित अधिनियम 2015(34), 63 i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीत कमी रक्कम रु.500 चे मुद्रांक शुल्क 10 लाख पर्यंत घेणे आवश्यक आहे.***

वैद्यकीय विभागाकरिता औषधे, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरिता निविदा मागवणे या कामाच्या खालील तपशील:-

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे/पुरवठ्याचे नाव | वैद्यकीय विभागाकरिता औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरिता निविदा मागवणे बाबत |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | औषध खरेदी - 35,09,691/-<br>सर्जिकल मटेरिअल - 85,42,935/-<br>लॅब मटेरिअल - 15,80,922/- |
| 3 | प्रशासकीय मंजूरी पत्र क्र. व दिनांक | वैद्यकीय आरोग्य विभाग दि.17/08/2015<br>मा.महासभा दि.04/09/2015, प्रकरण क्र.70 ठराव क्र.44 |
| 4 | स्थायी समिती ठराव क्र. मंजूरीसाठी | ठराव क्र.115 दि.21/12/2015 |
| 5 | मंजूरी प्राधिकरणाचे नाव | |
| 6 | प्रसिध्द केलेल्या वर्तमान पत्राचे नाव व दिनांक | आपले महानगर, दि.10/09/2015<br>जागरुक टाइम्स दि.10/09/2015 |
| 7 | स्विकृत निविदेचा कालावधी व दि. | 09/09/2015 ते 30/09/2015 |
| 8 | निविदा उघडल्याची दिनांक | 01/10/2015 |
| 9 | निविदेमध्ये भाग घेण्यात आलेल्या कंत्राटदाराची नावे | मे.शंखेश्वर हेल्थकेअर, मे.सरिता डिस्ट्रीब्युटर्स<br>मे.धन्वंतरी मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स<br>मे.जेनोबा बायोटेक, मे.व्हिजीत फ़ार्मा<br>मे.गगन फ़ार्मा, मे.सालासर बालाजी सप्लाय<br>मे.लक्ष्मी फ़ार्माक्युटीकल्स प्रा.लि. |
| 10 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदारांची नावे, कार्यादेश क्र. व दिनांक | मे.शंखेश्वर हेल्थकेअर-क्र.840 दि.28/06/2017<br>मे.शंखेश्वर हेल्थकेअर-क्र.833 दि.28/03/2017<br>मे.सरिता डिस्ट्रीब्युटर्स-क्र.838 दि.28/03/2017<br>मे.सरिता डिस्ट्रीब्युटर्स-क्र.834 दि.28/03/2017 |

| | | |
|---|---|---|
| | | मे.जेनोबा बायोटेक-क्र.842 दि.28/06/2017<br>मे.जेनोबा बायोटेक-क्र.835 दि.28/06/2017<br>क्र.839 दि.28/06/2017<br>क्र.836 दि.28/06/2017<br>क्र.837 दि.28/06/2017<br>क्र.837 दि.28/03/2017<br>क्र.836 दि.28/03/2017 |
| | करारनामा दिनांक | दि.18/03/2016 |

सन 2015-16 च्या अर्थसंकल्पिक अंदाज पत्रकात औषधे खरेदीकरिता रु.1,00,00,000 रुग्णालय किरकोळ खरेदी (सर्जिकल साहित्य) करिता रु.1,00,00,000 श्वानदंश/सर्पदंश/कावीळ लस खरेदी करिता 50,00,000 तरतूद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त रक्कमेच्या साहित्याचा पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. सदर खरेदीची निविदा नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1. शासन निर्णय - पी.यू.बी.-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.01/03/2001 अन्वये जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु.50,00,001 पेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग दैंनिकास देणे आवश्यक आहे. तसेच जिल्हास्तर–मराठी (1वृत्तपत्र) राज्यस्तर–मराठी (2 वृत्तपत्र), हिंदी (1वृत्तपत्र) व राष्ट्रीय स्तर-इंग्रजी (2वृत्तपत्र), हिंदी (1वृत्तपत्र) अशा प्रकारे निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. मनपाने केवळ जागरुक टाईम्स व आपलं महानगर या स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केलेली आहे. तरी सदरील बाबतीत महानगरपालिकेला स्पर्धात्मक दराचा फ़ायदा झालेला नाही.

2. औषधे खरेदीसाठी 94 बाबी करिता सर्जिकल साहित्य खरेदी करिता 180 बाबी करिता, लॅब मटेरिअल खरेदीसाठी 100 बाबी करिता दोन किंवा एकच दर निविदेव्दारे प्राप्त झालेले असल्याने सदर साहित्य खरेदीकरिता पुरेसे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नसताना सदरील बाबींसाठी निविदा पुर्ण निविदा न मागविता प्राप्त निविदाकारांना पात्र करुन पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहे. तरी सदरील बाबतीत महानगरपालिकेला स्पर्धात्मक फ़ायदा झालेला दिसून येत नाही.

3. सदर औषध खरेदी/सर्जिकल साहित्य खरेदी संचालक,वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन मुंबई (डीएमईआर) यांच्याकडील दर कराराप्रमाणे सदरील बाबी खरेदी केलेल्या नाहीत.

4. शासनाने दर करार उपलब्ध नसल्यास अ) डी.जी.एस. ॲण्ड डी चे दर करार आ) केंद्रीय राज्य कामगार विमा योजने अंतर्गत दर करार इ) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे दर संविदेचे दर करार याव्दारे खरेदी कमीत कमी दर असलेल्या संस्थेकडून करण्यात आलेली नाही.

5. मे. धन्वंतरी मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स याच्याशी औषध खरेदी बाबतचा रक्कम रु.3330 चा दर करार 100 रुपयाच्या स्टँप पेपरवर करण्यात आलेला आहे. तरी मुद्रांक शुल्क सुधारित अधिनियम 2015(34),63 i(a)ii(b) नुसार प्रत्येक करारनाम्याला कमीत कमी रक्कम रु.500 चे मुद्रांक शुल्क 10

लाख पर्यंत घेणे आवश्यक आहे.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.44 दि.15/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 65, Hmm No : 44)

## *66 भिमसेन जोशी रुग्णालय भाईंदर (प.) इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष : रूग्णालय फर्निचर/ उप महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 6988649.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6988649.00/-

***जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.50,00,001/- पेक्षा अधिक आहे अशी जाहिरात अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग दैनिकास देणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागाने जाहिरात दिलेबाबतची अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने सदरिल कामाबाबत लेखापरिक्षणाला कामाच्या निविदेच्या जाहिरातीबाबत खात्री झाली नाही. अग्निशमन विभागाने स्वतः चे दर निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे s याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आलेली असून सदरील परिपत्रकातील तरतूदीचे विभागाकडून पालन झाले नाही. विमा न उतरवल्याने विमा संचालनालयाचे पत्र क्र. प्रविनी 2310/साबवि/ विमावसुली/अभी-3 दि.08/09/2010 नुसार ठेकेदाराकडून विमा रक्कम रु.69,886/- वसूल करण्यात यावी. सदरील कामाची 3% सुरक्षा अनामत भरलेली नाही. त्यामुळे रक्कम रु.2,09,659/- तात्पुरती वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. ठेकेदाराने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अंतर्गत नमुना प्रमाणपत्र "अ" महापालिकेस प्रदान करणे निविदाकारास बंधकारक राहिल असे आहे तरी सदरील प्रमाणपत्र "अ" नस्तीत उपलब्ध नाही.***

| अनु.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | भिमसेन जोशी रुग्णालय भाईंदर (प.) इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे |
| 2 | अंदाजपत्रकिय रक्कम | रु.71,31,275/- |
| 3 | स्थायी समिती ठराव क्र. | ठराव क्र.78, दि.30/9/2015 |

| | | |
|---|---|---|
| 4 | जाहिरात मागविण्यात आलेल्या वृत्तपत्राचे नाव व दिनांक | नस्तीत आढळुन आले नाही. |
| 5 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे. नॉर्टेक्स फायर इक्विपमेंट |
| 6 | अनामत रक्कम व बँक गॅरंटी क्रमांक व कालावधी | नस्तीत आढळुन आले नाहीत. |
| 7 | मंजूर दर | रु.69,88,649/- |
| 8 | कामाचा कालावधी | 2 महिने - दि.01/12/2015 ते दि.31/01/2016 |
| 9 | कंत्राटदारा बरोबर केलेल्या कराराचा दिनांक व नोंदणी केलेल्या कराराच्या मुद्रांक शुल्काची रक्कम | दि.29/10/2015<br>रक्कम - 6,100/- |
| 10 | कंत्राटदारास निविदेमध्ये भरण्यात आलेल्या दरासंबंधी केलेल्या वाटाघाटाचे पत्र क्रमांक व दिनांक | मि.भा./मनपा/अग्नि/352/2015-16 दि.17/08/2015 |
| 11 | कामाचे लेखाशीर्ष | रूग्णालय फर्निचर/उपकरणे/खरेदी करणे |

1.सदरील कामाची निविदा जाहिरात ही महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये 55 लाखापेक्षा अधिक आहे, अशी जाहिरात संबंधित विभागाकडील अ-वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क-वर्ग दैनिकास आळीपाळीने देणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागाने जाहिरात दिलेबाबतची अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने सदरिल कामाबाबत लेखापरिक्षणाला कामाच्या निविदेच्या जाहिरातीबाबत खात्री झाली नाही.

2.केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र.4(3)/2007 क्र.005/सिआरडी/012 दि.03 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढतांना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दरपत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबंधित सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणन पत्रकात समाविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनपत्रक सक्षम प्राधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये, तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये असे असतांना अग्निशमन विभागाने सन 2015-16 मध्ये भिमसेन जोशी रुग्णालय भाईंदर (प.) इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे या कामासाठी बाजार भावानुसार दर न ठरविता पूर्वगणनपत्रक रक्कम निच्छित करण्यात आलेली आहे. केवळ त्याच प्रमाणे ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेल्या न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून ठेकेदाराचेच दर सदर कामासाठी लागू करण्यात आलेले आहेत. तरी अग्निशमन विभागाने स्वत:चे दर निविदा काढताना निश्चित न केल्यामुळे ठेकेदाराचे निविदेसोबत सादर केलेले दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री न करता पूर्वगणनपत्रक रक्कम निर्धारित करण्यात आलेली असून सदरील परिपत्रकातील तरतूदीचे विभागाकडून पालन झाले नाही.

3.भिमसेन जोशी रुग्णालय भाईंदर (प.) इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे या कामाची विमा

रक्कम न भरल्याने कामाची रक्कम रु.69,88,649/- असून सदरील कामाच्या 1% रक्कम रू.69886/- विमा न उतरवल्याने विमा संचालनालयाचे पत्र क्र. प्रविनी 2310/साबवि/विमावसुली/अभी-3 दि.08/09/2010 नुसार ठेकेदाराकडून विमा रक्कम रु.69,886/- वसूल करण्यात यावी.

4.कामाची सुरक्षा अनामत रक्कम ही कामाच्या दोषदायित्व कालावधी पर्यंत वैध असावी अशी असताना सदरील कामाची 3% सुरक्षा अनामत भरलेली नाही. त्यामुळे रक्कम रु.2,09,659/- तात्पुरती वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

5.करारनाम्यातील अट क्र.27 नुसार ठेकेदाराने पुरविलेल्या अग्निशमन यंत्रणेकरिता ठेकेदाराने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अंतर्गत नमुना प्रमाणपत्र “अ” महापालिकेस प्रदान करणे निविदाकारास बंधकारक राहिल असे आहे तरी सदरील प्रमाणपत्र “अ” नस्तीत उपलब्ध नाही.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.65 दि.02/03/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

STDARPF8701 (Ref No : 35, Hmm No : 65)

## *67 मिरा भाईंदर महानगरपालिका नगरभवन येथे ई-लायब्ररी सुरु करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनि यमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : संगणक व संगणक आज़ाव महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 595458.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 594958.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 500.00/-

***खरेदी पुर्वी विभागाने उपलब्ध असलेले संगणक व आवश्यकता असलेले संगणक व इतर साहित्य याचा आढावा घेऊन मागणी योग्य व वाजवी असल्याबाबतचे खात्यांत जमा केल्याचे दिसून येत नाही. तसेच खरेदी नियम पुस्तिका 1978 भाग-2 नियम 1 मधील खरेदी विषयक तरतुदींचे पालन केले नसल्याचे दिसून येते. खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही. कार्यादेशाप्रमाणे पुरवठा केलेल्या सामग्रीचा दर्जा शासन दर-करारामध्ये नमूद दर्जा (स्पेसिफिकेशन) प्रमाणे असणे पुरवठादारास बंधनकारक असताना पुरवठा केलेल्या सामग्रीचा सक्षम प्राधिकाऱ्याचा चाचणी अहवाल नस्ती मध्ये आढळून आला नाही. कामाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) नुसार मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर होणे आवश्यक होते. परंतु याप्रमाणे स्थायी समितीस प्रस्ताव सादर झाल्याबाबत त्याचे अभिलेखे नस्तीत आढळुन***

***आले नाहीत. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.500 चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने करारनामा करण्यात आला नाही. रक्कम रु.500 ची मे.इंग्राम मायक्रो इंडिया प्रा.लि. वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. कामाचे DGS-D चे दर करारपत्रक, देयक, चलन, मुळ प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. वित्तीय नियमावली अन्वये प्रत्येक प्रमाणकांवर अथवा सोबत ज्या व्यक्तीने मागणीपत्र सादर केले असेल त्याची स्वाक्षरी असलेली देय रक्कमेची पोच पावती असल्याविना प्रदान करता येत नाही.त्यामुळे हे प्रदान नियमानुसार प्रदान झाल्याची खातरजमा करता आली नाही. DGS-D दरपत्रक किंवा राज्य शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दर करारपत्रक अन्वये 10% पुरवठादारास खरेदी किंमतीच्या 10% रक्कम बँक हमी स्वरुपात दोष दायित्व कालावधी पर्यंत दयावयाची आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेले अभिलेखे नस्तीमध्ये आढळुन आले नाही. त्यामुळे बँक हमी घेतल्याची खात्री करता आली नाही.***

कामाचे नाव:- मिरा भाईंदर महानगरपालिका नगरभवन येथे ई-लायब्ररी सुरु करणे
मक्तेदाराचे नाव:- मे. इंग्राम मायक्रो इंडिया प्रा.लि.
कार्यादेश:- जा.नं./मनपा/संगणक/308/2015-16 दि.20/01/2016
प्रशासकिय मंजुरी:- मा. आयुक्त सो. यांची दि.18/01/2016
लेखाशिर्ष:- संगणक व संगणक आज्ञावली खरेदी

मिरा भाईंदर महानगरपालिका नगरभवन येथे ई-लायब्ररी सुरु करण्यासाठी विभागाने शासन निर्णय क्रमांक: भाखंस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उदयोग-4 दि.30/10/2015 अन्वये 13 संगणक मे.इंग्राम मायक्रो इंडिया प्रा.लि. यांना दि.20/01/2016 रोजी कार्यादेश देऊन DGS&D दर करारानुसार खरेदी करण्यात आले. सदरील कामाची नस्ती तपासली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

1. खरेदी पुर्वी विभागाने उपलब्ध असलेले संगणक व आवश्यकता असलेले संगणक व इतर साहित्य याचा आढावा घेऊन मागणी योग्य व वाजवी असल्याबाबतचे खात्यांत जमा केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे खरेदीची कार्यवाही अचुक व योग्यरीत्या तसेच आवश्यकतेप्रमाणे झाली असल्याची लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही. तसेच खरेदी नियम पुस्तिका 1978 भाग-2 नियम 1 मधील खरेदी विषयक तरतुदींचे पालन केले नसल्याचे दिसून येते.

2. खरेदीच्या अनुषंगाने खरेदी केलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत नोंदविल्याचे नोंदवही अभावी पडताळणी करता आलेली नाही.

3. कार्यादेशाप्रमाणे पुरवठा केलेल्या सामग्रीचा दर्जा शासन दर-करारामध्ये नमूद दर्जा (स्पेसिफिकेशन) प्रमाणे असणे पुरवठादारास बंधनकारक असताना पुरवठा केलेल्या सामग्रीचा सक्षम प्राधिकाऱ्याचा चाचणी अहवाल नस्ती मध्ये आढळून आला नाही.

4. ई-लायब्ररी सुरू करणेकामी 13 संगणक खरेदी करणेकामी रु.45,766/- (कर वगळून) प्रति नग दराने रु.5,94,958/- (कर वगळून) खर्च होणार असल्याने सदर प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) नुसार मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर होणे आवश्यक होते. परंतु याप्रमाणे स्थायी समितीस प्रस्ताव सादर झाल्याबाबत त्याचे अभिलेखे

नस्तीत आढळुन आले नाहीत.

5. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra Stamp Act (Amendment) Act 2015 (mah.act.No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत 500/व त्यापुढील (रक्कमेच्या 0.1% दराने) प्रत्येक एक लाखास 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार र.रु.500/- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने करारनामा करण्यात आला नाही. रक्कम रु.500/- ची मे. इंग्राम मायक्रो इंडिया प्रा.लि. वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

6. उपरोक्त कामाचे DGS&D चे दर करारपत्रक, देयक, चलन, मुळ प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. वित्तीय नियमावली अन्वये प्रत्येक प्रमाणकांवर अथवा सोबत ज्या व्यक्तीने मागणीपत्र सादर केले असेल त्याची स्वाक्षरी असलेली देय रक्कमेची पोच पावती असल्याविना प्रदान करता येत नाही.त्यामुळे हे प्रदान वरील नियमानुसार प्रदान झाल्याची खातरजमा करता आली नाही.

7. DGS&D दरपत्रक किंवा राज्य शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दर करारपत्रक अन्वये 10% पुरवठादारास खरेदी किंमतीच्या 10% रक्कम बँक हमी स्वरुपात दोष दायित्व कालावधी पर्यंत दयावयाची आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेले अभिलेखे नस्तीमध्ये आढळुन आले नाही. बँक हमी घेतल्याची खात्री करता आली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.89 दि.27/03/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 51, Hmm No : 89)

## *68 मिरा भाईंदर महानगरपालिका बायोमॅट्रीक पंचिंग मशिन पुरवठा करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : बायोमॅट्रीक पंचिंग म महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 144000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 144000.00/-

***मशिन्स खरेदी करण्यापूर्वी कार्यालयास एकूण किती मशिन्सची आवश्यकता आहे त्याचे निर्धारण न करता खरेदी केलेचे दिसून येते. सदर मशिन्स WARRENTY PERIOD मध्ये असताना दुरुस्ती करून न घेता नविन मशिन पुरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. मशिनची नोंद घेतल्याबाबतची साठानोंदवही, जडवस्तू संग्रह नोंदवही, वाटप नोंदवही, इन्स्टॉलेशन रजिस्टर इ. लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. सदर***

***खरेदी केलेल्या बायोमॅट्रीक मशिन तांत्रिक दृष्टया योग्य दर्जाच्या असल्याचा/पुरवठा केल्याचा अहवाल नस्तीत नाही. शासनाच्या किंवा DGS-D च्या दर कराराप्रमाणे खरेदी करण्यात आलेली नाही या बाबत अनुपालन झाले नाही. निविदा स्विकृत दर बाजार भावाशी तुलना करता वाजवी असल्याबाबत सादर स्पष्ट करणारे अभिलेखे नस्ती सोबत नाहीत.***

| अ.क्र. | देयकाच्या तपासणीचे विषय | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | मिरा भाईंदर महानगरपालिका बायोमॅट्रीक पंचिंग मशिन पुरवठा करणेबाबत. |
| 2 | अंदाजपत्रकिय रक्कम | 1,60,000/- |
| 3 | प्रशासकीय मान्यता पत्र क्र. | दि.14/11/2014 |
| 4 | जाहिरात मागविण्यात आलेल्या वृत्तपत्राचे नाव व दिनांक | जा.क्र.मनपा/संगणक/45/480/2014-15 दि.23/06/2014 सध्यानंद, द फ्री प्रेस जरनल |
| 5 | स्विकृत निविदेचा दिनांक व कालावधी | दि.03/07/2014 (स्विकृती दिनांक) दि.25/06/2014 ते दि.03/07/2014, |
| 6 | काम देण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | मे. भरारी सर्व्हिसेस |
| 7 | कार्यादेश क्रमांक व दिनांक | मनपा/संगणक/130/966/2014-15 दि.24/11/2014<br>मनपा/संगणक विभाग/112/2015-16/ दि.17/08/2015<br>मनपा/संगणक/376/15-16 दि.23/02/2016 |
| 8 | कंत्राटदारा बरोबर केलेल्या कराराचा दिनांक व नोंदणी केलेल्या कराराच्या मुद्रांक शुल्काची रक्कम | सन 2014-15/ करारनामा रजिस्टर अनु.क्र.603/ दि.06/01/2015, रु.100/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागाने बायोमॅट्रीक पंचिंग मशिन खरेदी कामी ऑफलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर ऑफलाईन निविदेव्दारे 20 बायोमॅट्रीक्स मशिन्स मागविण्यात आलेल्या होत्या. बायोमॅट्रीक पंचिंग मशिन खरेदी करणेबाबत दि.27/05/2014 च्या प्रस्तावात अंदाजे प्रति मशिन 8000 प्रमाणे अंदाजे 1,44,000/- खर्चाच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

या अनुषंगाने निविदा मागविण्यात आल्या, प्राप्त निविदा दि.07/08/2014 रोजी उघडल्या असता खालीलप्रमाणे निविदा व दर प्राप्त झाले.

| अनु. क्र. | नाव | दर |
|---|---|---|
| 1. | मे. प्रथम इंटरप्रायजेस | 8,750/- |
| 2. | मे. भरारी सर्व्हिसेस | 8,239/- |
| 3. | मे. एम. टेक कंप्युटर्स | 8,549/- |

उपरोक्त बाबतीत अनु.क्र.2 च्या निविदाकाराचे दर कमी असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यानी दर कमी करण्यास नकार दिला. त्यामुळे सदर दर महानगरपालिकेने मान्य करुन करारनामा (सन 14-15/करारनामा रजिस्टर 603 दि.06/01/2015) करताना पुरवठा केलेल्या मशिनची 3 वर्षापर्यंत देखभाल व दुरूस्ती करण्याची अट करारनाम्यामध्ये नमुद करुन संबंधितांना मनपा/संगणक/130/966/2014-15 दि.24/11/2014 रोजी 20 मशिन्स पुरवठा करण्याबाबत कार्यादेश देण्यात आला.

सदर नस्तीमध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आलेल्या आहेत.

1. दि.12/01/2015 च्या संगणक विभागाच्या टिप्पणीमध्ये वैदयकिय विभागाने 16 ऐवजी 13 बायोमॅट्रीक्स मशिन्स कार्यान्वयीन करणेबाबतची यादि उपलब्ध केलेली आहे व उर्वरित 4 मशिन्स अतिरिक्त असल्याबाबत नमुद केलेले आहे व सदर मशिनबाबत निर्णय घेणेबाबत आदेशीत करण्याबाबत नमुद केलेले आहे. त्यामुळे मशिन्स खरेदी करण्यापूर्वी कार्यालयास एकूण किती मशिन्सची आवश्यकता आहे त्याचे निर्धारण न करता खरेदी केलेचे दिसून येते.

2. मनपाने मनपा/संगणक विभाग/112/2015-16 दि.17/08/2015 च्या कार्यादेशानुसार आणखी 1 मशिन खरेदी केलेले आहे. करारनाम्यातील अटीनुसार उपरोक्त मशिनबाबत 3 वर्षाचा WARRENTY PERIOD असताना संगणक विभाग दि.11/012/2016 रोजीच्या टिप्पणीनुसार नगरभवन कार्यालय, भाईंदर (प.) येथील बायोमॅट्रिक्स मशिन बंद असल्याने मे. भरारी सर्विसेस यांचेकडून 1 नविन मशिन खरेदी करण्यास दि.15/02/2016 अन्वये मंजूरी दिलेली आहे व याबाबत मनपा/संगणक/376/2015-16 दि.23/02/2016 नुसार कार्यादेश देण्यात आलेले आहेत. याबाबत सदर मशिन्स WARRENTY PERIOD मध्ये असताना दुरूस्ती करून न घेता नविन मशिन पुरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात आलेले आहेत त्यामुळे सदर नविन मशिनची खरेदी रक्कम रु.8,239/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे याबाबत मशिनची नोंद घेतल्याबाबतची साठानोंदवही, जडवस्तू संग्रह नोंदवही, वाटप नोंदवही, इन्स्टॉलेशन रजिस्टर इ. लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

3. तसेच दि.23/06/2015 च्या स्थानिक संस्थाकर विभागाच्या पत्रात वृत्तात त्यांनी दि.22/06/2015 रोजी त्याचे बायोमॅट्रीक मशिन बंद असल्याचे कळविले आहे व दुरूस्ती करणेबाबत कळविले आहे. या अनुषंगाने दि.14/08/2015 रोजीच्या टिप्पणीनुसार सदर विभागास नविन 1 बायोमॅट्रीक खरेदीस मंजूरी दिलेली आहे व त्यानुसार मनपा/संगणक विभाग/112/15-16 दि.17/08/2015 नुसार कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर मशिन WARRENTY PERIOD मध्ये असताना नविन खरेदी आदेश देण्यात

आलेले आहेत. त्यामुळे सदर खर्च रु.8,239/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. याबाबत सदर मशिनची नोंद असलेले साठा नोंदवही, जडवस्ततू संग्रह नोंदवही, मशिन कोणत्या ठिकाणी बसविली याबाबतची वाटप नोंदवही, इन्स्टॉलेशन रजिस्टर इ. लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

4. सदर खरेदी केलेल्या बायोमॅट्रीक मशिन तांत्रिक दृष्टया योग्य दर्जाच्या असल्याचा/पुरवठा केल्याचा अहवाल नस्तीत नाही

5. शासनाच्या किंवा DGS&D च्या दर कराराप्रमाणे खरेदी करण्यात आलेली नाही याचा खुलासा करावा.

6. निविदा स्विकृत दर बाजार भावाशी तुलना करता वाजवी असल्याबाबत सादर स्पष्ट करणारे अभिलेखे नस्ती सोबत नाहीत.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.91 दि.03/04/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 70, Hmm No : 91)

## *69 विकास योजना आरखडा नुसार आरक्षित केलेल्या जागांच्या भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : नगर रचना महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महापालिकेला विकसित करावयाच्या 211 आरक्षणांपैकी फक्त 56 आरक्षणे विकसित करण्यात आलेली असून उर्वरीत 101 आरक्षणाबाबत भूसंपादन न झाल्यामुळे विकसित करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगररचना अधिनियम-1966 चे कलम 127 अन्वये विकास योजना मंजूर होऊन ती अंमलात आल्यापासून 10 वर्ष कालावधीत जर नियोजन/समुचित प्राधिकरणाने सार्वजनिक आरक्षणाची भूसंपादनाची कार्यवाही केली नाही तर जमीन मालक सबंधित प्राधिकरणावर खरेदी सूचना नोटीस बजावू शकतो अशी नोटीस बजावल्यानंतर सबंधित प्राधिकरणामार्फत 6 महिन्यात भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विकास योजना रस्ते व रस्त्याचे रुंदीकरणाच्या विकासाचे काम महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणेत येत असल्यामुळे त्यासाठीच्या तरतुदी व झालेला खर्च याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त होवू शकेल असे नमूद करून अनुपालन सादर केलेले असल्याने व प्रत्यक्ष तरतुद व खर्च याची माहिती लेखा***

***परिक्षणास अनुपालनासोबत सादर केलेली नाही.महाराष्ट्र नगररचना अधिनियम-1966 मधील कलम 26(2) अन्वये संपादित केलेल्या आरक्षणावर बांधकाम, रस्ता डांबरीकरण, सिमा भिंत यासाठी येण्याऱ्या खर्चाची 20 टक्के तरतूद अर्थसंकल्पात करणे बंधनकारक आहे. परंतु तशी तरतूद केल्याचे बजेट नोंदवहीत दिसून आले नाही.***

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/1997 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील विकास योजना आराखडा तपासाला असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.31 दि.16/01/2019 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून प्राप्त झालेल्या दि.28/02/2019 च्या अनुपालनानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. महानगरपालिका क्षेत्रात एकूण 386 आरक्षण क्षेत्र असून त्यापैकी 211 क्षेत्रे महापालिकेसाठी आरक्षित करण्यात आलेले आहेत व उर्वरित 175 क्षेत्रे इतर संस्थासाठी (52 अधिसुचित गावांतील आरक्षणांची संख्या MMRDA व सी.आर.झेड न बाधीत 123) आरक्षित करण्यात आलेली आहेत. महानगरपालिकेने एकूण 334 आरक्षित क्षेत्रापैकी फक्त 112.78 क्षेत्रे ताब्यात घेतलेले आहे. महापालिकेला विकसित करावयाच्या 211 आरक्षणांपैकी फक्त 56 आरक्षणे विकसित करण्यात आलेली असून उर्वरीत 101 आरक्षणाबाबत भूसंपादन न झाल्यामुळे विकसित करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगररचना अधिनियम-s1966 चे कलम 127 अन्वये विकास योजना मंजूर होऊन ती अंमलात आल्यापासून 10 वर्ष कालावधीत जर नियोजन/समुचित प्राधिकरणाने सार्वजनिक आरक्षणाची भूसंपादनाची कार्यवाही केली नाही तर जमीन मालक सबंधित प्राधिकरणावर खरेदी सूचना नोटीस बजावू शकतो अशी नोटीस बजावल्यानंतर सबंधित प्राधिकरणामार्फत 6 महिन्यात भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षणे आपोआप रद्द होतात अशी तरतूद आहे. याबाबत विभागाला प्रलंबित भूसंपादनाबाबत खुलासा विचारला असता त्यांनी दिलेल्या अनुपालनानुसार महापालिकेच्या आर्थिक परिस्थिती पाहता वरिलपैकी खाजगी वाटाघाटी किंवा भूसंपादनाच्या कार्यवाहीसाठी दयावा लागणारी रक्कम महानगरपालिकेस परवडणारी नसल्यामुळे विकास हक्क प्रमाणपत्रान्वये जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करणेत येवून ताब्यात आलेल्या जागा महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येते.

2. नगर विकास विभाग मुंबई शासन निर्णय टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12,

दि.25/08/2000 अन्वये महानगरपालिकेला सन 2000 पासून अंमलबजावणीचे आदेश आहेत. आरक्षित रस्त्यांच्या संपादनासाठी केलेली तरतूद व जागा मालकांना किती रक्कम अदा करून जागा ताब्यात घेवून त्यांचा विकास केलेला आहे. याबाबत माहिती विचारली असता विभागाने अनुपालनामध्ये विकास योजनेतील विविध आरक्षणे, विकास योजना रस्ते व रस्त्याचे रुंदीकरणाच्या विकासाचे काम महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणेत येत असल्यामुळे त्यासाठीच्या तरतुदी व झालेला खर्च याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त होवू शकेल असे नमूद करून अनुपालन सादर केलेले असल्याने व प्रत्यक्ष तरतुद व खर्च याची माहिती लेखा परिक्षणास अनुपालनासोबत सादर केलेली नाही.त्यामुळे जागेच्या रक्मेची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

3. महाराष्ट्र नगररचना अधिनियम-1966 मधील कलम 26(2) अन्वये संपादित केलेल्या आरक्षणावर बांधकाम, रस्ता डांबरीकरण, सिमा भिंत यासाठी येण्याऱ्या खर्चाची 20 टक्के तरतूद अर्थसंकल्पात करणे बंधनकारक आहे. परंतु तशी तरतूद केल्याचे बजेट नोंदवहीत दिसून आले नाही.

| अ.क्र. | सेक्टर न. | एकूण आरक्षणाची संख्या | आरक्षणाचे एकूण क्षेत्र (हेक्टर) अंदाजे | ताब्यात आलेले क्षेत्र (हेक्टर) अंदाजे | विकसीत आरक्षणाची क्षेत्र (हेक्टर) अंदाजे | अतिक्रमीत आरक्षणाची क्षेत्र (हेक्टर) अंदाजे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | I | 12 | 14.65 | 1.06 | 2.26 | 0.24 |
| 2 | II | 44 | 80.31 | 33.82 | 14.22 | 5.03 |
| 3 | III | 27 | 38.40 | 26.79 | 10.53 | 3.28 |
| 4 | IV | 34 | 56.58 | 0.49 | 0.42 | 0 |
| 5 | V | 23 | 10.97 | 1.25 | 4.85 | 1.70 |
| 6 | V-A | 25 | 15.63 | 6.96 | 5.80 | 0.75 |
| 7 | VI | 51 | 42.56 | 17.82 | 15.04 | 0.70 |
| 8 | VI-A | 65 | 47.96 | 16.98 | 4.10 | 2.19 |
| 9 | VII | 40 | 31.69 | 7.61 | 1.17 | 2.85 |
| 10 | VIII | 13 | 5.59 | 0 | 0 | 0 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | 334 | 344.34 | 112.78 | 58.39 | 16.74 |

उपरोक्त तक्त्यांनुसार 334 आरक्षित जागांपैकी फक्त 112.78 हेक्टर क्षेत्र ताब्यात आलेले आहे. अदयापही 42 टक्के क्षेत्र विकसित करणे बाकी आहे यासाठी महानगरपालिकेने विकसित करण्यासाठी महापालिकेने कोणतेही प्रयोजन केलेले दिसून येत नाही. जागा ताब्यात घेवून त्यांचा विकास न केल्याने महापालिका क्षेत्रात नागरिक पायाभूत सोयी सुविधा पासून वंचित राहिल्याचे दिसून येत आहे.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.31 दि.16/01/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 52, Hmm No : 31)

## *70 मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध ठिकाणी पंपिंग स्टेशन देखभाल दुरुस्तीच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : पंपिंग स्टेशन देखभाल महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कामाच्या अंदाजपत्रकिय खर्चाच्या 5 टक्केपेक्षा जादा दराने स्वीकारणेत येवू नयेत अशी तरतूद आहे. तथापि ठेकेदाराने सादर केलेल्या कामाच्या किंमतीच्या 5 टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे. पंपिंग स्टेशन देखभाल/दुरुस्तीसाठी (ITEM NO 2 – MATERIAL) जे साहित्य वापरले आहे ते कोणकोणत्या ठिकाणी व दिवशी वापरले हे नस्तीमध्ये आढळून आले नाही. मोजमाप पुस्तिकेमध्ये कामाचा दिनांक नमूद केला नसल्याने कोणत्या कालावधीत कोणते काम करण्यात आले याबाबत खातरजमा करता आली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात साहित्य वापरल्याची तपासणी करता आली नाही. राज्य कामगार विमा अधिनियम 1948 व कर्मचार भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतूदीनुसार ठेकेदाराने ESIC व EPF च्या कामगार वर्गणीची रक्कम व मालक हिस्सा रक्कम चलनाने संबंधित प्राधिकाऱ्याकडे चलनाने भरणा केल्याबाबत चलनाच्या प्रती, कामगारांची यादी नस्तीसोबत आढळून आली नाही. तसेच निविदा अटी/शर्ती नुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार किमान वेतन कायदयानुसार कामगारांना वेतन दिल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत. करारनामा अट क्र.9 नुसार सदर साहित्य जसे पंपाचे सुटे भाग, व्हॉल्व, मोटार हे योग्य दर्जाचे असणे आवश्यक आहे. दर्जा योग्य***

***असल्याची खात्री केल्याबाबतचा अहवाल नस्तीमध्ये अढळ होत नाही. ठेकेदाराने सदर कामासाठी वापरलेल्या साहितयाची अधिकृत विक्रेत्याकडील खरेदीची बिले, पुरवठा चलने आढळून आली नाहीत. वाहनावरील झालेल्या खर्चाचा तपशील व लॉग बुक लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने खर्च वाजवी व योग्य असल्याची खात्री करता आली नाही. कामाच्या केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविलयाचे नस्तीवरून दिसून येत नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परि. क्र.24 मधील नियम क्र.8(एच) नुसार झालेल्या कामाची 5% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. सदरील प्रमाणकासोबत जोडलेले मोजमाप पुस्तके यांच्यात कंत्राटदाराने कार्यादेशाप्रमाणे कामाच्या वर्गानुसार काम केले आहे, तसे नमूद केलेले नाही व तसे तारखेनिहाय मोजमाप केलेबाबत अभियंताने वेगवेगळया Estimated कामाच्या तारखा लिहून काम तपासणीची स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे काम कालमर्यादित असतांना कंत्राटदाराने काम केव्हा केव्हा, केलेले आहे, त्याबाबत लेखापरिक्षणास मोजमाप पुस्तिकेची खात्री करता आलेली नाही. पंपिंग स्टेशन देखभाल/दुरुस्तीच्या साहित्याची जसे पंपाचे सुटे भाग, व्हॉल्व, मोटार (ITEM NO.2 – MATERIAL) नोंदवही ठेवली नाही तसेच कामात निघालेले जुने साहित्य भांडार विभागात जमा केलेले नाही.***

मिरा भाईंदर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सन 2015-16 या वर्षात विविध ठिकाणी पंपिंग स्टेशन देखभाल दुरुस्तीच्या अनुषंगाने निविदा सूचना क्र.09 (2015-16) खालील प्रमाणे निविदा मागवून काम करण्यात आले.

| अ क्र | कामाचे नाव | मक्तेदाराचे नाव | अपेक्षित खर्च (DSR)2013-14 | कंत्राट दाराचे मंजूर दर | कार्यादेश क्र. व दि. | प्रशासकीय व आर्थिक मंजूरी | मंजूर दरानुसार अपेक्षित खर्च | काम पूर्ण झाल्याची तारीख | बांध काम नोंदवही | कामाची मुदत | तांत्रिक मंजूरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सृष्टी मलनि:सारण केंद्राची देखभाल/ दुरस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 2457400 | अंदाज पत्र कापेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/ 36/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 2653992 | 13/10/2016 | 988/75 ते 76 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभाम नपा यांची क्र.25 दि.20/5/ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | 15 |
| 2 | शांती पार्क मलनि:सारण केंद्राची (पंपगृह व मलनि:सारण पाईप) देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 2457400 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/ 35/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 2653992 | 13/10/2016 | 988/ 73 ते 74 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभामनपा यांची क्र.24 दि.20/5/15 |
| 3 | शांती नगर सेक्टर-3 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 2496600 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/ 37/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 2696328 | 13/10/2016 | 845/ 38ते 39 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभामनपा यांची क्र.20 दि.20/5/15 |
| 4 | शांती नगर सेक्टर-8 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 2496600 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/ 38/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 2696328 | 13/10/2016 | 845/ 40 ते 41 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभामनपा यांची क्र.27 दि.20/5/15 |
| 5 | जेसल पार्क मलनि:सारण केंद्राची देखभाल/ दुरुस्ती करणे | मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग | 2457400 | अंदाज पत्रका | मनपा/पापु/ 44/15-16 दि.21/08 | मा. आयुक्त यां दि.20/05 | 2653992 | 24/08/2016 | 989/ 32 ते 33 | 12 महिने दि. 21/8/15 ते | कार्यकारी अभियंता, पापु |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्क्स | | पेक्षा 8% जास्त दराने | /15 | /15 ची मंजूरी | | | | दि. 20/8/16 | विभाग मिभाम नपा यांची क्र.28 दि.20/5/15 |
| 6 | मिरा(एम.आय.डी.सी.)येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 2060900 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/ 39/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 2225772 | 13/10/2016 | 988/81 ते 82 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभाम नपा यांची क्र.29 दि.20/5/15 |
| 7 | मिरारोड (पु)शांती नगर सेक्टर-7 येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 1062400 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/ 40/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 1147392 | 13/10/2016 | 988/83 ते 84 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभाम नपा यांची क्र.30 दि.20/5/15 |
| 8 | पाली, लाईट हाऊस व चवळी येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 1062400 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दरा | मनपा/पापु/ 42/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 1147392 | 16/04/2016 | 988/33 ते 34 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभाम नपा यांची क्र.33 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ने | | | | | | | दि.20/5/15 |
| 9 | मिरारोड (पु)शांती नगर सेक्टर-11 येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 1982500 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/41/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 2141100 | 13/10/2016 | 988/85 ते 86 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभामनपा यांची क्र.31 दि.20/5/15 |
| 10 | काशी जनता नगर पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरुस्ती करणे | मे. ॲकॉर्ड वॉटर टेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | 1062400 | अंदाज पत्रका पेक्षा 8% जास्त दराने | मनपा/पापु/43/15-16 दि.13/08/15 | मा. आयुक्त यां दि.20/05/15 ची मंजूरी | 1147392 | 13/10/2016 | 1010/01 ते 02 | 12 महिने दि. 13/8/15 ते दि. 12/8/16 | कार्यकारी अभियंता, पापु विभाग मिभामनपा यांची क्र.34 दि.20/5/15 |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करून दिलेल्या नस्ती, मोजमाप पुस्तिका यांची तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

1. पंपिंग स्टेशन देखभाल/दुरुस्तीसाठी (ITEM NO 2 - MATERIAL) जे साहित्य वापरले आहे ते कोणकोणत्या ठिकाणी व दिवशी वापरले हे नस्तीमध्ये आढळून आले नाही. मोजमाप पुस्तिकेमध्ये कामाचा दिनांक नमूद केला नसल्याने कोणत्या कालावधीत कोणते काम करण्यात आले याबाबत खातरजमा करता आली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात साहित्य वापरल्याची तपासणी करता आली नाही.

2. राज्य कामगार विमा अधिनियम 1948 व कर्मचार भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतूदीनुसार ठेकेदाराने ESIC व EPF च्या कामगार वर्गणीची रक्कम व मालक हिस्सा रक्कम चलनाने संबंधित प्राधिकाऱ्याकडे चलनाने भरणा केल्याबाबत चलनाच्या प्रती, कामगारांची यादी नस्तीसोबत आढळून आली नाही. तसेच निविदा अटी/शर्ती नुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार किमान वेतन कायदयानुसार कामगारांना वेतन दिल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत.

3. करारनामा अट क्र.9 नुसार सदर साहित्य जसे पंपाचे सुटे भाग, व्हॉल्व, मोटार हे योग्य दर्जाचे

असणे आवश्यक आहे. दर्जा योग्य असल्याची खात्री केल्याबाबतचा अहवाल नस्तीमध्ये अढळ होत नाही. ठेकेदाराने सदर कामासाठी वापरलेल्या साहितयाची अधिकृत विक्रेत्याकडील खरेदीची बिले, पुरवठा चलने आढळून आली नाहीत.

4. अंदाजपत्रक बनविताना Item No.2 Minor Maintenance (Material) अंतर्गत वाहनाच्या देखभाल/दुरुस्तीचा खर्चाचा समावेश केलेला आहे. त्याप्रमाणे प्रती महा रक्कम रु.40,000/- या प्रमाणे रक्कमही प्रदान केली आहे. परंतु वाहनावरील झालेल्या खर्चाचा तपशील व लॉग बुक लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने खर्च वाजवी व योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

5. कामाच्या केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविलयाचे नस्तीवरून दिसून येत नाही.

6. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परि. क्र.24 मधील नियम क्र.8(एच) नुसार झालेल्या कामाची 5% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तपासणी केल्याचे अभिप्राय मोजमाप पुस्तिकेत नोंद केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदरील प्रमाणकासोबत जोडलेले मोजमाप पुस्तके यांच्यात कंत्राटदाराने कार्यादेशाप्रमाणे कामाच्या वर्गानुसार काम केले आहे, तसे नमूद केलेले नाही व तसे तारखेनिहाय मोजमाप केलेबाबत अभियंताने वेगवेगळया Estimated कामाच्या तारखा लिहून काम तपासणीची स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे काम कालमर्यादित असतांना कंत्राटदाराने काम केव्हा केव्हा, केलेले आहे, त्याबाबत लेखापरिक्षणास मोजमाप पुस्तिकेची खात्री करता आलेली नाही.

8. पंपिंग स्टेशन देखभाल/दुरुस्तीच्या साहित्याची जसे पंपाचे सुटे भाग, व्हॉल्व, मोटार (ITEM NO 2 - MATERIAL) नोंदवही ठेवली नाही तसेच कामात निघालेले जुने साहित्य भांडार विभागात जमा केलेले नाही. त्यामुळे सदर काम केल्याची खात्री करता आली नाही.

सदरील आक्षेपित मुद्यांबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.40 दिनांक29/01/2019 अन्वये कळविले असता विभागचे अनुपालन अप्राप्त आहे.त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 57, Hmm No : 40)

## *71 विवाह नोंदणी फ़ी व शास्तीची रक्कम शासन जमा न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : विवाह नोंदणी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 330475.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 330475.00/-

***महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाची अधिसुचना क्र. एस30/1007/848/प्र.क्र.284/कृ.क्र.2 दि.27/02/2008 नुसार राज्य शासनाने विवाह नोंदणी स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर काम महानगरपालिकेने करावयाचे आहे. तसेच आरोग्य सेवा संचलनालय (म.रा.) यांच्या वि.जा.क्र.संआसे/विवाह***

***नोंदणी/कक्ष18/2744-2857 दि.17/03/2016 च्या परिपत्रकामधील अनु.क्र.10 मध्ये नमुद केल्याप्रमाणे विवाह विज्ञाप्तीव्दारे जमा होणारी फ़ी खाली दिलेल्या लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. अशाप्रकारे, महापालिकेकडे विवाह नोंदणीव्दारे सन 2015-16 मध्ये एकूण 330475 एवढी रक्कम जमा झालेली आहे. परंतु महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, 1998 व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम, 1999 च्या नियम 12 नुसार शासकीय कोषागारात जमा होणे आवश्यक असताना ती जमा केलेली नाही.***

महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाची अधिसुचना क्र.एस30/1007/848/प्र.क्र.284/कृ.क्र.2 दि.27/02/2008 नुसार राज्य शासनाने विवाह नोंदणी स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर काम महानगरपालिकेने करावयाचे आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना क्र. विनोंका 2002/1448/प्र.क्र.423/ कु.कं.3 दि.29/03/2003 नुसार विवाह नोंदणी व त्या संबंधीच्या नियमातील बाबीतील शुल्काच्या दरामध्ये शासनाने सुधारणा केली आहे त्याप्रमाणे 29/03/2003 नुसार आहे. एप्रिल 2003 पासून सदर सुधारीत दराप्रमाणे विवाह नोंदणीसाठी 90 दिवसाच्या आतमध्ये नोंदणी केल्यास रु.50/- व 1 वर्षाच्या आत नोंदणी केल्यास रु.50/- व रु.100/- शास्तीची रक्कम भरावी लागणार आहे. तसेच 1 वर्षानंतर नोंदणी केल्यास रु.50/- अधिक रु.200/- शास्तीची रक्कम भरून विवाह नोंदणी करता येणार आहे. याप्रमाणे महानगरपालिका शुल्क आकारत आहे. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार दि.20 मे 1999, सार्वजनिक आरोग्य विभाग दि.15 मे 1999 अधिसुचना महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998, 160 च्या नियम 12 नुसार विवाह निबंधकाकडे आलेली सर्व फ़ी आणि शास्ती यांची रक्कम शासकीय कोषागार जमा करण्याबाबत नमुद केलेले आहे. तसेच आरोग्य सेवा संचलनालय (म.रा.) यांच्या वि.जा.क्र.संआसे/विवाह नोंदणी/कक्ष18/2744-2857 दि.17/03/2016 च्या परिपत्रकामधील अनु.क्र.10 मध्ये नमुद केल्याप्रमाणे विवाह विज्ञाप्तीव्दारे जमा होणारी फ़ी खाली दिलेल्या लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मुख्य शीर्षक:- 0030 मुद्रांक व नोंदणी फ़ी

उपशिर्षक:- 03 नोंदणी

उपगौण लेखा:- 800 इतर जमा 0030016106 विवाह अधिनियम अन्वये वसुल केलेली फी.

आर्थिक वर्ष 2015-16 मध्ये महानगरपालिकेच्या सर्व 1 ते 6 प्रभागांची संबंधित प्रभागांनी दिलेल्या महिती नुसार खालीलप्रमाणे विवाह नोंदणीची रक्कम जमा झालेली आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | विवाह नोंदणीची रक्कम |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. 1 | 30825 |

| | | |
|---|---|---|
| 2 | प्रभाग क्र. 2 | 57350 |
| 3 | प्रभाग क्र. 3 | 23250 |
| 4 | प्रभाग क्र. 4 | 45600 |
| 5 | प्रभाग क्र. 5 | 74550 |
| 6 | प्रभाग क्र. 6 | 98900 |
| एकूण रक्कम | | 330475 |

अशाप्रकारे, महापालिकेकडे विवाह नोंदणीव्दारे सन 2015-16 मध्ये एकूण 330475 एवढी रक्कम जमा झालेली आहे. परंतु महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, 1998 व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम, 1999 च्या नियम 12 नुसार शासकीय कोषागारात जमा होणे आवश्यक असताना ती जमा केलेली नाही.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.54 दि.28/02/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन समाधानकारक नसल्याने आक्षेप करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 67, Hmm No : 54)

### *72 मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कंत्राटी पध्दतीने सशस्त्र/बिनहत्यारी खाजगी सुरक्षा रक्षक नेमणुकीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कंत्राटी पध्दतीने सशस्त्र/ बिनहत्यारी खाजगी सुरक्षा रक्षक नेमणुक केलेले आहेत. शासन निर्णय क्र.5GA/1506/pra.kra-92/Labour-5 दि.06/11/2006 उदयोग व ऊर्जा व कामगार विभाग नुसार शासनाच्या विविध कार्यालयामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सुरक्षा रक्षक नियुक्त करावयाचे असल्यास शासन मान्य सुरक्षा रक्षक बोर्ड बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा करिता असलेल्या बोर्डावरुन घेणे बंधनकारक आहे. सदरील शासन निर्णयामधील मुद्दा क्र.2 नुसार महानगरपालिकेने सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक नियुक्त केले नाहीत त्यामुळे शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. सदर खाजगी सुरक्षा नेमणुक करताना केलेल्या करारामधील अट क्र.3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे रक्कम रुपये 50 लाखाची बँक गॅरंटी राष्ट्रीकृत बँकेमधील आयुक्तांच्या नावे करारातील कालावधी पर्यंत असणे आवश्यक आहे. परंतू सदरील बँक***

***गॅरंटी लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.***

शासन निर्णय क्र. 5GA/1506/pra.kra-92/Labour-5 दि.06/11/2006 उदयोग व ऊर्जा व कामगार विभाग नुसार शासनाच्या विविध कार्यालयामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सुरक्षा रक्षक नियुक्त करावयाचे असल्यास शासन मान्य सुरक्षा रक्षक बोर्ड बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा करिता असलेल्या बोर्डावरुन घेणे बंधनकारक आहे. सदरील शासन निर्णयामधील मुद्दा क्र.2 नुसार महानगरपालिकेने सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक नियुक्त केले नाहीत, तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महानगरपालिकेची राहिल व संबंधीतांवर कारवाई करण्यात येईल असे नमूद केले आहे.

महानगरपालिकेच्या सुरक्षा रक्षक नेमणुकीची नस्ती तपासणी केली असता खालीलप्रमाणे खाजगी सुरक्षा एजन्सीकडून सुरक्षा रक्षक नियुक्त केल्याचे दिसून येते.

| | |
|---|---|
| मे. सैनिक इंटिलिजीएन्स आणि सुरक्षा प्रा.लि. भाईंदर | दि.01/07/2005 ते आजतागय म्हणजेच दि.31/03/2016 |

1. मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि.1 जूलै 2005 ते दि.31 मार्च 2016 या कालावधीसाठी मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. भाईंदर (प.) या खाजगी एजन्सीकडून सुरक्षा रक्षक नियुक्त केलेले आहेत याबाबत अनुपालन सादर करावे व त्यांना ठेका कोणत्या पध्दतीने देण्यात आला याबाबत लेखा परिक्षणास अवगत करावे.
2. उपरोक्त शासनाच्या निर्णयानुसार सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांच्या कडून सुरक्षा रक्षकाची मागणी करून नियुक्ती करणेत आलेली नाही.
3. सदर खाजगी सुरक्षा नेमणुक करताना केलेल्या करारामधील अट क्र.3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे रक्कम रुपये 50 लाखाची बँक गॅरंटी राष्ट्रीकृत बँकेमधील आयुक्तांच्या नावे करारातील कालावधी पर्यंत असणे आवश्यक आहे. परंतू सदरील बँक गॅरंटी लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.
4. लेखापरिक्षण कालावधीत खाजगी सुरक्षा रक्षक नेमणूक केल्याची यादी लेखापरिक्षणास उपलब्ध करून दयावी.
5. खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीला अदा केलेल्या देयकांच्या नस्ती सन 2015-16 मधील लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात याव्यात.
6. दि.01/04/2015 ते दि.13/03/2016 या कालावधीत नियुक्त केलेल्या सुरक्षा एजन्सीचा तपशील लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात यावा.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.114 दि.01/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 74, Hmm No : 114)

## *73 आस्थापना विभागाने स्वतंत्र/वेगळे रोखपुस्तक न ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1473412.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1473412.00/-

***मिरा भाईंदर महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून खाजगी बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जाच्या परतफेडीच्या हप्त्याची एकूण 223 कर्मचाऱ्यांची रक्कम रु.14,73,412/- देयकातून कपात केली आहे. विभागाने याबाबत स्वतंत्र/ वेगळे रोखपुस्तक ठेवलेले नाही. विभागाने बँकेकडून याबाबतचे वसुलीचे विवरणपत्र प्राप्त करून घेतलेले नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकाची तपासणी केली असता, कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून खाजगी बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जाच्या परतफेडाचे हप्त्याची रक्कम देयकातून कपात करण्यात येते. एकूण 223 कर्मचाऱ्यांची रक्कम रु.14,73,412/- देयकातून कपाती केल्याचे दिसून येते. विभागाने याबाबत स्वतंत्र/वेगळे रोखपुस्तक ठेवलेले नाही. विभागाने बँकेकडून याबाबतचे वसुलीचे विवरणपत्र प्राप्त करून घेतलेले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष किती गृहकर्ज घेतले व किती रक्कमेची परतफेड केले व उर्वरित किती गृह कर्ज बाकी आहे. याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे बँकेकडून जादा गृहकर्ज हप्त्याची वसुली होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.115 दि.01/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 75, Hmm No : 115)

## *74 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनावरील कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी खात्यातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***भविष्य निर्वाह निधी लेजर बुक आणि भविष्य निर्वाह निधी बृहतपत्र (ब्रॉड शिट) चे संगणकीरण केलेले असून बृहतपत्राची सन 2015-16 ची प्रिंटेड प्रत ठेवण्यात आलेली आहे. परंतू सक्षम प्राधिकाऱ्यांची त्यावर स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर प्रत लेखापरिक्षणासाठी ग्राह्य धरता येत नाही. मासिक प्रगत बेरीज लेजर मध्ये सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित/ प्रमाणित केलेली नाही. (सन 2005-06 पासून लेखापरिक्षण कालावधीपर्यंत) सेवानिवृत्ती पूर्वी 3 महिने वर्गणी बंद करणे आवश्यक असताना ती न करता काही कर्मचाऱ्यांची वर्गणी कपात केलेली दिसून येते. (महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 7(4) नुसार नियत सेवावधीनंतर निवृत्तीच्या शेवटच्या तीन महिन्यापूर्वी निधीमध्ये वर्गणी भरता येत नाही)*** |

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे कॅश बुक, बृहतपत्र (ब्रॉड शिट) आणि लेजर ठेवण्यात येते. सदरील कॅश बुक, बृहतपत्र (ब्रॉड शिट) आणि लेजर भविष्य निर्वाह निधीची तपासणी केली असता खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1. भविष्य निर्वाह निधी लेजर बुक आणि भविष्य निर्वाह निधी बृहतपत्र (ब्रॉड शिट) चे संगणकीरण केलेले असून बृहतपत्राची सन 2015-16 ची प्रिंटेड प्रत ठेवण्यात आलेली आहे. परंतू सक्षम प्राधिकाऱ्यांची त्यावर स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर प्रत लेखापरिक्षणासाठी ग्राह्य धरता येत नाही.
2. भविष्य निर्वाह निधी लेजर बुकच्या मुळ प्रतीमध्ये संबंधित सर्व कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन नमूद केलेले नाही. (सन 2005-06 पासून लेखापरिक्षण कालावधीपर्यंत)
3. मासिक प्रगत बेरीज लेजर मध्ये सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित/प्रमाणित केलेली नाही. (सन 2005-06 पासून लेखापरिक्षण कालावधीपर्यंत)
4. भविष्य निर्वाह निधी अग्रिम अदा केल्यानंतर बिल नंबर आणि दिलेली तारीख लेजरमध्ये नमूद नाही.
5. भविष्य निर्वाह निधी कॅश बुक आणि बृहतपत्रामध्ये तफावत आहे.
6. तफावतीची कारणे लेखापरिक्षणास अवगत करावीत.
7. भविष्य निर्वाह निधी बृहतपत्र (ब्रॉड शिट) मध्ये आणि लेजर मध्ये काही कर्मचाऱ्यांचे अंशदान बंद केल्याचे दिसून येते. परंतू काही रक्कमा त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये दर्शविलेल्या आहेत. विभागाने याबाबतची परिगणना केलेली नाही.
8. लेख्यामधील दुरुस्ती खाडाखोड सक्षम प्राधिकाऱ्यांची साक्षांकित केलेल्या नाहीत.

9. सेवानिवृत्ती पूर्वी 3 महिने वर्गणी बंद करणे आवश्यक असताना ती न करता काही कर्मचाऱ्यांची वर्गणी कपात केलेली दिसून येते.
10. भविष्य निर्वाह निधी लेखानिधी सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेली नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.116 दि.01/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 76, Hmm No : 116)

## *75 मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध विभागातील प्रशासकीय कामासाठी संगणक चालक तथा लिपिक ठेका पध्दतीने भरल्याच्या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1456250.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1456250.00/-

***मिरा भाईंदर महानगरपालिकेने 68 संगणक चालक तथा लिपिक ठेका पध्दतीने 3 वर्षासाठी मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट भाईंदर (प.) जिल्हा ठाणे याच्याकडून घेतलेले आहेत. विभागाने ठेका देताना संबंधित ठेकेदाराचे/ नियोक्ताचे भविष्य निर्वाह निधी नोंदणी क्रमांक मागील 3 वर्षाचे भविष्य निर्वाह निधी विवरणपत्र ठेकेदाराकडून प्राप्त करुन घेतलेले नाहीत. ठेकेदाराने भविष्य निर्वाह निधी वर्गणी व रक्कम भरल्याचे PF Office ची चलने 2015-16 ची लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नाहीत. विभागाने ठेकेदाराकडून EPF Registration Certificate आणि ESIC Certificate करारातील अटीप्रमाणे घेतलेले नाही. मनपा आयुक्त पत्र क्र.GAD/387/2016 दि.26/05/2016 नुसार 68 उमेदवारांपैकी 25 उमेदवार करारामधील शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे त्या ऐवजी 25 दुसऱ्या उमेदवारांना पाठविण्याबाबत ठेकेदाराला कळविण्यात आलेले होते. परंतु नविन 25 उमेदवारांची यादी लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेने 68 संगणक चालक तथा लिपिक ठेका पध्दतीने 3 वर्षासाठी मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट भाईंदर (प.) जिल्हा ठाणे याच्याकडून घेतलेले आहेत. याबाबत त्यांना कार्यादेश क्र.corporation/GAD/1314/2015-16 दि.02 नोव्हेंबर 2015 ला देण्यात आला व रु.11,650/- प्रति संगणक चालक दर ठरविण्यात आला व याचा कालावधी दि.02 नोव्हेंबर 2015 ते दि.01 नोव्हेंबर 2018 असा ठरविण्यात आला. याबाबतची बँक गॅरंटी बेसिन कॅथलिक बँक BYD/27/2015-16 दि.02

नोव्हेंबर 2015 रक्कम रु.3,00,000/- दि.19 डिसेंबर 2016 पर्यंत मुदत असलेली घेण्यात आली. सदरील नस्तीचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. विभागाने ठेका देताना संबंधित ठेकेदाराचे/नियोक्ताचे भविष्य निर्वाह निधी नोंदणी क्रमांक मागील 3 वर्षाचे भविष्य निर्वाह निधी विवरणपत्र ठेकेदाराकडून प्राप्त करुन घेतलेले नाहीत. ठेकेदाराने भविष्य निर्वाह निधी वर्गणी व रक्कम भरल्याचे PF Office ची चलने 2015-16 ची लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नाहीत. विभागाने ठेकेदाराकडून EPF Registration Certificate आणि ESIC Certificate करारातील अटी प्रमाणे घेणे आवश्यक आहे.

2. विभागाने पुरेशा प्रमाणात बँक गॅरंटी दि.02 नोव्हेंबर 2015 ते दि.01 नोव्हेंबर 2018 या कालावधीसाठी घेतलेली नाही.

3. विभागाने 13.36.EPF आणि ESIC 4.75% वेतनाच्या स्थुल रक्कमेतून कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपाती केलेले आहेत. परंतु दि.02 नोव्हेंबर 2015 ते दि.30 एप्रिल 2018 या कालावधीची याबाबतची चलने लेखापरिक्षणास सादर केलेली नाहित.

4. मनपा आयुक्त पत्र क्र.GAD/387/2016 दि.26/05/2016 नुसार 68 उमेदवारांपैकी 25 उमेदवार करारामधील शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे त्या ऐवजी 25 दुसऱ्या उमेदवारांना पाठविण्याबाबत ठेकेदाराला कळविण्यात आलेले होते. परंतु नविन 25 उमेदवारांची यादी लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

5. विभागाने रुपये 20.39 लाख पैकी 25 उमेदवारांना अर्हता नसताना दि.02 नोव्हेंबर 2015 ते दि.31 मे 2016 या कालावधीत खालीलप्रमाणे अदा केलेले आहेत.

| प्रति माहे वेतन | कर्मचारी संख्या | एकूण मासिक वेतन | एकूण महिना | एकूण 5 महिन्याचे वेतन |
|---|---|---|---|---|
| 11650 | 25 | 291250 | 5 | 1456250 |

6. करारामध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेची तपासणी न करता विभागाने त्यांना वेतनाची रक्कम अदा केलेली आहे. विभागाने अदा केलेल्या देयकाची नस्ती किंवा मुळ निविदेची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहित.

7. ठेकेदाराला प्रति माहे वेतन अदा केलेबाबतची मुळ प्रमाणके लेखापरिक्षणाला उपलब्ध न झाल्याने प्रमाणकांचे लेखापरिक्षण करता आले नाही.

सदरील आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.117 दि.01/06/2019 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 77, Hmm No : 117)

## ***76 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मंजूर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : ९ड*

***शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.वेपुर 1209/प्र.क्र.69/सेवा-9, दि.05/05/2010 नुसार सहाव्या वेतन आयोगातील वेतनवाढ मंजूर करतांना अनियमितता झालेली आहे. वेतनवाढीतील येणाऱ्या रक्कमेत एक रुपयापेक्षा कमी पैसे येत असतील तर ती मागील दहाच्या पटीत तसेच एक रुपयापेक्षा जास्त रक्कम येत असेल तर ती पुढील दहाच्या पटीत पूर्णांकीत करणे आवश्यक आहे तसे केलेले नाही.***

शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.वेपुर 1209/प्र.क्र.69/सेवा-9, दि.05/05/2010 नुसार सहाव्या वेतन आयोगातील वेतनवाढ मंजूर करतांना, वेतनवाढीत येणाऱ्या रक्कमेत एक रुपयापेक्षा कमी पैसे येत असतील तर ती मागील दहाच्या पटीत तसेच एक रुपयापेक्षा जास्त रक्कम येत असेल तर ती पुढील दहाच्या पटीत पूर्णांकीत करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत निवडक कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तके तपासणी केली असता पुढील प्रमाणे वेतनवाढीच्या रक्कमेची परिगणना करताना अनियमितता झालेल्या दिसून येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव/ पद नाव | सेवा पुस्तकाप्रमाणे झालेली वेतन निश्चिती | आवश्यक सुधारीत वेतन निश्चिती | वेतन वाढीतील फरक रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. विनायक शिर्के, लिपिक | | | |
| | दि.02/05/2010 कालबध्द पदोन्नती | वेतन बॅन्ड मधील वेतन - 8360, ग्रेड पे - 2400 | वेतन बॅन्ड मधील वेतन - 8360, ग्रेड पे - 2400 | निरंक |
| | दि.01/07/2010 | वेतन बॅन्ड मधील वेतन - 9030, ग्रेड पे - 2400 | वेतन बॅन्ड मधील वेतन - 8990, ग्रेड पे - 2400 | 40 |
| 2. | श्री. संपत रामचंद्र चव्हाण, लिपिक | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 7060, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 7050, ग्रेड पे - 1900 | 10 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 7330, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 7320, ग्रेड पे - 1900 | 10 |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 7610, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 7600, ग्रेड पे - 1900 | 10 |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 7900, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 7890, ग्रेड पे - 1900 | 10 |
| 3. | श्री. पंढरीनाथ स. जाधव, शिपाई | दि.01/07/2010 रोजीचे वेतन - 7690, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2010 रोजीचे वेतन - 7690, ग्रेड पे - 1600 | निरंक |
| | | दि.01/07/2011 रोजीचे वेतन - 7970, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2011 रोजीचे वेतन - 7970, ग्रेड पे - 1600 | निरंक |
| | | दि.01/07/2012 रोजीचे वेतन - 8580, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2012 रोजीचे वेतन - 8260, ग्रेड पे - 1600 | 320 |
| 4. | श्रीम. वैशाली पाटील, लिपिक | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8000, ग्रेड पे - 2400 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8000, ग्रेड पे - 2400 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 8310, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 8320, ग्रेड पे - 2400 | 10 |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 8640+340 (L.G.S वेतन वाढ) 8/07 + ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 8650, ग्रेड पे - 2400 | 10 (LGS वेतनवाढीतला फरक) |
| 5. | श्री. विजय नवघरे, लिपिक | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 6240, ग्रेड पे - 1900 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 6240, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 6490+260 (L.G.S वेतन वाढ) 4/07 + ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 6490+260 (L.G.S वेतन वाढ) 4/07 + ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2013 रोजीचे वेतन - 8770, ग्रेड पे - | दि.01/07/2013 रोजीचे वेतन - 8770, ग्रेड पे - | निरंक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 1900 | 1900 | |
| | | दि.01/07/2014 रोजीचे वेतन - 8570, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2014 रोजीचे वेतन - 9090, ग्रेड पे - 1900 | 520 |
| | | दि.01/07/2015 रोजीचे वेतन - 8890, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2015 रोजीचे वेतन - 9420, ग्रेड पे - 1900 | 530 |
| 6. | श्रीम. हेलन गोन्सालवीस, लिपिक | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8190, ग्रेड पे - 2400 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8190, ग्रेड पे - 2400 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 8510 + ग्रेड पे - 2400 + 320 (L.G.S वेतन वाढ) 4/07 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 8510 + ग्रेड पे - 2400 + 330 (L.G.S वेतन वाढ) 4/07 | 10 (LGS वेतनवाढीतला फरक) |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 9160, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 9180, ग्रेड पे - 2400 | 20 |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 9500, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 9530, ग्रेड पे - 2400 | 30 |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 9880, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 9890, ग्रेड पे - 2400 | 10 |
| 7. | श्री. जगदीश का. भोपतराव, लिपिक | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8560, ग्रेड पे - 2400 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8560, ग्रेड पे - 2400 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 9300 + ग्रेड पे - 2400 + 410 (DLGFM वेतन वाढ) 5/07 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 8890 + ग्रेड पे - 2400 + 340 (DLGFM वेतन वाढ) 5/07 | 410 (मुळ वेतनवाढीतील फरक) 70 (DLGFM वेतन वाढीतील फरक ) |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 10130, ग्रेड पे | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 9580, ग्रेड पे - | 550 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | - 2400 | 2400 | |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 10560, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 9940, ग्रेड पे - 2400 | 620 |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 11010, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 10310, ग्रेड पे - 2400 | 700 |
| 8. | हंबीर हे रामु, लिपिक | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 6930, ग्रेड पे - 1900 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 6930, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 7200, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 7200, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 7480, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 7480, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 7770, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 7770, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 8070, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 8060, ग्रेड पे - 1900 | 10 |
| 9. | श्री. नारायण बा. पाटील, लिपिक | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 5960, ग्रेड पे - 1900 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 5960, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 6200, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 6200, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 6450, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 6450, ग्रेड पे - 1900 | निरंक |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 6710, ग्रेड पे - 1900 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 6700, ग्रेड पे - 1900 | 10 |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 6970, ग्रेड पे - | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 6960, ग्रेड पे - | 10 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 1900 | 1900 | |
| 10. | श्री. प्रकाश अनंता गोरखणे, शिपाई | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 4950, ग्रेड पे - 1300 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 4950, ग्रेड पे - 1300 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 5150, ग्रेड पे - 1300 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 5140, ग्रेड पे - 1300 | 10 |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 5350, ग्रेड पे - 1300 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 5340, ग्रेड पे - 1300 | 10 |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 5550, ग्रेड पे - 1300 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 5540, ग्रेड पे - 1300 | 10 |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 5760, ग्रेड पे - 1300 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 5750, ग्रेड पे - 1300 | 10 |
| 11. | श्री. यज्ञेश्वर पंढरीनाथ भोईर, शिपाई | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 6140, ग्रेड पे - 1600 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 6140, ग्रेड पे - 1600 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 6370, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 6380, ग्रेड पे - 1600 | 10 |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 6610, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 6620, ग्रेड पे - 1600 | 10 |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 6860, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 6870, ग्रेड पे - 1600 | 10 |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 7110, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 7130, ग्रेड पे - 1600 | 20 |
| | | दि.01/07/2010 रोजीचे वेतन - 7380, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2010 रोजीचे वेतन - 7400, ग्रेड पे - 1600 | 20 |
| | | दि.01/07/2011 रोजीचे वेतन - 7650, ग्रेड पे - | दि.01/07/2011 रोजीचे वेतन - 7670, ग्रेड पे - | 20 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 1600 | 1600 | |
| | | दि.01/07/2012 रोजीचे वेतन - 7930, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2012 रोजीचे वेतन - 7950, ग्रेड पे - 1600 | 20 |
| | | दि.01/07/2013 रोजीचे वेतन - 8220, ग्रेड पे - 1600 | दि.01/07/2013 रोजीचे वेतन - 8240, ग्रेड पे - 1600 | 20 |
| 12. | श्री. दिलिप महादेव गायकवाड, लिपिक | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8750, ग्रेड पे - 2400 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8750, ग्रेड पे - 2400 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 9080, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 9090, ग्रेड पे - 2400 | 10 |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 9420, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 9440, ग्रेड पे - 2400 | 20 |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 9770, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 9800, ग्रेड पे - 2400 | 30 |
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 10160, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 10170, ग्रेड पे - 2400 | 10 |
| 13. | सौ. मिवरल कुहटो (लिपिक) | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8190, ग्रेड पे - 2400 | दि.01/01/2006 रोजीचे वेतन - 8190, ग्रेड पे - 2400 | निरंक |
| | | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 8510, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2006 रोजीचे वेतन - 8510, ग्रेड पे - 2400 | निरंक |
| | | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 8830 + ग्रेड पे - 2400 + 330 (L.G.S वेतन वाढ) 4/07 | दि.01/07/2007 रोजीचे वेतन - 8840 + ग्रेड पे - 2400 + 330 (L.G.S वेतन वाढ) 4/07 = 9170 | 10 (मुळ वेतनवाढीतील फरक ) |
| | | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 9500, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2008 रोजीचे वेतन - 9520, ग्रेड पे - 2400 | 20 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 9850, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2009 रोजीचे वेतन - 9880, ग्रेड पे - 2400 | 30 |
| | | दि.01/07/2010 रोजीचे वेतन - 10220, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2010 रोजीचे वेतन - 10250, ग्रेड पे - 2400 | 30 |
| | | दि.01/07/2011 रोजीचे वेतन - 10620, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2011 रोजीचे वेतन - 10630, ग्रेड पे - 2400 | 10 |
| | | दि.01/07/2012 रोजीचे वेतन - 10990, ग्रेड पे - 2400 | दि.01/07/2012 रोजीचे वेतन - 11020, ग्रेड पे - 2400 | 30 |

अनियमिततेबाबत परिगणना करताना उपरोक्त त्रुटीचे निराकरण करुन इतर कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटी दुरुस्त करुन व अतिप्रदानाबाबत वसूली करुन लेखापरिक्षणास अनुपालन विहीत कालावधीत सादर करण्यात यावे.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास क्र.118 दिनांक 07/06/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 78, Hmm No : 118)

## *77 जाहिरात विभागातील जमा रकमेच्या पोटकीर्द, पावत्या, चलने इत्यादींमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष : जाहिरात विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 31992.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 31992.00/-

***सदर पावतीची व रक्कमेची नोंद पोटकीर्द, चलनावर नाही व पावतीवर जाहिरात फि वसूली लिपिकाची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर रक्कम बँकेमध्ये जमा केल्याबाबतची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. सन 2015-16 मधील जाहिरात फी वसूली पावती पुस्तक क्र.136 मधील पावती क्र.13565 दि.23/03/2016 (कालावधी दि.01/04/2015 ते दि.31/03/2016) रक्कम रु.17,592/- च्या पावतीवर IDBI बँक 301442 दि.21/03/2016 अशी***

***नोंद आहे, परंतु सदर पावतीची व रक्कमेची नोंद पोटकीर्द, चलनावर नाही. न वापरलेल्या पावत्या रितसर रद्द करणे आवश्यक आहे. पावती पुस्तक क्र.140 मधील पावती क्र.13973 ते 14000 तशाच कोऱ्या ठेवण्यात आलेल्या आहेत. जाहिरात फी वसुली लिपिक यांनी पावती दिल्यानंतर प्रत्येक पावतीवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. बऱ्याच पावत्यांवर स्वाक्षरी नाही. पोटकीर्दमध्ये व्यवहार नोंदविल्यानंतर दररोजच्या दररोज बंद करून लिपिक संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची पदनामासह स्वाक्षरी करण्यात आलेली नाही. मासिक गोषवारा प्रत्येक महिन्यानंतर काढणे आवश्यक आहे. वार्षिक गोषवारा काढल्यानंतर संबंधीताची लिपिक व संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची पदनामासह स्वाक्षरी नाही. पोटकीर्द पावती पुस्तकामधील पावत्यांची संख्या प्रमाणित नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये लावण्यात येणाऱ्या जाहिरातीच्या सुधारित दरास मा. महासभा ठराव क्र.27 दि.19/07/2014 नुसार मंजूरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिका जाहिरातीच्या प्रकारानुसार प्रति चौ. फुटाप्रमाणे दर आकारले जातात व पावतीदवारे संबंधितांकडून रक्कम रोख किंवा धनादेशादवारे जमा करून घेतली जाते व चलनाव्दारे सदर रक्कम रोख पालाकडे भरना करण्यात येते.

याबाबत विभागाने उपलब्ध करून दिलेली पावती पुस्तके, पोटकीर्द, चलने तपासले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. सन 2015-16 मधील जाहिरात फी वसूली पावती पुस्तक क्र.136 मधील पावती क्र.13564 दि.23/03/2016 (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015) रक्कम रु.14,400/- च्या पावतीवर कॅनरा बँक 5402621 अशी नोंद आहे, परंतु सदर पावतीची व रक्कमेची नोंद पोटकीर्द, चलनावर नाही व पावतीवर जाहिरात फि वसूली लिपिकाची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर रक्कम बँकेमध्ये जमा केल्याबाबतची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

2. सन 2015-16 मधील जाहिरात फी वसूली पावती पुस्तक क्र.136 मधील पावती क्र.13565 दि.23/03/2016 (कालावधी दि.01/04/2015 ते दि.31/03/2016) रक्कम रु.17,592/- च्या पावतीवर IDBI बँक 301442 दि.21/03/2016 अशी नोंद आहे, परंतु सदर पावतीची व रक्कमेची नोंद पोटकीर्द, चलनावर नाही. त्यामुळे सदर रक्कम बँकेमध्ये जमा केल्याबाबतची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3. चलनावर फक्त रोखीने जमा झालेली रक्कम अक्षरी नमुद केलेली आहे. त्यामुळे धनादेशादवारे रक्कम कधी जमा झाली याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

4. न वापरलेल्या पावत्या रितसर रद्द करणे आवश्यक आहे. पावती पुस्तक क्र.140 मधील पावती क्र.13973 ते 14000 तशाच कोऱ्या ठेवण्यात आलेल्या आहेत.

5. जाहिरात फी वसुली लिपिक यांनी पावती दिल्यानंतर प्रत्येक पावतीवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. बऱ्याच पावत्यांवर स्वाक्षरी नाही. (उदा. पावती पुस्तक क्र.136 पावती क्र.13600, 13501,

13505, 13506, 13507 ते 13510, 13552, 13553 इ.)

6. पोटकीर्दमध्ये व्यवहार नोंदविल्यानंतर दररोजच्या दररोज बंद करून लिपिक संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची पदनामासह स्वाक्षरी करण्यात आलेली नाही.

7. मासिक गोषवारा प्रत्येक महिन्यानंतर काढणे आवश्यक आहे.

8. वार्षिक गोषवारा काढल्यानंतर संबंधीताची लिपिक व संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची पदनामासह स्वाक्षरी नाही.

9. पोटकीर्द पावती पुस्तकामधील पावत्यांची संख्या प्रमाणित नाही.

सदरील आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास पत्र क्र.83 दि.26/03/2019 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 69, Hmm No : 83)

## *78 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागातील सेवापुस्तकातील नोंदी अद्यावत नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अधिकारी/कर्मचा-यांची निवडक सेवापुस्तकांची तपासणी केली असता, सेवापुस्तकामध्ये रजेचा लेखा अद्यावत ठेवण्यात आलेला नाही. शासन निर्णय क्र. मविसे10/2003/प्र.क्र.4230/आस्था. 3, दिनांक 23/04/2007 नुसार सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या मराठी, हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण झालेबाबत/सुट मिळालेबाबतच्या नोंदी घेतलेल्या नाहीत. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39 दि.19 मार्च, 2003 अन्वये संगणक ज्ञान परीक्षा (एम.एस.सी.आय.टी.) अधिकारी/कर्मचारी उत्तीर्ण झाल्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेतल्याचे आढळुन आले नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागाचे सन 2015-16 चे लेखापरीक्षण करत असताना खालील अधिकारी/कर्मचा-यांची निवडक सेवापुस्ताकांची तपासणी केली असता नमूद केलेल्या उणिवा व अनियमितता निदर्शनास आल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | सेवा पुस्तकातील त्रुटी |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीम. सावित्री सी. सावलकर (प्रसविका) | 1) सेवापुस्तकात नामनिर्देशनाच्या नोंदी नाहित.<br>2) रजा लेखा स्वाक्षरी नाही.<br>3) 7/17 वेतनवाढ कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही. |
| 2. | श्रीम. कल्पना गावीत (परिचारिका) | 1) सेवापुस्तकात नामनिर्देशनाच्या नोंदी नाहित.<br>2) रजा लेखा स्वाक्षरी नाही.<br>3) रजा कालावधी दि.26/12/2018 ते दि.29/12/2018 नोंदीखाली आस्थापना अधिक्षक स्वाक्षरी नाही.<br>4) 7/17, 7/18 वेतनवाढीसमोर कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही. |
| 3. | श्रीम. सुवर्णा पी. गावीत (प्रसविका) | 1) दि.2/5/2017 ते दि.4/5/2017 रजा नोंदीखाली आस्थापना अधिक्षक स्वाक्षरी नाही.<br>2) 7/17, 7/18 वेतनवाढी पुढे कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही.<br>3) रजा लेखा स्वाक्षरी नाही. |
| 4. | श्रीम. निता महादेव सानप (प्रसविका) | 1) दि.15/5/2017 ते दि.23/5/2017 रजा नोंदीखाली आस्थापना अधिक्षक स्वाक्षरी नाही.<br>2) दि.1/7/2018 वेतनवाढ मंजूर पुढे कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही.<br>3) रजा लेखा स्वाक्षरी नाही.<br>4) नामनिर्देशनाच्या नोंदी नाहित. |
| 5. | शेख अनवर हुसेन (अधिपरिचारिका) | 1) सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशनाच्या नोंदी नाहित.<br>2) 7/18 वेतनवाढ संबंधित कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही.<br>3) रजा लेखा स्वाक्षरी नाही. |
| 6. | श्री. कैलास दा. म्हात्रे | 1) संगणक परिक्षा उत्तीर्ण नोंद नाही.<br>2) नामनिर्देशनाच्या नोंदी नाहित.<br>3) रजा लेखा अपूर्ण 31 12/16 पर्यंत<br>4) रजा नोंदी दि.30/09/2008 पासून स्वाक्षरी नाही.<br>5) दि.1/7/2017 नंतर दि.1/7/2018 ला डायरेक्ट ग्रेड वेतन 2400 दर्शविलेले आहे.<br>(वेतननिश्चिती, कालबध्द पदोन्नती इ. नोंद नाही) |
| 7. | श्री. जयेश दा. पाटील (लिपिक) | 1) वेतनवाढी पुढे कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही.<br>2) दि.1/7/2017 पासून ग्रेड वेतन 2400 मंजूर केलेले आहे. (कालबध्द, पदोन्नती, वेतन निश्चिती आदेशाची नोंद नाही)<br>3) नामनिर्देशनाच्या नोंदी नाहित. |

| | | |
|---|---|---|
| | | 4) रजा लेखा अपूर्ण 31 12/16 पर्यंत स्वाक्षरी नाही. |
| 8. | सौ. शर्मिला धं. गावकर (लिपिक) | 1) नामनिर्देशनाच्या नोंदी नाहित.<br>2) जात पडताळणी नोंद आहे स्वाक्षरी नाही.<br>3) 30 6/16 पर्यंत रजा लेखा अपूर्ण आहे स्वाक्षरी नाही.<br>4) दि.23/8/2010 पासून दि.17/1/2012 रजा नोंदीवर स्वाक्षरी नाही. |
| 9. | श्री. पंढरीनाथ जाधव (शिपाई) | 1) रजा लेखा अपूर्ण 30 6/16 पर्यंत स्वाक्षरी नाही.<br>2) 7/14 ते 7/18 वेतनवाढीपुढे कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही.<br>3) दि.1/7/2015 ते दि.1/7/2018 रजा नोंदी स्वाक्षरी नाहीत.<br>4) जात पडताळणी नोंद नाही. |
| 10. | श्री. कैलास म्हात्रे | 1) दि.8/11/2010 पासून दि.10/11/2014 रजा नोंद स्वाक्षरी नाही.<br>2) रजा लेखा स्वाक्षरी नाही. रजा लेखा अपूर्ण (दि.31/12/2016 पर्यंत) |

1. सेवापुस्तकाची पडताळणी केली असता सेवापुस्तकामध्ये रजेचा लेखा अद्यावत ठेवण्यात आलेला नाही. रजा लेख्यावर सक्षम प्राधिकारी यांच्यावर स्वाक्षऱ्या नाहीत.

2. सेवापुस्तकामध्ये टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची नोंद, शासन निर्णय क्र.मविसे10/2003/ प्र.क्र.4230/आस्थाप3 दि.23/04/2007 नुसार सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याप मराठी, हिंदी भाषा परीक्षा उतीर्ण् झालेबाबत/सुट मिळालेबाबतच्या् नोंदी सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु सदरच्या नोंदी घेतलेल्यान नाहीत. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39 दि.19 मार्च, 2003 अन्वये संगणक ज्ञान परीक्षा (एम.एस.सी.आय.टी.) उत्तीर्ण् झाल्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. अन्यथा सदर परीक्षा उत्तीर्ण नसल्यास संबंधितांच्या वेतनवाढी स्थगित ठेवलेबाबतच्या नोंदी सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु अशा नोंदी सेवापुस्तकात घेतल्याचे आढळुन आले नाही.

3. सेवा पुस्तकात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 116(14) अनुसार नमुना क्र.3 मधील कुटुंबाचा तपशील, कुटुंबनिवृत्ती वेतनासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 117(7) अनुसार परिशिष्ट 5 मधील फॉर्म नं.4 नामनिर्देशन, मृत्यू नि सेवा उपदानासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 115(1) अनुसार परिशिष्ट 5 मधील फॉर्म नं.1 (कुटुंब असलेल्यांना) व फॉर्म नं.7 (कुटुंब नसलेल्यांना) मध्ये नामनिर्देशन, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम क्र.7(3) अनुसार भविष्य निर्वाह निधीसाठीचे नामनिर्देशनपत्र जोडलेले नाहीत.

4. शासन निर्णय क्र. बीसीसी-1207/प्र.क्र.53/08/16ब दि.16/06/2008 नुसार जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर करून त्याची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे.

5. सेवा पुस्तकाची दुसरी प्रत कर्मचाऱ्यास देणेत यावी प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांना साधारणपणे प्रत्येक वित्तीय वर्षात कमीत कमी एकदा सेवा पुस्तकातील नोंदी काळजीपूर्वक वाचल्या आहेत आणि त्या नोंदी बाबत त्याची खात्री पटली आहे अशा अर्थाचे प्रतिज्ञापत्र त्याच्याकडून घेण्यात यावे असे प्रतिज्ञापत्र घेतल्याबद्दलचा अहवाल कार्यालय प्रमुखाने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास पाठवावा. याप्रमाणे कार्यवाही या कार्यालयात पार पाडली जात नाही.

6. वर्तणुक व चारीत्र पडताळणी प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेतल्याचे आढळुन आले नाही.

7. जन्मतारखेची नोंद शाळा सोडल्यांच्या दाखल्यावरून किंवा तत्सम प्रमाणपत्रावरून खात्री करून प्रमाणित करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपित मुद्याबाबत विभागाला अर्ध समास क्र.123 दिनांक 11/06/2019 अन्वये अनुपालन मागविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DATSLMM7301 (Ref No : 80, Hmm No : 123)

**आक्षेप विवरणपत्राबाबत :** लेखापरिक्षण अहवालात समाविष्ठ केलेल्या सर्व परिच्छेदांबाबत लेखापरीक्षण चालू असतांना अर्धमास पत्रे निर्गमीत करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त उत्तरे व अनुपालन तपासुन सर्वसामान्य स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता करुन घेण्यात आली असल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमीत केले नाही.

**अनुपालन :** या लेखापरीक्षण अहवालाचे परिपुर्ण अनुपालन (तीन प्रतीत) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 10(1) मधील तरतुदीनुसार, हा लेखापरीक्षण अहवाल मिळाल्यापासून 4 महिन्याच्या आत, महासभेच्या मान्यतेच्या ठरावाच्या प्रतीसह आयुक्त, मिरा-भाईदर महानगरपालिका, भाईदर यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

**पोहोच :** सदर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याची तारीख कळवून तात्काळ पोहोच देण्यात यावी.

**(नितिन पाठक)**
**उपसंचालक (मनपालेप)**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई.**

**प्रत अग्रेषित -**

1. मा. प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र -1, (लेखापरीक्षा), मुंबई.
2. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई- 32
3. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
4. मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
5. मा. सहसंचालक, (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
6. पुनर्विलोकन अहवाल शाखा, (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, रायगड भवन, नवी मुंबई.
7. अभिलेख कक्ष, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, रायगड भवन, नवी मुंबई

**(नितिन पाठक)**
**उपसंचालक (मनपालेप)**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई.**

## *लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र*

| नाव | परिच्छेद क्रमांक |
| --- | --- |
| तुषार विष्णू मोरे, सहाय्यक संचालक | 38, 39, 5, 58, 59, 62, 63 |
| अमृता रमेशसिंग परदेशी, सहाय्यक संचालक | 14, 3, 64, 66 |
| विजय रंगनाथ खेडकर, लेखापरिक्षा अधिकारी | 1, 10, 29, 31, 33, 34, 35, 36, 37, 4, 45, 46, 53, 6, 67, 69, 7, 70, 8, 9 |
| राजु यमू जाधव, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 12, 13, 17, 18, 2, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 30, 32, 40, 43, 44, 48, 49, 50, 51, 52, 54, 55, 57 |
| सुनिल लक्ष्मण महारणुर, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 11, 15, 16, 19, 41, 42, 47, 56, 60, 61, 65, 68, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78 |

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 7217841.00 | 6800.00 | ---- | ---- | 7224641.00 |
| 2 | 3 | 2734100.00 | ---- | ---- | ---- | 2734100.00 |
| 3 | 4 | 41000170.00 | 51190.00 | 98977.00 | ---- | 41051360.00 |
| 4 | 6 | 6608134.00 | 3690726.00 | ---- | ---- | 10298860.00 |
| 5 | 7 | ---- | 40300.00 | ---- | ---- | 40300.00 |
| 6 | 8 | 1264400.00 | 4400.00 | ---- | ---- | ---- |
| 7 | 9 | 805000.00 | 800.00 | ---- | ---- | 805800.00 |
| 8 | 10 | 1900000.00 | 800.00 | ---- | ---- | 1900800.00 |
| 9 | 12 | ---- | 6289727.00 | ---- | ---- | 6289727.00 |
| 10 | 13 | ---- | 974149.00 | ---- | ---- | 974149.00 |
| 11 | 14 | 3389650.00 | 128299.00 | ---- | ---- | 3517949.00 |
| 12 | 15 | ---- | 32018.00 | 18347.00 | ---- | 50365.00 |
| 13 | 16 | 5999000.00 | 225570.00 | ---- | ---- | 6224570.00 |
| 14 | 17 | 1311509278.00 | 992355.00 | ---- | ---- | 1312501633.00 |
| 15 | 18 | 365454832.00 | ---- | ---- | ---- | 365454832.00 |
| 16 | 19 | 1103025.00 | 400.00 | ---- | ---- | 1103425.00 |
| 17 | 20 | 7506190.00 | 432483.00 | ---- | ---- | 7938673.00 |
| 18 | 21 | ---- | 89647905.00 | ---- | ---- | 89647905.00 |
| 19 | 22 | ---- | 11493381.00 | ---- | ---- | 11493381.00 |
| 20 | 23 | ---- | 894055838.00 | ---- | ---- | 894055838.00 |
| 21 | 24 | ---- | 520206226.00 | ---- | ---- | 520206226.00 |
| 22 | 25 | ---- | 5524000.00 | ---- | ---- | 5524000.00 |
| 23 | 26 | 14576506.00 | 1668044.00 | ---- | ---- | 16244550.00 |
| 24 | 27 | ---- | 4828747.00 | ---- | ---- | 4828747.00 |
| 25 | 28 | 40000000.00 | 14000.00 | ---- | ---- | 40014000.00 |
| 26 | 29 | 2766960.00 | 1700.00 | ---- | ---- | 2766960.00 |
| 27 | 30 | ---- | 5669192.00 | ---- | ---- | 5669192.00 |
| 28 | 31 | ---- | 8041209.00 | ---- | ---- | ---- |
| 29 | 32 | ---- | 12457131.00 | ---- | ---- | 12457131.00 |
| 30 | 33 | 400555.00 | ---- | ---- | ---- | 400555.00 |
| 31 | 34 | 1582000.00 | 500.00 | ---- | ---- | 1582500.00 |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | 35 | ---- | 300.00 | ---- | ---- | 300.00 |
| 33 | 36 | ---- | 300.00 | ---- | ---- | 300.00 |
| 34 | 37 | 4991513.00 | 1200.00 | ---- | ---- | 4991513.00 |
| 35 | 39 | 2001613.00 | ---- | ---- | ---- | 2001613.00 |
| 36 | 40 | 17556250.00 | ---- | ---- | ---- | 17556250.00 |
| 37 | 41 | 2663850.00 | ---- | ---- | ---- | 2663850.00 |
| 38 | 42 | 1000000.00 | ---- | ---- | ---- | 1000000.00 |
| 39 | 43 | 2959082.00 | ---- | ---- | ---- | 2959082.00 |
| 40 | 44 | 6570000.00 | ---- | ---- | ---- | 6570000.00 |
| 41 | 46 | 1301120.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 42 | 47 | 11900000.00 | ---- | ---- | ---- | 11900000.00 |
| 43 | 48 | 880000.00 | 400.00 | ---- | ---- | 880400.00 |
| 44 | 49 | 894100.00 | 400.00 | ---- | ---- | 894500.00 |
| 45 | 50 | 1788072.00 | 800.00 | ---- | ---- | 1788872.00 |
| 46 | 51 | 922118.00 | ---- | ---- | ---- | 922118.00 |
| 47 | 52 | 959060.00 | ---- | ---- | ---- | 959060.00 |
| 48 | 53 | 35000.00 | ---- | ---- | ---- | 35000.00 |
| 49 | 54 | 4472500.00 | ---- | ---- | ---- | 4472500.00 |
| 50 | 56 | ---- | 50680000.00 | ---- | ---- | 50680000.00 |
| 51 | 57 | 3336858.00 | ---- | ---- | ---- | 3336858.00 |
| 52 | 61 | 2412094.00 | ---- | ---- | ---- | 2412094.00 |
| 53 | 64 | 389879232.00 | 33744044.00 | ---- | ---- | 423623276.00 |
| 54 | 65 | 13633548.00 | ---- | ---- | ---- | 13633548.00 |
| 55 | 66 | 6988649.00 | ---- | ---- | ---- | 6988649.00 |
| 56 | 67 | 594958.00 | 500.00 | ---- | ---- | 595458.00 |
| 57 | 68 | 144000.00 | ---- | ---- | ---- | 144000.00 |
| 58 | 71 | 330475.00 | ---- | ---- | ---- | 330475.00 |
| 59 | 73 | 1473412.00 | ---- | ---- | ---- | 1473412.00 |
| 60 | 75 | 1456250.00 | ---- | ---- | ---- | 1456250.00 |
| 61 | 77 | 31992.00 | ---- | ---- | ---- | 31992.00 |
| **एकूण रक्कम** | | **2296993387** | **1650905834** | **117324** | **0** | **3937303539** |

सन 2015-16

विवरणपत्र - एस 1(अ)

महानगरपालिका निहाय स्वनिधीची महसूली व भांडवली जमा, खर्च व शिल्लक

(रुपये लाखात)

| सन | | स्वनिधी | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | महानगरपालिका | आरंभीची शिल्लक | महसूली जमा | | भांडवली जमा | | एकूण प्रत्यक्ष जमा | महसूली खर्च | | भांडवली खर्च | | एकूण प्रत्यक्ष खर्च | अखेरची शिल्लक |
| | | | अंदाजपत्रकिय जमा | प्रत्यक्ष जमा | अंदाजपत्रकिय जमा | प्रत्यक्ष जमा | | अंदाजपत्रकिय खर्च | प्रत्यक्ष खर्च | अंदाजपत्रकिय खर्च | प्रत्यक्ष खर्च | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 (3+5+7) | 9 | 10 | 11 | 12 | 13 (10+12) | 14 (8-13) |
| 1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका | 5484.09 | 62452.39 | 52369.39 | 69214.02 | 27018.62 | 84872.1 | 40051.98 | 32235.57 | 96575.01 | 41117.49 | 73353.06 | 11519.04 |
| | | | | | | | | | | | | | |

मुख्यलेखाधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन 2015-16

विवरणपत्र - एस 1(ब)

महानगरपालिका निहाय स्वनिधी व शासकिय निधी एकत्रित जमा, खर्च व शिल्लक तपशिल

(रुपये लाखात)

| सन | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शासकिय निधी | | | | | एकूण एकंदर | | | | | |
| अ.क्र | महानगरपालिका | आरंभीची शिल्लक | जमा | एकूण जमा | खर्च | अखेरची शिल्लक | आरंभीची शिल्लक | जमा | एकूण जमा | खर्च | अखेरची शिल्लक | शेरा |
| | | | | 5 | | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | 2 | 3 | 4 | (3+4) | 6 | (5-6) | (स्वनिधी + शासकिय निधी) | (स्वनिधी + शासकिय निधी | (8+-9) | (स्वनिधी + शासकिय निधी) | (10-11) | |
| 1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका | 2983.46 | 18584.86 | 21568.32 | 13482.76 | 8085.56 | 2500.62 | 65274.03 | 67774.65 | 64341.18 | 3433.47 | |
| | | | | | | | | | | | | |

मुख्यलेखाधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मत्ता व दायित्वे (नमुना क्र. २९)
## सन 2015-2016

आकडे लाखांत

| अ.क्र. | दायित्वे | रुपये | एकूण | अ.क्र. | मत्ता | रुपये | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | <u>शिल्लक रक्कम</u> | | |
| 1 | ठेवी (मनपाकडे ठेवलेल्या) | 4990.71 | **4990.71** | | A) बँक शिल्लक | 18186.63 | |
| | | | | | B) हातातील शिल्लक | 1.64 | **18188.27** |
| | | | | | C) उपकर खाते बँकेतील शिल्लक | 1137.73 | **1137.73** |
| 2 | कर्ज (परतफेड न केलेले) | 19370.85 | **19370.85** | 2 | <u>वसुल करावयाची अग्रीम रक्कम</u> | 92.54 | **92.54** |
| 3 | कर्मचाऱ्यांची देणी | 3.87 | **3.78** | 3 | <u>वसुल न झालेली कराची रक्कम</u> | | |
| | | | | | A) थकीत | 3890.70 | |
| | | | | | B) चालू | 4505.28 | **8395.98** |
| 4 | प्रलंबित देयके | 685.07 | **685.07** | 4 | <u>वसुल न झालेली इतर कराची रक्कम (भाडे, फी, शुल्क)</u> | | |
| | | | | | A) थकीत | 114.16 | |
| | | | | | B) चालू | 69.46 | **183.62** |
| 5 | अखर्चित अनुदाने | 8085.56 | **8085.56** | 5 | मनपाने ठेवलेली ठेव | 303.20 | **303.20** |
| 6 | <u>खास निधी</u> | | | 6 | <u>खास निधी</u> | | |
| | १) कर्मचारी निवृत्ती वेतन | 2221.91 | | | १) कर्मचारी निवृत्ती वेतन | 2221.91 | |
| | २) भविष्य निर्वाह निधी | 2803.39 | | | २) भविष्य निर्वाह निधी | 2803.39 | |
| | ३) वेतन राखीव निधी | 857.72 | | | ३) वेतन राखीव निधी | 857.72 | |
| | ४) घसारा निधी | 249.84 | | | ४) घसारा निधी | 249.84 | |
| | ५) पाणीपुरवठा राखीव निधी | 2687.51 | | | ५) पाणीपुरवठा राखीव निधी | 2687.51 | |
| | ६) कर्मचारी कल्याण निधी | 71.11 | | | ६) कर्मचारी कल्याण निधी | 71.11 | |
| | ७) MMRDA कर्जपरतफेड निधी | 3903.00 | | | ७) MMRDA कर्जपरतफेड निधी | 3903.00 | |
| | ८) विकास निधी | 68.50 | | | ८) विकास निधी | 68.50 | |
| | ९) परिभाषित अंशदान निधी | 1053.45 | | | ९) परिभाषित अंशदान निधी | 1053.45 | |
| | १०) आग सुरक्षा निधी | 1188.47 | **15104.90** | | १०) आग सुरक्षा निधी | 1188.47 | **15104.90** |
| | **एकूण** | **48240.96** | | | **एकूण** | **43406.24** | **43406.24** |
| | | | | | **दायित्वाचे अधिक्य** | | **4834.63** |
| | | | **48240.87** | | | | **48240.87** |

| | | |
|---|---|---|
| **मुख्यलेखाधिकारी** | **मुख्यलेखापरिक्षक** | **उपायुक्त (मु.)** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका | मिरा भाईंदर महानगरपालिका | मिरा भाईंदर महानगरपालिका |

विवरणपत्र - क्र.3

महानगरपालिकेस योजनानिहाय प्राप्त झालेल्या अखर्चित शासकिय निधीबाबत

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन

(रुपये लाखात)

| अ.क्र | योजनेचे नाव | मंजूर करणारे प्राधिकारी | राज्य लेख्यातील प्रधानशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाच्या आरंभीचे शिल्लक अनुदान | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाच्या आरंभीचे प्राप्त अनुदान | एकूण उपलब्ध अनुदान | लेखापरीक्षण वर्षामध्ये केलेला खर्च | शिल्लक अनुदान | सन (लेखापरीक्षण वर्षानंतरचे वर्ष) मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची रक्कम | शासनास परत करावयाची अनुदानाची रक्कम | उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | वित्त आयोग | | | 2218.23 | 2218.23 | 4436.46 | 3417.76 | 1018.70 | 1018.70 | NIL | होय | |
| 2 | BSUP योजना | | | NIL | 1974.11 | | 1017.82 | 956.29 | 956.29 | NIL | होय | |
| 3 | JNNURM | | | 0.70 | NIL | | NIL | NIL | | | | |
| | | | | | | | | | | | | |

मुख्यलेखाधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

विवरणपत्र क्र.4 (अ)

संकलित करांची मागणी, वसुली व शिल्लक याबाबतची माहिती

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन

(रुपये लाखात)

| अ.क्र | कराचे नांव | मागणी | | | वसुली | | | एकूण शिल्लक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील थकबाकी | चालू | एकूण | मागील थकबाकीची वसुली | चालू | एकूण | मागील थकबाकीची शिल्लक | चालू | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | मालमत्ता कर | 3465.94 | 9535.00 | 13001.03 | 3438.00 | 6634.00 | 10072.00 | 27.94 | 2901.00 | 2928.94 |
| 2 | पाणपट्टी कर | 163.44 | 4374.26 | 4537.70 | 82.05 | 4201.43 | 4283.48 | 81.39 | 172.83 | 254.22 |
| 3 | जल उपकर | 9.46 | 11.96 | 21.42 | 0.36 | 9.64 | 10.00 | 9.10 | 1.96 | 11.06 |
| 4 | मोकळया जागेवरील कर | 4969.39 | 1965.09 | 6934.48 | 1196.79 | 535.63 | 1732.43 | 3762.60 | 1429.46 | 5192.06 |
| | | | | | | | | | | |

**मुख्यलेखाधिकारी**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

## विवरणपत्र क्र.4 (ब)

### संकलित करांची मागणी, वसुली व शिल्लक याबाबतची माहिती

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन - 2015-16

(रुपये लाखात)

| अ.क्र | कराचे नांव | मागणी | | | वसुली | | | एकूण शिल्लक | | | वसुलीची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील थकबाकी | चालू | एकूण | मागील थकबाकीची वसूली | चालू | एकूण | मागील थकबाकीची शिल्लक | चालू | एकूण | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | जाहिरात कर | 88.97 | 344.73 | 433.70 | 34.35 | 340.74 | 375.09 | 54.62 | 3.98 | 58.61 | | |
| 2 | मिळकत कर | 124.03 | 100.01 | 224.05 | 65.50 | 34.83 | 99.34 | 59.52 | 65.18 | 124.71 | | |
| | | | | | | | | | | | | |

टिप :- 1) वरील माहिती देत असताना एकूण मागणी (-) वसुली (=) शिल्लक अशाप्रकारे पडताळता येणे आवश्यक आहे. 2)

मागील वर्षी कळविलेल्या माहितीबरोबर थकबाकीची माहिती जुळणे आवश्यक आहे. जुळत नसल्यास त्याप्रमाणे स्पष्टीकरणासह कारणे द्यावीत.

**मुख्यलेखाधिकारी**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

## विवरणपत्र क्र.5(अ)

महानगरपालिका यांना दिलेल्या अग्रिम रकमांचा तपशिल

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन - 2015-16

(रुपये लाखात)

| अ.क्र | अग्रिमाचा तपशिल | मागील शिल्लक अग्रिम | चालू वर्षी दिलेले अग्रिम | एकूण | वसूली | मार्च 2016 अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 (5-6) |
| 1 | अग्रिम | 59.30 | 20.40 | 79.71 | 16.81 | 62.90 |
| | | | | | | |

**मुख्यलेखाधिकारी**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

विवरणपत्र - क्र.5 (ब)

महानगरपालिका यांना दिलेल्या प्रलंबित अग्रिम रकमेचा वर्षनिहाय तपशिल

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन 2015-16 (रुपये लाखात)

| अ.क्र. | वर्ष | प्रलंबित अग्रिम रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 2015-16 | 62.90 | |
| | | | |
| एकूण रक्कम | | | |

मुख्यलेखाधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

विवरणपत्र - क्र.6

महानगरपालिका यांनी इतर संस्थांकडून घेतलेली कर्ज

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन -2015-16

| अ.क्र | ज्य संस्थेकडून कर्ज घेतले त्या संस्थेचे नांव | कर्जाचा तपशिल | दि.01/04/2019 रोजीची शिल्लक | चालू वर्षाचे नविन कर्ज | एकूण | परतफेड केलेली रक्कम | | | मार्च 2016 अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मुद्दल | व्याज | एकूण | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 (7+8) | 10 (6-7) |
| 1 | MMRDA | 50 एम.एल.डी. पाणी पुरवठा | 1377.23 | | 1377.23 | 652.41 | 97.39 | 749.80 | 724.82 |
| 2 | MMRDA | श्री. छात्रपती शिवाजी महाराज मार्ग | 606.75 | | 606.75 | 134.83 | 148.31 | 283.14 | 471.92 |
| 3 | MMRDA | डि.पी.रोड | 1661.41 | | 1664.41 | 130.41 | 139.65 | 270.06 | 1534.00 |
| 4 | MMRDA | भुयारी गटार योजना | 6106.25 | | 6106.25 | 287.65 | 537.54 | 825.19 | 5818.60 |

टिप :- वरील विववणांमध्ये आगाऊ रकमांचा समावेश करण्यात येऊ नये फक्त कर्जाची माहिती देण्यात यावी.

(उदा. बँक/विमा कंपनीकडून घेतलेले किंवा प्रशासकिय कारणास्तव घेतलेले कर्ज.)

**मुख्यलेखाधिकारी**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

## विवरणपत्र - क्र.7 (अ)

अनामत रकमेबाबतची माहिती

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन -2015-16

(रुपये लाखात)

| अ.क्र | तपशिल | मागील शिल्लक | चालू वर्षातील जमा | एकूण जमा | परतावा/खर्च | व्यपगत | एकूण | शिल्लक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 (3+4) | 6 | 7 | 8 (6+7) | 9 (5-8) | 10 |
| 1 | सुरक्षा अनामत | 3176.26 | 2107.59 | 5283.85 | 717.48 | | 717.48 | 4566.37 | |
| 2 | निवडणूक अनामत | — | — | — | — | | — | — | |
| 3 | निविदा व इसारा | 51.12 | 2544.77 | 2595.89 | 2518.04 | | 2518.04 | 77.85 | |
| 4 | इतर | | | | | | | | |

टिप :- 1) वरील माहिती देत असताना एकूण जमा (-) परतावा/खर्च व व्यपगत (=) शिल्लक अशाप्रकारे पडताळता येणे आवश्यक आहे. 2) मागील वर्षी कळविलेल्या माहितीबरोबर थकबाकीची माहिती जुळणे आवश्यक आहे. जुळत नसल्यास त्याप्रमाणे स्पष्टीकरणासह कारणे द्यावीत.

मुख्यलेखाधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# विवरणपत्र - क्र.7 (ब)

## वर्षनिहाय शिल्लक अनामत रकमेचे विवरणपत्र

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन - 2015-16 (रुपये लाखात)

| अ.क्र | वर्ष | अनामत रकमेचा प्रकार | | | | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा अनामत | निवडणूक अनामत | निविदा व इसारा रक्कम | इतर अनामत | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | 2015-16 | 4566.37 | - | 77.86 | - | 4644.23 | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**मुख्यलेखाधिकारी**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

## विवरणपत्र - क्र.8

## महानगरपालिकेने केलेल्या गुतवणूकाचा तपशिल

## महानगरपालिकेचे नाव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन - 2015-16

(रुपये लाखात)

| अ.क्र | निधीचा प्रकार | बँकेचे नांव | गुंतवणूक केलेली रक्कम | मंजूर प्राधिकारी (ठराव क्र. व दिनांक | व्याजदर | गुंतवणूक कालावधी (दि. ते दि. | मुदत संपल्यावर प्राप्त मुद्दल व व्याज | | | मुदत संपूनही न मिळालेली रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | मुद्दल | व्याज | पुर्नगुंतवणूक | मुद्दल | व्याज | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | Pension Fund | | 22,21,90,597 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 2 | Tree Fund | | 1,21,84,864 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 3 | Provident Fund | | 28,03,38,897 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 4 | Road Fund | | 2,36,911 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 5 | Salary Reserve Fund | | 8,57,71,588 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 6 | Defined Pension Fund | | 10,53,44,538 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 7 | Depreciation Fund | | 2,49,84,033 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 8 | General Fund | | 18,13,565 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 9 | Development Fund | | 68,50,317 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 10 | Employee Welfare Fund | | 71,11,357 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 11 | Water & Sewarage Fund | | 26,87,50,650 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 12 | C.W & S.U Loan Fund | | 39,03,00,023 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 13 | JNNURM | | 8,89,229 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |
| 14 | Fire Fund | | 11,88,47,127 | – | 8.50% | 1-2 Year | - | - | - | - | - | - |

मुख्यलेखाधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिका

## विवरणपत्र- क्र.9

### स्वनिधी अंदाजपत्रकात समाज कल्याण, महिला व बाल कल्याण व अपंग कल्याण योजना अंतर्गत केलेली तरतूद व खर्चाचे विवरण

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन - 2015-16

(रुपये लाखात)

| अ क्र | विभागाचे नांव | स्वनिधीचे एकूण अंदाजपत्रक | विहित टक्केवारीप्रमाणे होणारी तरतूद | प्रत्यक्ष केलेली तरतूद | विभागाने केलेली खर्च | शिल्लक अनुशेष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | दुर्बल घटक | महसूली जमा - 27983.43 | 101.00 | 101.00 | 8.76 | | |
| | | महसूली खर्च - 25963.43 | | | | | |
| | | **निव्वळ जमा - 2020.00** | | | | | |
| 2 | महिला व बालकल्याण | महसूली जमा - 27983.43 | 101.00 | 394.93 | 271.04 | | |
| | | महसूली खर्च - 25963.43 | | | | | |
| | | **निव्वळ जमा - 2020.00** | | | | | |
| 3 | अपंग कल्याण | महसूली जमा - 27983.43 | 101.00 | 101.00 | 5.34 | | |
| | | महसूली खर्च - 25963.43 | | | | | |
| | | **निव्वळ जमा - 2020.00** | | | | | |

**मुख्यलेखाधिकारी**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# विवरणपत्र - क्र.10

## महानगरपालिका यांनी शासनास भरावयाच्या रक्कमांचा तपशिल

महानगरपालिकेचे नांव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन -2015-16

(रुपये लाखात)

| अ.क्र | तपशिल | मागील शिल्लक | चालू वर्षातील जमा | एकूण | शासनास भरलेली रक्कम | शिल्लक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 (3+4) | 6 | 7 (5-6) | 8 |
| 1 | शिक्षण व रोजगार हमीकर | - | 1331.84 | 1331.84 | 1325.62 | 6.22 | |
| 2 | पोषण अधिभार व प्रवासी कर | - | - | - | - | - | - |
| 3 | विवाह नोंदणी फी व शास्तीचा रक्कम | - | - | - | - | - | - |
| 4 | इतर | - | - | - | - | - | - |

मुख्यलेखाधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय
महानगरपालिका लेखापरीक्षण शाखा
रायगड भवन, सातवा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.
☎/ 🖷:-०२२-२७५६१६२३. Website: www.mahalfa.maharashtra.gov.in E.Mail:mca_lfa@mahalfa.in

## प्रारुप लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण

**मिरा भाईंदर महानगरपालिका लेखापरीक्षण २०१५-१६.**

मिरा भाईंदर कार्यालयाचे पत्र क्र.स्था.१८/ब/मिरा भाईंदर मनपा/ले.प./२०१५-१६/मनपालेप/९१६, दि.०५/१२/२०१९ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाच्या प्रारूप अहवालाचे दिनांक १०.१२.२०१९ ते दिनांक १७.१२.२०१९ या कालावधीत दिनांक व वेळ निश्चित करून या कार्यालयास कळविण्यात यावे असे कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने दिनांक १९.१२.२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता अंतिमीकरण करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

या अहवालावर दि. १९.१२.२०१९ रोजी चर्चा करण्यात येऊन अहवालाचे अंतिमीकरण करण्यात आले. चर्चे दरम्यान उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेऊन विहीत बदलांसह लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करण्यात येईल.

आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**भाईंदर**

उप संचालक (मनपालेप),
उपविभाग - २
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.